लोकलेखा समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या
सन २००७-२००८ च्या महसुली जमा अहवालामधील
वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.२, २.४, २.५, २.७),
महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.७, ४.२.९.१,
४.२.९.२, ४.२.१०.१, ४.२.१०.२ व ६.२), गृह (राज्य उत्पादन शुल्क)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.२, ५.३, ५.४), गृह विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र.७.२), सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व उद्योग, उर्जा व कामगार
(उद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ७.३) यावरील

सोळावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक डिसेंबर, २०१३ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.
डिसेंबर, २०१३

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या
सन २००७-२००८ च्या महसुली जमा अहवालामधील
वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.२, २.४, २.५, २.७),
महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.७, ४.२.९.१,
४.२.९.२, ४.२.१०.१, ४.२.१०.२ व ६.२), गृह (राज्य उत्पादन शुल्क)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.२, ५.३, ५.४), गृह विभागाशी संबंधित
(परिच्छेद क्र.७.२), सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व उद्योग, उर्जा व कामगार
(उद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ७.३) यावरील

सोळावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१२-२०१३

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

* (७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

(७अ) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै, २०१३ रोजीपासून)

(८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

** (९) श्री.संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

*** (१०) श्री.दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

(११) श्री.ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

**** (११अ) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून)

(१२) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१३) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

(१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(२०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(२१) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

(२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(२४) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

(२५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)

***** (२६अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून)

(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधामंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.उ.की.चव्हाण, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्री.दिलीप येवाला, अवर सचिव (समिती).
(६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.
(७) श्री.कैलास पाझारे, कक्ष अधिकारी.

*** श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.**

**** श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

***** श्री.दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

****** श्री.ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली.**

******* श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली.**

( )

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.२, २.४, २.५, २.७), महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.२.७, ४.२.९.१, ४.२.९.२, ४.२.१०.१, ४.२.१०.२ व ६.२), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.२, ५.३, ५.४), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.७.२), सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ७.३) यावरील यावर विचार करून लोकलेखा समितीचा सोळावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ३० व ३१ ऑक्टोबर, २०१२, दिनांक ६ व ७ नोव्हेंबर व दिनांक २३ व ३० जानेवारी, २०१३ रोजी अप्पर मुख्य सचिव, महसुल व गृह विभाग, प्रधान सचिव, वित्त, गृह (राज्य उत्पादन शुल्क), उद्योग व जलसंपदा विभाग तसेच सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली. तसेच दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ रोजी पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, जुने विधान भवन, मुंबई येथे भेट देऊन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र यांचे समवेत चर्चा केली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक डिसेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

विधान भवन,
नागपूर.
दिनांक : डिसेंबर, २०१३

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

( )

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
(१)	**वित्त विभाग**	
	(परिच्छेद क्र. २.२, २.४, २.५, २.७)	
(२)	**महसूल व वन (महसूल) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.२.७, ४.२.९.१, ४.२.९.२, ४.२.१०.१, ४.२.१०.२ व ६.२)	
(३)	**गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ५.२, ५.३, ५.४)	
(४)	**गृह विभाग**	
	(परिच्छेद क्र. ७.२)	
(५)	**सार्वजनिक बांधकाम विभाग**	
	(परिच्छेद क्र. ७.३)	
(६)	**जलसंपदा विभाग**	
	(परिच्छेद क्र. ७.३)	
(७)	**उद्योग उर्जा व कामगार (उद्योग) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ७.३)	

वित्त विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील परिच्छेद क्र. २.२ "मोटार स्पिरीट कर अधिनियमाखाली महसूल हानी", परिच्छेद क्रमांक २.४ "प्रोत्साहन योजनेखाली विक्रीकराची चुकीची सुट", परिच्छेद क्रमांक २.५ "निर्यात विक्रीतुन नियमबाह्य सुट देणे", परिच्छेद क्र. २.७ "चुकीची वजावट देणे" यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

मोटार स्पिरीट कर अधिनियमाखाली महसूल हानी

मुंबई मोटार स्पिरीट विक्री कराधान अधिनियम, १९५८ व त्याखालील नियमांप्रमाणे आयातदार किंवा उत्पादकाने मोटार स्पिरीटच्या केलेल्या प्रथम विक्रीवर कर आकारणी करण्यात येते. गळती/बाष्पीभवन, परिवहन इत्यादिच्या विनिर्दिष्ट हानीच्या तुटीची आकडेवारी वजावट करुन विक्रीकर लागू करण्यास योग्य उलाढालीची संगणना करण्याबाबत कायद्यात/नियमावलीत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. १९७६ मध्ये तेल दर समितीने (OPC) पेट्रोल आणि डिझेलकरीता बाष्पीभवन/साठा (इतर उत्पादनासहीत) अनुज्ञेय हानीचे प्रमाणक अनुक्रमे ०.५ टक्के आणि ०.१२ टक्के इतके नियत केले.

एप्रिल २००८ मध्ये, नरिमन पॉइन्ट विभागाच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली असता असे आढळले की, १९९८-९९ आणि २००२-०३ या कालावधीकरीता हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आाणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, लिमिटेड यांच्या नोव्हेंबर २००६ ते मार्च २००८ मध्ये पूर्ण करण्यात आलेल्या निर्धारणात तेल दर समितीच्या प्रमाणकापेक्षा, पेट्रोल, डिझेल आणि एव्हीयेशन टर्बाइन फ्युलच्या १,०१४.७८ लाख लिटरच्या अधिक तुटीचा दावा मान्य केला. परिणामी रु. ६२.३४ कोटी महसूलाची हानी झाली.

ही प्रकरणे एप्रिल २००८ मध्ये निदर्शनास आणून दिल्यानंतर, निर्धारणा अधिकाऱ्याने एप्रिल २००८ मध्ये विदीत केले की, लाभाचा विचार करुन निव्वळ तुटीची परिगणना करणे सुसंगत ठरेल. हे उत्तर समर्थनीय नाही कारण, तेल दर समितीच्या प्रमाणकात फक्त ऑईल कंपन्यांना लागू असलेली अनुज्ञेय हानी विनिर्दिष्ट केली आहे. म्हणून अधिनियमात कोणतीही विशिष्ट तरतूद नसल्याने ही प्रमाणके मान्य करणे आवश्यक आहे.

ही बाब विभागाला आणि शासनाला मे २००८ मध्ये कळविण्यात आली त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८).

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

व्यापाऱ्याचे नाव : मे.इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन

नोंदणी क्रमांक : परवाना क्रमांक : एमएसटी/आयडी-३४

परवाना क्रमांक : एमएसटी/आयएफ -२७

कालावधी : २०००-२००१ व २००१-२००२

निर्धारण आदेशाचा दिनांक : २७-०३-२००८ व ३१-०३-२००८

तेल दर समिती ही काही विशिष्ट हेतूने निकष ठरवते. तसेच, हे फक्त निकष आहेत की, जे तेलकंपन्यांनी प्राप्त करणे अपेक्षित असते. प्रत्यक्षात पेट्रोल/डिझेल तेलाची हानी ही तेलदर समितीने नियत केलेल्या निकषापेक्षा जास्त किंवा कमी होवू शकते. जर हानी तेलदर समितीच्या निकषापेक्षा जास्त झाली तर त्याचा अर्थ असा होत नाही की, व्यापाऱ्याने काही विक्री व्यवहार लपविलेला आहे. किंवा हानी कमी झाली तर त्याचा अर्थ असा होत नाही की, तेलाची विक्री झाली नाही. त्यामुळे तेलाची हानी काही मर्यादबाहेर होत असेल आणि कायद्यात तशी तरतूद नसेल तर त्या मर्यादेबाहेरच्या हानीला विक्री समजून त्यावर कर आकारता येणार नाही. त्यासाठी कायद्यात तशी तरतूद करावी लागेल. जी सध्या अस्तित्वात नाही. त्यामुळे नियत निकषापेक्षा जास्त मंजूर केलेल्या तुटीस विक्री समजून कर लावता येणार नाही. सदर मुद्दा दिनांक २४.६.०८ रोजी वर्ष ०२-०३ च्या लोकलेखा समितीच्या बैठकीत चर्चिला गेला. (कॅग २००२-०३, परिच्छेद क्र. २.३.१/प्रा.प.क्र.५४/०२-०३)

ज्ञापन :

व्यापाऱ्याचे नाव : मे.हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.

नोंदणी क्रमांक : परवाना क्रमांक : एमएसटी/आयएफ-८

कालावधी : १९९८-१९९९ व १९९९-२०००

निर्धारणा आदेशाचा दिनांक : १७.११.२००६ व २९.३.२००७

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप अमान्य

तेल दर समिती ही काही विशिष्ट हेतुने निकष ठरवते. तसेच, हे महत्वाचे आहेत की हे फक्त निकष आहेत की, जे तेलकंपन्यांनी प्राप्त करणे अपक्षित असते. प्रत्यक्षात पेट्रोल/डिझेल तेलाची हानी ही तेलदर समितीने नियत केलेल्या निकषापेक्षा जास्त किंवा कमी होवू

शकते. जर हानी तेलदर समितीच्या निकषापेक्षा जास्त झाली तर त्याचा अर्थ असा होत नाही की, व्यापाऱ्याने काही विक्री व्यवहार लपविलेला आहे. किंवा हानी कमी झाली तर त्याचा अर्थ असा होत नाही की, तेलाची विक्री झाली नाही. त्यामुळे तेलाची हानी काही मर्यादेबाहेर होत असेल आणि कायद्यात तशी तरतूद नसेल तर त्या मर्यादेबाहेरच्या हानीला विक्री समजून त्यावर कर आकारता येणार नाही. यासाठी कायद्यात तशी तरतूद करावी लागेल. जी सध्या अस्तित्वात नाही. त्यामुहे नियम निकषापेक्षा जास्त मंजूर केलेल्या तुटीस विक्री समजून कर लावता येणार नाही. सदर मुद्दा दिनांक २४.६.०८ रोजी वर्ष ०२-०३ च्या लोकलेखा समितीच्या बैठकीत चर्चिला गेला. (कॅग २००२-०३, परिच्छेद क्र. २.३.१/प्रा.प.क्र.५४/०२-०३)

वसुली कार्यवाही

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? नाही.

प्रोत्साहन योजनेखाली विक्रीकराची चुकीची सुट

मुं.वि.क. अधिनियम आणि नियमांतर्गत सामुहीक प्रोत्साहन योजनेखाली कोणताही पात्र उद्योग घटक योग्यता आणि पात्रता प्रमाणपत्रातील कालावधीत योग्यता प्रमाणपत्रात नमूद केलेल्या अनुज्ञेय आर्थिक मर्यादेपर्यंतचा विक्रीकर, खरेदी कर, केंद्रीय विक्रीकर आणि उत्पादीत मालावरील विक्रीकर यातून सुटीचा प्रोत्साहन लाभ घेण्यास पात्र असतात. व्यापाऱ्याच्या निर्धारणेनंतर व्यापाऱ्याने वर्षभरात घेतलेल्या संचयी लाभाच्या प्रमाणाची (सं.ला.प्र.) निर्धारणा प्रस्तुत म.वि.क. अधिनियम, १९५९ मधील तरतूदींनुसार करण्यात येते. प्रत्येक वर्षाच्या आरंभी उपलब्ध आर्थिक मर्यादेतून हे संचयी लाभाचे प्रमाण कमी केले जाते. जर संचयी लाभाचे प्रमाण आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त झाल्यास ती, जास्तीची रक्कम व्यापाऱ्याकडून वसुलीस पात्र असते. याशिवाय संबंधित विक्रीकर अधिनियमानुसार दोन टक्के (जुलै २००४ पासून १.२५ टक्के) दराने व्याज आणि दंड आकारणीय असतात.

डिसेंबर २००५ मध्ये नाशिक विभागाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे दिसून आले की, वनस्पती खाद्य तेल आणि तेल वड्यांचे उत्पादन करणाऱ्या एका व्यापाऱ्याच्या १९९९-०० सालाच्या डिसेंबर २००४ मध्ये पूर्ण केलेल्या निर्धारणेत निर्धारणा अधिकाऱ्याने रु. १२.८६ कोटीच्या विक्रीपैकी रु. ११.११ कोटीच्या विक्रीकर कर आकारला नाही आणि रु. १.७५ कोटीच्या विक्रीवर कर कमी आकारला. याची परिणीती संचयी लाभाच्या प्रमाणाची चुकीची निर्धारणा करण्यात झाली आणि त्यामुळे विहित आर्थिक मर्यादेपेक्षा रु.२४.९० लाखाचा जास्त

लाभ घेण्यात आला. परिणामी रु. ५.५७ लाख व्याजासहित रु. ३०.४७ लाखाची न्यून निर्धारणा झाली.

ऑक्टोबर २००७ मध्ये कोल्हापूर विभागाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, डिसेंबर २००६ मध्ये वर्ष २००१-०२ आणि २००४-०५ मधील कालावधीसाठी पूर्ण करण्यात आलेल्या एका व्यापाऱ्याच्या निर्धारणेत योग्यता प्रमाणपत्रानुसार लॅमिनेटेड करण्यापूर्वीच्या पार्टीकल बोर्डवर विक्री करातून सूट असताना सुध्दा एकूण रु. ४८.८७ कोटीच्या लॅमिनेटेड पार्टीकल बोर्डच्या उत्पादन आणि विक्रीवरील विक्रीकरातून चुकीची सूट देण्यात आली होती. परिणामी रु. १.८९ कोटी व्याजासहीत आणि अधिकतम रु. ६.२६ कोटी शास्तीसह रु. १४.४१ कोटी कराची न्यून निर्धारणा झाली.

ही बाब विभागास जानेवारी २००६ आणि नोव्हेंबर २००७ मध्ये आणि शासनास मे २००८ मध्ये कळविण्यात आली याची उत्तरे प्राप्त झाली नाहीत. (नोव्हेंबर २००८)

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

व्यापाऱ्याचे नाव : मे. रामदेव ऑईल इंडस्ट्रीज लि.

नोंदणी क्रमांक : ४२५००३/एस/११२

कालावधी : १९९९-२०००

निर्धारणा आदेशाचा दिनांक : १४.१२.२००४

लेखा आक्षेप मान्य/अमान्य : लेखा आक्षेप मान्य

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मुं.वि.का. १९५९ च्या कलम-५७ खाली कार्यवाही सुरु केलेली आहे.

वसुली कार्यवाही :

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते का ? नाही.

पुनर्विचारणेस उत्तर : विक्रीकर सह आयुक्त (व्यवसायकर) पुणे, यांनी मुं.वि.का. कलम ५७ खाली दिनांक २४.१२.२००९ अन्वये सुधारीत आदेश पारीत करुन रु. ७५.१७ लाखांची मागणी काढलेली आहे. विक्रीकर सह आयुक्त, पुणे यांना या कार्यालयाने पत्र पाठवून वसुली याबाबतचा अहवाल पाठविण्यास सांगितले आहे.

अनुपालन अहवाल : दिनांक २१.०५.२०१० रोजी मुं.वि.का. कलम ६२ खाली आदेश पारित करुन रु. ८४.६० लाख एवढी मागणी काढण्यात आली आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र.२ : सदर प्रकरणात स्मरणपत्र पाठवून वसूली अहवाल मागविला आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. ३ : सदर प्रकरणात व्यापाऱ्याने विक्रीकर सह आयुक्त (अपिले) नाशिक यांचे कार्यालयात अपिल केले आहे. अपिल प्रलंबित आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. ४ : न्यायाधिकरणात अपिल प्रलंबित आहे.

अनुपालन अहवाल : दिनांक २४.०७.२०१० च्या अहवालानुसार ३९ नंबरची नोटीस काढून बँक खाते दिनांक २२.२.२०१० रोजी गोठवले. जमीन महसूल कायद्याखाली नमुना-१ ची नोटीस व्यापाऱ्याला दिनांक ७.१२.२००९ रोजी काढून दिनांक १८.१२.२००९ रोजी बजावली. परंतु त्यापूर्वीच व्यापाऱ्याने दिनांक २८.१०.२००९ रोजी मालमत्ता विकली होती. त्यामुळे सदर मालमत्तेवर बोजा टाकता आलेला नाही. व्यापाऱ्याने महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणात अपिल क्र. ५२/२०११ अन्वये अपिल दाखल केलेले आहे. विक्रीकर उप आयुक्त, ब-२२६, जळगांव यांनी अनुक्रमे दिनांक ०५.०१.२००९, ०२.०९.२००९ व २९.०७.२०११ रोजीच्या पत्राने डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज व डेव्हलपमेंट कमिशननर इंडस्ट्रीज यांना व्यापाऱ्याकडून १ कोटी ९८ लाख थकबाकीची वसुली करण्याबाबत कळविलेले आहे. व्यापाऱ्याने धंदा बंद केला असून फॅक्टरी दिनांक २८.१०.२००९ रोजी विकलेली आहे. सदर व्यापाऱ्याचे सामुहिक प्रोत्साहन योजनेखालील सवलत प्रमाणपत्र सुरुवातीपासूनच रद्द करण्यात आलेले आहे. व्यापाऱ्यास दोन प्रोत्साहन योजना दिनांक १.१२.९५ व १.७.९८ पासून मंजूर होत्या.

केंद्रिय विक्रीकर कायद्याखाली व्यापाऱ्याकडे रु. ६.५५ कोटी थकबाकी असून व्यापाऱ्याकडे जप्त करण्याजोगी कोणतीही चल व अचल संपत्ती नाही. कंपनीच्या संचालकाच्या मालमत्तेची माहिती घेण्यासाठी त्यांच्यावर केंद्रिय विक्रीकर कायदा १९५६ च्या कलम १८ अन्वये समन्स बजावण्यात आलेले आहे.

व्यापाऱ्याचे नाव : मे.इकोबोर्ड इंडस्ट्रीज लिमिटेड

नोंदणी क्रमांक : ४१५४०७/एस/३

कालावधी : ०१.०२.२००२-०३, ०४.०४.२००५

निर्धारण आदेशाचा दिनांक : ०४.०९.२००६, १६.११.२००६, ०८.१२.२००६

दोष निवारण कृती : आक्षेप क्र. १ अमान्य, क्र. २ मान्य

१) विक्रीकर सह आयुक्त, पुणे यांच्या अहवालावरुन इंडियन स्टॅण्र्डच्या परिच्छेद क्र. ३.२ खालील प्रिलॅमिनेटेड पार्टीकल बोर्डच्या शास्त्रीय परिभाषेनुसार लॅमिनेटेड पार्टीकल बोर्ड व प्रिलॅमिनेटेड पार्टीकल बोर्ड हे एकच असून ते १३ टक्के ऐवजी ८ टक्के दराने कर योग्य आहे.

२) उलाढालकर १ टक्के ऐवजी १.५ टक्के ने लावणे योग्य असल्याचे मान्य केलेले असून कालावधी ०१-०२ करीता सुधारीत आदेशाची कार्यवाही सुरु आहे.

या कार्यालयाने पत्र क्र. ६८१, दिनांक १३.४.२०१० अन्वये विक्रीकर सह आयुक्त (व्यवसायकर) पुणे यांना सुधारीत कार्यवाही लवकरात लवकर करण्याबाबत कळविले आहे.

वसुली कार्यवाही : सदर प्रकरणामध्ये मुं.वि.का. व के.वि.का. खाली दिनांक २५.०८.२०१० रोजी कलम ५७ खाली सुधारीत आदेश पारीत करुन खालीलप्रमाणे अतिरिक्त मागणी काढण्यात आली.

वर्ष	मुविका	केंविका
०१-०२	१,५८,९०,८९५	२,३८,५२,११५
०२-०३	२,९५,९३,४०८	३०,४४,५४१
०३-०४	२,०२,३७,७३०	१२,८४,२९०
०४-०५	१,६४,२४,१०९	३१,५३,९६०
एकूण	**१०९४.७९ लाख**	

त्याप्रमाणे CQB नव्याने गणना करुन निश्चित करण्यात आला. तसा अहवाल दिनांक २४.१०.१० रोजी महालेखाकारांना पाठविण्यात आला. सदर प्रकरण महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणात अपिल क्र. ३४-४१/२०१० नुसार प्रलंबित होते. त्यात दिनांक ०५.०५.२०११ रोजी महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाने निर्णय दिला असून अपिल आदेशाप्रमाणे कलम ५७ खाली आदेश रद्द करुन मुळ निर्धारणा आदेश कायम करण्यात आले आहेत. तसा अहवाल दिनांक ०२.१२.११ रोजी महालेखापालांना पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात वसुली रिक्त. अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते का ? नाही.

निर्यात विक्रीतुन नियमबाह्य सूट देणे

भारताच्या सीमाशुल्क हद्दीबाहेर माल पाठविताना अशी निर्यात एकतर मालाची विक्री किंवा खरेदी करुन अथवा भरणपत्र, गोदी अधिपत्र, रेल्वे पावती इत्यादीच्या मालाच्या हक्कपत्राच्या दस्तऐवजांच्या हस्तांतरणाने झाली असेल. तर अशी विक्री किंवा खरेदी भारताबाहेरील प्रदेशात निर्यातीच्या ओघात झाली असे समजण्यात येईल.

अंधेरी आणि नरिमन पॉइन्ट विभागाच्या चाचणी तपासणीत असे निदर्शनास आले की, तीन व्यापाऱ्यांच्या २००१-०२ आणि २००३-०४ मधील कालावधीतील रु. ९.३९ कोटी विक्रीच्या व्यवहारांची २००५-०६ मध्ये निर्धारण करताना भरणपत्र, गोदी अधिपत्र, रेल्वे पावती इत्यादी कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसतानासुध्दा ह्या विक्रीला निर्यात विक्री समजून करातून सूट देण्यात आली. परिणामी, रु. ५८ लाखाची न्यून निर्धारणा झाली.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अ.क्र.	एल.ए. आर.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव/नों.दा.क्र.	कालावधी निर्धारणेचे वर्ष	माल	निर्यातीची रक्कम (लाखात)	कराचा दर	कर (लाखात)	शेरा
१.	२००६०७ ४३६	सी-४७१ अंधेरी	मे.करंट अफेअर्स ७२/एस/३२२८	२०००-०१ ०५-०६	तयार कपडे	३८९.१६	५.४	२१.०१	निर्धारणा धारिणीची पाहणी केली असता बील ऑफ लॅडींग, निर्यातीबाबतची प्रमाणपत्रे बँक रीअलायझेशन सर्टीफिकेट इत्यादी निर्धारणा धारणीत होते. **पुनर्विचारणा :-** की डॉक्युमेंटस धारिणी २ मधील पृष्ठ क्रमांक ३८१ वर दिनांक ०६.०६.०८ रोजी संबंधित अधिकाऱ्यांनी असे म्हटले आहे की लेखा परिक्षणात जो मुद्दा उपस्थित केला तो तपासला जाईल, बील ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टीफिकेट व्यापाऱ्याकडून मागविले जाईल आणि अहवालात असे म्हटले आहे की हे सर्व निर्धारणा धारिणीत होते, याची खातरजमा करण्यात यावी. उत्तर : संबंधित विभागास या कार्यालयाचे पत्र क्र. ४५० दिनांक १७.०३.२००९ अन्वये पुनर्विचारणा कळविण्यात आली आहे व स्मरणपत्र २९.०५.२००९ रोजी पाठविलेले असून अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा क्र. १ :-** पुढील अहवाल कळविण्यात यावा. **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त, अंधेरी यांचा आलेला अहवाल बिल ऑ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टिफिकेटच्या प्रतीसह या कार्यालयाचे पत्र क्र. ४८१, दिनांक ०८.०३.२०१० अन्वये पाठविला आहे.

२.	२००६०७ ४३६	सी- ४७१ अंधेरी	मे.करंट अफेअर्स ७२/एस/३२२८	०१-०२/०५-०६	तयार कपडे	२९०.३२	५.४	१५.६८	निर्धारणा धारिणीची पाहणी केली असता बील ऑफ लॅडींग, निर्याती बाबतची प्रमाणपत्रे बँक रीअलायझेशन सर्टीफीकेट इत्यादी निर्धारणा धारणीत होते. **पुनर्विचारणा :** की डॉक्युमेंट्स धारिणी २ मधील पृष्ठ क्रमांक ६८१ वर दिनांक ०६.०६.०८ रोजी संबंधित अधिकाऱ्यांनी असे म्हटले आहे की लेखा परिक्षणात जो मुद्दा उपस्थित केला तो तपासला जाईल, बील ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टीफिकेट व्यापाऱ्याकडून मागविले जाईल आणि अहवालात असे म्हटले आहे की, हे सर्व निर्धारणा धारिणीत होते, याची खातरजमा करण्यात यावी. **उत्तर :** संबंधित विभागास या कार्यालयाचे पत्र क्र. ४५०, दिनांक १७.०३.२००९ अन्वये पुनर्विचारणा कळविण्यात आली आहे व स्मरणपत्र २९.०५.२००९ रोजी पाठविलेले असून अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा क्र. १ :** पुढील अहवाल कळविण्यात यावा. **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त, अंधेरी यांचा आलेला अहवाल बिल ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट्स प्रतीसह या कार्यालयाने पत्र क्र. ४८१, दिनांक ०८.०३.२०१० अन्वये पाठविला आहे.
३.	२००६०७ ४४०	के- ४७८ अंधेरी	मे.रेकॉन डाईज ॲड टुल्स ९३/एस/१०	०२-०३/०५-०६	मशिनरी पार्ट्स	९५.२९	१५.०३	१४.५८	व्यापाऱ्याने निर्यातीबाबतची सर्व कागदपत्र सादर केली आहेत. आयातदाराने निर्यात केलेल्या वस्तुनिहाय यादी व इतर तपशील न पाठविल्यामुळे निर्यातीची पडताळणी करता येत नाही. पुनर्विचारणा कळविण्यात आली आहे व स्मरणपत्र २९.०५.२००९ रोजी पाठविलेले असून अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा क्र. १ :** पुढील अहवाल कळविण्यात यावा. **उत्तर :** महालेखापाल यांनी त्यांचे पत्र दिनांक ०७.०१.२००९ अन्वये परदेशी खरेदीदारांना निर्यात केलेल्या मालाची वस्तुनिहाय यादी इतर तपशीलासह मागितलेली होती. तथापि, विक्रीकर सह आयुक्त यांनी त्यांचे पत्र दिनांक २२.०२.२०१० अन्वये परदेशी खरेदीदर व रक्कम यांची यादी पाठविलेली असून वस्तुचा उल्लेख नसल्याने

									त्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ४०३ दिनांक १८.०३.२०१० अन्वये वरील प्रमाणे अहवाल पाठविण्यास सांगितलेले आहे. **पुनर्विचारणा क्र. २ :** पूर्ण व अंतिम अहवाल महालेखापालांना पाठविण्यात यावा. **उत्तर :** व्यापाऱ्याने सादर केलेली निर्यात बिलांची यादी तसेच विक्री बिले व बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट इत्यादी दस्तऐवजांचे पुरावे पाठविलेले आहेत. विक्री बिलावरुन वस्तुचा शोध होतो. पडताळणीकरीता कागदपत्रे या कार्यालयाचे पत्र क्र. ब-२७४० दिनांक २५.१०.२०१० नुसार आपल्या कार्यालयास पाठविलेले आहेत.
४.	**२०००७० ८२७६**	**डी-१०४० नरीमन पॉईंट**	**मे.जनरल ट्युब अँड हार्डवेअर मार्ट ०९/एस/८५५**	**०३-०४/०५-०६**	**आयर्न अँड स्टील**	**१६३.८३**	**४**	**६.५५**	महालेखापांनी त्यांचे पत्र क्र. एसटीआरए ४/२००७०८२७६/मांडवी विभाग/११३९, दिनांक २०.०१.२००९ अन्वये सदर मुद्दा बंद केलेला आहे. **पुनर्विचारणा १:** एसटीआरए कडून मुद्दे बंद केले आहेत ते एसआरए (आर) यांच्याकडे स्थानांतरीत झालेले असल्याने अहवाल त्यांना पाठवावेत. **उत्तर :** सदर प्रारुप परिच्छेद मध्ये ४(१) व ४(२) हे मुद्दे अंतर्भूत असून वरीष्ठ लेखा परिक्षा अधिकारी एसटीआरए यांनी त्यांचे पत्र क्र. विसलेप/४/२००७०८२७६/मांडवी विभाग/११३९, दिनांक २०.०१.२००९ अन्वये बंद केलेले असून सदर बाब महालेखापाल चर्चगेट मुंबई -२० यांना कळविलेले आहे. (ब-५१३, दिनांक १९.०३.२०१०) **पुनर्विचारणा २:** जे मुद्दे एसवटीआरएने बंद केलेले आहेत ते अस्तित्वात आहेत असे समजून या कार्यालयांशी पत्र व्यवहार करावा. **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) नरीमन पॉईंट यांना पुनर्विचारणा कळविली आहे. **पुनर्विचारणा ३:** प्रकरणातील अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा. **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) नरीमन पॉईंट यांना पुनर्विचारणा केली आहे. अहवाल प्रलंबित आहे.

									पुनर्विचारणा ४: अंतिम अनुपालन अहवाल सादर करावा. उत्तर : विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) नरीमन पॉईंट यांना ४ थी पुनर्विचारणा या कार्यालयाने पत्र क्र. ब-६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार कळविली आहे. सदर विभागाकडून पत्र क्र. ब-५८६ दिनांक ०८.०६.२०१३ अन्वये त्वरीत अहवाल मागविण्यात आला आहे. अनुपालन अहवाल : महालेखापाल यांचे आक्षेपानुसार निर्यातीच्या रकमेत तफावत असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. निर्धारणा आदेशाचे अवलोकन केले असता निर्यातीची रक्कम रु. १,६०,४४,८४०/- ही बरोबर असून महालेखापांनी दर्शविलेली निर्यातीची रक्कम रु. १,६३,८३,४६३/- ही निर्यातीची रक्कम नसून आयातीची रक्कम आहे.

निर्यात विक्रीतून नियमबाह्य सूट देणे

सात विभागांच्या चाचणी तपासणीमध्ये असे दिसून आले की, १४ व्यापाऱ्यांच्या २००१-२००२ आणि २००४-२००५ मधील कालावधीतील २००५-०६ आणि २००७-०८ दरम्यान निर्धारणा करताना तयार कपडे, यंत्राचे सूटे भाग इत्यादीच्या रु. २१९.१८ कोटी विक्रीला निर्यात म्हणून मान्यता दिली होती आणि करातून सूट दिली होती. सीमाशुल्क विभागाच्या निर्यात तपशीलाबरोबर ह्या विक्रीची पडताळणी केली असता, फक्त एकूण रु. ८१.३८ कोटी निर्यात विक्रीची नोंद झाल्याचे आढळून आले. अशा प्रकारे रु. १३७.८० कोटीच्या निर्यात विक्रीच्या दाव्यावर करातून चुकीची सूट दिली गेल्याने रु. ७.०८ कोटी कराची न्यून निर्धारणा झाली.

सदरची बाब विभागास आणि शासनास जुलै २००८ मध्ये कळविण्यात आली त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८)

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अ.क्र.	विभाग	व्यापाऱ्याचे नांव/नों.दा.क्र.	माल	कालावधी निर्धारण वर्ष	आय. ई.सी. क्रमांक	निर्धारण आदेशा प्रमाणे निर्यात (रुपये लाखात)	सिमा शुल्क विभागाप्रमाणे निर्यात (रुपये लाखात)	तफावत	कराचा दर (%)	अंतर्भूत कर (रुपये लाखात)	शेरा
१	क-४७२ अंधेरी	मे.रुपम ६०/एस/६२१	तयार कपडे	०१-०२ /०७-०८	३८८०७ ८८३९	८०५.७५	२११.८१	५९३.९४	५.४	३२.०७	एकूण निर्यातीची यादी व निर्यातीबाबतची सहपत्रे म्हणजेच बील ऑफ लॅडींग एअरवेज बिले निर्यातीची सर्टिफिकेटे इत्यादी अभिलेखावर आहेत, याची पुर्णखातरजमा करुनच निर्यातीची सवलत मान्य केली आहे. **पुनर्विचारणा :** बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट व संबंधित बिल ऑफ लॅडींग जुळत नाही. **उत्तर :** संबंधित विभागास पुनर्विचारणा दिनांक १८.०३.२००९ रोजी कळविण्यात आलेली आहे व २९.०५.२००९ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा क्र. २ :** पुढील अहवाल पाठवावा. **उत्तर :** सविआ यांनी त्यांच्या अहवालासोबत विक्री बिले व संबंधित बिल ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टिफिकेटच्या प्रती नमुन्या दाखल पाठविलेले आहे. विक्री बिलाशिवाय बिल ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट एकमेकांशी फक्त मालाचे वर्णन व बिल क्रमांक इत्यादी बाबतीत जुळतील. तथापि, बाकीचे तपशील जुळणार नाहीत. या कार्यालयाने पत्र क्र. २५३० दिनांक २८.०९.२०१० नुसार आपल्या कार्यालयात संबंधित कागदपत्रे पडताळणीसाठी पाठविली आहेत.

	क-४७२ अंधेरी	**मे.रविराव ल ॲड सन्स १३/एस/२ १८९**	**तयार कपडे**	**०१-०२/ ०७-०८**	**३८८१६ ६५२७**	**२२९.११**	**५२.५८**	**१७६.५२**	**५.४**	**९.५३**	निर्यातीची पूर्ण यादी अभिलेख्यावर ठेवली आहे. संपूर्ण निर्यात ही जे. एन. पी. टी. मार्फत करण्यात अलेली असून वैध पुराव्यांच्या आधारे, खातरजमा करुन निर्यात मान्य केली आहे. **पुनर्विचारणा :** बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट व संबंधित बिल ऑफ लँडिंग जुळत नाही. संबंधित विभागास पुनर्विचारणा दिनांक १८.०३.२००९ रोजी कळविण्यात आलेली आहे व २९.०५.२००९ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा क्र.२ :** बिले, बिल ऑफ लॅडींगच्या इ. च्या नमुना प्रती पाठविण्यात याव्यात. **उत्तर :** सविआ यांनी त्यांच्या अहवालासोबत विक्री बिले व संबंधित बिल ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टिफिकेटच्या प्रती नमुन्या दाखल पाठविलेले आहेत. विक्री बिलाशिवाय बिल ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट एकमेकांशी फक्त मालाचे वर्णन व बिल क्रमांक इत्यादी बाबतीतच जुळतील. तथापि, बाकीचे तपशील जुळणार नाहीत. या कार्यालयाने पत्र क्र. २५३०, दिनांक २८.०९.२०१० नुसार आपल्या कार्यालयात संबंधित कागदपत्रे पडताळणीसाठी पाठविली आहेत.
३	**बी-१९१ ठाणे**	**मे.युनी डेरीटेंड लि. ६०७/एस-२**	**अन-मशिन्ड कास्टींग**		**३८८०७ ८८३९**	**९८७.२७**	**५६३.७०**	**४२३.३८**	**१५.३**	**६४.७८**	व्यापाऱ्यासह कागदपत्रासह बोलावून प्रत्येक निर्यात व्यवहार व त्यातील बिले, बिल ऑफ लॅडींग, बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट पडताळून पाहिले. व्यापाऱ्याने सर्व नोंदी व्यवस्थित घेतलेल्या आहेत. त्यात काहीही त्रुटी आढळल्या नाही. त्यामुळे दिलेल्या निर्यातीची सवलत योग्य आहे. **पुनर्विचारणा :** सदर प्रकरणात Details सादर करावेत. **उत्तर :-** पुनर्विचारणा संबंधित विभागास कळविली असून Details म्हणजे नेमके काय अपेक्षित आहे यांच्याबाबत महालेखापालांना पत्र दिनांक

											१८.०३.२०१० अन्वये कळविण्याची विनंती केली आहे. **पुनर्विचारणा क्र.२ :** बिले, बिल ऑफ लॅडींग इ. च्या नमुना प्रती पाठविण्यात याव्या. **उत्तर :** या कार्यालयाचे पत्र क्र. ब-८१३, दिनांक १४.०५.२००९ अन्वये आपल्या कार्यालयात अहवालासोबत निर्यातीची कागदपत्रे (बिले व बिल ऑफ लॅडींग इ.) पाठविली आहेत. **पुनर्विचारणा ३ :** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. पुन्हा सदर अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा. **उत्तर :** या कार्यालयाचे पत्र ब-५०२३, दिनांक ०७.०३.२०११ नुसार आवश्यक सहपत्रानुसार अनुपालन अहवाल सादर करण्यात आला आहे. **पुनर्विचारणा ४:** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ? **उत्तर :** या कार्यालयाने पत्र क्रमांक ब-६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार विक्रीकर सह आयुक्त ठाणे यांना पुनर्विचारणा कळविले असून अहवाल प्रलंबित आहे. **अनुपालन अहवाल :** कस्टम प्राधिकाऱ्यांनी त्यांचेकडील इलेक्ट्रॉनिक्स फॉर्ममध्ये असलेला डाटा दिला आहे. परंतु त्यांचेकडील मॅन्युअल फॉर्म मध्ये असलेला डाटा दिलेला नाही. त्यामुळे निर्यातीच्या रकमेची मेळजुळणी करता आलेली नाही. तसेच महालेखापाल यांनी सुध्दा मॅन्युअल डाटा आणलेल नाही असे दिसते. त्यामुळे निर्यातीची मेळजुळणी होत नाही. परंतु निर्धारणा अधिकाऱ्याने सर्व निर्यातीची कागदपत्रे तपासून निर्यात मान्य केली आहे. त्यामुळे मानय केलेली निर्यात बरोबर आहे.

४	बी-१९१ ठाणे	मे.आर.के. कंट्रोल इंस्ट्रुमेंट ६०४/एस-१११४	कंट्रोल पॅनल	०२-०३ ०५-०६	३८८०४ २३११	३४६.९२	११६.५२	२३०.४०	१५.३	३५.२५	व्यापाऱ्यासह कागदपत्रासह बोलावून प्रत्येक निर्यात व्यवहार व त्यातील बिले, बिल ऑफ लॅडींग, बँक रिअलायझेशन सर्टिफिकेट पडताळून पाहिले. व्यापाऱ्याने सर्व नोंदी व्यवस्थित घेतलेल्या आहेत. त्यात काहीही त्रुटी आढळल्या नाही. त्यामुळे दिलेल्या निर्यातीची सवलत योग्य आहे. **पुनर्विचारणा १ :** सदर प्रकरणात Details सादर करावेत. **उत्तर :** पुनर्विचारणा संबंधित विभागास कळविली असून Details म्हणजे नेमके काय अपेक्षित आहे यांच्याबाबत महालेखापालांना पत्र दिनांक १८.०३.२०१० अन्वये कळविण्याची विनंती केली आहे. **पुनर्विचारणा २ :** बिले, बिल ऑफ लॅडींग इ. च्या नमुना प्रती पाठविण्यात याव्या. **उत्तर :** या कार्यालयाचे पत्र क्र. ब-८१४, दिनांक १४.०५.२००९ अन्वये आपल्या कार्यालयास अहवालासोबत निर्यातीची कागदपत्रे (बिल, बिल ऑफ लॅडींग इ.) पाठविली आहेत. **पुनर्विचारणा ३:** विभागाने कस्टम प्राधिकाऱ्याकडून निर्यातीच्या रकमेबाबत खातरजमा केली आहे काय ? कस्टमच्या लेखा परिक्षणात रु. ११६.५२ लाख निर्यात झाली असे कळविले असता विभागाने रु. ३४६.९२ लाखांची मंजूर केली. **उत्तर :** या कार्यालयाने पत्र क्र. ब-५०२२, दिनांक ०७.०३.२०११ नुसार निर्यातीबाबतीत सहपत्राच्या प्रती अहवालासोबत सादर केल्या आहेत. विभागास आक्षेप अमान्य आहे. **पुनर्विचारणा ४:** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ?

											उत्तर : या कार्यालयाने पत्र क्रमांक ब-६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार विक्रीकर सह आयुक्त ठाणे यांना पुनर्विचारणा कळविले असून अहवाल प्रलंबित आहे. **अनुपालन अहवाल :** महालेखापालांनी एअर कागो्र, सहार यांचेकडून इ ालेला निर्यातीचा आकडा दिलेला आहे. परंतु व्यापाऱ्याने त्या व्यतिरिक्त मुंबई व जे.एन.पी.टी. या दोन बंदरातून निर्यात केलेली आहे. त्यामुळे महालेखापालांनी दर्शविलेली निर्यात अपूर्ण आहे. बँक सर्टिफिकेट ऑफ एक्सपोर्ट रिअलायझेशनच्या आधारे निर्धारणा अधिकाऱ्याने निर्यात मान्य केली असून ती बरोबर आहे.
५	**सी-३०७ नरिमन पॉईंट**	**मे.गिरॅच इंटरनॅशनल ४००००१/ एस/७०**	**फार्मास्युटीकल्स व तयार कपडे**	**०३-०४ ०६-०७**	**३०१०६ ७५६२**	**४३७.६५**	**११६.८०**	**३२०.८५**	**५.४**	**१७.३३**	स्मरणपत्र दिनांक १८.०३.२००९ व २५.०५.२००९ ला काढलेले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा :** पुढील अहवाल पाठवावा. **उत्तर :** विक्रीकर सहआयुक्तांच्या दिनांक ११.०२.२०१० च्या पत्रानुसार अद्याप अहवाल प्रलंबित आहे. **पुनर्विचारणा २ :** अहवाल पाठविण्यात यावा. **उत्तर :** विसआ (प्रशासन) नरीमन पॉईंट, विभाग यांना या कार्यालयाने पुनर्विचारणा कळविली आहे. अहवाल अद्याप प्रलंबित आहे. **पुनर्विचारणा ३ :** प्रकरणातील अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा. **उत्तर :** या कार्यायाचे पत्र ब-५५१०, दिनांक २२.०७.२०११ नुसार सहपत्रासह अहवाल पाठविण्यात आला आहे. आक्षेप अमान्य केला आहे. **पुनर्विचारणा ४:** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ?

											उत्तर : या कार्यालयाने पत्र क्रमांक ब-६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार विक्रीकर सह आयुक्त नरीमन पॉईंट यांना पुनर्विचारणा कळविले असून अहवाल प्रलंबित आहे.
६	**सी-३४४ चर्चगेट**	**मे.रीषभ इंटरनॅशन ल०२/एस/७९४५**	**तयार कपडे**	**०४-०५ ०६-०७**	**३८८०७ ८८४७**	**२००४.७५**	**१४५८.३५**	**५४६.१९**	**५.४**	**२९.४९**	व्यापाऱ्याच्या निर्यात व्यवहाराची तपासणी केली असता असे आढळले की, व्यापाऱ्याने मालाची निर्यात चार वेगवेगळ्या बंदरावरुन केलेली आहे व ती निर्धारणा आदेशातील निर्यातीशी जुळत आहे. **पुनर्विचारणा १:** बँक रिअलायझेशन स्टेटमेंट बिल ऑफ लॅडींगशी जुळत नाही. **उत्तर :** संबंधित विभागास पुनर्विचारणा दिनांक १८.०३.२००९ रोजी कळविण्यात आलेली आहे व २९.०५.२००९ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा २:** पुढील अहवाल पाठवावा. **उत्तर :** विक्रीकर सहआयुक्त वरळी यांच्या दिनांक १९.०४.२०१० च्या पत्रानुसार त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहे. **पुनर्विचारणा ३:** प्रकरणातील अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा. **उत्तर :** निर्धारणा अधिकाऱ्यांनी कस्टम विभागास दिनांक २१.०७.२०१० व ०१.०९.२०१० ला पत्र पाठविले आहे. अहवाल प्रलंबित आहे. **पुनर्विचारणा ४ :** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ? **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) चर्चगेट यांना ४ थी पुनर्विचारणा कार्यालयाच्या पत्र क्र. ब-६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार कळविलेली आहे. सहाय्यक विक्रीकर आयुक्त, क-३४८, वरळी विभाग यांनी दिनांक

											१४.१२.२०११ रोजी सहाय्यक आयुक्त, कस्टम्स, तसेच जेएनपीटी यांना पत्र पाठवून माहिती मागविलेली आहे. ती अप्राप्त आहे. अहवाल प्रलंबित आहे.
७	बी-१२१ चर्चगेट	मे.प्रेसीझ्ञान मिअर्स लि. ३४/एस/४२५	गिअर्स	०२-०३ ०६-०७	३८८०५४८५९	२३३६.७१	७३७.७०	१५९९.०१	९.८	१५६.७०	निर्यातीची तपासणी केली असता व्यापाऱ्यांची बहुतेक निर्यात हवाईमार्गे झाली आहे. पुरावे अभिलेख्यावर ठेवले आहे. **पुनर्विचारणा :** फक्त विवरणपत्र उपलब्ध केलेले असून संबंधित कागदपत्रे पाठविली नाहीत. **उत्तर :** या कार्यालयाने संबंधित कागदपत्रे या कार्यालयाचे पत्र क्र ब-२२९५ दिनांक २६.११.२००८ अन्वये पाठविलेली आहे. (६२९ पृष्ठे)
८	बी-१४२ वरळी	मे.हायटेक स्वीचगिअर १६/एस/१७८६	ऑटोपार्ट	०३-०४ ०६-०७	३९६०७२०२०	१८९.५७	०.१५	१८९.४२	९.८	१८.५६	संपूर्ण निर्यात ही नावाशेवा व जे.एन.पी.टी. मागे झालेली असून व्यापाऱ्याच्या हिशेबाच्या पुस्तकात व निर्धारणा आदेशात दिलेल्या निर्यातीत तफावत नाही. **पुनर्विचारणा १ :** सदर प्रकरणी Details सादर करावेत. **उत्तर :** पुनिर्विचारणा संबंधित विभागास कळविण्यात आलेले आहे तथापि महालेखापालांना पत्र पाठवून Details म्हणजे त्यांना नेमके काय अपेक्षित आहे. यांबाबत कळविण्याची विनंती केलेली आहे. **पुनर्विचारणा २ :** बिले, बिल ऑफ लॅडींग इ. च्या नमुना प्रती पाठविण्यात यावा. **उत्तर :** सदर कागदपत्रे संबंधित विभागाकडून मागविण्यात आलेली आहेत. ती मिळताच पाठविण्यात येईल. **पुनर्विचारणा ३ :** प्रकरणातील अनुपालन अहवाल सादर करावा. **उत्तर :** या कार्यालयाचे पत्र ब-५०१९, दिनांक १७.०३.२०११ नुसार निर्यातीबाबत आवश्यक सहपत्रासह अनुपालन अहवालासोबत सादर

											करण्यात आली आहेत. **पुनर्विचारणा ४ :** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ? **उत्तर :** या कार्यालयाने पत्र क्रमांक ब-६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार विक्रीकर सह आयुक्त वरळी यांना पुनर्विचारणा कळविले असून अहवाल प्रलंबित आहे.
९	बी-१४२ वरळी	मे.मेरीगोल्ड इम्प्रेस ३३/एस/१०८६	स्टीलच्ची भांडे	०३-०४ ०६-०७	०३९६०२४६७०	१०५७.८२	१०.८३	१०४६.९९	४	४१.८८	निर्यात कागदपत्रांची तपासणी केली असता ते बरोबर असल्याचे आढळून आले. महालेखाकारांना दिनांक १८.०५.२००८ अन्वये अहवाल पाठविलेला आहे. **पुनर्विचारणा :** फक्त विवरणपत्र उपलब्ध केलेले असून संबंधित कागदपत्रे पाठविले नाही. **उत्तर :** या कार्यालयाने संबंधित कागदपत्रे या कार्यालयाचे पत्र क्र. ब-२२९५, दिनांक २६.११.२००८ अन्वये पाठविलेली आहेत. (११८ पृष्ठे)
१०	क-३७३ मांडवी विभाग	मे.मेरिट ट्रांन्शमिशन ३/एस/९७	इंजिनी अरींग गुड्स	०३-०४ ०६-०७	३८८२२१६१५	३६.३९	२.९४	३३.४५	१५.३	५.१२	निर्यातीबाबतच्या दस्तऐवजाच्या आधारे निर्यात मान्य केलेली आहे. **पुनर्विचारणा १ :** दस्तऐवज जसे की बिल ऑफ लॅडींग, बँक रिअलायझेशन विवरणपत्र यांच्याशी निर्यातीचे व्यवहार जुळत नाही. **उत्तर :** संबंधित विभागास पुनर्विचारणा दिनांक १७.०३.२००९ रोजी कळविण्यात आलेली आहे व २९.०५.२००९ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा २ :** पुढील अहवाल पाठवावा. **उत्तर :** विसआ यांच्याकडून आलेला अहवाल सहपत्रांसह जसे की बिले, बिल बँक ऑफ लॅडींग व बँक रिअलायझेशन प्रमाणपत्रे यांच्या प्रतीसह

											पडताळणीसाठी पाठवित आहे. **पुनर्विचारणा २ :** प्रकरणातील अहवाल सादर करण्यात यावा. **उत्तर :** सदर प्रकरणात विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) नरीमन पॉईंट यांना स्मरणपत्रे पाठविण्यात आली असून अहवाल प्रलंबित आहे. **पुनर्विचारणा ४ :** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ? **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) मांडवी विभाग यांना ४ थी पुनर्विचारणा या कार्यालयाच्या पत्र क्र. ब-६०४२, दिनांक २१.१२.२०११ नुसार कळविलेली आहे. विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) नरीमन पॉईंट यांनी पत्र क्र. १७७१, दिनांक १९.०५.२०१० रोजी अहवाल पाठविला आहे. सदर अहवालातील त्रुटीनुसार त्यांना पुन्हा अनुक्रमे दिनांक २४.०६.२०१०, २३.०९.२०१०, १२.१२.२०११ व ०८.०६.२०१२ रोजी पत्रे पाठविलेली आहेत. अद्याप अहवाल अप्राप्त आहे. अनुपालन अहवाल प्रलंबित आहे. **अनुपालन अहवाल :** बँकेचे कमिशन व व्यापाऱ्याला ॲडव्हान्स मिळालेली रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम जमा केल्याचे बँकेकडून व्यापाऱ्यास कळविण्यात येते. त्यामुळे निर्यातीचे बिल व जमा रकमेची पावती यामध्ये फरक आढळून येतो. निर्धारणा अधिकाऱ्याने महालेखापालांनी निदर्शनास आणलेल्या बिलांच्या रकमेबाबत मेळजुळणी अहवाल दिला आहे व फरक विषद केला आहे.
११	**क-३७३ मांडवी**	**मे.मेरिट ट्रांन्शमिशन**	**इंजिनीअरींग गुड्स**	**०४-०५ ०६-०७**	**३८८२२ १६१५**	**४५.२३**	**४२.२५**	**२.९८**	**१५.३**	**०.४६**	निर्यातीबाबतच्या दस्तऐवजाच्या आधारे निर्यात मान्य केलेली आहे. **पुनर्विचारणा १ :** दस्तऐवज जसे की बिल ऑफ लॅडींग, बँक रिअलायझेशन विवरणपत्र यांच्याशी निर्यातीचे व्यवहार जुळत नाही.

	विभाग	**३/एस/९७**									**उत्तर :** संबंधित विभागास पुनर्विचारणा दिनांक १७.०३.२००९ रोजी कळविण्यात आलेली आहे व २९.०५.२००९ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा २ :** प्रकरणातील अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा. **उत्तर :** सदर प्रकरणात विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) नरीमन पॉईंट यांना स्मरणपत्रे पाठविण्यात आली असून अहवाल प्रलंबित आहे. **पुनर्विचारणा ४ :** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ? **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) मांडवी विभाग यांना ४ थी पुनर्विचारणा या कार्यालयाच्या पत्र क्र. ब-६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार कळविलेली आहे. अनुपालन अहवाल प्रलंबित आहे. निर्याती बाबतच्या दस्तऐवजाच्या आधारे निर्यात मान्य केलेली आहे. सदर अहवालातील त्रुटीनुसार त्यांना पुन्हा अनुक्रमे दिनांक २४.०६.२०१०, २३.०९.२०१०, १२.१२.२०११ व ०८.०६.२०१२ रोजी पत्रे पाठविलेली आहेत. अद्याप अहवाल अप्राप्त आहे. अनुपालन अहवाल प्रलंबित आहे. **अनुपालन अहवाल :** बँकेचे कमिशन व व्यापाऱ्याला ॲडव्हान्स मिळालेली रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम जमा केल्याचे बँकेकडून व्यापाऱ्यास कळविण्यात येते. त्यामुळे निर्यातीचे बिल व जमा रकमेची पावती यामध्ये फरक आढळून येतो. निर्धारणा अधिकाऱ्याने महालेखापालांनी निदर्शनास आणलेल्या बिलांच्या रकमेबाबत मेळजुळणी अहवाल दिला आहे व फरक विषद केला आहे.

१२	क-३७३ मांडवी विभाग	मे.शक्ती ओव्हरसीज ३/एस/१६७५५	तयार कपडे आणि स्टीलची भांडी	०३-०४ ०६-०७	३०००६८९३०	१३४.९७	१९.९५	११५.०२	५.४	०.६२	निर्याती बाबतच्या दस्तऐवजाच्या आधारे निर्यात मान्य केलेली आहे. **पुनर्विचारणा :** दस्तऐवज जसे की बिल ऑफ लॅडींग, बँक रिअलायझेशन विवरणपत्र यांच्याशी निर्यातीचे व्यवहार जुळत नाही. **उत्तर :** संबंधित विभागास पुनर्विचारणा दिनांक १७.०३.२००९ रोजी कळविण्यात आलेली आहे व २९.०५.२००९ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा :** पुढील अहवाल पाठवावा. **उत्तर :** विसआ (प्रशासन) नगरपालिका यांचेकडून आलेला अहवाल सहपत्रांसह जसे की विक्री बिले, बिल ऑफ लॅडींग, व बँक रिअलायझेशन प्रमाणपत्र यांच्या प्रतीसह पडताळणीसाठी पाठविले आहे.
१३	क-३७३ मांडवी विभाग	मे.गॅलेक्सी आर्ट ३/एस/१५४४८	स्टार अँड डेकोरेटर पेपर	०४-०५ ०६-०७	३९९००७२७०	२०६.२६	२०३.४९	२.७७	९.८	०.२७	व्यापाऱ्याने सर्व म्हणजेच ५१ बिले, बिल ऑफ लॅडींग, रिअलायझेशन सर्टिफिकेट इत्यादी सादर केलेले आहे. परत पडताळणी करुन पाहिले असता निर्धारणा आदेशात मान्य केलेली निर्यात योग्य आहे. (सदर ५१ बिलांपैकी ३ बिले पाऊंड मध्ये असून ४८ बिले युरो मध्ये आहे.) **पुनर्विचारणा :** सदर तपशील तपासणीसाठी पाठविला आहे. **उत्तर :** या कार्यालयाने दिनांक २९.०६.२००९ च्या पत्रान्वये सर्व बिले व सहपत्रे तपासणीसाठी पाठविली आहेत.
१४	बी-१३३ माझगांव	मे.किर्ती ऑर्नामेंट्स प्रा.लि. ४/एस/२२६४	सोन्याचा दागिना	०३-०४ ०६-०७	३९११३००३०	३८२३.९५	--	३८२३.९५	१	३८.२४	व्यापारी सोन्याच्या दागिन्यांची निर्यात कस्टम क्लीअरंस सेंटर, इंडियन कस्टम मुंबई व भारत डायमंड बोर्स मुंबई -२१ यांचे मार्फत करतो. **पुनर्विचारणा १ :** सदर प्रकरणात Details सादर करावेत. **उत्तर :** पुनर्विचारणा संबंधित विभागास कळविली आहे. **पुनर्विचारणा २ :** बिले, बिल ऑफ लॅडींग इ. च्या नमुना प्रती पाठविण्यात याव्या.

											उत्तर : निर्याती संबंधीची कागदपत्रे या कार्यालयाचे पत्र क्र. २२९५, दिनांक २४.११.२००८ अन्वये आपल्या कार्यालयात पाठविली आहेत. **पुनर्विचारणा ३ :** प्रकरणात अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. पुन्हा अहवाल पाठविण्यात यावा प्रकरणात कस्टम विभागाकडून निर्यातीबाबत खातर जमा केली आहे काय ? कस्टम लेखा अहवालाप्रमाणे मे. किर्ती ऑरनामेंट्स प्रा.लि.आइर. कोड क्र. ०३९११३००३० तर्फे कुठलीही निर्यात झाली नाही. **उत्तर :** सदर आक्षेप विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) नरीमन पॉईंट यांना कळविला तसेच स्मरणपत्र पाठविण्यात आले असून अहवाल प्रलंबित आहे. विसआ, नगरपालिका यांचेकडून पत्र क्र.ब-२५०२, दिनांक ३०.०९.२०१० व दिनांक ०८.०६.२०१२ नुसार अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
१५	**बी-१३३ माझगांव**	**मे.मेट्रो एक्सपोर्टर प्रा.लि. ४/एस/४१९३**	**तयार कपडे**	**०४-०५ ०६-०७**	**३८८०२ ०५९८**	**९२७६.४९**	**४६०१.३८**	**४६७५.११**	**५.४**	**२५२.४६**	व्यापारी हा तयार कपड्यांची निर्यात वेगवेगळ्या बंदरातून करतो. तसेच तो टेक्नॉलॉजीचीही निर्यात करतो. **पुनर्विचारणा १ :** सदर प्रकरणात Details सादर करावेत. **उत्तर :** पुनर्विचारणा संबंधित विभागास कळविली आहे. तसेच महालेखापालांना Details संबंधी मिळविण्याची विनंती केलेली आहे. **पुनर्विचारणा २ :** बिजक व भरणा पत्राच्या (बिल ऑफ लॅडींग) नमुना प्रती प्रकरण क्र. १४ मध्ये उपलब्ध करुन देण्यात याव्यात. **उत्तर :** निर्याती संदर्भातील दस्तऐवज जसे बिजक व भरण पत्र (बिल ऑफ लॅडींग) इत्यादी माहिती उपलब्ध करुन देण्यासंदभर्रात संबंधित विभागास पत्र पाठविण्यात आलेले आहे. **पुनर्विचारणा ३ :** अनुपालन अहवाल उपलब्ध करुन देणेसंदर्भात त्वरीत कार्यवाही करावी.

											उत्तर : सदर पुनर्विचारणा विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) मांडवी विभाग यांना कळविलेली आहे. तसेच स्मरणपत्र सुध्दा पाठविलेले आहे. अनुपालन अहवाल प्रतिक्षाधीन आहे. **पुनर्विचारणा ४ :** या कार्यालयास अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही. विभागाने कस्टम्स प्राधिकाऱ्याकडून निर्यातीबाबत पडताळणी केली आहे काय ? **उत्तर :** विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन) मांडवी विभाग यांना ४थी पुनर्विचारणा या कार्यालयाच्या पत्र क्र. ६०४२, दिनांक १२.१२.२०११ नुसार कळविलेली आहे. अनुपालन अहवाल प्रलंबित आहे.

चुकीची वजावट देणे

मुंबई विक्रीकर (मुं.वि.क.) अधिनियम आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमांनुसार उत्पादकाने अधिनियमाच्या अनुसूची "ब" च्या नोंद आणि अनुसूची "क" मधील विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या खरेदीवर जर कर भरला असेल आणि त्याने तो माल करयोग्य वस्तुच्या उत्पादनात राज्यांतील विक्रीसाठी किंवा निर्यातीसाठी किंवा अशा उत्पादनांच्या वेष्टनासाठी वापरला असल्यास विहीत दराने त्याने खरेदीवरील भरलेल्या कराच्या वजावटीस मान्यता होती. उत्पादीत माल विक्रीव्यतिरिक्त इतर कारणांसाठी शाखांना पाठविला गेला असल्यास त्या प्रमाणात वजावट मान्य होती. याशिवाय, मुं.वि.क. अधिनियमातील तरतुदींनुसार व्याज आणि शास्ती आकारणीय होती.

विक्रीकर उपआयुक्त (उ.आ.वि.क.), अ-२६, नागपूर यांच्या कार्यालयाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणी ऑक्टोबर २००७ मध्ये केली असता असे निदर्शनास आले की मेसर्स वेस्टर्न कोल फिल्ड लि., नागपूर यांच्या २००१-०२ या वर्षीच्या निर्धारणेला मार्च २००७ मध्ये अंतिम स्वरुप देतांना एकूण विक्री निर्धारित करण्यासाठी कामगारांना निशुल्क देण्यात आलेल्या कोळशाची रु. ३७६.९५ कोटी किंमत गृहीत न धरता रु. १३.४५ कोटींची वजावट देण्यात आली होती. याचा परिणाम व्याजासहीत रु. २.२१ कोटीची चुकीची वजावट देण्यात झ ाला.

हे प्रकरण नोव्हेंबर २००७ मध्ये निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने मार्च २००८ मध्ये चूक मान्य केली आणि ही बाब विक्रीकर सह आयुक्त (अपिल) नागपूर ह्यांच्याकडे पाठविली असल्याचे नमूद केले. पुढील अहवाल प्राप्त झाला नाही. (नोव्हेंबर २००८)

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

व्यापाऱ्याचे नाव : मे.वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड

नोंदणी क्रमांक : ४४०००१/एस/१०९२

कालावधी : २००१-०२

निर्धारणा आदेशाचा दिनांक : ३०.०३.२००७

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मूळ निर्धारणा आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने विक्रीकर सहआयुक्त (अपिले) नागपूर यांचेकडे अपिल क्र.जेसी/बीएसटी/अपिल बीएसटी-५५/०७-०८ अन्वये दाखल केले आहे. अपिल अधिकाऱ्यास अपिल आदेश पारीत करातांना आक्षेप विचारात घेण्याबाबत कळविले आहे. अपिल अद्याप प्रलंबित आहे.

वसुली कार्यवाही : अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? नाही.

पुनर्विचारणेस उत्तर : विक्रीकर सह आयुक्त, नागपूर यांना स्मरणपत्र काढून अपिलाची सद्यस्थिती कळविण्याबाबत विनंती केलेली आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. २ : अपिल अद्याप प्रलंबित आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. ३ : प्रकरणात विक्रीकर सह आयुक्त (अपिले) नागपूर यांनी दिनांक १.४.२०११ ला निर्णय दिला असून मूळ निर्धारणा आदेशात मुं.वि.का. कलम ४१-ड नुसार देण्यात आलेली वजावट बरोबर आहे. थकबाकी रिक्त होत आहे. या कार्यालयाचे अनुपालन अहवाल पत्र क्र. ब-५४४५ दिनांक ४.७.२०११ नुसार आपणांस सादर करण्यात आला आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र.४ : या कार्यालयाने पत्र क्र. ब-२९०, दिनांक १३.३.२०१२ नुसार अहवाल पुन्हा सादर केला आहे.

ऑक्टोबर २००२ ते जुलै २००६ दरम्यान आठ विभागातील अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली असता, १९९६-९७ ते २००४-०५ या कालावधीकरीता फेब्रुवारी २००२- ते नोव्हेंबर २००५ मध्ये अंतीम स्वरुप देण्यात आलेल्या १४ व्यापाऱ्यांच्या निर्धारणात असे निदर्शनास आले की, वजावटीची एकतर चुकीची संगणना करण्यांत आली होती किंवा वजावटीस पात्र नसलेल्या खरेदीवर चुकीने वजावट दिली होती. परिणामी रु. ५.८४ लाख व्याजासहीत रु. १.३३ कोटीचे न्यून निर्धारण झाले. काही निदर्शी प्रकरणे पुढे देण्यात आली आहेत.

अ.क्र.	विभाग व्यापाऱ्याची संख्या	कालावधी निर्धारणेचा महिना	अनियमिततेचे स्वरुप	व्याजासह न्यून निर्धारणा
१.	औरंगाबाद १	१९९८-९९ एप्रिल २००२	वजावटीस पात्र नसलेल्या यंत्र खरेदीवर चुकीने वजावट देण्यात आली होती.	५८.२४
२.	नाशिक १	१९९८-९९ फेब्रुवारी २००३	खरेदी केलेल्या बाटल्यांची अणि पेट्यांची न केलेली विक्री यावर चुकीने वजावट देण्यात आली होती	३८.८४
३.	घाटकोपर १	२०००-०१ ऑक्टोबर २००४	खरेदी केलेल्या रसायनावर (नमुना ३१) आठ टक्क्यांऐवजी १३ टक्केनी चुकीने वजावट देण्यात आली होती.	१४.२८

ही प्रकरणे नोव्हेंबर २००२ ते ऑगस्ट २००६ मध्ये निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने मे २००४ ते ऑगस्ट २००७ मध्ये चुका दुरुस्त केल्या/निर्धारणा सुधारीत करुन रु. १३.४८ लाख शास्तीसह एकूण रु. १.४६ कोटीची अतिरिक्त मागणी केली. यापैकी एका व्यापाऱ्याने रु. ६१.८३८ प्रदान केले. उर्वरीत प्रकरणांतील वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (नाव्हेंबर २००८)

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

व्यापाऱ्याचे नाव : मे.फोस्टर्स इंडिया लिमिटेड

नोंदणी क्रमांक : ४३११३३/एस/६५०

कालावधी : १९९८-९९

निर्धारणा आदेशाचा दिनांक : २९.०४.२००२

दोष निवारण कृती : आक्षेप मान्य

नुंविका कलम ५७ खाली दिनांक १४.९.२००५ रोजी सुधारीत आदेश पारीत करुन रु. ६६.७० लाखांची अतिरिक्त मागणी व्याजासह काढण्यात आली आहे.

वसुली कार्यवाही :- सुधारीत आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने न्यायाधिकरणामडे अपिल दाखल केले होते. मविन्यांनी दिनांक १०.११.२००६ अन्वये अधिसूचना ए-१३ मध्ये झालेल्या बदलानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेली वजावट योग्य आहे व त्यांनी विसआंनी पारीत केलेला सुधारित

आदेश रद्दबातल ठरविला. त्यांच्या या निर्णयाविरुध्द खात्याने संदर्भ अर्ज दाखल केला. मविन्यांनी दिनांक २९.९.२००७ च्या निर्णयान्वये व्यापाऱ्यांस दिलेली वजावट योग्य होती असा निर्णय देवून संदर्भ अर्ज फेटाळला.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? :- नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.एम.टी.झेड इंडिया लि.

नोंदणी दाखला क्रमांक : २०/एस/१९.

कालावधी : १९९८-९९

निर्धारणा आदेशाचा दिनांक : २८.०२.२००२

लेखा आक्षेप मान्य/अमान्य :- लेखा आक्षेप मान्य

दोष निवारण कृती : विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन) चर्चगेट, विभाग मुंबई यांनी मुंविका कलम ५७ दिनांक ०३.०३.२००७ अन्वये सुधारित आदेश पारित करुन रु. ७,२८,२२६/- इतकी अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही :- व्यापारी हा BIFR मध्ये असल्याने (संदर्भ क्र. १३३/२००५) सुधारीत आदेशान्वये काढलेली मागणी या कार्यालयाचे पत्र दिनांक २१.०७.२००७ अन्वये बीआयएफआर यांना कळविलेली आहे.

अंतर्गत लेखा परिक्षण झाले होते काय :- नाही

पुनर्विचारणेस उत्तर :- बीआयएफआरने दिनांक २१.१.१० रोजी बोलाविलेल्या बैठकीत व्यापाऱ्याच्या मालमत्तेच्या विक्रीला मान्यता दिलेली आहे. तसेच विक्रीकराच्या थकबाकीचा दावा मान्य केलेला आहे. पुढील सुनावणी दिनांक ६.५.२०१० रोजी झालेली आहे. त्याचा अहवाल आल्यावर पाठविण्यात येईल.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. २ :- बीआयएफआरच्या दिनांक ०६.०५.२०१० रोजी झालेल्या बैठकीत खंडपीठाने (Bench) IDBI (OA) यांना खालापूरची मालमत्ता विकण्याच्या सूचना तसेच इतर कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या होत्या. पुढील सुनावणी दिनांक १४.०७.२०१० रोजी होणार होती. अद्याप बैठकीचा तसेच वसुलीचा अहवाल प्रलंबित आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. ३ :- प्रकरणात वसुलीसाठी विभागाने व्यापाऱ्याचा उद्योग आजारी असल्यामुळे वसुलीचा दावा बीआयएफआर व एएआयएफआर मध्ये दाखल केला आहे. वसुली अहवाल प्रलंबित आहे. पुढील सुनावणी दिनांक २५.०५.२०११ रोजी ठेवली होती.

या कार्यालयाचे प्रत्र क्र.ब - ५४८९, दिनांक १३.०७.२०११ नुसार अंतरीम अनुपालन अहवाल आपणांस सादर करण्यात आला आहे.

व्यापाऱ्याचे नाव : मे.हिंदुस्थान कोकाकोला.

नोंदणी क्रमांक : ४२२०१०/एस/१३०३

कालावधी : १९९८-९९

निर्धारणा आदेशाचा दिनांक : १४.०२.२००३

लेखा आक्षेप मान्य/अमान्य :- लेखा आक्षेप मान्य

दोष निवारण कृती : विक्रीकर उपआयुक्त (प्रशासन) नाशिक विभाग, मुंबई यांनी मुंविका कलम ५७ खाली दिनांक १४.०५.२००४ अन्वये सुधारित आदेश पारीत करुन नियम ४१ -ड खालील रु. ३४.८४ लाखांची वजावट कमी करुन रु. ४२.८१ लाखाची अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही :- सदर आदेशांविरुध्द व्यापाऱ्याने न्यायाधिकरणात अपिल दाखल केलेले आहे व त्याच्या वसुलीस स्थगिती दिलेली आहे. स्थगिती आदेश क्र. एसए-१००/२००४.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ?. :- नाही

पुनर्विचारणेस उत्तर १ :- विक्रीकर सहआयुक्त, नागपूर यांना स्मरणपत्र काढलेले आहे. तसेच विक्रीकर सह आयुक्त, विधी यांना महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाकडील प्रलंबित अपिले प्राधान्याने काढण्याबाबत विनंती करण्यासाठी कळविले आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. २ :- अद्याप अपिल प्रलंबित आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. ३ :- प्रकरणातील अपिल महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणात अद्याप प्रलंबित आहे.

पुनर्विचारणेस उत्तर क्र. ४ :- प्रकरणात व्यापाऱ्याचे अपिल अद्याप महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणात प्रलंबित आहे. संबंधित विभागाकडून अनुक्रमे दिनांक २३.०९.२०१० व ०७.०६.२०१२ रोजी पत्रे पाठवून अहवाल मागविण्यात आला आहे. अद्याप अहवाल अप्राप्त आहे.

अनुपालन अहवाल :- व्यापाऱ्याने कलम ५७ खालील आदेशाविरुध्द अपिल करता येते काय ? यासाठी मा.महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणात अपिल दाखल केले होते. मा.महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाने सदर प्रकरणी निर्णय देवून कलम ५७ खालील आदेश हे मूळ आदेश असल्यामुळे त्या विरध्दचे अपिल करता येते. असा निर्णय पत्र क्र.३४५१, दिनांक ०९.११.२००९ रोजी विभागास कळविण्यात आलेला आहे. सदरील निर्णयाप्रमाणे व्यापाऱ्याचे अपिल बाटल्यासाठीची घेतलेली अनामत रक्कम ही विक्री होते काय ? तसेच व्यापाऱ्याने त्यांच्या ग्राहकांना दिलेल्या बाटल्यांची विक्री होते काय ? व पॅकींग मटेरीयलवर नियम ४१ ड खाली वजावट मिळते काय ? याच्या निर्णयासाठी प्रलंबित आहे.

व्यापाऱ्याचे नाव : मे.उदय स्टील इंडस्ट्रीज

नोंदणी क्रमांक : ७२/एस/१७९०

कालावधी : ९९-२००० ते २००१-०२

निर्धारणा आदेशाचा दिनांक : २०.०५.२००३

दोष निवारण कृती : आक्षेप मान्य

सहाय्यक विक्रीकर आयुक्त (प्रशासन) अंधेरी यांनी मुंविका कलम ५७ दिनांक २८.०२.२००७ अन्वये सुधारित आदेश पारित करुन कालावधी ९९-२००० व २००१-०२ ची रु. ०.८८ लाख व ०.७९ लाखाची मागणी काढली.

वसुली कार्यवाही :- सदर आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ३ यांचा आदे क्र.डीसी/अेपीपी-३/बीए १९८-१९९/२००६-०७/ब-२२५, दिनांक ८.५.२००७ अन्वये स्थगिती दिलेली आहे. तसेच त्यांनी त्यांचे पत्र दिनांक २५.०६.२००९ अन्वये सदर अपिल विक्रीकर आयुक्तांचे परिपत्रक १५.०३.२००७ ठेवलेले आहे.

विक्रीकर सह आयुक्त (अपिले) ३ यांनी दिनांक १३.०८.२०१० रोजी दोन्ही कालावधीची अपिले निकाली काढलेली असून अनुक्रमे रु. ६४,९२८/- व रु. ६३,७४३/- इतकी वाढीव मागणी काढली व्यापाऱ्याने सदर रकमेचा भरणा दिनांक १७.०९.२०१० रोजी कला असून थकबाकी भरणा दिनांक १७.०९.२०१० रोजी केला असून थकबाकी रिक्त आहे. अंतिम अनुपालन अहवाल दिनांक १५.१०.२०१० रोजी पाठविण्यात आलेला आहे.

अंतर्गत लेखा परिक्षण झाले होते काय ? :- नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.फियाट इंडिया प्रा.लिमिटेड

नोंदणी क्रमांक : ७०/एस/२६१४

कालावधी : २०००-०१

निर्धारणा आदेशाचा दिनांक : १८.८.२००४

दोष निवारण कृती : आक्षेप मान्य

विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन) रायगड विभाग यांनी दिनांक ३१.०७.२००७ अन्वये मुंविका कलम ५७ खाली सुधारित आदेश पारित करुन रु. १.७३ लाखाची वजावट कमी केली व त्याच प्रमाणात कलम ४३ क खालील व्याजही कमी केले व एकूण ४६.८५ लाखाची अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही :- व्यापाऱ्याने खालीलप्रमाणे पूर्ण भरणा केला आहे.

रक्कम	**दिनांक**
१६,८४,९६८	२७.११.२००७
३०,००,०००	२६.१२.२००७
४६,८४,९६८	

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.गायत्री पेपर मिल्स प्रा.लिमिटेड

नोंदणी क्रमांक : ४१०२०७/एस/८९.

कालावधी : २००२-०३

निर्धारणा आदेशाचा दिनांक : २१.११.२००५

दोष निवारण कृती : आक्षेप मान्य

विक्रीकर उपआयुक्त (निर्धारण) रायगड, नवी मुंबई यांनी मुंविका कलम ६२ अन्वये दिनांक ८.१.२००७ रोजी सुधारित आदेश पारित करुन रु. ०.३३ लाखांची मागणी काढली.

वसुली कार्यवाही :- व्यापाऱ्याने उपरोक्त रकमेचा पूर्ण भरणा दिनांक २१.२.२००७ रोजी केलेला असून कर थकबाकी शिल्लक नाही.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही

व्यापाऱ्याचे नाव : मे.मालदार बॅरल्स प्रा.लिमिटेड

नोंदणी क्रमांक : ४१०२०८/एस/२१५

कालावधी : २००१-०२

निर्धारणा आदेशाचा दिनांक : १७.१.२००५

दोष निवारण कृती : आक्षेप मान्य

सहाय्यक विक्रकर आयुक्त (निर्धारण) ब-१९५, रायगड यांनी मुंविका कलम ६२ अन्वये दिनांक १६.६.२००५ सुधारित आदेश पारीत करुन रु. १.३७ लाखांची अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही : सदर सुधारित आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने विक्रीकर उपायुक्त (अपिले) ठाणे यांच्याकडे अपिल दाखल केले. विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ठाणे यांच्या दिनांक २१.०८.२००७ च्या आदेशान्वये व्यापाऱ्यास नियम ४१-ड खाली वजावटीत रु. ३८, ५४४/- ची वाढ व कलम ३६ (३) बी खाली व्याजात रु. ९४,८०५/- ची सुट अशी एकूण १,३३,१४९/- ची मागणी कमी झालेली आहे व रु. ९९५२९/- ची कर थकबाकी शिल्लक आहे. जमीन महसूल कायद्यांतर्गत वसुली कार्यवाही चालू आहे. एम.एल.आर.सी ची नोटीस १०.०७.२००८ रोजी बजावली आहे. व्यापाऱ्याने दिनांक ०८.०९.२००९ रोजी रु. ९९,५२९/- चा भरणा केलेला आहे. थकबाकी रिक्त. या कार्यालयाने अंतिम अनुपालन अहवाल महालेखापालांना दिनांक १९.११.२००९ रोजी सादर केलेला आहे.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.प्रिमिअर ऑटोमोबाईल्स लिमिटेड

नोंदणी क्रमांक : ७०/एस/०१

कालावधी : २०००-०१

निर्धारणा आदेशाचा दिनांक : ३१.०८.२००५

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

ज्येष्ठ विक्रीकर उपआयुक्त, घाटकोपर विभाग, मुंबई यांनी मुंविका कलम ६२ अन्वये दिनांक ३१.०१.२००७ अन्वये सुधारीत आदेश पारीत करुन रु. १.०७ लाखांची अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही :- सुधारित आदेशानुसार काढलेली रु. १.०७ लाखांची मागणी १९९६-९७ च्या परताव्यास RAO No. ०७३६५६, दिनांक ०३.०१.२००७ अन्वये समायोजित केलेली आहे व थकबाकी शिल्लक नाही.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.आकार लॅमिनेटर्स

नोंदणी क्रमांक : ४३११३३/एस/१३५

कालावधी : २०००-०१

निर्धारणा आदेशाचा दिनांक : २९.०४.२००३

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मुंविका कलम ५७ अन्वये दिनांक १६.११.२००६ रोजी सुधारीत आदेश पारीत करुन रु. ४,६८,६४०/- ची अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही : सुधारीत आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने दिनांक २.३.२००७ रोजी महाराष्ट्र राज्य न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल केले. विक्रीकर उपआयुक्त (विधी), खंडपीठ-३, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक ९.७.२००९ च्या पत्रानुसार, मा.उच्च न्यायालयाचे मुं.वि.का. कलम ५७ खाली फेरतपासणी आदेशाबाबत निर्णय असल्यामुळे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत प्रलंबित ठेवण्यात येत आहे. पत्र क्र. ३०७२, दिनांक ०१.०८.२०११ अन्वये अहवाल प्राप्त झाला असून न्यायाधिकरणामध्ये अपिल क्र. ४५/२००७ नुसार अपिल प्रलंबित असल्याबाबतचे कळविलेले आहे. व्यापाऱ्यास सुनावणीसाठी दिनांक २५.१०.२०१२ रोजी बोलाविण्यात आले आहे असे श्री.खैरनार, सविआ यांनी सांगितले.

सदर प्रकरणात महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाने स्थगिती आदेश दिलेला नाही. व्यापाऱ्याची मालमत्ता दिनांक २१.०७.२०१० रोजी जप्त करण्यात आली. दिनांक २२.०७.२०१० रोजी विभागाने विभागीय अधिकारी एम.आय.डी.सी. औरंगाबाद यांना पत्र पाठवून मालमत्तेवर बोजा ठेवण्यास कळविले आहे. दिनांक १३.०१.२०१२ रोंजी कंपनीच्या संचालकांवर अभियोग प्रस्ताव दाखल करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. व्यापाऱ्याच्या मालमत्तेची कागदपत्रे मिळविण्यासाठी एम.आय.डी.सी. यांना दिनांक २३.०१.२०१२ रोजी पत्र दिले. ती कागदपत्रे मिळाल्यानंतर प्लॉट नं.बी-१ ची किंमत काढण्यासाठी दिनांक २१.०८.२०१२ रोजी

सहाय्यक निबंधक यांना पत्र पाठविण्यात आले आहे. मुंबई विक्रीकर कायद्यानुसार वसुलीबाबतचा प्रथम बोजा ठेवणेबाबत E.P.F.O. च्या वसुली अधिकाऱ्यास दिनाक १७.१०.२०१२ रोजी कळविले आहे. व्यापारी बीआरएफआर मध्ये प्र.क्र. ३१५/२००२ नुसार प्रलंबित आहे. व्यापाऱ्याचे युनिट २००५ पासून बंद आहे. व्यापाऱ्याने दिनांक २८.०३.२०१२ रोजी अपर विक्रीकर आयुक्त, नाशिक क्षेत्र यांचेकडे हप्ते मंजूरीसाठी अर्ज केला आहे.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.इंटरनॅशनल फूटस्टेप मॅन्यू.कं.

नोंदणी क्रमांक : ०५/एस/६०४

कालावधी : २००४-०५

निर्धारणा आदेशाचा दिनांक : १४.१०.२००५

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मुंविका कलम ३५ खाली दिनांक १५.०२.२००७ रोजी आदेश पारीत करुन रु. ६४,६६८/- इतकी अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही : व्यापाऱ्याने दिनांक २.८.२००७ रोजी अतिरिक्त मागणीचा पूर्ण भरणा केला. वसुली शिल्लक नाही.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.इलेक्ट्रो फॅब्स.

नोंदणी क्रमांक : ४११०१९/एस/२७८

कालावधी : २००१-०२

निर्धारणा आदेशाचा दिनांक : २१.०९.२००४

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मुंविका कलम ५७ अन्वये सुधारीत कार्यवाही करुन दिनांक ३१.०१.२००७ रोजी सुधारीत आदेश पारीत केला व रु. ३,२१,७७१/- ची अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही : उपरोक्त आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने महाराष्ट्र राज्य न्यायाधिकरणाकडे द्वितीय अपिल दाखल केले असून वसुलीस स्थगिती आदेश क्र. ९४०/०७ अन्वये स्थगिती मिळाली आहे. महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाने त्यांच्या दिनांक ३०.०६.२०११ च्या

आदेशानुसार मुं.वि.का. कलम ५७ खाली आदेश रद्द ठरविला असून प्रकरण प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे नियम ४१ ड खाली वजावटीची परिगणना करण्यासाठी पाठविलेले आहे. त्यानुसार विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट) पुणे यांना दिनांक ३०.०५.२०१२ रोजी पत्र पाठवून अहवाल मागविलेला आहे.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.माया इंजिनियरिंग.

नोंदणी क्रमांक : ४११०२६/एस/२५७

कालावधी : १९९६-९७

निर्धारणा आदेशाचा दिनांक : ३१.०१.२००५

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मुंविका कलम ६२ अन्वये दुरुस्ती आदेश दिनांक ०७.०९.२००६ रोजी आदेश पारीत केला व नियम ४१ ड अन्वये रु. १,०८,०१८/- ची वजावट कमी करण्यात आली.

वसुली कार्यवाही : व्यापाऱ्यास मुळ निर्धारणा आदेशानुसार आलेला परतावा देण्यात आला नव्हता व कलम ६२ अन्वये रु. १,०८,०१८/- ने वजावट कमी करुन उर्वरीत परतावा देण्यात आला. वसुली बाकी नाही.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय? : नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.जोसेफ लेसलीले ॲन्ड कं.

नोंदणी क्रमांक : २८/एस/१५९३

कालावधी : ९९ ते २०००

निर्धारणा आदेशाचा दिनांक : २७.११.२००३

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मुंविका १९५९ च्या कलम ५७ खाली दिनांक ७.८.२००७ अन्वये सुधारीत आदेश पारीत करुन रु. ६१,८३८/- ची अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे.

वसुली कार्यवाही : व्यापाऱ्याने सदर रकमेचा भरणा दिनांक १४.९.२००७ रोजी केला. वसुली रिक्त आहे.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही.

व्यापाऱ्याचे नाव : मे.रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड.

नोंदणी क्रमांक : ४१०२०७एस/३

कालावधी : २०००-०१

निर्धारणा आदेशाचा दिनांक : १९.१०.२००४

दोष निवारण कृती : लेखा आक्षेप मान्य

मुंविका १९५९ च्या कलम ५७ अन्वये दिनांक २०.०६.२००७ रोजी सुधारीत आदेश पारीत करुन रु. २५,७०,८२५/- ची अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही : सुधारीत आदेशाविरुध्द व्यापाऱ्याने महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण यांच्याकडे रु. ५,००,०००/- चा भागभरणा दिनांक ९.२.२००८ रोजी करुन अपिल दाखल केले आहे. महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणानी त्यांचे आदेश दिनांक २०.६.२००८ अन्वये उर्वरीत वसुलीस स्थगिती दिली आहे. (एसए क्र.११५/०७) अपिल प्रलंबित.

अंतर्गत लेखा परीक्षण झाले होते काय ? : नाही.

साक्ष :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. २.२ "मोटार स्पिरीट कर अधिनियमाखाली महसुल हानी" यासंदर्भात विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ रोजी सचिव, वित्त विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने पेट्रोल, डिझेल करिता बाष्पीभवन/गळतीचे प्रमाण किती दाखविण्यात आले होते व त्याचे निश्चित कारण काय आहे, बाष्पीभवन/गळतीचे प्रमाण ठरविण्याचे अधिकार कोणाला आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की,पेट्रोल/डिझेलच्या बाष्पीभवनाचे/गळतीचे प्रमाण तेलदर समिती ठरवते. यात पेट्रोलचे प्रमाण जास्त असते, तर डिझेलचे प्रमाण कमी असते. तेल दर समिती काही विशिष्ट हेतूने निकष ठरवते. या निकषांची पूर्तता तेल कंपन्यांनी करणे अपेक्षित असते. तेल दर समितीने पेट्रोल डिझेल करिता बाष्पीभवन गळतीसाठी अनुक्रमे ०.५ टक्के, ०.१२ टक्के इतके अनुज्ञेय हानीचे प्रमाण निश्चित केले आहे. सन १९९८-९९ मध्ये हिंदुस्थान पेट्रोलियमची ०.१८ टक्के घट दाखविली आहे. सन १९९९-२००० मध्ये हिंदुस्थान पेट्रोलियमची पेट्रोल मधील १.२२ टक्के

आणि डिझेलमध्ये ०.१६ टक्के टक्के घट दाखविली आहे. सन २००२-२००३ मध्ये पेट्रोलमध्ये ०.८० टक्के आणि डिझेलमध्ये १.५९ टक्के घट दाखविली आहे. इंडियन ऑईल कंपनीने सन २०००-२०११ मध्ये ३.२ टक्के पेट्रोलमध्ये आणि ३२ टक्के डिझेलमध्ये घट दाखविली आहे. पेट्रोल/डिझेलचे बाष्पीभवन तेल दर समितीच्या निकषापेक्षा जास्त झाले असेल तर व्यापाऱ्याने विक्री व्यवहार लपविलेला आहे असा अर्थ होऊ शकत नाही. पेट्रोल/डिझेलची हानी कमी झाली असेल तर तेलाची विक्री कमी झाला असा अर्थ होतो. त्यामुळे नियत निकषापेक्षा जास्त मंजूर तुटीस विक्री समजून कर लावता येणार नाही.

विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रधान महालेखाकार, यांनी पुढील अभिप्राय व्यक्त केले. इसमें जो नॉर्म्स हैं उससे ज्यादा लॉस परमिट किया गया है. अगर इस लॉस को नॉर्म्स के हिसाब से परमिट किया जाता तो निश्चित रुप से सेल अधिक दिखायी देती और सरकार को उस पर ज्यादा टैक्स मिल सकता था. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, हा पिलफरेजचा पॉईंट आहे. आपल्याकडे गळतीची प्रमाणे ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा जास्त आहे म्हणून ही गळती झाली असावी. ही चोरी असेल तर त्यावर सेल्स टॅक्स लावला पाहिजे असा मुद्दा आहे.

बाष्पीभवनाचे मानांकन ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता पेट्रोल/डिझेलचे बाष्पीभवनाचे मानांकन ठरविण्याचे अधिकार केंद्र शासनाच्या पेट्रोलियम खात्यांतर्गत येणाऱ्या कंपन्यांना आहे. यासाठी त्यांनी तेल दर समिती नियुक्त केलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बाष्पीभवन जास्त होत असेल तर ते विभागाने तपासायला पाहिजे होते. निकषात चुका असणार त्यामुळे ते सर्व तपासावे लागेल. प्रमाणापेक्षा जास्त नुकसान होत आहे हे कबूल केले आहे असे समितीने सांगितले असता त्यांच्या समोर ऑडिटेड अकौंटस आले ऑडिटरने ते प्रमाणित केले. ऑडिट अकौंट पब्लिश झालेले आहेत. संबंधित कंपन्यांच्या लेख्यांची महालेखाकारांकडून तपासणी होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला महालेखाकार आणि आपल्या लॉसमध्ये मार्जिन किती आहे अशी विचारणा विभागाकडे केली त्यावेळी विभागीय सचिवांनी असे सांगितले की, इंडियन ऑईल कंपनी आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनी हे दोन्ही केंद्र शासनाचे उपक्रम आहेत. या दोन्ही कंपन्या किती विक्री झाली याचे सनदी

लेखापालकडून (C.A.) ऑडिट करून घेतात व तद्नंतर बॅलन्सशिट सादर करतात. त्याचे महालेखाकारांकडून ऑडिट होते. डिझेल/पेट्रोलचे बाष्पीभवन जास्त होत असेल तर हा त्यांच्या मॅनेजमेंटचा विषय आहे. त्याचा विभागाशी काहीही संबंध नाही.

तेल दर समितीने कोणते निकष ठरवून दिलेले आहेत ? तेल दर समिती राज्यशासनाच्या अखत्यारित येते काय या प्रश्नावर तेल दर समिती राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाही. हा विषय त्या कंपन्यांच्या अखत्यारितील आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच, प्रमाण आणि निकष ठरविण्याचे अधिकार केंद्र शासनाचे आहेत असे सांगितले.

बाष्पीभवनाचे प्रमाण ठरवून देण्याचे अधिकार कोणाला आहे, त्यांनी ठरविलेले प्रमाण किती आहे ? बाष्पीभवन नॉर्म्स पेक्षा जास्त झाले असल्यामुळे विक्री झाली की नुकसान झाले असा मूळ प्रश्न महालेखाकार यांचा आहे. प्रमाणापेक्षा जास्त नुकसान दाखविले असतील तर त्याची जबाबदारी कोणावर आहे ? तसेच बाष्पीभवन सर्टिफाय कोण करते अशी समितीने पृच्छा केली असता पेट्रोलियम कंपन्यांच्या अकौंटसमध्ये लॉस दाखविला आहे तो कोणी सर्टिफाय केला आहे या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, बाष्पीभवन चे सर्टिफाय पेट्रोलियम कंपन्याच्या अकाऊंटसमध्ये येते तसेच ऑईल कंपन्यांनी त्यांचे अकौंटस तयार केले आहे. ते बोर्ड ऑफ मॅनेजमेंटमध्ये मान्य झालेले आहे असेही सांगितले.

सरकारी कंपन्यांमध्ये चुकीचे लिहिले जाणार नाही हे गृहीत धरायला काही कारण आहे काय ? या समितीच्या प्रश्नावर विभागासमोर सनदी लेखापाल (C.A.) ने सर्टिफाय केलेले लेखे येतात. ते विभाग स्वीकारतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. पेट्रोल/डिझेल तेलाची हानी ही तेलदर समितीने नियमत केलेल्या निकषापेक्षा किती टक्के जास्त किंवा कमी होऊ शकते, प्रत्यक्षात सन २००७-२००८ या वर्षात किती टक्के हानी झाली आहे अशी समितीने पृच्छा केली असता कर हा विक्री झालेला वस्तूला लागतो. पण यथे विक्री झालेली नाही विक्री कशामुळे झाली नाही हा विषय त्या कंपनीचा आहे. हा सेल्स टॅक्सचा विषय नाही असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी समितीसमोर केले.

माहे डिसेंबर २००५ मध्ये नाशिक विभागाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत महालेखाकारांना असे आढळून आले की, वनस्पती खाद्यतेल आणि तेल वड्यांचे उत्पादन करणाऱ्या एका व्यापाऱ्याच्या १९९९-२००० मधील डिसेंबर २००४ मध्ये पूर्ण केलेल्या निर्धारणेत निर्धारणा अधिकाऱ्यांनी रूपये १२.८६ कोटीच्या वनस्पती विक्रीपैकी रूपये ११.११ कोटीच्या विक्रीकवर २.१ टक्के विक्रीकर कायद्याने आकारणे आवश्यक असताना कर न आकारण्याची कारणे काय आहेत ?

या अनुषंगाने खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, संबंधित व्यापाऱ्या विरूद्ध डिसेंबर २००९ मध्ये नोटीस काढण्यात आली होती. परंतु, तत्पूर्वीच व्यापाऱ्याने स्वत:ची मालमत्ता विकली होती. सदर युनिट बंद पडल्यामुळे डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडिस्ट्रीज व डेव्हलपमेंट कमिशनर इंडस्ट्रीज यांनी व्यापाऱ्याचे सवलत प्रमाणपत्र सुरूवाती पासूनच रद्द केले. त्यामुळे जुनी सर्व सवलत रद्दबातल झाली. आता व्यापाऱ्याकडे थकबाकी असून जप्त करण्याजोगी कोणतीही चल व अचल संपती त्याच्याकडे नाही.

कर मुक्त प्रकरणाची व विक्री कर कमी आकारल्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, एकूण ९६७५५ प्रकरणे आहेत. एकूण रूपये २६५६१.८५ इतका टॅक्स गोळा केला आहे. कॅग रिपोर्टमध्ये १९२ प्रकरणे होती. STRA मधील रक्कम रूपये १७४.४० कोटी एवढी आहे. २५ प्रकरणातील रूपये १३७.०० कोटी इतकी रक्कम एक्सेप्ट करण्यात आली नाही. १६७ प्रकरणांमध्ये रूपये ३६.७१ कोटी इतकी रक्कम एक्सेप्ट करण्यात आली आहे. काही व्यापारी कोर्टामध्ये गेले होते. ट्रिब्यूनलने व्यापाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला आहे.

केंद्रीय विक्रीकर कायद्यानुसार मे.रामदेव ऑईल इंडस्ट्रीजकडे ६.५५ कोटी रुपयांची थकबाकी असून सदर व्यापाऱ्याकडे जप्त करण्याजोगी कोणतीही चल व अचल संपत्ती नसल्याची माहिती कोणत्या आधारावर निश्चित केली आहे ? हा कर वसूल न करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहे. कोट्यवधी रुपयांचा कर असताना त्यांच्याकडे कोणतीही चल व अचल संपत्ती नाही याची तपासणी कोणी केली आहे यासंदर्भात समितीने विचारणा केली. त्यावर स्पष्टीकरण देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मे.रामदेव ऑईल इंडस्ट्री बंद झाली आहे. या प्रकरणात ईसीआरए यांनी ३०.४७ लाख रुपयांची वसुली काढली होती. परंतु

सदर कंपनी बंद झाली आहे. ही कंपनी बंद करण्याची कारणे जाणून घेण्यासाठी कंपनीच्या डायरेक्टरशी संपर्क करुन माहिती घेण्यात आली आहे.

हे प्रकरण कोणत्या वर्षाचे आहे कंपनीची कोणतीही चल व अचल संपत्ती नाही, याची माहिती मागविण्यात आली आहे काय या समितीने विचारलेल्या प्रश्नावर या मध्ये दोन योजना असतात. एक म्हणजे डेफरमेंट स्कीम व दुसरी एक्झमशन स्कीम. डेफरमेंट स्कीम विक्रीकर विभागामार्फत राबविण्यात येते तर एक्झमशन स्कीम उद्योग विभागामार्फत राबविण्यात येते. सदरहू प्रकरणात कंपनीच्या डायरेक्टरला नोटीस देण्यात आली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विक्रीकर उप आयुक्त, जळगांव यांनी अनुक्रमे दिनांक ५.१.२००९, २.९.२००९ व दिनांक २९.७.२०११ रोजी थकबाकी वसूलीबाबत पत्र दिले आहे असाही खुलासा केला.

कंपनीकडे कोणतीही चल व अचल संपत्ती नाही, अशी माहिती कंपनीने कोणत्या आधारावर दिली आहे अशी समितीने पृच्छा केली असता याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, व्यापाऱ्याने सामुहिक प्रोत्साहन योजनेखाली सवलतीकरीता अभिकरण संस्थेकडे अर्ज केलेला होता. सामुहिक प्रोत्साहन योजनेखाली सवलत दिलेल्या युनिट धारकांची थकबाकीची वसुली महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. PSI-२१०८/CR-३५/IND-८, दिनांक २१.५.२००८ अन्वये करण्याची जबाबदारी उद्योग विभागाची आहे. त्यामुळे व्यापाऱ्याकडील थकबाकीच्या वसुलीकरीत मालमत्तेवर बोजा टाकता आलेला नाही. वसूलीबाबत विक्रीकर उपआयुक्त (ब-२२६), जळगांव यांनी दिनांक ५-१-२००९, दिनांक २-९-२००९ व दिनांक २९-७-२०११ रोजीच्या पत्राने डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज व डेव्हलपमेंट कमिशनर इंडस्ट्रीज यांना व्यापाऱ्याकडून थकबाकी वसूली करण्याबाबत कळविलेले आहे.

केंद्रीय विक्रीकर कायद्याखाली रु.६.५५ कोटी थकबाकी असून सदर व्यापाऱ्याकडे जप्त करण्याजोगी कोणतीच मालमत्ता नाही. हे निर्धारणा अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार महालेखाकारांना कळविण्यात आलेली नाही. तसेच दिनांक ९.२.२०१२ रोजी कंपनीला नोटीस बजावण्यात आली आहे. या मध्ये दोन भाग आहेत. या कंपनीने विक्रीकर विभागाकडे सूट मिळावी अशी विनंती केली होती. या बाबत पाठपुरावा करुन विक्रीकर वसूल करण्यासाठी

२००९ पासून २०११ पर्यंत तीन नोटीसा बजावण्यात आल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दिनांक २४.०७.२०१० च्या अनुपालन अहवालानुसार ३९ नंबरची नोटीस काढून बँक खाते गोठविण्यात आले आहे. जमीन महसूल कायद्याखाली नमुना-१ ची नोटीस व्यापाऱ्याला १८.१२.२००९ रोजी बजावली आहे. त्या अगोदर सदर व्यापाऱ्यांनी त्याची मालमत्ता विकली आहे. या प्रकरणात दुर्लक्ष केल्यामुळे व्यापाऱ्याला मालमत्ता विकण्यास सहकार्य झाले आहे. यासाठी कोण अधिकारी जबाबदार आहे अशी समितीने विचारणा केली त्यावर या केसमध्ये न्यायालयाने स्टे दिलेला आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

या व्यापाऱ्याकडे विक्रीकराची थकबाकी प्रलंबित असताना त्या व्यापारी मालमत्ता डिस्पोज करण्यास परवानगी कोणी दिली तसेच न्यायालयाने स्टे केव्हा दिला या समितीच्या प्रश्नावर दिनांक ५.१.२००९ व दिनांक २९.७.२०११ रोजी डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज व डेव्हलपमेंट कमिशनर इंडस्ट्रीज यांना व्यापाऱ्याकडून थकबाकी वसूल करण्यासाठी पत्र पाठविण्यात आले आहे, पुढील काम हे उद्योग विभागाचे आहे असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिले. तसेच या प्रकरणाची संपूर्ण माहिती समितीला नंतर सादर करण्याबाबत आश्वासित केले.

केंद्रीय विक्रीकर कायद्यानुसार व्यापाऱ्याकडे ६.५५ कोटी रुपयांची थकबाकी असून व्यापाऱ्याकडे जप्त करण्याजोगी कोणतीही चल व अचल संपत्ती नाही. कंपनीच्या संचालकांच्या मालमत्तेची माहिती घेण्यासाठी त्यांच्यावर केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ च्या कलम १८ अन्वये समन्स बजावण्यात आले आहे. हे सर्व गृहीत धरुन आता ही रक्कम वसूल करण्यासाठी आता कोणतीच मालमत्ता नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण होतो. प्रत्येक वेळी महालेखाकार कार्यालय परीक्षण करुन पॅरा काढतात. परंतु विभागाकडून अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात येते किंवा नाही तेव्हा या बाबी निदर्शनास येत नाहीत काय ? सदर व्यापाऱ्याकडे आता कोणतीही चल व अचल संपत्ती नसेल तर त्यांच्याकडून कोणत्या प्रकारे कराची थकबाकी वसूल करण्यात येईल अशी समितीने पृच्छा केली असता या संदर्भातील सविस्तर माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

कर चुकविण्याचे प्रमाण कमी झालेले नाही. आता विक्रीकर विभागाने एआययू ही नवीन योजना सुरु केली आहे. ही योजना चांगली आहे काय, अशी विचारणा समितीने केली.

यासंदर्भात खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, ही नवीन योजना चांगली आहे. सर्वांकडून रिटर्न व सविस्तर माहिती अनेक्शरमध्ये भरुन घेण्यात येते. खरेदी व विक्री किती झाली याचे डिटेल द्यावयाचे असतात. काही वेळा टॅक्समध्ये तफावत येत होती. त्यामुळे कर निर्धारणाचे ऑडिट करण्याची गरज आहे. या योजनेच्या माध्यमातून खरेदी केलेला माल व विक्री केलेला माल मॅच करुन घेण्यात येतो.

मे.रामदेव ऑईल इंडस्ट्रीचा प्रश्न निर्माण झाला आहे. उद्योग विभागाने या संदर्भात वित्त विभागाला टिपणी द्यावयास पाहिजे होती व या प्रकरणाचा आढावा आयुक्त यांनी घ्यावयास पाहिजे होता. उद्योग विभागाशी ही बाब संबंधित असल्यामुळे उद्योग विभागाचे सचिव बैठकीला उपस्थित असल्याशिवाय याबाबत खुलासा होऊ शकत नाही.

विभागाच्या सचिवांना साक्षीच्या बैठकीला बोलावयास पाहिजे होते असे मत समितीने व्यक्त केले असता उद्योग विभागाने अनेक उद्योग बंद केले आहेत. ज्या कंपन्याना सवलती दिल्या त्या त्यावेळी त्यांना उपयुक्त होत्या. उद्योग विभागाचे निर्णय पॉलिसी मॅटरचे असतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, रुपये १ कोटीच्या वर करदायित्व असताना उलाढालकर रुपये १.५ टक्के ऐवजी १ टक्के आकारल्याने शासनास १४.४१ कोटी रुपयांचे नुकसान झाले. कराची आकारणी कमी करणाऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय समितीने केलेल्या प्रश्नावर विभागीय प्रतिनिधींनी समितीस अशी माहिती दिली की, मे.इकोबोर्ड इंडस्ट्री लि. या कंपनीच्या संदर्भात लॅमिनेटेड करण्यापूर्वीच्या पार्टीकल बोर्डवर विक्रीकरातून सूट असताना लॅमिनेटेड पार्टीकल बोर्डचे उत्पादन आणि विक्रीवरील विक्रीकरातून चुकीची सूट देण्यात आली आहे. यासंदर्भात सुधारीत कारवाई करण्यात आली आहे. हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर हार्ड बोर्ड असताना लॅमिनेटेड पार्टीकल बोर्डची सवलत घेऊन चुकीच्या दराचे काढलेले आदेश रद्द करावे असा निर्णय न्यायालयाने दिला आहे.

सदरहू प्रकरण ट्रिब्युनलमध्ये गेले असता ट्रिब्युनलने असा निकाल दिला की, संबंधित व्यापाऱ्यास सदरहू सवलत अनुज्ञेय आहे. ट्रिब्युनलच्या निकालाविरुध्द विभाग उच्च न्यायालयात अपिलात गेले नाही कारण ट्रिब्युनलने निकाल देतांना उच्च न्यायालयात जाण्यास प्रतिबंध केला.

न्यायालयाच्या निर्णयानुसार सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली आहे काय यासंदर्भात विभागीय सचिवांनी इन्सेंटिव्ह प्रमाणपत्र घेतले असल्याचे समितीस सांगितले. महालेखाकारांनी काढलेला मुद्दा न्यायालयात रिजेक्ट झाला आहे, त्यावर अपील करण्यात आले आहे काय यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सुरुवातीला १०० रुपये विक्रीकर आकारण्यात आला असून ही बाब लक्षात आल्यावर हा विक्रीकर ११० रुपये आकारण्यात आला आहे तसेच वाढीव उत्पन्नावर कर आकारावयास पाहिजे होता. प्रिलॅमिनेटेड हार्ड बोर्ड व लॅमिनेटेड हार्ड बोर्ड संदर्भातील मुद्दा आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महालेखाकार कार्यालयाचे म्हणणे असे आहे की, जो एक टक्का कर लावला तो दीड टक्का लावावयास पाहिजे होता. याबाबत संबंधित व्यापारी न्यायालयात गेले. न्यायालयाने ही बाब रिजेक्ट केली असल्याचे समितीने सांगितले. तसेच याबाबत राज्य सरकारने उच्च न्यायालयात जावयास पाहिजे होते असेही मत समितीने व्यक्त केले.

मॅनिफॅक्चरिंग युनिट राज्यात यावेत, त्यांची संख्या वाढावी म्हणून शासनाने सवलत दिली होती हा ईसीआरए संदर्भातील मुद्दा आहे. बऱ्याच प्रकरणात लिटिगेशनमध्ये गुंतायचे की, मध्यम मार्ग काढून प्रश्न सोडवावयाचा याबाबतचा व्हयू विभागाला घ्यावा लागतो. कर आकारणीचा विचार करतांना राज्यात उद्योग आले पाहिजेत याचाही विचार करावा लागतो असा खुलासा विभागीय सचिवांनी दिला.

या सर्व बाबींचा फायदा घेऊन अनेक उद्योग अशा प्रकारच्या सवलती घेण्यासाठी राज्यात आले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. मा.उच्च न्यायालयात जाऊन या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात यावा. एक कोटी रुपयांच्या वर उलाढाल असतांना दीड टक्क्यांऐवजी एक टक्का कर लावला आहे. परंतु हा कर दीड टक्केच लावावा या निष्कर्षाप्रत विभाग गेला आहे. त्यामुळे दीड टक्के ऐवजी एक टक्का कर लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती

कारवाई करण्यात आली, वा करण्यात येत आहे अशी समितीने विभागाकडे विचारणा केली तसेच मा.उच्च न्यायालयात जाण्याबाबत शासनाला काही अडचण आहे काय अशीही विचारणा केली.

यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, न्यायाधिकरणाने अपील फेटाळल्यानंतर उच्च न्यायालयात जाण्यासंबंधीची तरतूद कायद्यामध्ये असल्याने या संबंधात विधी व न्याय विभागाचा आम्ही सल्ला घेतो व त्यानंतर पुढील कार्यवाही करता यावर समितीने विधी विभागाचा कायदेशीर सल्ला घेतल्यानंतर आम्ही न्यालयात जाऊ असा त्याचा अर्थ होतो असे विचारले असता प्री लॅमिनेटेड पार्टीकल बोर्डाला योग्य ती सवलत दिलेली आहे. त्यावेळी हा मुद्दा आला नव्हता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यात सरकारचे आणि आपले म्हणणे वेगळे आहे असे समितीने सांगितले असता अपिलात जाऊ नये असे सरकारचे म्हणणे असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. उलाढाल कर १.५ टक्क्यांऐवजी १ टक्के आकारला आहे. ज्या अधिकाऱ्याने सदर कर आकारणी केली आहे त्यावर आपण कारवाई केली आहे काय या प्रश्नाला टर्न ओव्हर टॅक्स विशिष्ट पातळीवर गेला तर संबंधित व्यापारी सवलत मिळण्यास पात्र ठरत नाही. या प्रकरणात प्री लॅमिनेटेड पार्टीकल बोर्डाचा टर्न ओव्हर विशिष्ट पातळीच्या खाली आहे. या प्रकरणी व्यापारी स्वत: न्यायाधिकरणाकडे गेला आहे हे समितीने लक्षात घ्यावे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्या अधिकाऱ्याने १ टक्का कर आकारणी केली आहे त्याच्याविरूद्ध आपण कारवाई केली आहे काय अशी समितीने विचारणा केली यावर विभागीय प्रतिनिधींनी या प्रकरणात १ कोटी रूपयाच्या वर टॅक्स गेला असता तर टर्न ओव्हर टॅक्स लागत होता या प्रकरणातील टॅक्स हा एक कोटी रूपयाच्या आत होता त्यामुळे त्यांना टर्न ओव्हर टॅक्स लागत नाही असा खुलासा केला.

या प्रकरणी विक्रीकर १३ टक्के ऐवजी ८ टक्के आकारण्याचे कारण काय आहे या समितीच्या प्रश्नाला पात्रता प्रमाणपत्र ग्राह्य धरल्यामुळे १३ टक्के ऐवजी ८ टक्के दर आकारण्यात आला आहे व ते न्यायाधिकरणाने देखील मान्य केले आहे असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी केले.

एखाद्या वस्तूचे परिवर्तन नवीन वस्तूमध्ये होते तेव्हा ती वस्तू सेल्स टॅक्सच्या कक्षेत येते काय असे प्रश्न निर्माण होतात. उदा.ताजे दूध घेतले त्यातून नवीन पदार्थ निर्माण झाला आहे काय ? दुधपासून दही निर्माण केल्यानंतर तसेच दूध बाटलीबंद केल्यानंतर विक्रीकर कशा प्रकारे आकारावयाचा अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. अशा परिस्थितीत प्री लॅमिनेटेड आणि लॅमिनेटेडचा देखील विषय घेतला आहे. विभागाची पॉलिसी काही प्रमाणात विचार करण्याजोगी असली तरी राज्याचा महसूल वाढविण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई विभाग करीत असतो. या प्रकरणी व्यापारी न्यायाधिकरणात गेला व न्यायाधिकरणाने निर्णय दिलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीसमोर दिली.

पेट्रोल, डिझेल करीता बाष्पीभवन/गळतीचे प्रमाण किती दाखविण्यात आले होते व त्याचे निश्चित कारण काय आहे.

१) पेट्रोल डिझेलकरीता बाष्पीभवन/गळतीचे प्रमाण हे तेल दर समितीन (OPC) ने अनुक्रमे ०.५ टक्के व ०.१२ टक्के असे ठरवून दिलेले होते.

तेल कंपन्यांनी निर्धारणेच्या वेळेस त्यांचे लेखा पुस्तकानुसार खालीलप्रमाणे वर्षनिहाय बाष्पीभवन /गळती या कारणांमुळे झालेल्या घटीचे दावे सादर केले होते.

वर्ष	**हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (घटीचे प्रमाण) टक्के**		**इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (घटीचे प्रमाण) टक्के**	
	पेट्रोल	**डिझेल**	**पेट्रोल**	**डिझेल**
१९९८-९९	--	०.१८	--	--
१९९९-००	१.२२	०.१६	--	--
२०००-०१	--	--	--	३.२५
२००१-०२	--	--	--	०.३२
२००२-०३	०.८०	१.५९	--	--

अधिनियमात कोणत्या आधारावर बाष्पीभवन गळतीचे प्रमाण ठरविण्यात आले आहे या समितीच्या प्रश्नावर पेट्रोल व डिझेल यांचे बाष्पीभवन/गळतीचे प्रमाण मुंबई मोटार स्पिरीट कर अधिनियमामध्ये ठरविण्यात आलेले नसून हे प्रमाण तेल दर समिती (OPC) ने ठरविले असून ही समिती राज्याच्या अखत्यारीत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तेलदर समिती ही कोणत्या विशिष्ट हेतूने निकष ठरवते ? याबाबत समितीला सविस्तर माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, तेल कंपन्यांनी त्यांच्या तेलाच्या साठ्याची बाष्पीभवन /गळती याद्वारे कमीत कमी हानी व्हावी त्यादृष्टीने ऑईल कंपन्यांनी उपाययोजना करणे अपेक्षित आहे. यासाठी तेल दर समितीने (OPC) किमान प्रमाण ठरविण्यात आले असावे असे वाटते.

प्रत्यक्षात पेट्रोल/डिझेल तेलाची हानी ही तेलदर समितीने नियत केलेल्या निकषापेक्षा किती टक्के जास्त किंवा कमी होवू शकते ? प्रत्यक्षात सन २००७-०८ या वर्षात किती टक्के हानी झाली आहे अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय सचिवांनी असे विदीत केले की, महालेखाकारांनी घेतलेला आक्षेप हा वर्ष १९९८-९९ ते २००२-०३ या कालावधीच्या तेल कंपन्यांच्या निर्धारणेबाबत आहे. या तेल कंपन्यांच्या पेट्रोल/डिझेल या मोटार स्पिरीटची बाष्पीभवन व गळती या कारणाने झालेली हानी व तेल समितीचे त्याबाबतचे निकष याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.

अ) तेलदर समितीचे किमान घटीचे निकष

अ.क्र.	**मोटार स्पिरीट**	**घटीचे प्रमाण**
१	पेट्रोल	०.५ टक्के
२	डिझेल	०.१२ टक्के

ब) प्रत्यक्षात झालेल्या घटीचे प्रमाण

वर्ष	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (घटीचे प्रमाण) टक्के		इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (घटीचे प्रमाण) टक्के	
	पेट्रोल	डिझेल	पेट्रोल	डिझेल
१९९८-९९	--	०.१८	--	--
१९९९-००	१.२२	०.१६	--	--
२०००-०१	--	--	--	३.२५
२००१-०२	--	--	--	०.३२
२००२-०३	०.८०	१.५९	--	--

तेलाची हानी काही मर्यादेबाहेर होत असेल आणि कायद्यात तशी तरतूद नसेल तर त्या मर्यादेबाहेरच्या हानीला विक्री समजून त्यावर कर आकारता येत नाही. परंतु मर्यादेबाहेर हानीचे कारण विचारात घेतले जात नाही काय यासंदर्भात खुलासा करताना बाष्पीभवन व गळतीद्वारे होणाऱ्या हानीचे कारण निर्धारणेच्या वेळेस सादर केलेल्या पुस्तकांच्या आधारे विचारात घेतले जाते असे विभागीय सचिवांनी समितीसमोर स्पष्ट केले.

डिसेंबर २००५ मध्ये नाशिक विभागाच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणीत महालेखाकारांना असे आढळून आले की, वनस्पती खाद्यतेल आणि तेलवड्यांचे उत्पादन करणाऱ्या एका व्यापाऱ्याच्या १९९९-२००० सालाच्या डिसेंबर २००४ मध्ये पूर्ण केलेल्या निर्धारणेत निर्धारणा अधिकाऱ्यांनी रु. १२.८६ कोटीच्या वनस्पती विक्रीपैकी रु. ११.११ कोटीच्या विक्रीवर २.१ टक्के विक्रीकर कायद्याने आकारणे आवश्यक असताना करमुक्त करण्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता मे.रामदेव ऑईल इंडस्ट्रीज लि. या प्रकरणातील महालेखाकारांचा आक्षेप मान्य करुन मुंविका, १९५९ च्या कलम ५७ खाली दिनांक २४.१२.२००९ अन्वये सुधारित आदेश पारीत करुन रु. ७५.१७ लाखांची मागणी काढली. मुळ आदेशाप्रमाणे मंजूर करण्यात आलेला परतावा रु. ९.४७ लाख, सुधारीत आदेश कलम ५७ खाली पारीत करताना विचारात घेण्यात आला नव्हता. त्यामुळे कलम ६२ खाली दुरुस्ती आदेश दिनांक २१.१०.२०१० रोजी पारीत करुन रु. ८४.६० एवढी मागणी काढण्यात आली आहे. व्यापाऱ्याने उपरोक्त आदेशाविरुध्द महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाकडे अपिल क्र. ५२/२०११ अन्वये अपिल दाखल केलेले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अंधेरी आणि नरिमन पॉइंट विभागातील तीन व्यापाऱ्यांच्या २००१-०२ आणि २००३-०४ मधील कालावधीतील रु. ९.३९ कोटी विक्रीच्या व्यवहाराची २००५-०६ मध्ये निर्धारणा करताना भरणपत्र, गोदीअधिपत्र, रेल्वेपावती इत्यादी कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसताना सुध्दा या विक्रीला निर्यात विक्री समजून करातून सूट का देण्यात आली ? अशी सूट किती कंपन्यांना देण्यात आली होती. त्यांची नावे काय आहेत ? त्यांच्या वसुलीची सद्यस्थिती काय आहे ? यासंदर्भात समितीने सविस्तर माहिती देण्याबाबत विभागास सूचित केले असता विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला. अंधेरी विभागातील मे. करंट अफेअर्स या व्यापाऱ्याच्या वर्ष

२०००-०१ आणि वर्ष २००१-०२ तसेच मे. रेकॉन डाईन अँड टुल्स या व्यापाऱ्याच्या वर्ष २००२-०३ या कालावधीची निर्धारणा करताना संबंधीत निर्धारणा अधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांनी सादर केलेली निर्यातीची कागदपत्रे (उदा. बील ऑफ लॅडींग, निर्यातीबाबतचे बँक प्रमाणपत्रे इ.) तपासूनच निर्यातीचा दावा मान्य केलेला आहे. त्यानुसार अनुपालन अहवाल महालेखाकारांना सादर केलेला आहे. कंपन्यांनी दावा केलेली निर्यात बरोबर असून या प्रकरणी महसूल हानी झाली नाही. त्यामुळे वसूलीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

नरीमन पॉईंट विभागातील मे.जनरल ट्युब अँड हार्डवेअर मार्ट या व्यापाऱ्याच्या वर्ष २००३-०४ या कालावधीची निर्धारणा करताना मान्य केलेली निर्यात व महालेखाकारांच्या मते असलेली निर्यात यांच्या आकडेवारीत फरक असल्याबाबतच्या हा मुद्दा आहे. मात्र या प्रकरणात लेखापरिक्षण करताना आयातीची रक्कम ही निर्यातीची रक्कम म्हणून गृहीत धरली गेली व त्यामुळे ही तफावत दिसते आहे असा अनुपालन अहवाल महालेखाकारांना सादर केला होता. त्यानुसार सदर आक्षेप महालेखाकारांनी बंद केला आहे.

सात विभागातील चौदा व्यापाऱ्यांच्या २००१-०२ आणि २००४-०५ मधील कालावधीतील २००५-०६ आणि २००७-०८ दरम्यान निर्धारणा करताना तयार कपडे, यंत्रांचे सुटे भाग इत्यादींच्या रु. २१९.१८ कोटी विक्रीला निर्यात म्हणून मान्यता देवून करातून सूट दिली होती. सीमा शुल्क विभागाच्या निर्यात तपशीलाबरोबर ह्या विक्रीची पडताळणी केली असता फक्त एकूण रु. ८१.३८ कोटी निर्यात विक्रीची नोंद झाल्याचे आढळून आल्याने रु. १३७.८० कोटीच्या निर्यात विक्रीच्या दाव्यावर करातून चुकीची सूट दिली गेल्याने रु. ७.०८ कोटी कराच्या महसूलाचे शासनाचे नुकसान झाले आहे हे खरे आहे, या प्रकरणांची सद्यस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता महालेखाकार कार्यालयाने सीमा शुल्क विभागाकडून प्राप्त केलेली व्यापारीनिहाय निर्यातीची आकडेवारी अपूरी होती. विक्रीकर विभागाने सीमा शुल्क विभागाकडे निर्यातीच्या व्यवहारांची पडताळणी केली असता प्राप्त झालेली निर्यातीची आकडेवारी अपूर्ण प्राप्त झाली आहे. त्यामुळे मान्य केलेली निर्यात व महालेखाकारांनी दिलेल्या तपशिलानुसारची निर्यात यामध्ये तफावत दिसते.

मान्य करण्यात आलेल्या निर्यातीचा तपशिल हा या बँकांमार्फत निर्यातीचे व्यवहार केले आहेत त्या बँकांकडून प्राप्त "बँक सर्टिफिकेट ऑफ एक्सपोर्ट रियलायझेशन" शी पडताळला

असता सदर निर्यात योग्य आढळली. काही प्रकरणात जॉईंट डायरेक्टर ऑफ फॉरेन ट्रेड यांचे कार्यालयाकडून प्राप्त निर्यातीचा तपशिलांशी मान्य केलेली निर्यात पडताळली असता ती जवळपास योग्य आढळली. त्यामुळे या प्रकरणी मान्य केलेली निर्यात बरोबर असून महसूल हानी झालेली नाही असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी समितीसमोर केले.

नागपूर यांच्या कार्यालयाच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी ऑक्टोबर, २००७ मध्ये केली असता असे निदर्शनास आले की, मे.वेस्टर्न कोल फिल्ड लि., नागपूर यांच्या २००१-०२ या वर्षीच्या निर्धारणेला मार्च २००७ मध्ये अंतिम स्वरुप देताना एकूण विक्री निर्धारीत करण्यासाठी कामगारांना निःशुल्क देण्यात आलेल्या कोळशाची रु. ३७६.९५ कोटी किंमत गृहीत न धरता रु. १३.४५ कोटींची वजावट देण्यात आली होती. याचा परिणाम व्याजासहित रु. २.२१ कोटीची चुकीची वजावट देण्यात झाला. अशा प्रकारची चुकीची वजावट अनेक वर्षापासून देण्यात येत असल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे आतापर्यंत शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. असे समितीने मत व्यक्त केले आहे. तसेच करमुक्त करपात्र मालाचे गुणोत्तर काढताना चूक केल्यामुळे रु. २२१.३४ लाखाचे शासनाचे नुकसान झाले आहे ही चूक कोणी केली आहे ? संबंधितांवर विभागाने काय कारवाई केली आहे याबाबत विचारणा केली असता मे.वेस्टर्न कोलफिल्ड लि., नागपूर सदर व्यापाऱ्याने निर्धारणा आदेशांविरुध्द विसआ (अपिले), नागपूर यांचेसमोर अपिल दाखल केले होते. सदर प्रकरण त्यावेळी अपिलामध्ये असल्याने अपिल अधिकाऱ्यास आक्षेप कळविण्यात आले होते. त्यानुसार विक्रीकर सहआयुक्त (अपिले), नागपूर यांना तपासणीअंती असे आढळून आले की, महालेखापालांनी करमुक्त व करप्राप्त मालाचे गुणोत्तर काढताना मांजरा डेपोच्याबाबत करमुक्त उलाढाल रु. १६,९९,२००/- विचारात न घेता चूकीने रु. ३,७५,८५,०२,७३७/- विचारात घेतली जी अंतर्गत डेपो हस्तांतरणाशी संबंधित आहे. महालेखाकारांचा आक्षेप अपिल अधिकाऱ्यांनी तपासून मूळ निर्धारणा आदेशात दिलेली वजावट बरोबर आहे असा अपिल निर्णय दिला आहे.

सदर प्रकरणी कोणतीही महसूलहानी झाली नसून निर्धारणा अधिकाऱ्यांची चूक झालेली नाही त्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यात आलेली नसलयाचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

विभागातील १४ व्यापाऱ्यांच्या निर्धारणात वजावटीची चुकीची संगणना करण्यात आल्याने किंवा वजावटीस पात्र नसलेल्या खरेदीवर चुकीने वजावट दिल्याने शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले आहे. विक्रीकर विभागात वजावटीची संगणना करण्याचे व वजावटीस पात्र असलेल्या खरेदीवर वजावट देण्याचे अधिकार कोणत्या स्तरावर आहे अशी अनेक प्रकरणे निदर्शनास येत असल्याने विभागाने याबाबत आढावा घेतला आहे काय ? सद्यस्थितीत अशा प्रकरणांची टक्केवारी काय आहे ? याची विभागवार किंवा जिल्हावार माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले. यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदर १४ प्रकरणांपैकी ९ प्रकरणात दुरुस्ती कार्यवाही होऊन वसुली झाली आहे. उर्वरीत ५ प्रकरणांपैकी ३ प्रकरणे महाराष्ट्र विक्रीकर अपिलामधेन पुर्न:स्थापित झाल्यामुळे फेरतपासणीची कार्यवाही चालू आहे व १ प्रकरण बी.आय.एफ.आर. मध्ये निर्णयासाठी प्रलंबित आहे.

निर्धारणेबाबत विक्रीकर आयुक्त बैठका घेऊन वेळोवेळी कामकाजाचा आढावा घेत असतात. व्यापाऱ्याने विवरणपत्रात दाखविलेला दावा तपासणे व केलेल्या वजावटीची संगणना करण्याचे व वजावटीस प्राप्त झालेल्या खरेदीवर वजावट देण्याचे अधिकार संबंधित निर्धारणा अधिकाऱ्यांना आहेत. अशी टक्केवारी उपलब्ध नाही.

दिनांक ७.११.२०१२ रोजी झालेल्या बैठकीत विभागाने दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्याने समितीने दिनांक ३०.१.२०१३ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने मे.रामदेव ऑईल इंडस्ट्रीजकडे ६.५५ कोटी रुपयांची थकबाकी असताना देखील सदर कंपनीला विभागाने परवानगी दिल्यामुळे कंपनीने स्वत:ची मालमत्ता विकून टाकली. आता कंपनीकडे कोणत्याही प्रकारची चल किंवा अचल मालमत्ता शिल्लक राहिलेली नाही. या प्रकरणी उच्च न्यायालयात जाण्याचा मार्ग होता. जेणेकरुन जे कोणी दोषी असतील त्यांना जेलमध्ये पाठविता आले असते. परंतु विभागाने या संबंधी कार्यवाही का केली नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की,

सदर कंपनीने एक्झम्पशन स्कीम अंतर्गत विक्रीकरात सूट मिळण्यासाठी विक्रीकर विभागाकडे विनंती केली होती. त्यानुसार कंपनीला विक्रीकरात सूट देऊन लाभ देण्यात आला होता. याच अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, ही केस सन १९९९-२०००

मधील आहे. त्यावेळी आयपीएस स्कीममध्ये एसटीआरच्या संदर्भात मुद्दा उपस्थित झाला होता. वनस्पती तेलाच्या दरामध्ये बदल झाला होता तो दर वाढीव होता. त्या दरानुसार आहे. एसटीआरएचा मुद्दा उपस्थित झाला आहे त्यांचा सीक्युपी प्रलंबित होता. त्यामुळे त्यांना जो फायदा मिळतो तो माफ एक्झम्पट झाला आणि त्यामुळे त्यांच्याकडून कर वसूल करण्यात आला नाही त्यानंतर २००६ मध्ये रिव्हजन ऑर्डर पास केली. त्यावेळी त्यांचा सीक्युपीच्या मर्यादित होता त्यामुळे त्यांच्या वसुलीचा मुद्दा नव्हता. ही बाब सन १९९९-२००० मधील आहे ही महत्वाची बाब आहे. त्यानंतर सन २००५ मध्ये सदर युनिट बंद पडले. त्यावेळी त्यांना एक्झम्पशन पेएबल झाले. या संदर्भात रिव्हीजन ऑर्डर पास झाली त्यामुळे ते अपिलात गेले व या प्रकरणी स्टे देण्यात आला. सदर युनिट बंद पडल्यामुळे डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज व डेव्हलपमेंट कमिशनर इंडस्ट्रीज यांनी त्यांचे एन्टायटलमेंट प्रमाणपत्र सुरुवातीपासून रद्द केले आहे या प्रकरणी जवळपास २.२६ कोटी रुपये वसूल झाले आहेत.

उपरोक्त खुलाशानुषंगाने सचिव, उद्योग यांनी असे सांगितले की, या मुद्यासंबंधी मूळ युनिट आणि त्या युनिटचे विस्तारीकरण असे दोन भाग आहेत. शासनाने सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९३ अंतर्गत त्यांच्याकडून २ टक्के रक्कम घेऊन त्यांना लाभ दिला होता. त्यांनी ठराविक मर्यादेपर्यंत आयपीएस स्कीम अंतर्गत व्यापार करुन करात सूट मिळविली व ती त्यांना अनुज्ञेय होती. पूर्वी त्यांना आयपीएस योजना मंजूर असल्यामुळे ते कराची रक्कम भरत नव्हते अशा प्रकारे पूर्वीची प्रोसिजर होती. विक्रीकर आयुक्त कार्यालयाला असे आढळून आले की, सदर युनिट बंद पडले आहे. या संदर्भात अशी पॉलिसी होती की, युनिट सुरु होऊन प्रॉडक्शनला सुरुवात झाल्यानंतर सात वर्षांच्या कालावधीत युनिट बंद पडल्यास, सदर युनिटला काही लाभ दिले असल्यास त्या लाभाची रक्कम व्याजासह वसूल करण्याची पॉलिसी होती. तसेच ७ वर्षांच्या कालावधीनंतर युनिट बंद पडल्यास त्यांना दिलेल्या लाभाची रक्कम वसूल करण्याची तरतूद होती. आक्षेप असा आहे की, पॉलिसीनुसार युनिटचे प्रॉडक्शन सुरु झाल्यानंतर ते २० वर्षांपर्यंत सुरु राहिले पाहिजे. अशा परिस्थितीत मूळ युनिट व त्याचे विस्तारीकरण युनिट हे दोन्ही युनिट विहित कालावधीच्या आत बंद पडलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून दिलेल्या लाभाच्या रकमेची वसुली करणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार सदर युनिटचे एलिजीबिलीटी प्रमाणपत्र रद्द करुन त्यांच्याकडून वसुलीची कार्यवाही सुरु केली आहे. खात्याने

दिनांक २०.८.२००९ रोजी वसुलीची नोटीस पाठविली होती. त्या नंतर दिनांक २९.९.२००९ रोजी त्यांना आरआरसी देण्यात आली. सदर युनिटने बँकेकडून कर्ज घेतले होते. युनिट बंद पडल्यामुळे बँकेने त्यांची मालमत्ता ताब्यात घेतली. सदर केस बँकेकडे हस्तांतरीत झाली आहे. आता त्यांची कोणतीही मालमत्ता शिल्लक नाही. विभागाकडे दिनांक १८.८.२०११ रोजी आरआरसी प्राप्त झाली आहे. सध्या अशी परिस्थिती आहे की, सदर कंपनीकडे वसुलीसाठी कोणतीही मालमत्ता उपलब्ध नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही कंपनी खाजगी आहे का ? यावर विभागीय प्रतिनिधींनी ही कंपनी खाजगी आहे ज्यावेळी सदर कंपनीने मालमत्ता विक्री केली त्यावेळी ॲसेसमेंट प्रोसिडिंग प्रलंबित होते. कायद्यात अशी तरतूद आहे की, ॲसेसमेंट प्रोसिडिंग प्रलंबित असली तरी, इतरांनी सदर मालमत्ता विकत घेतल्यास तो व्यवहार रद्द करण्यासाठी विभागाकडून नोटीस देता येऊ शकते. या प्रकरणी ६ जणांनी खरेदी विक्री केली आहे. त्या अनुषंगाने विक्रीकर विभागाने संबंधितांना मालमत्ता खरेदी-विक्रीचा व्यवहार रद्द का करु नये, अशा आशयाची प्रोसिक्युशनल नोटीस पाठविलेली आहे. या संदर्भात नंतर सुनावणी होणार आहे असा खुलासा केला.

सदर कंपनी किती टॅक्स भरत होती. त्या कंपनीची वार्षिक उलाढाल किती होती या समितीच्या प्रश्नाला सुरुवातीच्या काळात सदर कंपनीला करामध्ये सूट असल्यामुळे त्यांच्याकडून कराची रक्कम घेण्याचा प्रश्न नव्हता. सन २००० पर्यंत ते कर भरत नव्हते. उलाढालीचा विचार केल्यास त्यांचा सीक्युपीचा कालावधी सुरु होता असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी केले.

सदरहू व्यवहाराला स्टे देण्यात आला होता का अशी समितीने विचारणा केली असता सदरहू कंपनीला सन २००० पर्यंत विक्रीकरातून सूट देण्यात आली होती. परंतु सीक्युबीच्या गणनेप्रमाणे ज्यावेळी या कंपनीचे उत्पन्न एसटीआरएने करपात्र दाखविले. त्यावेळी सन २००० -२००५ या कालावधीमध्ये या कंपनीचे उत्पन्न करपात्र झाले होते. या कालावधीमध्ये कंपनीचा आयपीएसच्या क्लेमच्या रकमेची वसूली डिपार्टमेंटने करणे आवश्यक होती. त्यावेळी कंपनीची प्रॉपर्टी विकण्याची नोटीस आम्ही रद्द केली. तसेच, कंपनीने आयडीबीआयसोबत जो विक्रीच्या

व्यवहारापैकी काही भाग पूर्ण केला होता, तो ही रद्दबातल करण्याची प्रक्रिया सुरु केली असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

याअनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू कंपनीने त्यांचे युनिट बंद पडल्यानंतर पेपरमध्ये प्रॉपर्टी विक्रीबाबत सूचना वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द केली असता आयडीबीआय बँकेने सदरहू कंपनीशी त्यांचा आपआपसातील व्यवहार क्लियर केला. त्याच प्रमाणे विभागाने वर्तमानपत्रातील त्यांची जाहिरात वाचून रिकव्हर करण्याची प्रक्रिया का सुरु केली नाही ?

याअनुषंगाने खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदीत केले की, सदरहू कंपनीच्या विक्रीची रक्कम ३१ मार्च क्लोजर व ०१ एप्रिलच्या स्टेमध्ये होती. त्यामुळे विभागामार्फत त्यावेळी या संदर्भात कंपनीबरोबर प्रक्रिया स्थगित अथवा वसूली व्यवहार केला गेला नाही. सीक्युबी नुसार एसटीआरएने कंपनीचे उत्पन्न करपात्र दर्शविल्यानंतर ज्यावेळी कंपनीने सन २००१ ते २००४ मध्ये आयटी रिटर्न फाईल केले होते. त्यावेळी विभागाने कंपनीला कराच्या सवलतीमधून वगळून एक्स पार्टी घोषित केले होते तसेच सदरहू कंपनी ४ वर्षापूर्वी अपिलात गेली होती असेही नमूद केले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अशा प्रकारची प्रकरणे उच्च न्यायालयामध्ये जाऊन त्याचा निकाल लवकरात लवकर लागून शासनाची रक्कम वसूल झाली पाहिजे. यामध्ये विनाकारण शासनाचे नुकसान होता कामा नये. विभागाच्या माध्यमातूनही या प्रकरणासंदर्भात अपिल केले जाऊन कंपनीच्या विक्रीच्या व्यवहारामध्ये हस्तक्षेप करुन तो व्यवहार रद्द केला जाईल असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले होते. त्या संदर्भात विभागाने कोणत्या प्रकारची कारवाई केलेली आहे समितीच्या या प्रश्नावर कंपनीने दिनांक २८ ऑक्टोबर, २००९ मध्ये त्यांच्या युनिटची प्रॉपटी विक्रीकरिता काढली होती. विभागाने महिन्या भरापूर्वी कंपनीला प्रॉसिक्यूशन नोटीस पाठविलेली आहे. या सूचनेमध्ये विभागाने असे नमूद केलेले आहे की, सदरहू कंपनीने आयडीबीय बँकेशी जो अंशत: विक्रीचा व्यवहार केलेला आहे व तो रद्द करण्यात येत आहे. या नोटिशी विरोधामध्ये कंपनी अपिलामध्ये गेलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

उपरोक्त खुलाशाच्या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीच्या माहितीप्रमाणे सदरहू कंपनीने सन २००९ मध्ये प्रॉपर्टी न विकता सन २००८ मध्ये विकली

होती. या प्रकरणाच्या तब्बल चार वर्षानंतर विभागाने कंपनीला वसूली व व्यवहार स्थगितीची नोटीस पाठविली, हे योग्य नसल्याबाबत खेद व्यक्त केला. यावर खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, कंपनीच्या विक्रीची रक्कम ही बजेट क्लोजर मध्ये अडकलेली होती. तसेच, वित्त विभागाने नियुक्त केलेल्या न्यायिक प्राधिकरणाकडे अडकलेली होती त्यामुळे नियमाप्रमाणे विभागाकडून त्यांच्या व्यवहाराला स्थगिती आदेश देऊ शकत नव्हतो. विभागाने कलम ६२ ए अंतर्गत कंपनीला निर्देश दिले होते की, "आपला व्यवहार रद्द करण्यात येत असून आपण वसूलीच्या रकमेचा भरणा करावा."

रु.०६ कोटी ५५ लक्ष सरकारने या कंपनीकडून वसूल करणे बाकी आहे. आयटी विभागाने विक्रीकर व उत्पन्न करासदंर्भात कंपनीला एक्स पार्टी ठरविलेले असल्यामुळे शासनाने कंपनीला देण्यात आलेली सवलत वसूल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. विभागाने सदरहू वसुलीची प्रकरणे विभागीय व प्राधिकरण पातळीवर निकाली काढावे, शासनाचे नुकसान होता कामा नये, याची काळजी विभागाने घ्यावी. दहा वर्षापासून समितीमध्ये हे आक्षेप परिच्छेद पडून असतात. समिती या संदर्भातील परिच्छेदाबाबत निर्णय घेत आहे की, समिती समितीच्या पातळीवर या आक्षेप परिच्छेदासंबंधीचा विषय संपवित आहे. परंतु विभागाने शासनाचे नुकसान होऊ न देता प्राधिकरण पातळीवर केसेसचा निपटारा करुन त्यासंबधीच्या निर्णयांचे पालन करावे. तसेच, प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयासंदर्भात त्यांचे समाधान न झाल्यास त्या संदर्भात विभागाला हायकोर्टामध्ये जाण्याची मुभा आहे. विभागीय ट्रिब्युनलकडे अशा संदर्भातील एकूण पाचशे ते हजार प्रकरणे निर्णयाविना प्रलंबित आहेत. विधानसभेमध्ये वॅटचा परतावा तसेच, ट्रिब्युनलकडे प्रलंबित असलेल्या केसेस हे दोन विषय नेहमी चर्चेकरिता असतात. वर्षानुवर्षे अधिवेशनामध्येही हे मुद्दे चर्चेला येतात, या विषया संदर्भात तात्पुरता निर्णय न घेता कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. या संदर्भात समिती अहवालामध्ये अशी शिफारस करीत आहे की, " विभागाने प्राधिकरण म्हणून नेमलेल्या ट्रिब्युनल पातळीवरील निर्णय कंपनीवर बंधनकारक ठेवून प्राथमिक रित्या जेवढी वसूली होत आहे, तेवढी करावी. सदरहू वसूली कमी वाटल्यास त्या संदर्भात विभागाला उच्च न्यायालयात जाण्याची मुभा आहे." या सर्व प्रक्रियेमध्ये विभागाने शासनाचे नुकसान होत नाही, हे लक्षात असू द्यावे असे मत समितीने व्यक्त केले.

ट्रिब्युनलमध्ये केसची सुनावणी होत असतांना कंपनी अथवा फिर्यादी पक्ष जर दोन ते तीन वेळा पेक्षा अधिक गैरहजर असेल तर त्यास कायद्यातील नवीन सुधारणेप्रमाणे परवानगी नाही. समितीने भेट दिल्यानंतर व साक्ष घेतल्यानंतर या संदर्भातील निर्णयामध्ये सुधारणा आणून तीन ॲडजर्नमेंटपेक्षा अधिक वेळा ॲडजर्नमेंट करण्यास परवानगी नाही, असा नियम जारी केलेला आहे. यामुळे प्रलंबित केसेसचा निपटारा जलद गतीने झालेला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

ट्रिब्युनल हे एक न्यायिक प्राधिकरण असून ते न्यायाधिकरणाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येते. विक्रीकर विभागामध्ये वन टाईम सेटलमेंट ही सिस्टम नाही का अशी समितीची विचारणा केली असता एमएसईबीमध्ये वन टाईम सेटलमेंट ही पध्दत अस्तित्वात आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

आक्षेप परिच्छेदांची संख्या सहा ते सात असून ते आक्षेप परिच्छेद गेल्या पाच ते दहा वर्षांपासून पेंडिंग आहेत. यासंदर्भात ट्रिब्युनल पातळीवर केसेसचा निपटारा जलद गतीने होणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. तसेच सन २००० पर्यंत या कंपनीच्या फॅक्टरी युनिटला विक्री करामधून सवलत देण्यात आली होती. सन २००० ते २००४ पर्यंत या कंपनीने आयकर रिटर्न फाईल केल्यानंतर शासनाला लक्षात आले की, कंपनीचे उत्पन्न करपात्र रकमेमध्ये समाविष्ट झाले त्यानंतर २००५ मध्ये हे युनिट डबघाईला आल्यानंतर फॅक्टरी बंद पडली. सन २००० -२००५ या कालावधीमध्ये शासनाने करपात्र उत्पन्न असतांनाही कंपनीला विक्रीकरामधून जी सूट दिलेली आहे, ती वसूल करणे क्रमप्राप्त ठरलेले होते. याकरिता विभागाने प्रॉसिक्यूशन नोटीस देऊन सदरहू व्यवहार ठप्प करुन रद्द केलेला आहे. त्यानुसार नियमाप्रमाणे कारवाई चालू असल्याचे समितीने मान्य केले. तसेच ट्रिब्युनल हे न्यायिक प्राधिकरण नसून विभागाने नेमलेले आहे. या ट्रिब्युनलमध्ये कोणाला नियुक्त केले जाते याबाबत विभागाकडे विचारणा केली असता ट्रिब्युनलमध्ये वित्त विभागातील निवृत्त अधिकारी व एक न्यायाधीश अशी नेमणूक केलेली असते अशी माहिती समितीने दिली.

सदरहू फॅक्टरी युनिट सन २००५ मध्ये डबघाईला आल्यानंतर बंद पडले होते. त्यापूर्वी चार वर्ष आयकर रिटर्न सदरहू कंपनीने भरलेले आढळून आलेले आहे. विभागाने सदरहू कंपनीकडून सूट वसूल केल्यानंतर प्रॉसिक्यूशन नोटीस दिलेली आहे. तसेच, कंपनीने

केलेला विक्री व्यवहार ठप्प दाखविण्यात येण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

संबंधित विभागांनी सदरहू कंपनी संदर्भात जी काही कारवाई करायची आहे ती त्वरित करावी, अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच, अशा प्रकारच्या अनेक प्रलंबित केसेस विभागाने लवकरात लवकर ट्रिब्युनलच्या माध्यमातून मार्गी लावाव्यात. तसेच, यामध्ये शासनाचे कोणतेही नुकसान होणार नाही आणि प्रलंबित वसूली योग्य प्रकारे वसूल होईल, याची खबरदारी घेण्यात यावी असे समितीने विभागास सूचित केले

. ट्रिब्युनल पातळीवर सदरहू वसुलीच्या केसेसच्या निर्णयाची अंमलबजावणी केल्यानंतर जी काही वसूली होईल ती जर विभागाला कमी वाटली तर ट्रिब्युनलच्या निर्णयाला विभाग उच्च न्यायालयामध्ये आव्हान देऊ शकतो. परंतु ट्रिब्युनल पातळीवरील निर्णय वर्षानुवर्षे प्रलंबित राहून अनेक वर्षे उलटली तरीही या माध्यमातून वसुली काहीही होत नाही मात्र वकिलांची फी द्यावी लागते. यामध्ये नाहक खर्च वाढतो, वसुली मात्र होत नाही. ट्रिब्युनलच्या निर्णयाची अंमलबजावणी केल्यानंतर विभागाला काही वसूली तरी करता येते असेही मत समितीने व्यक्त केले.

समितीने पुढे पेट्रोल/डिझेलचे बाष्पीभवन/गळतीचे प्रमाण नॉर्म्सपेक्षा जास्त झाले असल्यामुळे विक्री झाली की तोटा झाला, याबाबत समितीला सविस्तर माहिती देण्याबाबत विभागाला सूचित केले. देशात पेट्रोल, डिझेलची प्रत्यक्षात जी विक्री होते त्यावर कायद्याप्रमाणे सेल्स टॅक्स भरावा लागतो. ज्या कारणांमुळे पेट्रोल, डिझेलची विक्री होत नाही, जसे इव्हॅपोरेशन किंवा ट्रान्समिशन लॉस होत असेल तर त्यावर कशाप्रकारे विक्री कर आकारता येईल. यासंदर्भात महालेखाकारांनी असे म्हटले होते की, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, हिंदुस्थान पेट्रोलियम लिमिटेड या कंपन्यांचे पेट्रोल पंप आहेत. ते डिलर मार्फत पेट्रोलची विक्री करतात. तेल दर समितीने पेट्रोलचा ०.५ टक्के आणि डिझेलचा ०.१२ टक्के लॉस होऊ शकतो, अशा गाईड लाईन्स महालेखाकारांच्या कार्यालयास दिलेल्या असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले

पेट्रोल, डिझेलच्या प्रत्यक्ष विक्रीवर विक्रिकर आकारला जातो. पेट्रोल, डिझेलची प्रत्यक्षात जी विक्री होते त्याच्याशी विक्रीकर विभागाचा संबंध येतो. पेट्रोल, डिझेलचे बाष्पीभवन

किंवा गळती झाली तर त्याच्याशी विक्रीकर विभागाचा काही संबंध येत नाही. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणुन दिले.

अभिप्राय व शिफारशी

माहे डिसेंबर, २००५ मध्ये नाशिक विभागाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत महालेखाकारांना आढळून आले की, वनस्पती खाद्यतेल आणि तेल वड्याचे उत्पादन करणाऱ्या एका व्यापाऱ्याच्या सन १९९९-२००० मधील डिसेंबर, २००४ मध्ये पूर्ण केलेल्या निर्धारणेत निर्धारण अधिकाऱ्यांनी रु. १२.८६ कोटीच्या वनस्पती विक्रीपैकी रु. ११.११ कोटीच्या विक्रीवर २.१ टक्के विक्रीकर कायद्याने आकारणे आवश्यक असताना कर आकारण्यात आला नाही. त्यावेळी संबंधित व्यापाऱ्याविरुध्द डिसेंबर, २००९ मध्ये नोटीस काढण्यात आली होती. परंतु तत्पूर्वीच व्यापाऱ्याने मालमत्ता विकली होती. व्यापाऱ्याकडे थकबाकी असून जप्त करण्याजोगी कोणतीही चल व अचल संपत्ती नसल्याची माहिती समितीसमोर आली. सदरहू प्रकरणी सन २००४ मध्ये विक्रीकराची थकबाकी असल्याचे निदर्शनास येवून देखिल जमीन महसूल कायद्याखाली नमूना १ ची नोटीस व्यापाऱ्यास दिनांक १८.१२.२००९ रोजी म्हणजे ५ वर्षानंतर बजावली. यादरम्यानच्या कालावधीत व्यापाऱ्याने त्याची मालमत्ता विकली. विभागाने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे व्यापाऱ्यास मालमत्ता विकण्यास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य केले आहे.

विक्रीकराची थकबाकी मोठ्या स्वरुपात प्रलंबित असताना व्यापारी मालमत्ता विकतो व ते करीत असताना शासनाची साधी परवानगी देखिल घेत नाही ही बाब गंभीर आहे. विक्रीकराची थकबाकी जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवून त्यावर कार्यवाही पूर्ण होण्यापूर्वीच स्वतःची चल व अचल मालमत्ता विकल्याचे दाखवून विक्रीकराची थकबाकी देण्यासाठी निधी नसल्याचे भासवण्यात येते हे सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहमतीशिवाय होवू शकत नाही असे समितीचे मत आहे. अशी अनेक प्रकरणे असतील. महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यामुळे ही बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. असे प्रकार पुन्हा घडू नये यासाठी **नाशिक विभागाअंतर्गत वनस्पती खाद्यतेल व तेल वड्याचे उत्पादन करणाऱ्या व्यापाऱ्यास ज्या अधिकाऱ्यानी विक्रीकर थकविण्यास मदत केली अशा तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी**

तसेच या प्रकरणाची संपूर्ण माहिती समितीला आश्वासित केल्याप्रमाणे सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

विभागाने प्राधिकरण म्हणून नेमलेल्या ट्रिब्युनल पातळीवरील निर्णय कंपनीवर बंधनकारक ठेवून प्राथमिक रित्या जेवढी वसूली होत आहे, तेवढी करावी. सदरहू वसूली कमी वाटल्यास त्या संदर्भात विभागाला उच्च न्यायालयात जाण्याची मुभा आहे." या सर्व प्रक्रियेमध्ये विभागाने शासनाचे नुकसान लक्षात घेणे आवश्यक आहे. ट्रिब्युनल हे एक न्यायिक प्राधिकरण असून ते न्यायाधिकरणाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येते. काही केसेस गेल्या पाच ते दहा वर्षांपासून पेंडिंग आहेत. यासंदर्भात ट्रिब्युनल पातळीवर केसेसचा निपटारा जलद गतीने होणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. तसेच सन २००० पर्यंत या कंपनीच्या फॅक्टरी युनिटला विक्री करामधून सवलत देण्यात आली होती. **सन २००० ते २००४ पर्यंत या कंपनीने आयकर रिटर्न फाईल केल्यानंतर शासनाला लक्षात आले की, कंपनीचे उत्पन्न करपात्र रकमेमध्ये समाविष्ट झाले त्यानंतर २००५ मध्ये हे युनिट डबघाईला आल्यानंतर फॅक्टरी बंद पडली. सन २०००-२००५ या कालावधीमध्ये शासनाने करपात्र उत्पन्न असतांनाही कंपनीला विक्रीकरामधून जी सूट दिलेली आहे, ती वसूल करणे क्रमप्राप्त ठरलेले आहे. विभागाने प्रॉसिक्यूशन नोटीस देऊन सदरहू व्यवहार ठप्प करुन रद्द केलेला असलातरी विक्रीकर वसूलीसाठी पाच वर्षाचा विलंब करणे योग्य नसून याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

महसूल व वन (महसूल) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००७-०८ च्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील परिच्छेद क्रमांक ६.२ "केबलचालक/नृत्यबार चालकांकडून करमणूक कराची वसूली न करणे/कमी करणे" यासंदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहे.

"केबलचालक/नृत्यबार चालकांकडून करमणूक कराची वसूली न करणे/कमी करणे"

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम १९२३ मधील तरतुदीनुसार दिनांक १ एप्रिल २००० पासून महापालिका क्षेत्र अ व ब वर्ग पालिका क्षेत्र किंवा इतर प्रभागात केबल धारकाने प्रत्येक दूरचित्रवाणी संचाकरीता प्रतिमाह सरसकट रु. ३०, रु. २०/- किंवा रु. १०/- या दराने करमणूक शुल्क प्रदान करावयाचे होते. सदर दर जून २००६ पासून प्रत्येक दूरचित्रवाणी संचाकरीता प्रतिमाह रु. ४५/-, रु.३०/-, किंवा रु. १५/- असे सुधारीत करण्यात आले. एखाद्या महिन्यासाठी देय असलेले करमणूक शुल्क त्यापुढील महिन्याच्या दहा तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी प्रदान करावयाचे होते. नृत्यबारच्या बाबतीत, बृहन्मुंबई महानगरपालिका किंवा बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर पालिका किंवा पालिका/बृहन्मुंबई अंतर्गत न येणाऱ्या प्रभागातील प्रत्येक नृत्यबारचालकाने प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत प्रत्येक नृत्य अविष्काराकरीता प्रतिमाह रु. ३०,०००/-, रु. २५,०००/- आणि रु. १५,०००/- या दराने करमणूक शुल्क आगाऊ भरणे आवश्यक होते. करमणूक शुल्काची रक्कम भरण्यात कसूर केली तर, पहिल्या ३० दिवसाकरीता प्रतिवर्षी १८ टक्के दराने आणि त्यानंतर २४ टक्के दराने दंडनीय व्याज देय होते.

१४ जिल्ह्यांतील ३० घटकांची मे २००४ ते मार्च २००८ या काळात चाचणी तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, सन २००२-०३ ते २००६-०७ मधील विविध कालावधीकरीता २८५ केबलधारकांनी करमणूक कराची रु. ५४.१७ लाख रक्कम प्रदान केली नव्हती आणि १५४ केबल चालकांकडून रु. २३.५६ लाख करमणूक कर कमी वसुल केला होता. तसेच सन २००४-५ या काळात सात नृत्यबार चालकांनी रु. ३.८९ लाख करमणूक शुल्क प्रदान केले नव्हते/त्यांच्याकडून वसुल केले नव्हते. निवासी उपजिल्हाधिकारी/तालुका दंडाधिकारी/करमणूक कर अधिकारी यांनी सुध्दा चालकांकडे किंवा नृत्यबार मालकांकडे

कोणतीही मागणी केली नव्हती. परिणामी, रु. ८१.६२ लाखाची करमणूक कराची आकारणी झाली नाही/कमी झाली. याशिवाय विहीत दराने व्याजसुध्दा आकारणीय होते.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने आक्षेप मान्य केले आणि मार्च २००५ ते ऑगस्ट २००८ मध्ये २३२ केबल चालकांकडून रु. १७,९९२/- व्याजासह रु. ४४.८२ लाख आणि दोन नृत्यबार मालकांकडून रु. ६०,०००/- करमणूक शुल्क वसुल केले. उर्वरीत रकमेच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (नोव्हेंबर २००८)

ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की,

मुंबई शहर

मुंबई शहर जिल्ह्याकरीता लेखा परिच्छेद क्र. १६१५७/१(३), १६०२०/१, १५९६४/१ ए, १५९७२/१, १५५३७/१, १५९५२/१, द्वारे अनुक्रमे रुपये २,५०,०८०/-, ४९,७३०/-, २,८७,१४०/-, १,०२,९९०/-, ८,७४,२३०/-, १२,२६,५२०/- अशी एकूण रुपये २७,९०,६९०/- इतकी रक्कम केबल चालकांकडून वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आले होते. या परिच्छेदांपैकी परिच्छेद क्र. १५९५२/१ मधील आक्षेपित रक्कम रुपये १२,२६,५२०/- वगळता इतर परिच्छेदामध्ये नमूद संपूर्ण रक्कम टप्प्या-टप्प्याने वसुल झाली आहे. पूर्णपणे वसुली झालेल्या परिच्छेदाबाबत महालेखापाल कार्यालयास अनुक्रमे दिनांक २९.०६.२००९, १६.०७.२००९, २०.१०.२००८, ३१.०८.२००९ व २४.०६.२००९ अन्वये पूर्तता अहवाल सादर करण्यात आला आहे.

लेखा परिच्छेद क्र. १५९५२/१ मधील १२,२६,५२०/- मधून रुपये १०,९२,७३०/- इतकी रक्कम वसुल झाली असून उर्वरित १,३३,७९०/- इतक्या वसुल न करण्यात आलेल्या रकमेची वसुली जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सुरु आहे.

तसेच लेखा परिच्छेद क्र. १५४२१/२ द्वारे रुपये ६,००,०००/- इतकी रक्कम ५ नृत्यबार चालकांकडून वसुल न झाल्याबाबत परिच्छेद उपस्थित करण्यात आला होता. यापैकी ४ नृत्यबार चालकांकडून संपूर्ण रक्कम वसुल करण्यात आली आहे. सदरची रक्कम वसुल झाली असून दिनांक ९.१२.२००८ च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास सूचित करण्यात आले

आहे. एका नृत्यबार चालकाकडून अनुज्ञेय रक्कम रुपये ९०,०००/- पैकी ४०,०००/- वसुल करण्यात आली असून उर्वरित रक्कम रुपये ५०,०००/- वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मुंबई उपनगर

मुंबई उपनगर जिल्ह्यामधील लेखा परीक्षा अहवाल क्र. १५८९८/१, १६०८५/०१, व १५५४६/० याद्वारे प्राप्त आक्षेपित रक्कम अनुक्रमे रु. ७,३१,९७०/- रु. ९६,३३०/- व ३,२२,४७०/- वसुल करण्यात आली असून याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक १४.६.२०११, ११.६.२००८ व १७ फेब्रुवारी, २००६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

रायगड

रायगड जिल्ह्याकरीता लेखा परिच्छेद क्र. १६५५५/-१ या परिच्छेदाद्वारे रुपये १,१९,०००/- इतकी रक्कम ३ नृत्यबार चालकांकडून वसुल न केल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असून याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक २५.२.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच लेखा परिच्छेद क्र. १६५५५/२ व १६५५५/३ द्वारे अनुक्रमे १७ ते ५ केबल चालकांकडून रक्कम रुपये ४०,७३०/- व रु. २०,४४५/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असून महालेखापाल कार्यालयास दिनांक २९.४.२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

पुणे

पुणे जिल्ह्यातील लेखा परिच्छेद क्र. १५६६७/१, १६०७५/१, १५५७८/१, १५५७३/१, १४७३४/१ बी, १४९७१/१, १५६८०/१ द्वारे अनुक्रमे रुपये २,२८,९१०/-, ७४,०१०/-, १,१३,८७०/-, २,३५,११०/-, ९९,९९०/-, ३,१८,३२०/- १,१२,९२०/-, १,९८,९१०/- अशी एकूण रुपये १३,८२,०४०/- इतकी रक्कम केबल चालकांकडून वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आले होते. सदर संपूर्ण रक्कम टप्प्याटप्प्याने वसुल झाली आहे. या अनुषंगाने सदर सर्व परिच्छेद निर्लेखित करण्याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक ३१/१०/२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील केबल धारकाकडून करमणूक शुल्क वसुल न करणेबाबत लेखापरिक्षण क्र. १६६५९/१ अन्वये रु. ६,१२,७२०/- या आक्षेपित रकमेकरीता परिच्छेद उपस्थित करण्यात आला आहे. सदर संपूर्ण रक्कम वसुल करण्यात आली असून महालेखापाल कार्यालयाकडून दिनांक ३० जून २०१० अन्वये सदर परिच्छेद बंद करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

सोलापूर

सोलापूर जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १६२९२/१ द्वारे ८ केबल ऑपरेटर कडे रु. ४३९५०/- रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असून परिच्छेद निर्लेखित करण्याबात महालेखापाल कार्यालयास दिनांक १.११.२०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

नाशिक

लेखा परिच्छेद क्र. १६०६१/१ अन्वये निफाड तालुक्यातील ७ केबल ऑपरेटरकडून रुपये ९४,२५०/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदरची रक्कम वसुल झाली असून दिनांक ९.११.२००८ च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास सूचित करण्यात आले आहे.

तसेच लेखा परिच्छेद क्र. १६१७२/१ अन्वये बागलाण तालुक्यातील ४ केबल ऑपरेटरकडून रुपये ५६,९९५/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदरची रक्कम वसुल झाली असून दिनांक १२.१२.२००८ च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयस सूचित करण्यात आले आहे.

याशिवाय लेखा परिच्छेद क्र. १६१७२/१ अन्वये नाशिक जिल्ह्यातील रुपये १६,२९४/- इतक्या करमणूक कराचा उशीरा भरणा केल्याने दंडनीय व्याजाची आकारणी न करण्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदरची रक्कम वसुल झाली असून दिनांक १२.१२.२००८ च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास सूचित करण्यात आले आहे.

जळगांव

जळगांव जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १४८०१/१ द्वारे ८ केबल ऑपरेटर कडे रु. ६७,३००/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असून परिच्छेद निर्लेखित करण्याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक ९.११.२०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

औरंगाबाद

औरंगाबाद जिल्ह्यामधील लेखापरीक्षा अहवाल क्र. १६०४०/२ द्वारे १५ केबल ऑपरेटर कडे रु. ४,६६,६५०/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला. यापैकी १४ केबल ऑपरेटरकडून रु. ३,९१,०५०/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. उर्वरित श्री.हंबीरे या केबल ऑपरेटरकडून रु. ७५,६००/- वसुल न झाल्याबाबत उपस्थित आक्षेपासंदर्भात महालेखापाल कार्यालयास दिनांक २८.५.२००८ च्या पत्रान्वये सदर कालावधीत या केबल ऑपरेटकडील केबल प्रक्षेपण बंद असल्याने रक्कम देय होत नसल्याचे कळविले आहे.

बीड

बीड जिल्ह्याकरीता लेखा परीच्छेद क्र. १५८०२/११२९ अन्वये १४ केबल ऑपरेटरकडून रुपये ३,६७,९८०/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असून याबाबत संबंधितांकडून महालेखापाल यांचे कार्यालयास कळविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

अकोला

अकोला जिल्ह्यातील लेखा परीच्छेद क्र. १५८७१/३ द्वारे ३ केबल चालकांकडे रु.७,७१,०००/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असून परिच्छेद निर्लेखित करण्याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक २६ फेब्रुवारी, २०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच लेखापरीच्छेद क्र. १४८२६/१ अन्वये १९ केबल ऑपरेटर्सकडून १,२१,०८०/- रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित झाला होता. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असून याबाबत महालेखापाल कार्यालयास दिनांक १०.११.२०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

नागपूर

नागपूर जिल्ह्याकरीता लेखा परीच्छेद क्र. १६७३५/१ अन्वये ६७ केबल ऑपरेटरकडून रुपये ९,३२,७५९/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदरची संपूर्ण रक्कम वसुल झाली असून दिनांक २८.९३२०१२ च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास सूचित करण्यात आले आहे.

तसेच लेखा परीच्छेद क्र. १६७३८/१ अन्वये ४ केबल ऑपरेटरकडून रुपये १,७१,१२८/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदरची संपूर्ण रक्कम वसुल झाली असून दिनांक २२.२.२०१० च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास सूचित करण्यात आले आहे.

यवतमाळ

यवतमाळ जिल्ह्यांतील दारव्हा या तालुक्यातील ४ केबल ऑपरेटरकडून ५२,२२०/- वसुल न केल्याबाबत लेखा परीक्षण अहवाल क्र. १५८६५/१ उपस्थित करण्यात आला. सदर संपूर्ण रक्कम वसुल झाली असल्याने परिच्छेद निर्लेखित करण्याबाबत कार्यालयाने दिनांक १२ जानेवारी, २००७, दिनांक १६ जानेवारी, २००८, १९ जानेवारी, २०१० व ५ जुलै, २०१० च्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास कळविले आहे. तसेच नेर तालुक्यातील ४ केबल ऑपरेटरकडून ४२,९१०/-इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. यापैकी रु. ८०००/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली असून उर्वरित, ३४,९१०/- वसुल करण्याची कार्यवाही संबंधित कार्यालयाकडून सुरु आहे.

वर्धा

वर्धा जिल्ह्यातील ७ केबल चालकांकडून रुपये ६६,५९०/- वसुल न झाल्याबाबत लेखा परीक्षण अहवाल क्र. १५८६६/१ द्वारे आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. सदर संपूर्ण रक्कम वसुल करण्यात आली असून महालेखापाल कार्यालयास दिनांक १६.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

अमरावती

अमरावती जिल्ह्याकरीता लेखा परीच्छेद क्र. १५८७७/१ अन्वये केबल ऑपरेटरकडून रुपये १,५२,५५९/- इतकी रक्कम वसुल न झाल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आला होता.

सदर रकमेपैकी १,३२,९६०/- रक्कम वसुल झाली आहे. उर्वरित रुपये १९,५९९/-इतकी रक्कम सदर केबल ऑपरेटरने व्यवसाय बंद केला असल्याने वसुल करणे शक्य झाले नाही. सदर वसुलीबाबत आवश्यक कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यलयामार्फत सुरु आहे.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ व ३० जानेवारी, २०१३ रोजी अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) व इतर विभागातील प्रतिनिधींची साक्ष घेतली त्यावेळी मुंबई शहर जिल्ह्यातील केबल चालकांकडून रू.१,३३,७९०/- इतक्या वसूल न करण्यात आलेल्या रकमेच्या वसुलीसाठी विलंब का करण्यात येत आहे याबाबत माहिती देण्यास समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, करमणूक कराची रक्कम २८५ केबल चालकांकडून रू.५४,१७,०००/- व १५४ केबल चालकांकडून रू.२३,५६,०००/- इतकी कमी प्राप्त झाली होती. परंतु आता ही वसुली जवळजवळ शंभर टक्के पूर्ण झाली आहे. तशा प्रकारचा अहवाल महालेखाकारांना सादर करण्यात येईल व महालेखाकारांशी चर्चा करुन या संदर्भातील सविस्तर स्पष्टीकरण देण्यात येईल तसेच समितीने पूर्वी सूचना केल्याप्रमाणे, या संदर्भातील रिकन्सिलिएशन करून घेण्यात येईल. आता फक्त ५ प्रकरणांतील वसुली बाकी आहे. सदर परिच्छेद हा सन २००७-०८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील आहे. २८५ केबल चालकांकडून रू.५४,१७,०००/- पैकी रू.५१,४४,०००/- इतकी रक्कम आतापर्यंत वसूल केली आहे. रू.२३,५६,०००/- शॉर्ट वसुली करण्यात आली होती. आता त्यापैकी रू.२३,४०,०५०/- इतक्या रकमेची वसुली झाली आहे. फक्त रू.१६,९५०/- इतकी रक्कम वसूल करणे बाकी आहे.

पुणे येथील एका प्रकरणामध्ये रू.१०,३२०/- इतकी रक्कम वसूल करणे बाकी आहे. सदर प्रकरणी चुकीचे कॅल्क्युलेशन झाले असल्यामुळे या संदर्भातील स्पष्टीकरण महालेखाकारांना देण्यात येईल.

तसेच पुढील २ महिन्यांच्या आत सर्व प्रकरणांत शंभर टक्के वसुली केली जाईल किंवा काही प्रकरणांमध्ये काही कारणांमुळे वसुली करणे शक्य नसल्यास त्या संदर्भात समितीला व महालेखाकारांना निवेदनात्मक स्पष्टीकरण देण्यात येईल. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले.

मुंबई शहरजिल्ह्यातील केबल चालकांकडून १,३३,७९०/- इतक्या वसुल न करण्यात आलेल्या रकमेच्या वसुलीसाठी विलंब का करण्यात आला यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

"मुंबई शहर जिल्ह्यातील मे.प्रगती केबल नेटवर्क या केबल चालकाकडून अतिरिक्त केबल जोडण्यापोटी देय प्रलंबित करमणूक शुल्क वसूलीबाबत कारणे पुढीलप्रमाणे.

१) संबंधित केबल चालकाने करमणूक शुल्क व दंडनीय रक्कम आकारणीबाबत अपर जिल्हाधिकारी यांचे आदेशाविरुध्द विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे अपिल क्र. ८९५/२००९ दाखल केले होते.

२) याबाबत दिनांक ३० मार्च, २०१० रोजी विभागीय आयुक्त, कोकण यांनी याबाबत आदेश दिले असून, अपर जिल्हाधिकारी यांचे आदेश रद्द केले आहेत. तसेच या केबल ऑपरेटरकडील केबल जोडण्यांची फेरतपासणी करुन संख्या निश्चिती करावी व अनुज्ञेय करमणूक शुल्क व व्याज याबाबत निश्चित करावी अशा सूचना दिल्या आहेत.

३) सदर कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे. तथापि, संबंधित केबल चालकाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ व ३० नोव्हेंबर, २०१२ रोजी सर्व रकमेचा भरणा केला आहे. याबाबत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१२ रोजी महालेखापाल यांचे कार्यालयास कळविण्यात आले आहे."

राज्यात एकूण केबल चालक किती आहेत व १४ जिल्ह्यातील ३० घटकांची मे, २००४ ते २००८ च्या कालावधीतल १५४ केबल चालकांकडून २३.५६ लाख करमणूक कर कमी वसुल करण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यातील २८५ केबल चालकांकडून रू.५४,१७,०००/- वसूल करावयाचे होते व १५४ केबल चालकांकडून रू.२३,५६,०००/- वसूल करावयाचे होते. केबल चालक ३० जिल्ह्यांमध्ये विखुरलेले आहेत. ही सर्व प्रकरणे १४ जिल्ह्यांतील आहेत. या संदर्भात जिल्हावार तक्ता खालीलप्रमाणे आहे.

विवरणपत्र

जिल्ह्याचे नाव	अनुज्ञेय करमणूक शुल्क	वसूल केलेले करमणूक शुल्क	महालेखाकार कार्यालयास कळविल्याचा दिनांक
मुंबई शहर	रु. १,३३,७९०/-	रु. १,३३,७९०/-	दि.२७.११.२०१२ दि.३०.११.२०१२
मुंबई उपनगर	रु. ७,३१,७९०/-	रु. ७,३१,७९०/-	दि.२३.४.२००८ दि.१४.६.२०११
रायगड	रु. १,१९,०००/-	रु. १,१९,०००/-	दि.३१.१०.२०१२
पुणे	रु. १३,८२,०४०/-	रु. १३,८२,०४०/-	दि.३१.१०.२०१२
कोल्हापूर	रु. ६,१२,७२०/-	रु. ६,१२,७२०/-	दि.३०.६.२०१२
सोलापूर	रु. ६७,३००/-	रु. ६७,३००/-	दि.९.११.२०११
नाशिक	रु. ५,१३,८४९/-	रु. ५,१३,८४९/-	दि.९.११.२००८ दि.१२.१२.२००८ दि.२९.११.२००८
जळगाव	रु. ६७,३००/-	रु. ६७,३००/-	दि.९.११.२०११
औरंगाबाद	रु. ४,६६,६५०/-	रु. ३,९१,०५०/-	दि.२८.५.२००८
बीड	रु. ३,६७,९८०/-	रु. ३,६७,९८०/-	दि.१.११.२०१२
अकोला	रु. ७,७१,०००/-	रु. ७,७१,०००/-	दि.२६.२.२०१०
नागपूर	रु. ९,३२,७५९/-	रु. ९,३२,७५९/-	दि.२०.११.२०१२
वर्धा	रु. ६६,५९०/-	रु. ६६,५९०/-	दि.१६.१२.२०१२
अमरावती	रु. १,५२,५५९/-	रु. १,५२,५५९/-	दि.३.११.२०१२

मुंबई शहरात एकूण किती नोंदणीकृत केबल चालक आहेत आणि त्यांच्याकडून किती वसुली झाली पाहिजे होती तसेच सन २००७-०८ मध्ये मुंबई शहरात किती केबल चालकांची नोंदणी झाली होती व मागील वर्षी वसुलीची रक्कम किती होती याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई शहरातून रू.२७,९०,६९०/- इतकी रक्कम वसूल करावयाची होती, त्यापैकी रू.२६,५६,९००/- इतकी रक्कम वसूल केली आहे. फक्त १ प्रकरणामध्ये रू.१,३३,७९०/- वसूल करणे राहिले होते. बाकी सर्व वसुली शंभर टक्के पूर्ण झाली आहे. मुंबई उपनगरांमध्ये रू.११,५०,५७०/- इतकी रक्कम वसूल करावयाची होती, त्यापैकी रू.११,१९,२७०/- इतक्या रकमेची वसुली झाली आहे. फक्त रू.३०,५७०/- इतकी रक्कम वसूल करणे राहिले आहे.

विभागीय सचिवांनी पुढे असेही सांगितले की, एका हॉटेलकडून रू.३५,१००/- वसूल करायचे होते. परंतु सदर प्रकरणाच्या संदर्भात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून

लक्षात आणून देण्यात आले की, शासनाच्या धोरणाप्रमाणे सदर हॉटेलला सवलत दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सांगितल्याप्रमाणे, सदर हॉटेलकडून वसुली न करता, त्या संदर्भातील स्पष्टीकरण महालेखाकारांना दाखविण्यात येऊन त्यांच्याकडून ही रक्कम रिकन्सिलिएशनमध्ये माफ करून घ्यावी लागणार आहे. सदर हॉटेलला शासनाच्या धोरणाप्रमाणे सवलत देण्यात आली आहे. यासंदर्भातील माहिती समितीस नंतर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महसूल विभागाकडे केबल संदर्भातील कोणतीही तांत्रिक यंत्रणा उपलब्ध नाही. या बाबतीत विभागाकडून काही कार्यवाही करण्यात येणार आहे का तसेच या संदर्भात तांत्रिक सल्लागार नेमून एक पॅनेल तयार करणेही गरजेचे आहे. त्या संदर्भातील विभागाकडून काही कार्यवाही झाली आहे का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, लोकलेखा समितीने केलेल्या सूचनेप्रमाणे विभागाने माहिती गोळा करण्याचे काम केले आहे. आपल्या देशात नुकतीच जनगणना पूर्ण झाली आहे. ती आकडेवारी विभागाने प्राप्त केली आहे. त्यामुळे पूर्ण चित्र स्पष्ट झाले आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगर यांची लोकसंख्या, मुंबई शहर व मुंबई उपनगर यामध्ये एकूण कुटुंबे किती आहेत, याबाबतची माहिती विभागाला मिळाली आहे व त्यावरून एकूण केबल कनेक्शन्स किती आहेत, याची संख्या विभागाला प्राप्त होईल. तसेच या संदर्भात तंत्रज्ञांशी संवाद सुरू केला असून समितीच्या आजच्या बैठकीसाठी खाजगी क्षेत्रातील अभियंत्याला बोलविण्यात आले असून ते अभियंतांचा एक ग्रूप गठीत करणार असून त्यांच्याशी विभागीय प्रतिनिधीं चर्चा करणार आहेत. खाजगी क्षेत्रातील अभियंत्याकडून विभागास खूप चांगली माहिती मिळत आहे. डीएएस सिस्टिम ४ टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. मुंबईत त्याचे काम पूर्ण झाले आहे. ३१ ऑक्टोबर पर्यंत सेट टॉप बॉक्स लावण्याची सक्ती करण्यात आली होती. डीएएस सिस्टिममुळे नेमकी किती कनेक्शन्स आहेत, याची माहिती मिळणार आहे.

राज्यातील ज्या लोकांकडे टीव्ही आहे, त्यांनी केबल किंवा डिश सिस्टिम यांची सोय करुन घेतली आहे. मुंबई शहरातील दुकानदारांकडून ग्राहकांची यादी उपलब्ध करून घेतली तर कोणी टीव्ही संच, केबल, डिश सिस्टिम घेतली आहे, त्यांची नावे व पत्ते समजू शकतील. व या माहितीवरून सर्व अंदाज येऊ शकेल अशी सूचना समितीने केली असता विभागीय

सचिवांनी सांगितले की, प्रत्येक घरात १ नव्हे तर २-३ टीव्ही असतात. काही काही हॉटेलमध्ये केबलचे ५० कनेक्शन्स असतात. त्यामुळे ही माहिती गोळा करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक टेक्निकचा वापर करून यंत्रणा तयार करता येईल. तंत्रज्ञांबरोबर केलेल्या चर्चेवरुन असे दिसून येते की, ही माहिती फार चांगल्या पध्दतीने उपलब्ध होईल.

परंतु हे सर्व कशा पध्दतीन विभागाकडून करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की ज्याप्रमाणे आधार कार्डसाठी युनिक आयडेंटीटी म्हणून थम्ब इम्प्रेशन व डोळ्यांतील छटा मॅच करणे अशी पध्दत आहे, त्याचप्रमाणे प्रत्येक सेट टॉप बॉक्ससाठी स्मार्ट कार्ड लावण्याची आवश्यकता असणार आहे. The DAS System has been made compulsory by the Govt. of India. This is going to help us in determining the exact number of subscribers of cable connection. In this system, it will be compulsory for every cable connection to have a set-top box. Each set-top box will have a unique identity and this information will be available with the MSO. We will just have to tap the MSO and his control room to get the technical information about the subscribers. We will be able to electronically get the information about the number of connections in every household. In this manner, the technical information will be available to us. This will be great revolution in getting the information. The expectations of the Public Accounts Committee that generation of revenue by way of tax collection will rise substantially will truly be possible. म्हणजेच करवसुली दहा पटीने वाढेल असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, Yes. I am thankful to the Public Accounts Committee for this. The DAS system is going to help us a lot. Besides this there are number of regulations in the system. The Govt. of India is now in the process of having a price control mechanism whereby the price to be charged on the consumers will be regulated. त्यामुळे DAS सिस्टिममुळे तसेच युनिक आयडेंटीटी नंबर व स्मार्ट कार्डमुळे या संदर्भात नियंत्रण ठेवणे शक्य होईल, असे वाटते.

महसूल विभागाचे काम हे तहसील, प्रांत यांच्यासारखे आहे. तसेच या विभागाकडे इलेक्ट्रॉनिकचे देखील काम असते पण महसूल विभागाकडे इलेक्ट्रॉनिक एक्सपर्ट नाहीत. केबल चालकाने दिलेल्या माहितीवरच विभागाला अवलंबून रहावे लागते. केबल चालक

त्यांच्याकडे जेवढे बॉक्स आहेत, तेवढ्याच बॉक्सची नोंद केली जाते. केबल चालकाकडे ५०० कनेक्शन्स असतील तर केबल चालक १५० कनेक्शन्स असल्याचे सांगतो. केबल चालकाकडे किती कनेक्शन्स आहेत, हे पाहण्याची यंत्रणा महसूल खात्याजवळ नाही. विभागाला या संदर्भातील नियंत्रणासाठी नवीन इलेक्ट्रॉनिक सिस्टिमच्या संदर्भात विचार करावा लागेल. अशी सूचना समितीने विभागास केली व अजूनही सन १९२३ च्या करमणूक कायद्यानुसार विभागाचे कामकाज सुरू आहे. त्या कायद्यामध्ये सुधारणा (अमेंडमेंट) करण्यात आलेली नाही. सदर कायद्यामध्ये सुधारणा (अमेंडमेंट) झाली का अशी विचारणा समितीने केली असता सदर कायद्यामध्ये वेळोवेळी सुधारणा (अमेंडमेंट) करण्यात आली आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

आज इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली आहे. आता ॲडव्हान्स्ड मोबाईल, टीव्ही, केबल टीव्ही, डिश टीव्ही आले आहेत. जो कायदा सन १९२३ मध्ये अस्तित्वात आला, त्या कायद्यामध्ये या अनुषंगाने कोणत्याही प्रकारच्या सुधारणा न केल्यामुळे या सर्व बाबी कायद्याच्या कक्षेबाहेर राहिल्या आहेत. जिल्हाधिकारी जिल्ह्याचे प्रमुख असून देखील त्यांना केबल संदर्भातील नियंत्रण ठेवण्याचा अधिकार नाही. ते अनधिकृत केबल कनेक्शन्स बंद करू शकत नाहीत, त्यावर जप्ती आणू शकत नाहीत, दोषींवर गुन्हे दाखल करू शकत नाहीत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना त्या त्या जिल्ह्यातील केबल संदर्भातील नियंत्रणाचे अधिकार दिले गेले पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारचे तांत्रिक ज्ञान नाही. आजपर्यंत या संदर्भात काही वाटले नव्हते. परंतु, आता ते गरजेचे आहे. कारण महसूल विभाग फार मोठा आहे. महसूल विभागाचे काम देखील व्हास्ट आहे. सध्या महसूल विभागामध्ये नॉन टेक्निकल अधिकारी/कर्मचारी आहेत. त्यामुळे महसूल विभागाकडून जितक्या प्रमाणात वसुली व्हायला पाहिजे, तितक्या प्रमाणात होत नाही. त्यामुळे विभागाच्या पदांच्या आकृतिबंधामध्ये अभियंता संवर्गाची २ पदे असली पाहिजेत अशी सूचना समितीने केली.

राज्यात किती घरांमध्ये टीव्ही व इतर कनेक्शन्स आहेत, त्यानुसार शासनाला किती कराची रक्कम येणे आवश्यक आहे, या संदर्भातील माहिती विभागाला मिळणे गरजेचे आहे. कारण राज्यात एवढी कनेक्शन्स आहेत की, महसूल विभागाची कर वसुलीची रक्कम १० पट

वाढू शकेल. त्याकरीता टेक्निकल एक्सपर्ट घ्यावे लागतील यासाठी काय करावे लागेल याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, टेक्निकल एक्सपर्ट करिता एक अभ्यास गट नेमावा लागेल. विभागाकडे तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्ती कार्यरत नाहीत. आता बरीच तांत्रिक क्रांती झाली आहे. त्यामुळे शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामधील काही व्यक्ती, खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांतील काही व्यक्ती यांचा एक अभ्यास गट तयार करून शेअरिंग ऑफ इन्फर्मेशन कसे करता येईल, सेंट्रल डेटाबेस तयार झाला का, हे पहावे लागेल. व कोणत्या शहरात, कोणत्या जिल्ह्यात किती केबल कनेक्शन्स आहेत, हे पहावे लागेल. या सर्व बाबी करण्यासाठी शासनाची मान्यता घेऊन एक अभ्यास गट तयार करावा लागेल.

ग्रामीण भागात दुष्काळ पडतो, त्यावेळी चारा डेपो, जनावरांच्या छावण्या, पिण्याचे पाणी यासाठी लाखो रूपये खर्च केले जातात आणि हे काम करण्यासाठी शासनाने यंत्रणा उभारली आहे. याच धर्तीवर जर जिल्हा पातळीवर तांत्रिक अधिकाऱ्यांची यंत्रणा उभी केली तर शासनाला यामधून मोठा महसूल कर रूपाने मिळू शकेल. यामध्ये शासनाचे यंत्रणेवर २-३ लाख रूपय खर्च होतील. परंतु, त्यातून शासनाला कोट्यवधी रूपयांचा महसूल कर रूपाने मिळू शकेल. जिल्हाधिकारी या संदर्भातील नियंत्रण का करीत नाहीत ? याबाबत विभागाने शासन निर्णय काढावा अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीने केलेली सूचना विभागाला मान्य आहे. व जिल्हानिहाय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भातील समिती गठीत करण्यात येईल असेही आश्वासन समितीला देण्यात आले.

या विषयाच्या अनुषंगाने समितीने विभागास सूचना केली की, राज्य पातळीवर एक समिती गठीत करावी. राज्यातील एनजीओ फार चांगले काम करीत आहेत. शासनाचा फायदा होण्याच्या दृष्टीकोनातून समितीमध्ये एनजीओचा अंतर्भाव करण्याचा विचार देखील केला पाहिजे. १० एनजीओंनी या संदर्भातील अहवाल सरकारला सादर केला आहे. परंतु, त्यांचा अहवाल केराच्या टोपलीमध्ये पडला आहे. विभागाकडून जिल्हा स्तरावर गठीत करणार असलेल्या समितीमध्ये त्या जिल्ह्यातील एनजीओ देखील असावेत. नॉन कमर्शियल व्यक्ती या संदर्भात शासनाला नेहमी पत्रे पाठवित असतात. परंतु, त्या पत्रांना शासनाकडून केराची

टोपली दाखविली जाते. विभागाने तर या संदर्भात उपाययोजना केल्या तर शासनाचा महसूल नक्कीच वाढणार आहे. एनजीओ, तंत्रज्ञ, शासनाचा माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचे को-ऑर्डिनेशन घेऊन हे काम केले पाहिजे. या संदर्भात कायद्यामध्ये दुरूस्ती करावी लागेल.

समितीने पुढे असेही सांगितले की, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली पाहिजे, हे विभागाच्या सचिवांनी मान्य केले आहे. पण जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भात कारवाई करण्याचा अधिकार दिला पाहिजे. कारण केबल चालक स्वत:च्या जाहिराती देऊन प्रचंड उत्पन्न मिळवत आहेत. अनधिकृतपणे दिलेल्या कनेक्शनमधून देखील बराच महसूल बुडत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी या संदर्भात जिल्ह्यात कारवाई करू शकले पाहिजेत. महसूल करमणूक कर वसूल करण्यासंदर्भातील नियंत्रणाचे, कारवाईचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असलेच पाहिजेत याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, बऱ्याच ठिकाणी केबल चालकांनी स्वत:ची कंपनी सुरू केली आहे आणि त्या माध्यमातून केबल चालविले जात आहेत. परंतु, यावर जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही. जिल्हाधिकारी फक्त करमणूक कर वसुलीच्या संदर्भात कार्यवाही करु शकतात. करमणूक कर वसुलीच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आलेले आहेत.

करमणूक कर वसूल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. परंतु केबल चालकाकडे असलेले कनेक्शन्स चेक करणे, त्यांची पाहणी करणे, सर्व्हेक्षण करणे आणि काही गैर प्रकार होत असतील तर ते थांबविण्याचे अधिकार आहेत काय यावर विभागीय सचिवांनी नकारार्थी उत्तर दिले.

आतापर्यंत यासंदर्भात कायदा का केला नाही याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात दोन कायदे आहेत. केंद्र शासनाचा केबल नेटवर्कींग कायदा आहे. लायसन्स देण्याचा अधिकार केंद्र शासनाने स्वत:कडे ठेवलेला आहे. परवाना नूतनीकरणाचा अधिकार देखील केंद्र शासनाने स्वत:कडेच ठेवलेला आहे.

राज्यशासनाच्या कायद्याचे नियंत्रण जिल्हाधिकारी यांच्याकडे आहे. परंतु केबल चालकाकडून जर काही चुकीचे काम होत असेल तर त्याच्यावर कारवाई करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे काय कारण केबल ऑपरेटर सांगतात की, त्यांच्याकडे २०० कनेक्शन्स आहेत. परंतु केबल चालकाकडे प्रत्यक्षात ५०० कनेक्शन्स असतात. केबल

चालकाकडे असलेले कनेक्शन्स तपासणे (चेक करणे), केबल चालकाने खोटी माहिती दिली तर त्याचे ऑफिस बंद करणे किंवा त्याच्यावर कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत काय तसेच काही केबल चालक दिवसाढवळया प्रौढासाठी असलेले चित्रपट व अवैध जाहिरातींना (ॲडल्ट फिल्म) दाखवितात अशा प्रकरणी ते चॅनल बंद करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे काय ? यासंदर्भात करमणूक कर अधिकारी, पुणे यांनी सांगितले की, खाजगी दूरचित्रवाहिन्यांवर देखरेख ठेवण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आलेली आहे आणि त्याचे नियंत्रण पोलीस आयुक्त यांच्याकडे आहे.

समितीला यासंदर्भात कायद्यातील संबंधीत कलम वाचून दाखवावे. कारण जिल्हाधिकाऱ्यांनी अशा कारवाया कोठेही केलेल्या नाहीत असे समितीने निदर्शनास आणून दिल्यास विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाने दिनांक १९ फेब्रुवारी, २००८ रोजी ऑर्डर निर्गमित केलेली आहे. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "Sub: Monitoring Committee for Private Television Channels at the State and District levels." दोन पातळीवर समित्या नियुक्त करण्यात आलेल्या आहेत. त्यांनी सक्षम प्राधिकारी डिक्लेअर केलेला आहे. Authorised Officer has been defined. "The Authorised Officer as defined under Section 2(a) of the Act means within his local limits of jurisdiction- (i) a District Magistrate, (ii) a Sub-divisional Magistrate or (iii) a Commissioner of Police" जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून डिक्लेअर केलेले आहे. जिल्हा पातळीवर समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. जिल्हा पातळीवरील समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून जिल्हा पोलीस अधीक्षक सदस्य आहेत. जिल्हा पातळीवरील समितीमध्ये एनजीओच्या प्रतिनिधीचा सहभाग करुन केंद्र शासनाच्या ऑर्डर मध्ये डिस्ट्रीक्ट मॉनिटरींग कमिटी मध्ये "Representative of a leading NGO working for Children welfare, Representative of a leading NGO working for Women Welfare" यांना घेण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

जिल्हा पातळीवरील नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या बैठका होतात किंवा नाही याबाबतचा आढावा घेतला जातो काय आणि याचे राज्य पातळीवर नियंत्रण ठेवण्यात आलेले आहे काय याबाबत खुलासा करताना करमणूक कर अधिकारी, पुणे यांनी सांगितले की,

जिल्हा पातळीवर समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. पुणे जिल्ह्यात देखील समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. जिल्हा दंडाधिकारी, पुणे हे समितीचे अध्यक्ष आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) हे समितीचे शासकीय सदस्य आहेत. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे हे समितीचे सदस्य सचिव आहेत. बारामती येथील महिला कॉलेजच्या प्राचार्य समितीच्या सदस्य आहेत. श्रीमती सुधाताई कोठारी या समितीच्या सदस्य आहेत. श्री.सलीम शेख, सामाजिक कार्यकर्ते हे देखील समितीचे सदस्य आहेत तसेच राज्य पातळीवर समिती असावी, असे केंद्र शासनाचे आदेश आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

या समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश नाही काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये असे म्हटलेले आहे की, "Academician/Psychologist/Sociologist (one each to be nominated by the DM)" यामध्ये लोकप्रतिनिधी असे नमूद केलेले नाही. तसेच राज्य पातळीवरील समितीमध्ये सचिव माहिती व जनसंपर्क हे अध्यक्ष असून डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस या समितीमध्ये प्रतिनिधी आहेत.

ज्या समित्या नियुक्त करण्यात आलेल्या आहेत त्यांचे अधिकार काय आहेत याबाबत माहिती सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा पातळीवरील समितीचा स्कोप असा आहे की, "(i) To provide a forum where the public may lodge a complaint regarding content aired over cable television and take action on the same as per procedure prescribed herein. (ii) To review the action taken by Authorised officers for enforcement of Cable Television Networks (Regulation) Act, 1995. (iii) To immediately bring to the notice of State and Central Government if any programme is affecting public order or wide spread resentment in any community." (iv) To keep a watch on content carried by cable television channels at local level and to ensure through Authorised Officers, that no unauthorised or pirated channels are carried and local news if aired by the cable television operator is restricted to information about local events and is presented in a manner which is balanced, impartial and not likely to offend or incite any community." अशा प्रकारची तरतूद केंद्र शासनाच्या आदेशामध्ये करण्यात आलेली आहे. केबल चालकाने चॅनलवर काही आक्षेपार्ह दाखविले तर प्रथम जिल्हा पातळीवरील समितीकडे तक्रार करावी लागेल. केंद्र शासनाने जे अधिकारी नियुक्त केलेले आहेत ते त्यांचे काम योग्य प्रकारे करतात

किंवा नाही याबाबत आढावा घेतला पाहिजे. खाजगी केबल चालकांनी स्वत:च्या कंपन्या सुरु केलेल्या आहेत असे केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या निदर्शनास आणून द्यावे, अशा प्रकारच्या तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

परंतु आता ज्या तरतुदी विभागीय सचिवांनी समितीस सांगितल्या आहेत त्या तरतुदीतील पळवाटांचा फायदा केबल चालक घेतात. औरंगाबाद हायकोर्टात केस दाखल करण्यात आली होती. त्या केसचा निकाल केबल चालकांच्या बाजूने लागलेला आहे. केबल चालक चॅनलवर पिक्चर, गाणी दाखवितात आणि जाहिराती सुध्दा दाखवितात. केबल चालकांनी एका क्लॉजचा गैरफायदा घेतलेला आहे कोर्टात केस दाखल झाल्यानंतर कोर्ट सांगते की, लॉ सायलेंट आहे. म्हणून कायद्यात सुधारणा केली पाहिजे, कारण कोर्ट विचारणा करते की, कोर्टाला कायदा दाखवा. आपला कायदा १९२३ सालचा आहे. त्या काळापासून आता पर्यंत करमणुकीच्या क्षेत्रात बरीच क्राती झालेली आहे. केबल चालकांचा फायदा कसा होईल हे बघितले जाते. शासनाचे उत्पन्न कसे वाढेल हे बघितले जात नाही. कायद्यामध्ये सुधारणा केली पाहिजे, असे विभागाला वाटत नाही काय अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, कायद्यात सुधारणा केली पाहिजे. तज्ज्ञांचा सल्ला घेऊन पुढील दोन-तीन महिन्यात कायद्यात कसा बदल करावयाचा या संदर्भात विभाग प्रयत्न करणार आहे.

यासंदर्भात विभागाकडून प्रथम टिप्पणी तयार करण्यात येईल. नंतर ती नस्ती माननीय मंत्री महोदयांकडे जाईल. त्यानंतर ती नस्ती विधी व न्याय विभागाकडे जाईल आणि त्यानंतर मसुदा तयार होईल. यामध्ये बराच वेळ जाईल. कायद्यात तातडीने दुरुस्ती करावी, असे समितीचे मत आहे. त्यामुळे महसूल विभागाने काय प्रस्ताव सादर केले या संदर्भातील कागदपत्रे व पुणे जिल्ह्यातील करवसुली संदर्भात काय कार्यवाही केली याबाबतची माहिती समितीला द्यावी असे निदेश समितीने दिले परंतु विभागाकडून अद्याप माहिती अप्राप्त आहे.

सन २००८ पासून करमणूक शुल्क वसुलीच्या संदर्भात कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, पुणे जिल्ह्यातील केबल चालकांकडून १३,८२,०४०/- रुपये इतकी रक्कम वसूल करावयाची होती. तेवढी रक्कम पुणे

जिल्ह्यातील केबल चालकांकडून वसूल करण्यात आलेली आहे तसेच केबल चालकांकडून रक्कम वसूल करण्यास विलंब झालेला आहे हेही विभागीय सचिवांनी मान्य केले.

केबल चालकांकडून रक्कम वसूल करण्यास विलंब झालेला असेल तर संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली ? आणि जर कारवाई केली नसेल तर सन २००८ पासून वसुली करायची नाही असे कोणाला वाटले म्हणून वसुली केलेली नाही, ज्यांनी कराची रक्कम वसूल केली नाही त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे. यावर विभागाकडून संबंधितांना नोटीस दिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांनी वसुली केलेली नाही त्यांना फक्त नोटीस देऊनच सोडून देणार आहे काय ? कारण त्यांनी सन २००८ पासून कराच्या रकमेची वसुली केलेली नाही. जर गरीब माणसाने १००/- रुपये विजेचे बिल भरले नाही तर त्याचे विजेचे कनेक्शन तोडले जाते. परंतु जो लाखो रुपये कमवितो त्याच्याकडून एक टक्का सुध्दा वसुली केली जात नाही, हे योग्य नाही. अशी खंत समितीने व्यक्त केली.

टेक्निकल एक्स्पर्ट नियुक्त करण्यासंदर्भात काय केलेले आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कोणाची नियुक्ती केली पाहिजे हे निश्चित करण्यात येणार आहे. तसेच, आयआयटीमधील तज्ज्ञांची देखील मदत घेण्यात येणार आहे.

यासंदर्भात समितीने पुढे अशी विचारणा केली की, केबलचे कनेक्शन देताना केबलची वायर कशी टाकावी नियम असले पाहिजेत. कारण केबल चालक त्यांच्या मनाप्रमाणे केबल टाकतात. केबल चालक केबल टाकताना परवानगी घेतात काय ? तसेच अनेक ठिकाणी खाजगी कंपन्यांचे टॉवर्स आहेत. टॉवर्स लावण्यासंदर्भात नियम केलेले आहेत काय ? आणि जर यासंदर्भात नियम केलेले नसतील तर ते केले पाहिजेत यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, मोबाईल नेटवर्कच्या टॉवर संदर्भात नगर विकास विभागाने पॉलिसी तयार केलेली आहे. त्याच बरोबर, केबल लाईन टाकण्याबाबतचा विषय देखील नगर विकास विभागाकडेच असावा, त्यामुळे आता यासंदर्भात माहिती देता येणार नाही.

लोकलेखा समितीच्या सदर साक्षीच्या बैठकीसाठी मुंबईचे जिल्हाधिकारी आलेले नव्हते. मुंबईचे उप जिल्हाधिकारी साक्षीसाठी आलेले होते. यासंदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, साक्षीच्या बैठकीत संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीला उत्तर

द्यायचे असते. विभागीय सचिव किंवा विभाग प्रमुख यांच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची साक्ष समितीपुढे होत नाही परंतु विभागाचे कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी विभागाच्या सचिवांना सहाय्य करण्यासाठी बैठकीमध्ये उपस्थित राहू शकतात आणि जर कनिष्ठ अधिकाऱ्यांना बैठकीमध्ये काही सांगावयाचे असेल तर समितीच्या प्रमुखांची परवानगी त्यांनी घेतली पाहिजे. समितीच्या प्रमुखांनी परवानगी दिली तरच बैठकीमध्ये कनिष्ठ अधिकाऱ्यांना आपले म्हणणे मांडता येते, तसेच समितीला बैठकीसाठी आलेल्या कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांना उत्तर विचारण्याचा अधिकार आहे अशी समितीच्या कामकाजाची पध्दत आहे. वास्तविक पाहता लोकलेखा समितीच्या बैठकीत ज्या विषयाशी संबंधित साक्ष आयोजित करण्यात आली आहे त्या संबंधातील सर्व अधिकाऱ्यांनी समितीच्या बैठकीकरीता उपस्थित राहणे आवश्यक आहे. आणि जर एखाद्या अधिकाऱ्याचे बैठकीसाठी उपस्थित राहणे शक्य होणार नसेल तर त्यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबत समितीस अवगत करणे आवश्यक आहे. परंतु मुंबईचे जिल्हाधिकारी हे त्यांच्या संबंधातील विषय असून सुध्दा समितीला पूर्व कल्पना न देता बैठकीला अनुपस्थित राहिले त्यामुळे समितीला बैठकीत पूर्ण व योग्य माहिती मिळणार नसल्यामुळे बैठकीचे कामकाज पूर्ण होऊ शकणार नाही ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व विभागाकडून होत असलेल्या समितीच्या कामकाजाकडे दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली.

राज्यात अनेक ठिकाणी सेट टॉप बॉक्स वाटप होऊन बसविण्यात आलेले आहे. मुंबई जिल्हाधिकाऱ्यांकडे इतर जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सेट टॉप बॉक्स देण्याच्या संदर्भातील अधिकार दिले गेले आहेत. तेच सर्व जिल्ह्यांना सेट टॉप बॉक्स वाटप करतात. अशा रितीने हे काम सेंट्रलाइज केले आहे. विभागाकडून ते काम डिसेंट्रलाइज का केले जात नाही याचे उत्तर मुंबईचे उपजिल्हाधिकारी देऊ शकणार नाही कारण हे अधिकार मुंबईचे जिल्हाधिकारी यांच्याकडे आहे. त्याकरीता यासंबंधातील माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या बैठकीसाठी मुंबईचे जिल्हाधिकारी उपस्थित राहिले पाहिजे होते परंतु मुंबईचे जिल्हाधिकारी बैठकीकरीता अनुपस्थित राहिले कारण ते एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी उच्च न्यायालयात गेले असल्याने ते सदर बैठकीकरीता अनुपस्थित राहीले व त्यांच्या ऐवजी उपजिल्हाधिकारी समितीच्या बैठकीस उपस्थित होते.

काही शहरांत ३१ ऑक्टोबरपर्यंत सेट टॉप बॉक्स बसविले जाणार होते. आतापर्यंत किती सेट टॉप बॉक्स बसविण्यात आले. सेट टॉप बॉक्सची विक्री ज्या दुकानांतून होते, त्यांची माहिती विभागाकडे आहे का तसेच आतापर्यंत एकूण किती सेट टॉप बॉक्सची विक्री करण्यात आली याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आता नव्याने केलेल्या जनगणनेप्रमाणे मुंबईतील लोकसंख्या १ कोटी २४ लाख आहे आणि घरे २६ लाख ६५ हजार आहेत. सुमारे २२ लाख ७० हजार कुटुंबांकडे टीव्ही संच आहेत. सेट टॉप बॉक्स बसविण्याच्या संदर्भात दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ पर्यंतची मर्यादा दिल्यानंतर किती सेट टॉप बॉक्सची विक्री झाली व त्यातील किती बसविले, याच्या संख्या उपलब्ध आहेत. सर्व एमएसओ व एलसीओमार्फत किती सेट टॉप बॉक्स दिले गेले, याची देखील माहिती उपलब्ध आहे. मुंबई शहरात ४,५०,९७६ व मुंबई उपनगरांत १५,३८,९११ असे एकूण १९,८९,८८७ सेट टॉप बॉक्स बसविण्यात आले आहेत, अशी संख्या मिळाली आहे. मुंबई शहरात डीटीएचचा देखील ऑप्शन आहे. मुंबई शहरात १,३५,००० व मुंबई उपनगरांत ३,६०,००० डीटीएच कनेक्शन्स आहेत. यांची बेरीज केली तर जनगणनेची संख्या व कनेक्शन्सची संख्या जुळत आहे.

मुंबईतील केबल धारकांची संख्या आतापर्यंत ९-१० लाख होती. परंतु, आता सेट टॉप बॉक्स बसविण्याचे बंधन घातल्यामुळे ती संख्या वाढल्याचे दिसत आहे. तसेच मुंबईमध्ये हॉटेलचा व्यवसाय फार मोठा आहे. हॉटेलमधील प्रत्येक रूमला केबलचे वेगळे कनेक्शन असते. लोकांनी वेगवेगळ्या माध्यमातून २५ लाख कनेक्शन्स घेतली असल्याची अंदाजित संख्या (रॅण्डम फिगर) आता समोर येत आहे. आतापर्यंत केबल चालकाकडून बऱ्याच कनेक्शन्सची नोंदच केली जात नव्हती. सेट टॉप बॉक्सच्या विक्रीची माहिती मिळाल्यानंतर या संदर्भात सविस्तर समजेल. मुंबईमध्ये केबल धारकांची संख्या ९-१० लाखांच्या वर नव्हती, ती आता २५ लाखांच्या वर गेली आहे. याचाच अर्थ असा होतो की, इतकी वर्षे १५ लाख ग्राहकांनी करमणूक कर भरला नाही. परंतु केबल चालक त्या ग्राहकांकडूकन करमणूक कर वसूल करीत होते. पण वसूल केलेली कराची रक्कम शासनाकडे जमा करीत नव्हते. केबल चालक ग्राहकांकडून वसुल केलेले पैसे स्वतःच वापरत होते ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व अशा केबल चालकांवर विभागाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे

आणि त्यांच्यांकडून थकीत करमणूक कर कशा रीतीने वसूल करणार आहे अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भातील प्राथमिक स्वरुपाची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आता केबल कनेक्शन असणाऱ्या लोकांची माहिती समजेल. आतापर्यंत ज्यांनी कराची रक्कम भरली नसेल त्यांच्याकडून कराची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही विभागाला करावी लागेल. तसेच ग्राहक केबलचे पैसे केबल ऑपरेटरांना देत आहेत. परंतु, केबल चालक कराची रक्कम शासनाकडे भरत नसल्यामुळे हा १५ लाखांचा फरक दिसत आहे. या समतीच्या मताशी विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ च्या रात्री १२.०० वाजेपर्यंत सेट टॉप बॉक्स न बसविल्यास सर्व टीव्ही संच बंद होतील असा निर्णय शासनाने घेतल्यामुळे अचानक ही संख्या वाढली नोंदणी झालेल्या घरांबाबत हे बरोबर आहे. परंतु, नोंदणी न झालेल्या घरांबाबत काय करणार ? बऱ्याच ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या झोपड्यांची नोंदणीच झालेली नसते. पण केबल मात्र सुरू असतात अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व घरांची, झोपड्यांची नोंदणी झाली आहे

आपल्या राज्यात अनेक पंचतारांकित हॉटेल आहेत. हॉटेलच्या प्रत्येक रूममध्ये वेगवेगळे कनेक्शन असते. आपण कर वसूल करताना तेथील एकच कनेक्शन पकडता की, सर्व रूम्सची कनेक्शन पकडता. मुंबई शहर व मुंबई उपनगरे यांच्यामध्ये अनेक पंचतारांकित हॉटेल आहेत. ताज हॉटेलचेच उदाहरण घेऊ या. ताज हॉटेलच्या करमणूक कराच्या वसुलीच्या संदर्भात समितीला माहिती देताना करमणूक कर अधिकारी मुंबई उपनगर यांनी ताज, ग्रँट हयात अशी अनेक पंचतारांकित हॉटेल मुंबई व मुंबई उपनगरे यांमध्ये आहेत. तेथील रूम्स अद्ययावत आहेत. आपण त्या हॉटेलकडून रूम X ४५ अशाप्रकारे कर वसूल करतो. आता ताजच्या रूम्सची संख्या सांगता येणार नाही. इतर सर्व हॉटेल्समध्ये याचप्रमाणे करमणूक कराची वसुली करण्यात येते. आता प्रत्येक रूमला एक सेट टॉप बॉक्स बसविण्यात येणार आहे. प्रत्येक युनिटला एक कार्ड असेल. त्यामुळे तेवढा कर त्यांना भरावा लागणार आहे. त्यामुळे अनधिकृतरित्या काहीही होणार नाही. या सिस्टिमचा फायदाच होणार आहे.

सेट टॉप बॉक्स बसविण्याच्या पूर्वीच्या आणि नंतरच्या संख्येत बराच फरक असेल तर संबंधितांकडून कराची रक्कम वसूल करावीच लागणार आहे. कारण हा शासनाचा पैसा आहे.

राज्यातील ३-४ महानगरांत सेट टॉप बॉक्स बसविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. मुंबईत देखील सेट टॉप बॉक्स बसविण्याचे काम सुरू केले आहे. परंतु राज्यातील इतर ठिकाणी सेट टॉप बॉक्स बसविण्याची कार्यवाही अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. जर विभागाच्या म्हणण्याप्रमाणे सेट टॉप बॉक्स बसविण्याच्या पूर्वीच्या आणि नंतरच्या संख्येत एवढी वाढ असेल तर राज्यातील इतर भागांत देखील सेट टॉप बॉक्स बसविण्याचे बंधन घातले पाहिजे. जेणेकरून राज्याचा महसूल वाढेल. या संदर्भात शासनाची भूमिका काय राहणार आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यात ४ टप्प्यांमध्ये सेट टॉप बॉक्स बसविण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल. दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत पहिला टप्पा होता. दुसऱ्या टप्प्यामध्ये मोठी शहरे आहेत.

शासनाने कालमर्यादा देऊन सेट टॉप बॉक्स बसविण्याची कार्यवाही पूर्ण केली पाहिजे. दुसऱ्या टप्प्यामध्ये राज्यातील सर्व 'अ' वर्ग नगरपालिका व नगरपरिषदा याचा समावेश केला पाहिजे. विभागाने असे केले तर शासनाचे उत्पन्न एकदम वाढेल संपूर्ण राज्यात सेट टॉप बॉक्स बसविण्याच्या कार्यवाहीच्या संदर्भात दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंतची कालमर्यादा देण्यात आली आहे. ही योजना शक्य तितक्या लवकर सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रात राबवावी, जेणेकरून शासनाच्या महसुलात वाढ होईल. मुंबई शहरात डिजीटायझेशनच्या निर्णयामुळे केबल ग्राहकांच्या संख्येत २.५ ते ३ टक्क्याने वाढ झालेली आहे. त्यामुळे राज्यातील २२ महानगरपालिका क्षेत्रात आणि 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रात शासनाने तातडीने डिजीटायझेशन करण्याचा निर्णय घ्यावा अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई शहर व उपनगरांत सेट टॉप बॉक्स बसविण्याचे काम दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत पूर्ण झाले आहे. दुसऱ्या टप्प्यात दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत पुणे, नागपूर, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, कल्याण- डोंबिवली, नवी मुंबई, औरंगाबाद, सोलापूर अशी शहरे घेण्यात येणार आहेत. त्यानंतर, दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ पर्यंत तिसऱ्या टप्प्याची कार्यवाही सुरू होणर आहे. राज्यातील प्रत्येक शहरांची या संदर्भातील कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत पूर्ण होणार आहे. केंद्र शासनाची पॉलिसी असून त्यांनी नोटिफिकेशन देखील काढले आहे.

समितीने पुढे केबल चालकाकडून दंडाची वसुली करण्यासंदर्भात विभागास विचारणा केली की, मुंबई शहरातील उदाहरणावरुन असे लक्षात आलेले आहे की, मुंबई शहरात डिजीटायझेशनच्या निर्णयामुळे केबल ग्राहकांच्या संख्येत २.५ ते ३ टक्क्याने वाढ झालेली आहे. याचा अर्थ केबल ऑपरेटर्सनी शासनाला चुकीची माहिती देऊन शासनाचा महसूल बुडविलेला आहे. केबल चालकांनी केबल कनेक्शन्सची खोटी माहिती दिली तर दंडाची तरतूद काय आहे, कारावासाच्या शिक्षेची तरतूद काय आहे ? शासनाचा महसूल बुडविण्यामध्ये अधिकारी आणि केबल चालक सुध्दा जबाबदार आहेत. दंडाच्या रकमेवर व्याज आकारण्याची तरतूद आहे काय यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या लोकांनी अशा प्रकारची माहिती दडविली किंवा शासनाकडे करमणूक कराची रक्कम भरली नाही त्यांच्यावर दंडात्मक कारवाई कशी करावी यासंदर्भात बॉम्बे एन्टरटेन्मेंट ड्युटी ॲक्ट, १९२३ मध्ये दोन तरतुदी आहेत. शासनाचा महसूल बुडविला असेल तर ज्याप्रमाणे शेतसारा वसुल करतो त्याप्रमाणे केबल चालकांची प्रथम जंगम मालमत्ता अटॅच करणे, त्यानंतर त्यांची स्थावर मालमत्ता अटॅच करुन त्या मालमत्तेचा लिलाव करणे ही एक तरतूद आहे. दुसरी तरतूद अशी आहे की, कलम ५ (अ) मध्ये असे नमूद केलेले आहे की, "Any person who contravenes any of the provisions of this Act for which no other punishment has been provided for in this Act, shall on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to six months or with fine of not less than two thousand rupees and not more than five thousand rupees or with both

राज्यात मागील अनेक वर्षापासून काही लोकांनी कर बुडविलेला आहे. ते लोक लपून छपून किंवा दबाव आणून कर बुडवितात. आज पर्यंत कर बुडविणाऱ्या एखाद्या तरी माणसाविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे किंवा त्याला कारावासाची शिक्षा झाल्याचे उदाहरण आहे काय याबाबत माहिती उपलब्ध नाही असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता सदर माहिती समितीला सादर करावी असे निदेश समितीस दिले असता माहिती १५ दिवसात समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. परंतु अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त आहे.

डिजीटायझेशनच्या निर्णयामुळे केबल ग्राहकांच्या संख्येत १५ लाखाने वाढ झालेली आहे. महाराष्ट्र राज्यात किती केबल चालक आहेत, त्यांच्याकडून किती कर वसूल केला जातो

? तसेच, केबल धारकांची संख्या वाढावी, शासनाचा महसूल वाढावा यासाठी आपण धडक कार्यक्रम राबविणार आहात काय ? व मुंबई शहर आणि उपनगरात किती पंचतारांकीत हॉटेल्स आहेत आणि त्यांच्याकडे पूर्वी किती केबलचे कनेक्शन्स होते व आता किती कनेक्शन्स आहेत यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई शहरात डिजीटायझेशनच्या निर्णयामुळे जी आकडेवारी समोर आली त्यावरुन असे दिसून येते की, पूर्वीची माहिती वस्तुनिष्ट नव्हती. तसेच महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये अशा प्रकारची मोहीम घेतली जाईल.

विभागाकडून जी कोणती मोहिम हाती घेतली जाईल त्याचा अहवाल समितीला सादर करावा डिजीटायझेशनच्या निर्णयामुळे मुंबई शहरातील केबल ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. अधिकारी आणि केबल चालक यांच्या संगनमतामुळे शासनाचा महसूल बुडालेला आहे. म्हणून अशा केबल चालकांची यादी तयार करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात असे निदेश समितीने विभागीय सचिवांनी दिले.

केंद्र शासनाने देशातील ४ महानगरांमध्ये दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत डिजीटायझेशन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. केंद्र शासनाने याबाबत कायदा केलेला आहे. दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी ही मुदत संपल्यानंतर अशी परिस्थिती आहे की, या शहरातील केबल ग्राहकांच्या संख्येत वाढ झालेली आहे. शासन संपूर्ण राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी करणार आहे. या कायद्याची अंमलबजावणी सन २०१४ पर्यंत करण्याऐवजी डिसेंबर, २०१३ पर्यंत करावी, जेणे करुन शासनाच्या महसुलात वाढ होईल आणि जर याबाबत लवकर कायदा करता आला नाही तर शासनाने वटहुकूम काढावा अशी सूचना समितीने केली.

जे अधिकारी करमणूक कर वसूल करतात त्यांचे आणि केबल चालकांचे संगनमत असल्यामुळे केबल चालक केबल ग्राहकांची संख्या कमी दाखवितात. केबल कनेक्शन्स किती आहेत याबाबतचा आढावा घेणारी यंत्रणा विभागाकडे आहे काय याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्यात तहसीलदार, प्रांत अधिकारी आणि जिल्हाधिकारी पातळीवर प्रथम आढावा घेतला जातो. त्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात कामाचे वाटप करण्यात आलेले आहे. याबाबतचे अधिकार अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

केबल कनेक्शन संदर्भात समितीने विभागास निदर्शनास आणून दिले की, केबल कनेक्शन्स किती आहेत याबाबत आढावा घेतला जात नाही. म्हणून केबल चालक केबल ग्राहकांची संख्या कमी दाखवितात परंतु समितीच्या या मताशी विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली नाही. कारण जिल्हाधिकारी पातळीवर, विभागीय आयुक्त पातळीवर, सचिव पातळीवर आढावा घेतला जातो. तसेच प्रत्येक महिन्याला याबाबत आढावा घेण्याची पद्धत सुरु करण्यात येईल व याबाबत अतिशय बारकाईने आढावा घेतला जाईल असेही आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी एकदा तरी तलाठी यांचे दफ्तर तपासावे. आणि याची अंमलबजावणी तर महसूल विभागाने केली तर हा प्रश्न निर्माण होणार नाही. यामध्ये लॅक्युना आहे. यामध्ये लॅक्युना राहू नये, यासाठी सचिव स्तरावरुन सूचना देण्यात येतील काय? अशी विचारणा समितीला केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यासंदर्भात लवकरात लवकर सूचना देण्यात येतील.

समितीने पुढे नृत्यबारविषयी माहिती विचारताना विभागास विचारले की, नृत्यबारबाबत देखील बरीच लपवाछपवी आहे. त्यामुळे तेथील करमणूक कराची रक्कम सुध्दा पूर्णपणे वसूल होत नाही. महाराष्ट्र राज्यात अद्यापही नृत्यबार कार्यरत आहेत काय याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये असे म्हटले आहे की, "महाराष्ट्रात दिनांक १४ ऑगस्ट २००५ रोजी नृत्यबार बंदी घोषीत करण्यात आली आहे त्यानुसार राज्यात नृत्यबार चालु नाहीत."

नृत्यबारकडून वसुल होणाऱ्या करमणूक कराबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ७ डान्स बारकडून रू. ३,८९,०००/- वसूल केले पाहिजे होते, असा महालेखापरीक्षक यांनी मुद्दा उपस्थित केला होता परंतु ही संख्या सन २००७-०८ या वर्षातील आहे. त्यावेळी ७ डान्स बारकडून रु. ३,८९,०००/- वसूल झाले नव्हते, त्यापैकी आता रू. ३,३९,०००/- वसूल झाले आहेत. १ डान्स बारकडून रू. ५०,०००/- वसूल करणे बाकी आहे. परंतु आता तेथे डान्स बार नाही. यावर समितीने अशी सूचना केली की, जर तेथे डान्स बार नसेल तर, त्या ठिकाणी जे काही असेल ते त्यांच्याकडून वसुली करण्यात यावे. किंवा तेथील प्रॉपर्टी जप्त करावी अशी सूचना समितीने केली.

सन २००४-०५ या काळात सात नृत्यबार चालकांनी रुपये ३.८९ लाख करमणूक शुल्क प्रदान केले नव्हते त्यांच्याकडून निवासी उपजिल्हाधिकारी/तालुका दंडाधिकारी/करमणुक कर अधिकारी यांनी कोणतीही मागणी न करण्याची कारणे काय आहे याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

"सन २००४-०५ या कालावधीत राज्यात नृत्यबार सुरु होते. यापोटी मुंबई शहर व रायगड येथील अनुक्रमे ४ व ३ नृत्यबारचालकांकडून रुपये २,७०,०००/- व रुपये १,१९,०००/- इतक्या रकमेच्या करमणूक शुल्काची वसुली प्रलंबित होती. सदरची संपूर्ण रक्कम वसुली केली असून याबाबत महालेखाकार यांचे कार्यालयास दिनांक २५.२.२००९ व दिनांक १९.११.२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे."

राज्यात नृत्यबारवर बंदी आणण्यापूर्वी किती नृत्यबार होते याचा जिल्हानिहाय तपशील समितीला द्यावा. तसेच, त्यांच्याकडून मासिक किती करमणूक कर वसूल करण्यात येत होता ? यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

राज्यात सन २००५ मध्ये नृत्यबारवर बंदी घोषित झाली आहे. यापूर्वी राज्यातील पुढील चार जिल्ह्यात नृत्यबार सुरु होते. यानुसार मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड व पुणे या चार जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे ६९ नृत्यबार व ७३ दालने, ११२ नृत्यबार, २१ नृत्यबार व २ नृत्यबार सुरु होते.

महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील कलम ३ (११) अनुसार नृत्यबार (Dance bar) करमणूक शुल्काची आकारणी पुढे नमूद केल्याप्रमाणे करण्यात येत होती.

क्षेत्र	**प्रतिमाह करमणूक शुल्काचा दर (रुपये)**
बृहन्मुंबई महानगरपालिका	३०,०००
बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता अन्य सर्व महानगरपालिका	२५,०००
उर्वरित क्षेत्र	१५,०००

मल्टिप्लेक्समधील सिनेमांसाठी ऑनलाईन तिकिट खरेदी करता येते. परंतु, सिनेमागृहे व नाट्यगृहे येथे ऑनलाईन तिकिट खरेदी करता येत नाही. सिनेमागृहे व नाट्यगृहे यांचे मालक विभागाकडे पावती पुस्तक घेऊन येतात, त्यावर शिक्के मारतात व ते विकतात. २०० तिकिटे विकण्यात आले तरी १०० तिकिटे विकण्यात आल्याचे दाखविण्यात

येऊन शासनाचा कर बुडवितात. तेथील तिकिट विक्री सुध्दा ऑनलाईन केली तर कर बुडविण्याचा प्रश्न येणार नाही. त्यामुळे या संदर्भामील नेमकी पध्दत काय आहे, यासंदर्भात सिनेमागृहे व नाट्यगृहे याबाबत माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले.

केबल संदर्भात झालेल्या समितीच्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने समितीने असे मत मांडले की, लोकलेखा समितीच्या बैठकीत राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नावर अत्यंत साधकबाधक अशी चर्चा केली जाते. यामुळे शासनाचा जवळपास १ हजार कोटी रूपयांचा कर वाढणार आहे, असा समितीचा प्राथमिक अंदाज आहे. समितीचे सन्माननीय सदस्य म्हणून शासनाचा बुडणारा कर वाचविणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. असे मत प्रत्येक समिती सदस्यांचे असते. समितीच्या बैठकीमध्ये अधिकाऱ्यांचे वर्तन संशयास्पद दिसत आहे. तांत्रिक ज्ञान नसणाऱ्या व्यक्तींकडून कामे केली जात असल्यामुळे शासनाचा कर बुडत आहे. त्यामुळे या संदर्भातील सर्व बाबी समितीच्या अहवालात समाविष्ट कराव्या लागतील. हॉस्पिटल, हॉटेल या ठिकाणी असलेल्या केबलची नोंदच होत नाही, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यामुळे विभागाने या संदर्भातील कायद्यात दुरूस्ती करण्याबाबत पावले उचलली पाहिजे. किंवा यासंदर्भात कमीत कमी अध्यादेश तरी काढावा. पुण्यातील कारवाई संदर्भात अधिकाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाला आहे. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. करमणूक कर वसुलीच्या प्रकरणी सन २००८ मधील जे कोणी अधिकारी दोषी असतील, त्यांच्यावर देखील कारवाई करणे गरजेचे आहे. विभागाकडे या संदर्भात कुशल तांत्रिक नाहीत. विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सेट टॉप बॉक्स, डीटीएच संदर्भात एक सल्लागार समिती ताबडतोब नेमावयास पाहिजे. मुंबई शहर व उपनगरे वगळता राज्यातील इतर भागांत केबल वसुली करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्याच्या दृष्टीने देखिल विचार करावा. डीजीटीलायझेशन करणे केंद्र शासनाच्या सांगण्यानुसार राज्यशासन करीत आहे. परंतु त्या अगोदर हे कोणाच्याही लक्षात आले नाही. त्यामुळे सुध्दा या संदर्भातील असलेल्या राज्याच्या कायद्यामध्ये दुरूस्ती केली पाहिजे.

विभागीय सचिवांनी केबलचालक/नृत्यबार चालकांकडून करमणूक कराची वसूली न करणे/कमी करणे यासंदर्भात दिलेल्या उपरोक्त माहितीवरुन समितीचे समाधान न झाल्याने

तसेच काही मुद्यांसंदर्भात माहिती समितीला सादर करावयाची असल्यामुळे अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजी पुन्हा साक्ष घेण्यात आली.

सदर बैठकीत समितीने विभागाच्या असे निदर्शनास आणले की, महसूल विभाग केबल चालकांकडून करमणूक कर वसूल करण्याच्या संदर्भात गंभीर नाही. केंद्र शासनाने सेट टॉप बॉक्स बसविणे कम्पलसरी केलेले आहे. मुंबई शहरात १४ लाखापेक्षा जास्त लोकांनी सेट टॉप बॉक्स बसविले आहेत. सेट टॉप बॉक्स बसविल्याशिवाय केबल ऑपरेट होत नाही. परंतु केबलच्या संदर्भात गलथान कारभार आहे. आजही सेट टॉप बॉक्स बसविल्यानंतर सरकार एका कनेक्शनमागे ४५ रुपये घेते. परंतु केबल चालक आताही प्रत्येक महिन्याला ४५० रुपये घेतात. केबलधारक केबल चालकाला प्रत्येक महिन्याला २५० रुपये, ३०० रुपये किंवा ४०० रुपये देतात. केबल चालक केबल धारकांकडून प्रत्येक महिन्याला शंभर टक्के वसुली करतात. परंतु विभागामार्फत केबल चालकाकडून फक्त १० टक्केच वसुली होत आहे, याचा विभागाने विचार केलेला आहे काय ? जर यावर बंधन घालयाचे असेल तर केबलचालकास प्रत्येक सेट टॉप बॉक्सचे पैसे पोष्टात भरण्यास सांगावे. विभागाने केबलचालकांच्या शिष्टमंडळाबरोबर चर्चा करावी. पोष्टाकडून अल्प बचत एजंटला ज्याप्रमाणे कमिशन दिले जाते त्याप्रमाणे शासनाने त्यांना १०-२० टक्के कमिशन द्यावे.

या सिस्टीममध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे, गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी थैमान घातले आहे, सरकार या संदर्भात पूर्णपणे उदासीन आहे. केबल कनेक्शन्सच्या माध्यमातून शासनाला फक्त ९४ कोटी रुपये उत्पन्न मिळते. वास्तविक एवढे उत्पन्न एकट्या मुंबई शहरातून मिळावयास हवे. संपूर्ण महाराष्ट्रातून कमीत कमी ५०० कोटी रुपये उत्पन्न केबल कनेक्शन्सच्या माध्यमातून सरकारला मिळणार आहेत, परंतु त्यावर महसूल विभाग पाणी सोडत आहे. सर्वसामान्यांच्या खिशातून पैसे जात आहेत, त्याचा फायदा नको त्या वर्गाला मिळत आहे. कायद्यामध्ये शासनाने सुधारणा केली नाही. विकेंद्रीकरण करण्याऐवजी केंद्रीकरण करण्यात आले आहे. सेट टॉप बॉक्सबाबत कंपन्यांनी केंद्र सरकारला विनंती केली आणि केंद्र सरकारने चार मेट्रो शहरांना डिजिटायझेशन सक्तीने लागू केले. महसूल विभागाने मात्र वसुलीबाबत अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याऐवजी केंद्रीकरण केले आहे.

प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात करमणूक कर शाखा असताना त्या त्या जिल्हयातील जिल्हाधिकाऱ्यांना केबल कनेक्शन्सच्या संदर्भातील करमणूक कर वसूल करण्याचे अधिकार का दिले जात नाहीत? यामध्ये काहीतरी गौडबंगाल असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात सरकारने दर निश्चिती केली पाहिजे. कारण समितीची इच्छा आहे की, सरकारचे उत्पन्न वाढले पाहिजे, परंतु उत्पन्न वाढावे अशी सरकारची इच्छा दिसून येत नाही.

महसूल विभागाचा व्याप मोठ्या प्रमाणात असताना केबल कनेक्शनच्या संदर्भातील जाणकार किंवा तज्ज्ञ मनुष्यबळ विभागाकडे उपलब्ध नाही. केबल कनेक्शन्सचे जाळे कसे असते, ऑपरेटर्सची केबिन कशी असते, चॅनेल्सवरील कार्यक्रम कसे ट्रान्सफर केले जातात याची आज विभागाला काही माहिती आहे असे वाटत नाही. केवळ मुंबई शहरातून संपूर्ण राज्यातील केबल चालकांवर नियंत्रण ठेवणे हे चुकीचे आहे असे समितीला वाटते. सरकारचे उत्पन्न वाढविण्यासाठी ही समिती प्रयत्नशील आहे. या मुद्याबाबत निर्णय घेऊन समिती सरकारला शिफारस करणार आहे.

समितीने पुढे विभागास अशी विचारणा केली की, एका कनेक्शनमागे सरकारला ४५ रुपयांचे उत्पन्न मिळते. यंत्रणा चालविणारे वेगळे असून केबल कनेक्शन बसविण्यासाठी त्यांनी एजन्ट नेमलेले आहेत. झी टीव्ही, स्टार टीव्ही, बीबीसी किंवा इतर कोणतेही चॅनेल घेतले तर त्यासाठी दरमहा किती रक्कम द्यावी लागते आणि त्यापोटी ग्राहकांकडून दरमहा किती रक्कम आकारली जाते? त्यांना १५० रुपये भरावे लागत असतील आणि ते जर ग्राहकांकडून ४०० रुपये घेत असतील तर ती एकप्रकारे ग्राहकांची लूट आहे असेच म्हणावे लागेल. केबल चालकाला एका कनेक्शनमागे दरमहा ३०० रुपये खर्च येत असेल आणि तो जर ग्राहकाकडून दरमहा ४०० रुपये घेत असेल तर ते संयुक्तिक म्हणता येईल, परंतु एका कनेक्शनसाठी दरमहा १०० रुपये खर्च येत असेल आणि ग्राहकांकडून दरमहा ४०० रुपये घेतले जात असतील तर यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. ग्राहकांनी केबल कनेक्शनच्या चार्जेसची रक्कम सरकारकडे भरावी, सरकारला त्या रक्कमेतून ऑपरेटरचा वाटा डायरेक्ट देता येईल. पर्यायाने एजन्टची देखील गरज भासणार नाही. सरकारला या संदर्भात आदेश काढता येतील काय? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन १९२३ च्या करमणूक कर कायद्यामध्ये बदल झाला पाहिजे अशी सूचना समितीने केली होती.

त्यासंदर्भात कायद्यामध्ये अपेक्षित बदल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यासाठी पहिल्यांदा मंत्रिमंडळापुढे जावे लागेल. नंतर विधेयक सुधारणा करण्यासाठी सभागृहापुढे आणणार आहोत. समितीने सूचना केल्यानंतर विभागाच्या लक्षात आले की, मुंबईसारख्या शहरामध्ये केबलबाबत मल्टी सिस्टीम ऑपरेटर हे मुख्य प्लेयर्स झालेले आहेत. मल्टी सिस्टीम ऑपरेटर्सनी कनेक्शन ॲक्टिव्हेट केल्याशिवाय केबलद्वारे दूरचित्रवाणी संचावर चॅनेल्स दिसत नाहीत. दुर्दैवाने करमणूक कर कायद्यामध्ये यांचे नाव अंतर्भूत नाही. त्यामुळे कायद्यात सुधारणा करुन त्यांना कायद्याच्या चाकोरीत आणावे लागेल.

एका घरामध्ये पाच कनेक्शन्स असतील किंवा एखाद्या हॉटेलमध्ये ५०० कनेक्शन्स दिलेली असली तरी मल्टी सिस्टीम ऑपरेटर जोपर्यंत प्रत्येक कनेक्शन ॲक्टिव्हेट करणार नाही तोपर्यंत केबल कनेक्शन सुरु होत नाही. म्हणून प्रत्येक केबल ऑपरेटरकडे जाण्याची गरज नाही. मल्टी सिस्टीम ऑपरेटरच्या कंट्रोल रुममधून किती कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली याची माहिती मिळू शकते. आज मुंबई शहरामध्ये ३ ते ४ केबल ऑपरेटर्स आहेत. पूर्ण महाराष्ट्राचा विचार करता ही संख्या फार मोठी नाही. यातील लॅक्यूना दूर करावा लागेल.

दिल्ली राज्य शासनाने डिसेंबर, २०१२ मध्ये या मल्टी सिस्टीम ऑपरेटर संदर्भात एक आदेश काढला आहे. त्यांनी कायदेशीर आधार काय घेतला याची माहिती विभागाला घ्यावी लागेल. त्यांनी आदेशात, "करमणूक कराची जबाबदारी केबल ऑपरेटरसह मल्टी सिस्टीम ऑपरेटरवर जॉईंटली/सेव्हरली असेल" असा शब्दप्रयोग वापरला आहे. आता विभागसुध्दा हे लागू करणार आहोत. याकरिता आवश्यक असलेल्या कायदेशीर बदलाची प्रक्रिया सुरु केलेली आहे. लवकरच कायद्यात बदल करुन दिल्ली राज्य शासनाने लागू केलेली पध्दत महाराष्ट्रात सुध्दा लागू केली जाईल.

आज मुंबई शहर आणि उपनगरामध्ये १०० टक्के डिजिटायझेशन झालेले आहे. मार्च, २०१३ पर्यंत महाराष्ट्रातील नागपूर, पिंपरी-चिंचवड, पुणे, औरंगाबाद सारख्या १०-१२ मोठया शहरांमध्ये डिजिटायझेशन सक्तीचे होणार आहे. तेथे सुध्दा १०० टक्के सेट टॉप बॉक्स बसवावे लागणार आहेत. डीटीएच आणि डिजिटायझेशन या दोन्ही माध्यमातून यावर फार चांगले नियंत्रण राहणार आहे.

प्रत्येक कनेक्शन मागे शासनाला दरमहा ४५ रुपये मिळतात आणि केबल ऑपरेटर ग्राहकांकडून दरमहा ३०० ते ४०० रुपये वसूल करीत आहेत. यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महसूल विभागाला फक्त करमणूक कर गोळा करण्याचा अधिकार आहे. केबल ऑपरेटरचे दर काय असावेत, त्यांना एम.आर.पी.लागू करता येईल काय हे ठरविण्याचे अधिकार केबल टीव्ही नेटवर्क कायदा आणि नियमानुसार केंद्र शासनाला आहेत. त्यांचे दर काय असावेत हे टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथॉरिटीकडून निश्चित केले जाते. या सिस्टीममधील काही बाबी केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहेत. महाराष्ट्र शासनाचा करमणूक कर कायदा आहे, त्या अन्वये किती करमणूक कर गोळा करायचा एवढाच अधिकार महसूल विभागाला आहे.

एखाद्या इमारतीमध्ये जर ५०० केबल कनेक्शन्स असतील तर त्या सर्व कनेक्शन्सबाबत करमणूक कर कसा गोळा केला जातो काय? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, एका घरामध्ये चार कनेक्शन्स असतील तर प्रत्येक कनेक्शनमागे ४५ रुपये करमणूक कर शासनाला मिळतो. एका घरामध्ये एका सेट टॉप बॉक्सच्या माध्यमातून चार रुम्समध्ये स्वतंत्रपणे चार कनेक्शन्स घेतली असे होत नाही. चारही रुम्समध्ये वेगळा सेट टॉप बॉक्स बसवावा लागेल. आज अडचण अशी आहे की, मल्टी सिस्टीम ऑपरेटरकडून १०० टक्के वस्तुनिष्ठ माहिती प्राप्त होत नाही.

जेवढी कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली असतील तेवढ्या प्रमाणात करमणूक कर शासनाला मिळाला पाहिजे. तेव्हा तेथील केबल चालकाने असे सांगितले की, जितकी कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली आहेत त्या सर्व ग्राहकांनी केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे फॉर्म भरुन दिला पाहिजे. त्यांनी कोणती चॅनेल्स सिलेक्ट केली आहेत हे फॉर्ममध्ये लिहून दिले पाहिजे.

तसेच शासनाची अशी भूमिका आहे की, राज्य शासनाचा महसूल कोणत्याही परिस्थितीत बुडता कामा नये. ग्राहकांनी कोणत्या चॅनेल्सचा ऑप्शन स्वीकारला आहे हा विषय या कराच्या संदर्भात लागू होत नाही. त्यांनी जितकी कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली असतील तेवढ्या प्रमाणात प्रत्येकी ४५ रुपयांप्रमाणे करमणूक कर शासनाकडे जमा केला पाहिजे. त्यांच्यावर बंधन आणून कारवाई करता आली पाहिजे, त्यांना जबाबदार धरले पाहिजे

यासाठी कायद्यात सुधारणा करुन त्यांना कायद्याचा एक भाग करुन त्यांच्यावर जबाबदारी टाकावी लागेल. ही प्रक्रिया विभागाने सुरु केली आहे.

महाराष्ट्रामध्ये विकेंद्रीकरण करण्याऐवजी केंद्रीकरण केल्याबाबत एक मुद्दा मांडण्यात आला आहे. सन २००६ मध्ये या प्रकारचा निर्णय घेण्यात आला. कारण डीटीएच सेवा पुरविणारे आणि मल्टी सिस्टीम ऑपरेटर यांची संख्या मर्यादित आहे. महाराष्ट्रात डीटीएच सेवा पुरविणाऱ्यांची संख्या ६ ते ७ आहे. हे खरे आहे की, ते नेमका किती करमणूक कर देतात याची जिल्हाधिकारी किंवा जिल्हा पातळीवर माहिती नाही. ही माहिती सेंट्रलाईझ पध्दतीने गोळा होते. ही माहिती जिल्हा पातळीवर देत आहोत. केंद्रीकरण केल्यामुळे करमणूक कर वसुलीमध्ये सुधारणा होत आहे की वाईट परिणाम होत आहे या समितीने उपस्थित केलेल्या मुद्याची नोंद विभाग घेत आहे. केंद्रीकरण करण्याऐवजी विकेंद्रीकरण करण्याची सूचना समितीने केली आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ६ ते ७ प्लेयर्स आहेत आणि त्यांची मुख्यालये याच ठिकाणी आहेत. त्यांच्याकडील माहिती सर्व जिल्हयांना मिळेल अशी व्यवस्था केली आहे. विकेंद्रीकरण आणखी करण्याची मुभा आहे का हे तपासून घेऊ. सन २००६ मध्ये हा निर्णय घेण्यात आला होता, त्याची विकेंद्रीत सिस्टीम करीत आहोत.

आजच्या रेकॉर्डप्रमाणे मुंबई शहर आणि उपनगरामध्ये डीटीएच आणि केबल दोन्ही मिळून १३,६८,७२१ कनेक्शन्स आहेत. डिजिटायझेशन आणि सेट टॉप बॉक्सची सक्ती करण्यापूर्वीची आकडेवारी ११,४५,४४३ होती. मुंबई शहरामध्ये सुमारे २० टक्के आणि उपनगरामध्ये ३३ टक्के वाढ दिसून आली आहे. ही माहिती देखील परिपूर्ण आहे असे नाही. आणखी माहिती गोळा करण्याचे काम सुरु आहे. विभागाचे प्रतिनिधी माहिती घेण्यासाठी जातात, त्यांच्याशी बैठक घेतात तेव्हा मल्टी सिस्टीम ऑपरेटरकडून सांगितले जाते की, ग्राहकांकडून फॉर्म भरुन दिले जात नाहीत. सत्य माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता विभागाने त्यांना आणखी काही कालावधी दिलेला आहे. अन्यथा कायद्यामध्ये सुधारणा करावी लागेल. मल्टी सिस्टीम ऑपरेटरकडून जेवढी कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली जातील तेवढया प्रमाणात प्रत्येकी ४५ रुपयांप्रमाणे कर भरण्याची जबाबदारी त्यांची राहील. ग्राहकांनी

कॉम्बिनेशन काय घेतले हा महसूल विभागाचा विषय नाही. केंद्रीकरणाऐवजी विकेंद्रीकरण करण्याची आपली सूचना आहे, त्याची नोंद घेण्यात आली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, तालुका आणि जिल्हा पातळीवर विकेंद्रीकरण करावे लागेल. महसूल विभागाला फक्त करमणूक कर गोळा करण्याचा अधिकार आहे. आज विभागाकडे केबल कनेक्शन्सबाबत डे टू डे माहिती प्राप्त होत नाही. विभागाकडे माहिती प्राप्त होत नसेल तर संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कायद्यात तरतूद नाही का किंवा पूर्वीही अधिकार नव्हते का ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, नियमाप्रमाणे केबल चालकांनी वस्तुनिष्ठ माहिती देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. परंतु असे दिसून आले की, १०० टक्के वस्तुनिष्ठ माहिती ते देत नाहीत. त्यांनी पुरविलेली माहिती केबल चालक १०० टक्के सत्य आहे का हे सध्या जी टेक्नॉलॉजी आली आहे त्या माध्यमातून कळून येईल. केबल चालकास कंट्रोल रुममधून ही माहिती मिळू शकते की, त्यांनी किती कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली आहेत. आज प्रत्येक घरात चार कनेक्शन्स असली तरी प्रत्येक कनेक्शन स्वतंत्रपणे ॲक्टिव्हेट करावे लागते. म्हणून एका कंट्रोल रुममधून ही माहिती मिळणे शक्य झाले आहे.

यासंदर्भात माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सचिवांनी समितीला माहिती देताना सांगितले की, हा विषय केंद्र सरकारच्या टेलिकॉम खात्यामार्फत हाताळला जातो. दिल्ली येथे झालेल्या निर्णयानुसार चार महानगरांमध्ये डिझिटायझेशनची सक्ती करण्यात आली आहे. या विषयाबाबत दिल्ली येथे आयोजित केलेल्या बैठकांना गृह विभागाचे प्रतिनिधी जात असतात. हळूहळू टेक्नॉलॉजीमध्ये बदल होत आहे. परिणामी सेंट्रलायझेशन वाढणार आहे. सर्व गोष्टी सेंट्रलाईझ होणार आहेत.

समितीला केंद्रीकरण किंवा विकेंद्रीकरणामध्ये रस नाही. करमणूकर कराची परिपूर्ण वसुली होत नाही त्यामुळे शासनाचे नुकसान होते त्याबाबत समितीचा आक्षेप आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी मुंबईमध्ये जे मल्टी सिस्टीम ऑपरेटर आहेत त्यांची सेवा केंद्रे मुंबईमध्ये असली तरी त्यांची मुख्य कार्यालये गुरगाव किंवा इतर ठिकाणी आहेत. कार्यालय कुठेही असले तरी त्यांना डाटाबेस उपलब्ध करुन देण्याचे बंधनकारक केले पाहिजे. त्यांच्याकडील डाटाबेसच्या माध्यमातून किती

कनेक्शन्स वाढली हे जिल्हाधिकाऱ्यांना कळले पाहिजे आणि त्या प्रमाणात शासनाचे उत्पन्न वाढले पाहिजे, यासाठी विभाग प्रयत्नशील आहे.

यासंदर्भात समितीने सूचित केले की, डाटाबेस डे टू डे अपडेट झाला पाहिजे यावर माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सचिवांनी सांगितले की, महसूल विभागाला माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून पूर्ण सपोर्ट मिळेल. या सिस्टीममध्ये हळूहळू सेंट्रलायझेशन वाढणार आहे. कायद्यामध्ये सुधारणा केल्याशिवाय या लोकांवर अंकूश ठेवता येणार नाही. दुसरा मुद्दा म्हणजे महसूल विभागामध्ये तांत्रिक मनुष्यबळ कमी आहे. भारतीय टेलिकॉम विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिलेले असून अनेक अधिकारी सध्या मोकळे बसून आहेत. त्या विभागाने मुख्य सचिवांना पत्र पाठवून कळविले आहे की, ज्या ज्या विभागांना तांत्रिक अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे त्यांनी मागणी करावी. मी महसूल विभागाला विनंती करतो की, दोन-तीन तांत्रिक अधिकाऱ्यांची मागणी करावी. तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध झाले तर नक्की मदत होऊ शकेल. बरेच लोक १२०० रुपये किंमतीची DTH बसवून त्यावरील मोफत चॅनेल्स बघतात. मोफत असलेल्या चॅनेल्सवर करमणूक कर लागत नाही.

ज्या व्यक्ती DTH बसवितात त्यांना करमणूक कर द्यावा लागत नाही काय ? व DTH बसविल्यानंतर ते शासनाच्या ॲक्टीव्हीटींशी संबधित नाहीत काय ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी सांगितले की, DTH अंतर्गत जे फ्री चॅनेल दाखविले जातात त्यावर करमणूक कर लागत नाही. त्यांना दूरदर्शन सारखे चॅनेल्स फ्री असतात.

ग्रामीण भागात DTH बसविण्याचे प्रमाण वाढले आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, या मध्ये तीन गोष्टी अंतर्भूत आहेत. काही लोक सेट टॉप बॉक्स किंवा DTH वर चॅनेल्स बघतात. मुंबईत प्रत्येक कनेक्शनमागे केबलधारकांकडून ४५ रुपये करमणूक कर वसूल केला जातो. इतर शहरात आणि ग्रामीण भागात अनुक्रमे ३० व १५ रुपये प्रमाणे करमणूक कर वसूल केला जातो. फ्री चॅनेल्स वगळता उर्वरित चॅनेल्सवर करमणूक कर लागतो. जे चॅनेल्स फ्री असतात त्यांच्यावर कर लागत नाही. उदा.दूरदर्शन चॅनेल फ्री असल्यामुळे त्यावर कर लागत नाही.

माहिती संदर्भात समितीने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सचिवांचे मत काय आहे असे विचारले असता सचिव, माहिती तंत्रज्ञान विभग यांनी सांगितले की, महसूल विभागाला सॉफ्टवेअर किंवा माहिती व तंत्रज्ञान विषयक जी काही मदत लागेल ती माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून करण्यात येईल.

यासंदर्भात महसूल विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग या दोन्ही विभागांनी एकमेकांशी समन्वय साधून जी काही मदत अपेक्षित आहे ती मदत एकमेकांना करावी तसेच या संदर्भातील कायदा नेमका केव्हा अस्तित्वात येईल हे काही आता सांगू शकत नाही. कारण कायद्याचा मसुदा तयार होईल, तो मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी जाईल, नंतर सभागृहात त्यावर चर्चा होईल आणि त्यानंतर तो राज्यपालांकडे संमतीसाठी पाठविण्यात येईल. यात बराच वेळ जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही विभागाने लवकरात लवकर करावी असे निदेश समितीने विभागास दिले.

काही ठिकाणी केबल चालक स्थानिक चॅनेल्सवर सिनेमा, जाहिराती, स्थानिक बातम्या इ. दाखवितात. यावर विभागाचे काही नियंत्रण आहे की नाही ? खाजगी वा स्थानिक चॅनेल्सच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न केबल चालक स्वत: घेतात. त्यावरील महसूल सुध्दा जमा करीत नाहीत. अशा बाबींवर विभाग नियंत्रण आणू शकतो काय ? खाजगी चॅनेल्सवर नियंत्रण आणण्यासाठी विभागाने काही प्रयत्न केले आहेत काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, परवानगीशिवाय अशा प्रकारे खाजगी चॅनेल्स दाखविले जात असतील तर ते कायद्याला धरुन नाही. गृह विभागाच्या परवानगीशिवाय कोणत्याही केबल चालकाला अशा प्रकारचे चॅनेल्स दाखविता येत नाहीत.

विभागीय सचिवांनी सांगितल्याप्रमाणे जर गृह विभागाच्या परवानगीने हे चॅनेल्स दाखविता येत असतील तर गृह विभागाला त्याचा महसूल मिळावयास पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले व विभागास विचारणा केली की, केबल चालक खाजगी चॅनेलच्या माध्यमातून १०-१५ लाख रुपये कमवितात. त्यातून शासनाला महसूल मिळतो काय ? आणि महसूल विभागाने केबल चालकांना स्थानिक/खाजगी चॅनेल्स सुरु करण्यास परवानगी दिली आहे काय ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, खाजगी चॅनेल्सच्या माध्यमातून मिळविलेल्या उत्पन्नातून शासनाला महसूल मिळत नाही. जे केबल चालक अशा

प्रकारे खाजगी चॅनेल्स दाखवून उत्पन्न कमवित असतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी गृह विभागाच्या निदर्शनास आणून द्यावे लागेल. कारण महसूल विभागाने अशी कोणतीही परवानगी दिलेली नाही.

स्थानिक वा खाजगी चॅनेल्सच्या माध्यमातून स्थानिक बातमी पत्र, जाहिरात, प्रचार, शुभेच्छा, सिनेमा इ. कार्यक्रम दाखविले जातात. या माध्यमातून केबल ऑपरेटर्सना मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते. परंतु त्या तुलनेत शासनाला काहीच महसूल मिळत नाही अशी खंत समितीने व्यक्त केली व विना परवानगी ज्यांनी खाजगी वा स्थानिक चॅनेल्स सुरु केले आहेत त्यांच्यावर विभागाला काय कारवाई करता येईल ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यावर या बाबत केबल ऑपरेटर्सवर ॲक्शन घेता येईल ?

विभागीय सचिवांनी सांगितल्याप्रमाणे केबलचालकावर ॲक्शन घेता येईल परंतु जर कायदा शासनाच्या बाजूने नसताना त्यांच्यावर ॲक्शन कशी घेता येईल अशी शंका समितीने उपस्थित केली व यासंदर्भात विभागास सूचना केल्या की महसूल विभागाने गृह विभागाशी समन्वय साधावा तसेच राज्यात सुरु असलेल्या खाजगी चॅनेल्सबाबतची सविस्तर टिप्पणी समितीला सादर करावी.

अशा प्रकारचे खाजगी चॅनेल्स सुरु करण्यासाठी TRAI (ट्राय) ची परवानगी घ्यावी लागते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, चॅनेल सुरु करताना अशी परवानगी घ्यावी लागेल. आज प्रत्येक केबल चालक चार-पाच खाजगी वा स्थानिक चॅनेल्स दाखवित आहेत. त्या चॅनेल्सच्या माध्यमातून काही लोकांना ब्लॅकमेल केले जाते. काही तांत्रिक अडचण आल्यास DTH वरील चॅनेल्सवर खाली तळटीप येते की, अमुक ठिकाणी संपर्क साधावा. परंतु स्थानिक चॅनेल्सवर अशा प्रकारे काहीही नमूद केलेले नसते. केबल वा सेट टॉप बॉक्सवरील जेवढे चॅनेल्स असतात त्यातील चार-पाच चॅनेल्स हे स्थानिक असतात. त्या चॅनेल्सवर बहुतांशी जाहिरात दाखवून, उत्पन्न कमविले जाते. त्यामुळे नवीन कायदा करताना तो व्यापक ठेवून, स्थानिक चॅनेल्सवर प्रतिबंद आणण्याच्या दृष्टीने आवश्यक ते प्रयत्न करावेत अशी सूचना समितीने विभागास केली.

जिल्हा स्तरावर अनेक स्थानिक चॅनेल्स सुरु आहेत. कोणत्या जिल्ह्यात किती स्थानिक चॅनेल्स सुरु आहेत या बाबत संबंधित जिल्ह्याच्या करमणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठवून माहिती

मागवून घ्यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले करमणूक कर अधिकारी पुणे जिल्हा यांनी समितीस माहिती देताना सांगितले की, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाने २००४ साली एक शासन निर्णय काढला होता. त्यानुसार स्थानिक स्तरावर समित्या स्थापन केल्या आहेत. ज्या चॅनेल्सवर आक्षेपार्ह बाबी दाखविल्या जातात त्या बाबी समित्यांनी निदर्शनास आणून द्यावे. ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी आणि शहरी भागात आयुक्तांना कारवाई करण्याचे अधिकार आहेत. मागच्या वेळी समितीला या बाबतचे पत्रक दिले होते. त्यानुसार अशा चॅनेल्सवर बंदी आणता येते. कोणतेही चॅनेल्स सुरु करावयाचे असल्यास TRAI कडून परवानगी घ्यावी लागते.

परंतु या ठिकाणी स्थानिक चॅनलवर बंदी आणण्याचा विषय नाही कारण स्थानिक चॅनेल्सच्या माध्यमातून सिनेमा, जाहिराती, स्थानिक बातम्या दाखविल्या जात असल्यामुळे लोकांची करमणूक होते. परंतु त्यातून जे उत्पन्न मिळते त्यातील ठराविक रक्कम महसूल म्हणून शासनाकडे जमा केली जात नाही. हा मुद्दा आहे कारण यामध्ये केबल चालकांचा परस्पर व्यवहार करताना यामध्ये महसूल विभाग कोठेही पिक्चरमध्ये नाही. स्थानिक चॅनेल्सवर घाणेरडे/प्रक्षोभक दाखविले जात असेल तर संबंधितांवर गृह विभागाच्या माध्यमातून आय.पी.सी.नुसार गुन्हा दाखल केला जातो. परंतु महसूल विभागाकडून काहीच कारवाई होत नाही. त्यामुळे शासनाचा कोट्यावधी महसूल बुडत असल्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

केंद्र सरकारच्या कायद्यात स्थानिक चॅनेल्सच्या बाबतीत काही तरतूद आहे काय ? व राज्यात ज्या ज्या ठिकाणी स्थानिक वा खाजगी चॅनेल्स सुरु आहेत त्या बाबतची सविस्तर माहिती समितीला १५ दिवसांत सादर करावी. असे निदेश समितीने विभागास दिले व यासंदर्भात विभागीय सचिवांनी असे आश्वासन दिले की, कोणत्या जिल्ह्यात किती स्थानिक चॅनेल्स सुरु आहेत, केबल चालकांनी त्यासाठी परवानगी घेतली आहे काय, इ. माहिती जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवून समितीला सादर करण्यात येईल. परंतु विभागाकडून माहिती अद्याप अप्राप्त आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, औरंगाबाद जिल्ह्यातील श्री.हंबीरे या केबल ऑपरेटरचे प्रक्षेपण बंद असले तरी त्याने अन्य नावाने किंवा अन्य ठिकाणाहून प्रक्षेपण सुरु

केले असेल तर सदर केबल ऑपरेटरच्या मालमत्तेतून थकीत रक्कम वसूल करण्यात येईल काय ? यावर अप्पर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी समितीस असे सांगितले की, श्री.हंबीरे, या केबल ऑपरेटरची पूर्वीची रक्कम थकीत असल्यामुळे त्याचे प्रक्षेपण बंद केले होते. त्याचा केबल व्यवसाय सील केलेला आहे. आता श्री.हंबीरे हे केबल ऑपरेटर राहिलेले नाहीत. सन्माननीय सदस्यांची शंका आहे की, श्री.हंबीरे हे दुसऱ्या नावाने किंवा दुसऱ्या ठिकाणाहून केबलचा व्यवसाय करीत आहेत. श्री.हंबीरे हे औरंगाबाद येथील छावनी परिसरात काम करीत आहेत. औरंगाबाद येथील सर्व भागात केबल कनेक्शन दिले जाते. सर्व केबल ऑपरेटर्सकडून एक्झीस्टींग वसुली करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो संशोधनात्मकरित्या पुन्हा एकदा तपासून घेण्यात येईल. श्री.हंबीरे यांच्या ऐवजी कोण आले आणि त्यांच्याकडे किती केबल कनेक्शन आहेत तसेच त्यांच्याकडून किती रिकव्हरी करणे बाकी आहे हे तपासून घेण्यात येईल.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

"औरंगाबाद जिल्ह्यामधील रु. ४,६६,६५०/- करीता आक्षेपांपैकी श्री.हंबीरे या केबल ऑपरेटरकडून ऑक्टोबर, २००५ ते मार्च, २००६ या कालावधीकरीता रु. ७५,६००/- इतकी रक्कम वसूल न झाल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. उपस्थित लेखा परिच्छेद ऑक्टोबर, २००५ ते मार्च, २००६ या कालावधीसाठी असून श्री.हंबीरे या केबल ऑपरेटरकडे अतिरिक्त जोडण्यांपोटी देय रक्कम थकित असल्याने त्यांच्या कंट्रोल रुममधून होणारे प्रक्षेपण इनपूट सील करुन दिनांक २५ ऑक्टोबर, २००५ रोजी तहसिलदार, औरंगाबाद यांचेकडून बंद करण्यात आले होते. कंट्रोल रुम सील असल्याने या केबल ऑपरेटरकडुन प्रक्षेपण केले जात नव्हते. यामुळे आक्षेपित रक्कम अनुज्ञेय होत नसल्याबाबत महालेखाकार कार्यालयास दिनांक २८.५.२००८ व दिनांक २२.१०.२०१२ च्या पत्रान्वये कळवून सदरचा लेखा परिच्छेद वगळण्याबाबत विनंती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आली आहे."

अमरावती येथील केबल ऑपरेटरकडून रु. १९,५९९/- इतकी रक्कम वसुल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणती कार्यवाही केली आहे यासंदर्भात लेखी माहिती पुढीलप्रमाणे प्राप्त झाली आहे.

अमरावती जिल्ह्यामधील संबंधित केबल चालकांकडून अनुज्ञेय रुपये १९,५९९/- इतकी रक्कम वसुल केली असून, याबाबत दिनांक ३.११.२०१२ च्या पत्रान्वये महालेखापाल यांचे कार्यालयास कळविण्यात आले आहे.

औरंगाबाद शहरात १००० च्या वर केबल ऑपरेटर आहेत. ते मोठ्या प्रमाणात पैसा वसूल करीत असून शासनाकडे त्या प्रमाणात महसूल जमा होत नाही. यावर महसूल विभागाचे काहीच नियंत्रण नाही काय असे मत समितीने खेदान व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, करमणूक कराची रक्कम ठरलेली असते. सिनेमाची तिकीटे किंवा इतर ठिकाणावरून करमणूक कर वसूल करतांना त्याचे परसेंटेज ठरले असते. आता करमणूक कायद्याप्रमाणे केबल ऑपरेटर कडून प्रत्येक केबल ऑपरेटर कनेक्शनमागे ४५ रुपये निश्चित करण्यात आला आहे. तेवढाच कर शासनाला गोळा करता येतो. केबल ऑपरेटर जरी ३०० किंवा ४०० रुपये गोळा करीत असला तरी ४५ रुपयेच कर वसूल करता येतो.

४५ रुपये ही रक्कम अत्यंत कमी आहे. या रकमेत वाढ करता येईल, बजेट सादर करतांना करामध्ये वाढ किंवा घट करण्यात येते त्यावेळी करमणूक कराची रक्कम शासनाला वाढविता येऊ शकते. यासाठी कायद्यामध्ये बदल करण्याची गरज नाही. प्रति कनेक्शन ४५ रुपये कर गोळा करा असे कायद्यात नमूद केलेले नसावे. कायदा केल्यानंतर नियम करण्यात येतात त्यामध्ये रक्कम ठरविली जाते. मोटार वाहन ॲक्टमध्ये कर गोळा करावा असे नमूद केले आहे, परंतु किती कर गोळा करावा याचा निर्णय शासनाने घ्यावयाचा असतो. त्यानुसार करमणूक करात वाढ करता येईल असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, करमणूक कर कायद्यात कराची रक्कम नमूद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका क्षेत्रात ४५ रुपये तर 'अ' व 'ब' वर्ग नगरपालिका क्षेत्रात ३० रुपये आणि ग्रामीण भागात १५ रुपये करमणूक कर गोळा करण्यात यावा असे कायद्यात नमूद करण्यात आले आहे. सदर कायदा सन २००६ मध्ये करण्यात आला आहे. यामध्ये बदल करावयाचा असेल तर तसा बदल शासनाला करता येईल.

सन २००६ च्या कायद्यात तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. आणि जर सरकारची इच्छा असेल तर या कायद्यात ताबडतोब बदल करता येईल करमणूक कर कायद्याप्रमाणे ४५ रुपये कर असला तरी केबल चालकाकडून प्रति कनेक्शन ९० रुपये घ्यावेत

असे बंधन कायद्यात बदल करुन आणता येणार नाही काय कारण कायद्यात बदल करुन करमणूक करात वाढ करता येईल. केबल चालकाच्या माध्यमातून सरकारचे उत्पन्न अत्यंत कमी आहे. ९४ कोटी रुपये यातून शासनाला मिळतात यामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. या धंद्यात अनेक गुन्हेगार लोक आले आहेत. केबल चालक करमणूक कर नियमित भरीत नाहीत. त्यामुळे आता किती लोकांकडे टॅक्स प्रलंबित आहे. तो वसूल करण्याच्या संदर्भात काय कारवाई करण्यात येत आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केबल चालकाची यादी आहे परंतु त्यांच्याकडून वेळोवर करमणूक कराची वसुली १०० टक्के होत नाही. करमणूक कराची थकबाकी वसूल होण्यास उशीर लागतो. करमणूक कराची रक्कम दर महिन्याच्या १० तारखेला भरावी असा नियम आहे. परंतु करमणूक कर उशिरा भरण्याचे प्रकार सध्या चालू आहेत यासंदर्भात कारवाई सुरु आहे. ते केबल ऑपरेटर नियमित कर भरीत नाहीत. त्यांच्यावर नाईलाजाने त्यांची मालमत्ता जप्त करुन फौजदारी गुन्हा दाखल करावा लागतो.

केबल चालक उशिरा कर भरीत असल्यामुळे त्यांच्यावर दंड व व्याजाची आकारणी करण्यात येते काय याबाबात विभागीय सचिवांनी सांगितले की, केबल चालक यांनी कराचा भरणा उशिरा केला तर त्यांच्यावर दंड व १८ टक्के दराने व्याजाची आकारणी करण्यात येते.

यासंदर्भात केबल चालकाने करमणूक शुल्काची रक्कम भरण्यास कसुर केल्यास कोणत्या स्वरुपाची कामे करावी यासाठी निश्चित धोरण ठरविण्यात येणार आहे काय याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

केबल चालकाने करमणूक शुल्क भरण्यास कसूर केल्यास महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील कलम ९ (ब) नुसार वसुलीच्या विलंबाच्या ३० दिवसांपर्यंतच्या कालावधीकरीता १८ टक्के प्रतिवर्ष व पुढील कालावधीकरीता २४ टक्के या दराने दंडनीय व्याजाची आकारणी करण्यात येते. तसेच महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील कलम ९ नुसार जमीन महसुलाची थकबाकी म्हणून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १७ (२) नुसार करमणुक शुल्क वसुलीची कार्यवाही करण्यात येते.

रायगड, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, जळगांव, बीड, अकोला, नागपूर, यवतमाळ व वर्धा येथील केबल ऑपरेटरकडून संपूर्ण रक्कम वसूल केली असून त्याबाबत

महालेखाकारांना कळविले आहे. ही बाब महालेखाकारांना मान्य आहे काय ? याबाबत व नाशिक व वर्धा या दोनच जिल्ह्यात व्याजाची आकारणी करण्याचे कारण काय आहे ? अन्य ठिकाणी व्याज न आकारण्याची कारण काय आहे ? याबाबत महालेखाकार यांनी समितीला माहिती द्यावी असे महालेखाकारांना सांगितले असता As per our records out of Rs.81.62 lacs, Rs.61.54 lacs has been recovered and balance of Rs.20.08 lacs is still pending to be recovered. असे महालेखाकारांनी समितीस सांगितले. याच संदर्भात विभागीय सचिवांनी असे सांगितले की, as per our records, except in Shri Hambire's case, the amounts which were due in the cases pointed out by the A.G. have been recovered. Only in the case of Shri Hambire, the amount is still pending to be recovered. We will reconcile these figures and furnish up-to-date information to the Learned A.G.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

जिल्ह्याचे नाव	**अनुज्ञेय रक्कम**		**महालेखाकार कार्यालयास कळविण्यात आल्याचा दिनांक**
	करमणूक शुल्काची रक्कम	**व्याजाची रक्कम**	
रायगड	रु.१,१९,०००/-		दि.२५.२.२००९ दि.२९.४.२०१०
पुणे	रु.१३,८२,०४०/-		दि.३१.१०.२०१२
कोल्हापूर	रु.६,१२,७२०/-		दि.३०.६.२०१२
सोलापूर	रु.६७,३००/-		दि.७.९.२००५ दि.१२.९.२००७
नाशिक	रु.५,१३,८४९/-	रु.१६,२९४/-	दि.९.११.२००८ दि.१२.१२.२००८ दि.२९.११.२००८
जळगाव	रु.६७,३००/-		दि.९.११.२०११
बीड	रु.३,६७,९८०/-		दि.१.११.२०१२
अकोला	रु.७,७१,०००/-		दि.२६.२.२०१०
नागपूर	रु.९,३२,७५९/-		दि.२०.११.२०१२
यवतमाळ	रु.९५,१३०/-		दि.५.७.२०१० दि.२६.२२.२००९
वर्धा	रु.६६,५९०/-	रु.१९,३३०/-	दि.१६.१२.२०१२

अभिप्राय व शिफारशी

केबल चालक / नृत्यबार चालकांकडून करमणूक कराची वसुली न करणे/ कमी करणे या आक्षेपाच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या प्रतिनधींची साक्ष समितीसमोर घेण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या ४५ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते. राज्याचे मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे त्यामुळे करमणूक कराची वसुली मोठ्या प्रमाणावर होणे अपेक्षित आहे. परंतु वस्तुस्थिती पहाता केबल चालकांची संख्या तसेच या केबल चालकांनी दिलेल्या केबल कनेक्शनच्या तुलनेत करमणूक कराची वसुली फारच कमी प्रमाणात होत आहे. यामध्ये केबल चालक हे त्यांनी दिलेल्या केबल कनेक्शन्सची संख्या कमी दर्शवून कर चुकवित असल्याचे निदर्शनास येत आहे.

करमणूक कराच्या वसुलीची जबाबदारी ही महसूल विभागावर आहे. या विभागाचे काम मुख्यत: तहसील, प्रांत या स्वरुपाचे आहे परंतु केबल धारकांकडून करमणूक कराच्या वसुलीचे काम देखिल करावे लागते. हे काम काही प्रमाणात तांत्रिक स्वरुपाचे असून तांत्रिक क्षेत्रातील माहितीगार वा तज्ञ व्यक्ती महसूल विभागात कार्यरत असणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांना केबल चालकांकडून करमणूक कराची इत्यंभूत आकडेवारी प्राप्त होवून चोख वसुली करणे शक्य होईल परंतु केबल चालकाने दिलेल्या माहितीवरच विभागाला अवलंबून रहावे लागते. केबल चालकाकडे ५०० कनेक्शन्स असतील तर केबल चालक १५० कनेक्शन्स असल्याचे सांगतो. केबल चालकाकडे किती कनेक्शन्स आहेत, हे तपासण्याची यंत्रणा महसूल खात्याजवळ नाही. विभागाला या संदर्भात नियंत्रणासाठी नवीन इलेक्ट्रॉनिक सिस्टिमच्या विचार करावा लागेल.

आज इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली आहे. आता ॲडव्हान्स्ड मोबाईल, टीव्ही, केबल टीव्ही, डिश टीव्ही आले आहेत. जो कायदा सन १९२३ मध्ये अस्तित्वात आला, त्या कायद्यामध्ये कालानुरुप बदलानुसार कोणत्याही प्रकारच्या सुधारणा न केल्यामुळे या सर्व बाबी कायद्याच्या कक्षेबाहेर राहिल्या आहेत. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारचे तांत्रिक ज्ञान नाही. आजपर्यंत या संदर्भात गांभीर्याने विचार करण्यात आला नाही. परंतु, आता ते होणे गरजेचे आहे. कारण महसूल विभागाचा आवाका फार मोठा आहे. **सध्या महसूल विभागामध्ये नॉन टेक्निकल अधिकारी/कर्मचारी आहेत. महसूल विभागाकडून जितक्या प्रमाणात**

करमणूक कराची वसुली व्हायला पाहिजे, तितक्या प्रमाणात होत नाही. त्यामुळे विभागाच्या पदांच्या आकृतिबंधामध्ये अभियंता व तांत्रिक क्षेत्रातील ज्ञान असलेल्या संवर्गाची पदे नव्याने निर्माण करण्यात यावीत अशी समितीची शिफारस आहे.

राज्यात मागील अनेक वर्षापासून करमणूक कर न भरण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे. आज पर्यंत कर बुडविणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे किंवा त्याला कारावासाची शिक्षा झाल्याची माहिती १५ दिवसात समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. परंतु सदर माहिती अप्राप्त आहे. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. समितीला आश्वासित माहिती विहित मुदतीत सादर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच प्रलंबित आश्वासित माहिती व अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईची माहिती समितीला तातडीने सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

महसूल विभागाने करमणूक करासंबंधी योग्य नियंत्रण ठेवल्यास शासनाचा जवळपास १ हजार कोटी रूपयांचा कर वाढणार आहे, असा समितीचा प्राथमिक अंदाज आहे. कराद्वारे शासनाच्या महसूलात वाढ करणे शासकीय अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. तांत्रिक ज्ञान नसणाऱ्या व्यक्तींकडून कामे केली जात असल्यामुळे शासनाचा कर बुडत आहे. हॉस्पिटल, हॉटेल्स, रिसॉर्ट्स, खाजगी व शासकीय कार्यालये या ठिकाणी एकाच केबल कनेक्शनवर २००-३०० टिव्हींकरीता अंतर्गत केबल कनेक्शन दिली जातात. नोंद होताना फक्त एका केबल कनेक्शनचीच नोंद होते. अशा प्रकारे हॉटेल्स, हॉस्पिटल्स रिसॉर्ट्स, खाजगी व शासकीय कार्यालये या संस्था मोठ्या प्रमाणात करमणूक कर बुडवित आहेत त्यांचेकडे असलेल्या केबलची नोंदच होत नाही, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यामुळे विभागाने या संदर्भातील कायद्यात दुरूस्ती करण्याबाबत पावले उचलली पाहिजे. केबल ऑपरेटर्स व शासकीय संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने आतापर्यंत मोठ्या प्रमाणात शेकडो कोटी रुपयांचा महसूल बुडालेला आहे. त्या दृष्टीने चौकशी करुन विभागाने केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे. पुण्यातील करमणूक कर वसूली संदर्भात संबंधीताकडून करण्यात आलेल्या कारवाई संदर्भात अधिकाऱ्यांकडून हलगर्जीपणा झाला आहे. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच करमणूक कर वसुलीच्या प्रकरणी सन

२००८ मधील जे कोणी अधिकारी दोषी असतील, त्यांच्यावर देखील कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.

महसूल विभागाकडे कुशल तांत्रिक कामगार नाहीत. त्यामुळे महसूल विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सेट टॉप बॉक्स, डीटीएच संदर्भात कर वसुली करण्यासाठी एक सल्लागार समिती तात्काळ नेमावी. मुंबई शहर व उपनगरे वगळता राज्यातील इतर भागांत कर वसुली करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्याच्या दृष्टीने देखिल विचार करावा. अशी समितीची शिफारस आहे.

महसूल विभाग केबल चालकांकडून करमणूक कर वसूल करण्याच्या संदर्भात गंभीर नाही. केंद्र शासनाने सेट टॉप बॉक्स बसविणे बंधनकारक केलेले आहे. मुंबई शहरात १४ लाखापेक्षा जास्त लोकांनी सेट टॉप बॉक्स बसविले आहेत. सेट टॉप बॉक्स बसविल्याशिवाय केबल ऑपरेट होत नाही. परंतु केबलच्या संदर्भात गलथान कारभार आहे. आजही सेट टॉप बॉक्स बसविल्यानंतर सरकार एका कनेक्शनमागे ४५ रुपये घेते. परंतु केबल चालक आताही प्रत्येक महिन्याला ४५० रुपये घेतात. केबलधारक केबल चालकाला प्रत्येक महिन्याला २५० रुपये, ३०० रुपये किंवा ४०० रुपये देतात. केबल चालक केबल धारकांकडून प्रत्येक महिन्याला शंभर टक्के वसुली करतात. परंतु विभागामार्फत केबल चालकाकडून करमणूक करासंदर्भात फक्त १० टक्केच वसुली होत आहे.

या सिस्टीममध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे, गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी थैमान घातले आहे, सरकार या संदर्भात पूर्णपणे उदासीन आहे. केबल कनेक्शन्सच्या माध्यमातून शासनाला करमणूक करापोटी फक्त ९४ कोटी रुपये उत्पन्न मिळते. वास्तविक एवढे उत्पन्न एकट्या मुंबई शहरातून मिळावयास हवे. संपूर्ण महाराष्ट्रातून कमीत कमी ५०० कोटी रुपये उत्पन्न केबल कनेक्शन्सच्या माध्यमातून सरकारला मिळणार आहे, परंतु त्यावर महसूल विभाग पाणी सोडत आहे. सर्वसामान्यांच्या खिशातून पैसे जात आहेत, त्याचा फायदा नको त्या वर्गाला मिळत आहे. कायद्यामध्ये शासनाने सुधारणा केली नाही. विकेंद्रीकरण करण्याऐवजी केंद्रीकरण करण्यात आले आहे. केंद्र सरकारने चार मेट्रो शहरांना डिजिटायझेशन सक्तीने लागू केले. महसूल विभागाने मात्र वसुलीबाबत अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याऐवजी केंद्रीकरण केले आहे. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात करमणूक कर शाखा असताना त्या त्या

जिल्हयातील जिल्हाधिकाऱ्यांना केबल कनेक्शन्सच्या संदर्भातील करमणूक कर वसूल करण्याचे अधिकार दिले जात नाहीत यामध्ये शासनाची उदासिनता दिसून येते.

महसूल विभागाचा व्याप मोठ्या प्रमाणात असताना केबल कनेक्शनच्या संदर्भातील जाणकार किंवा तज्ज्ञ मनुष्यबळ विभागाकडे उपलब्ध नाही. केबल कनेक्शन्सचे जाळे कसे असते, ऑपरेटर्सची केबिन कशी असते, चॅनेल्सवरील कार्यक्रम कसे ट्रान्सफर केले जातात याची आज विभागाला काही माहिती आहे असे वाटत नाही. केवळ मुंबई शहरातून संपूर्ण राज्यातील केबल चालकांवर नियंत्रण ठेवणे हे चुकीचे आहे. केंद्रीकरण केल्यामुळे करमणूक कर वसुलीमध्ये सुधारणा होत आहे की वाईट परिणाम होत आहे याचा विभागाने अभ्यास करावा. केंद्रीकरण करण्याऐवजी विकेंद्रीकरण करण्याची सूचना समितीने केली आहे. यासंदर्भात ६ ते ७ प्लेयर्स आहेत आणि त्यांची मुख्यालये याच ठिकाणी आहेत. त्यांच्याकडील माहिती सर्व जिल्हयांना मिळेल अशी व्यवस्था केली आहे. विकेंद्रीकरण आणखी करण्याची मुभा आहे का याची शासनाने तपासणी करावी.

सन १९२३ च्या करमणूक कर कायद्यात सुधारणा करणारी समितीने बैठकीत सूचना केली होती. त्यासंदर्भात कायद्यात अपेक्षित बदल करण्याची प्रक्रिया सुरु केली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे, औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये केबलबाबत मल्टी सिस्टिम ऑपरेटर्स हे प्रमुख प्लेयर्स झालेले आहेत. या ऑपरेटर्सची कनेक्शन ॲक्टीव्हेट केल्याशिवाय केबल दुरचित्रवाणी संचावर चॅनेल दिसत नाहीत. परंतु मल्टी सिस्टिम ऑपरेटर्स ही संकल्पना नव्यानेच अस्तित्वात आली असल्याने करमणूक कर कायद्यामध्ये त्यांचा अद्यापपर्यंत समावेश झालेला नाही असे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे या मल्टी सिस्टिम ऑपरेटर्सना करमणूक कर कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी करमणूक कर कायद्यात आवश्यक ती सुधारणा करण्याची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

बरेचसे केबल चालक स्वत:ची केबल कंपनी सुरु करुन त्यांच्या माध्यमातून केबल व्यवसाय करीत आहेत. हे केबल चालक त्यांच्या अंतर्गत असलेल्या केबलवर जाहिराती देवून प्रचंड उत्पन्न मिळवित आहेत. केबल चालक स्थानिक चॅनेल्सवर सिनेमा, जाहिराती, स्थानिक बातम्या इ. दाखवितात. या माध्यमातून मिळणारे उत्पन्न केबल चालक शासनास न दर्शविता

स्वत:च्या तिजोरीत जमा करीत आहेत. यामुळे शासनास महसूल तर मिळत नाहीच परंतु या केबल चालकांवर कोणाचे नियंत्रण देखिल नाही. तसेच यांचेद्वारे दाखविण्यात येणारे चित्रपट देखिल बऱ्याच वेळा अश्लिल स्वरुपाचे असतात. केबल व्यवसायधारकांवर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नसल्यामुळे त्यांचे उद्योग अविरतपणे चालू आहेत. असे अनिधिकृतरित्या केबलचा व्यवसाय करणाऱ्या केबल चालकांवर कारवाई करण्याकरीता महसूल विभागाने गृह विभागाशी समन्वय साधावा अशी समिती शिफारस करीत आहे.

खाजगी चॅनेल्स सुरु करण्याकरीता ट्राय ची परवानगी आवश्यक असते. परंतु खाजगी चॅनल्स सुरु करणाऱ्या केबल चालकांवर महसूल व गृह विभागाचा अंकुश नसल्यामुळे स्थानिक चॅनेल्सवर नियंत्रण ठेवून त्यांच्यामार्फत महसूल शासनास जमा होण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.

राज्यातील किती घरांमध्ये टिव्ही व इतर कनेक्शन्स आहेत त्यानुसार शासनास कराची किती रक्कम प्राप्त होवू शकते यासंदर्भात विभागास रेडी रेकनरप्रकारे माहिती मिळणे आवश्यक आहे. याबाबत वस्तुनिष्ठ माहिती प्राप्त झाल्यास राज्याच्या महसूल विभागाची कर वसुलीची रक्कम १० पट वाढू शकते. परंतु याकरीता टेक्निकल एक्सपर्ट शासन खाती असणे आवश्यक आहे. टेक्निकल एक्सपर्टकरीता एक कंत्राटदार नेमण्याची आवश्यकता आहे. परंतु विभागाकडे तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्ती कार्यरत नाहीत. तांत्रिक क्षेत्रात मोठी क्रांती झाली असल्याने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातील व्यक्ती खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यातील व्यक्ती, अशासकीय संस्था यातील काही व्यक्ती अशा जणांची मिळून प्रत्येक जिल्हात एक समिती गठीत करण्यात आल्यास फायदा होवू शकतो. ही समिती सर्व पातळ्यांवर माहिती घेवून सेंट्रल डेटाबेस तयार करील व त्याप्रकारे शासनास विविध माध्यमातून कर गोळा करण्यास सहाय्य होऊ शकेल. अत: जिल्हानिहाय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभाग, खाजगी क्षेत्रातील तसेच अशासकीय संख्या यांचे प्रतिनिधी यांनी मिळून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय समित्या नेमण्यात याव्यात अशी समिती शासनास शिफारत करीत आहे.

मुंबई शहर आणि उपनगरामध्ये डीटीएच आणि केबल दोन्ही मिळून १३,६८,७२१ कनेक्शन्स आहेत. डिजिटायझेशन आणि सेट टॉप बॉक्सची सक्ती करण्यापूर्वीची आकडेवारी

११,४५,४४३ होती. मुंबई शहरामध्ये सुमारे २० टक्के आणि उपनगरामध्ये ३३ टक्के वाढ दिसून आली आहे. ही माहिती देखील परिपूर्ण आहे असे नाही. विभागाचे प्रतिनिधी माहिती घेण्यासाठी जातात, त्यांच्याशी बैठक घेतात तेव्हा मल्टी सिस्टीम ऑपरेटरकडून सांगितले जाते की, ग्राहकांकडून फॉर्म भरुन दिले जात नाहीत. सत्य माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता विभागाने त्यांना आणखी काही कालावधी दिलेला आहे. मल्टी सिस्टीम ऑपरेटरकडून जेवढी कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली जातील तेवढया प्रमाणात प्रत्येकी ४५ रुपयांप्रमाणे कर भरण्याची जबाबदारी त्यांची राहील. ग्राहकांनी कॉम्बिनेशन काय घेतले हा महसूल विभागाचा विषय नाही. केंद्रीकरणाऐवजी विकेंद्रीकरण करण्याची सूचना समितीने केली याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

तालुका आणि जिल्हा पातळीवर विकेंद्रीकरण करावे लागेल. महसूल विभागाला फक्त करमणूक कर गोळा करण्याचा अधिकार आहे. आज विभागाकडे केबल कनेक्शन्सबाबत डे टू डे माहिती प्राप्त होत नाही. असे दिसून आले की, १०० टक्के वस्तुनिष्ठ माहिती ते देत नाहीत. त्यांनी पुरविलेली माहिती केबल चालक १०० टक्के सत्य आहे का हे सध्या जी टेक्नॉलॉजी आली आहे त्या माध्यमातून कळून येईल. केबल चालकास कंट्रोल रुममधून ही माहिती मिळू शकते की, त्यांनी किती कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली आहेत. महसूल विभागाला सॉफ्टवेअर किंवा माहिती व तंत्रज्ञान विषयक आवश्यक ती माहिती व तंत्रज्ञान विभागाने द्यावी. महसूल विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग या दोन्ही विभागांनी एकमेकांशी समन्वय साधून केबल व सेटटॉप बॉक्स संदर्भात अद्ययावत माहिती मिळण्यासाठी जी काही मदत अपेक्षित आहे ती मदत समन्वयाने करावी तसेच या संदर्भातील कायदा लवकरात लवकर अस्तित्वात आणावा अशी समितीची शिफारस आहे.

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ५.२ साखरेच्या घटकांवर आधारीत स्पिरीटच्या उत्पादनात घट झाल्याने महसूलाची हानी, परिच्छेद क्र. ५.३ अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली व परिच्छेद क्र. ५.४ विशेषाधिकार शुल्काची वसुली न करणे / कमी वसुली करणे यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

साखरेच्या घटकांवर आधारीत स्पिरीटच्या उत्पादनात घट झाल्याने महसूलाची हानी

मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या तरतूदीनुसार परिशोधित स्पिरीटवर विहीत दराने उत्पादन शुल्क देय आहे. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या परिपत्रकानुसार (ऑगस्ट १९९१) आसवनीतील पक्क्या खड्डयात/टाकीत शिल्लक राहिलेली मळी प्रत्येक महिन्याला अहमदनगरमधील चितळी येथील पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाकडे मळीतील साखरेच्या घटकांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी आणि साखर कारखान्यांच्या अहवालात दर्शविण्यात आलेल्या साखरेच्या घटकांबरोबर तुलना करण्यासाठी पाठविणे आवश्यक आहे. साखर कारखाने आणि पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ या दोघांनीही केलेल्या विश्लेषणांच्या निष्कर्षाची नोंदवहीत नोंद करुन त्याची संबंधित अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी मासिक निरीक्षणाच्यावेळी तपासणी करावयाची असते. तथापि, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या अहवालातील साखरेच्या घटकांचे प्रमाण आसवनीने कळविलेल्या साखरेच्या घटकांपेक्षा जास्त असेल तर याबाबत कोणती कार्यवाही करावी, याविषयी विभागाने निर्गमित केलेल्या परिपत्रकात कोणताही उल्लेख नाही.

३१ मार्च, १९९९ ला संपलेल्या वर्षाच्या भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या परिच्छेद ३.२.८ मध्ये नमूद केले होते की, लोकलेखा समितीच्या परिच्छेद ५.६ (१९८०-८१ चा तिसरा अहवाल) मधील शिफारशींनुसार शासनाने एक तांत्रिक समिती स्थापन केली होती आणि त्यांचा अहवाल कार्यवाहीसाठी मान्य केला होता. त्याचप्रमाणे, उत्पादन शुल्क विभागानेसुध्दा उत्पादनाचे मानक, उत्पादनातील हानी, साठवणूक, वितरण इत्यादी विविध गोष्टींचा विचार करण्यासाठी एक समिती स्थापन (फेब्रुवारी १९८९) केली. जून १९८९ मध्ये,

विभागाने समितीच्या शिफारशींनुसार या नियमांत व्यापक प्रमाणात सुधारणा करण्यात येतील असे नमूद केले. तथापि, आजतागायत कोणतीही सुधारणा करण्यांत आली नाही.

अहमदनगर, कोल्हापूर आणि पुणे येथील सात आसवन्यांची २००२-०३ ते २००६-०७ यामधील विविध कालावधीकरीता जानेवारी ते मार्च २००८ मध्ये साखर कारखान्यांच्या प्रगतीचा तपशील दाखविणारी वार्षिक विवरणे आणि पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या एकूण कमी झालेल्या साखरेच्या (TRS) घटकांच्या अहवालांची चाचणी तपासणी केली असता या दोन्ही अहवालात तफावत असल्याचे आढळून आले. शासनाच्या पृथक्करण अहवालाप्रमाणे स्पिरीटचे उत्पादन ७८५.८० लाख बल्क लीटर असणे आवश्यक होते. तथापि, एकूण कमी झालेल्या साखरेच्या संदर्भातील साखर कारखान्यांच्या निवेदनाप्रमाणे ह्या आसवन्यांतील उत्पादन ७६०.२५ लाख बल्क लीटर होते. याचा परिणाम परिशोधित स्पिरीटच्या उत्पादनात २५.५५ लाख बल्क लीटर (४२.६७ लाख प्रूफ लीटर) इतकी घसरण होण्यात झाला आणि त्यामुळे तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शासनाला रु. ५३.३४ कोटीच्या अधिक महसूलाला मुकावे लागले.

अ.क्र.	घटकाचे नाव	पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या एकूण कमी झालेल्या साखरेच्या घाटकानुसार परिशोधीत स्पिरीटचे आवश्यक असलेले उत्पादन (बल्क लीटर मध्ये)	कारखान्याच्या एकूण कमी झालेल्या साखरेच्या घटकानुसार परिशोधीत स्पिरीटचे उत्पादन (बल्क लीटर मध्ये)	उत्पादनातील घट		महसूलाची हानी
				बल्क लीटर मध्ये	प्रूफ लीटर मध्ये	
	१	२	३	४	५	६
१.	व्ही.व्ही.पाटील स.सा.का., अहमदनगर	२,९८,७१,५१२.७१	२,८६,२४,१४९	१२,४७,३६३.७१	२०,८३,०९७.४०	२६.०४
२.	श्रीगोंदा स.सा.का., अहमदनगर	६७,८०,४९७.४४	६६,९९,९६२	८०,५३५.४४	१,३४,४९४.१८	१.६८
३.	टिळकनगर इंडस्ट्रीज लिमिटेड, अहमदनगर	२,२५,६६,२२६.४८	२,१७,५७,४२५	८,०८,८००.४८	१३,५०,६९६.८०	१६.८८
४.	कोपरगांव स.सा.का., अहमदनगर	२४,६७,१२४.१६	२३,९२,१४४	७४,९८०.१६	१,२५,२१६.८७	१.५६
५.	संजीवनी स.सा.का., अहमदनगर	१,२३,८१,१६३.००	१,२०,८८,१६७	२,९२,९९६.००	४,८९,३०३.३२	६.१२
६.	कुंभी कासारी स.सा.का., कोल्हापूर	२५,६३,८८७.९८	२५,५१,११३	१२,७७४.९८	२१,३३४.२२	०.२७
७.	यशवंत स.सा.का., पुणे	१९,५०,२१३.२८	१९,१२,२९८	३७,९१५.२८	६३,३१८.५२	०.७९
	एकूण	**७,८५,८०,६२५.०५**	**७,६०,२५,२५९**	**२५,५५,३६६.०५**	**४२,६७,४६१.३०**	**५३.३४**

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी विश्लेषणाच्या शर्ती, पृथ:करणासाठीचे मिश्रण इत्यादी विविध घटकांमुळे दोन अहवालातील एकूण कमी झालेल्या साखरेतील घटक भिन्न असू शकतील असे विदीत केले. तसेच, कारखान्याने प्रत्येक आठवड्याला एकूण कमी झालेल्या साखरेचे घटक तपासले होते आणि त्यामुळे कारखान्याच्या अहवालात एकूण कमी झालेल्या साखरेच्या घटकांचे सरासरी प्रमाण दिसून येत होते. तथापि, उत्तरात शासकीय प्रयोगशाळेच्या साखरेच्या घटकांचे प्रमाण न स्वीकारण्याविषयी आणि परिणामी रु. ५३.३४ कोटीच्या शुल्काच्या फरकाची आकारणी करण्याविषयी कोणतेही भाष्य केले नव्हते.

ही बाब मे २००८ मध्ये शासनास कळविण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८).

ज्ञापन :-

सन २००७-०८ मधील कमी वसुलीच्या एकूण रु. ५३.३४ कोटी रकमेपैकी पुणे जिल्ह्यातील रु. ०.७९ कोटी व कोल्हापूर जिल्ह्यातील रु. ०.२७ कोटी रक्कम खालील कारणामुळे लागू नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी वसुल केलेली नाही. महाराष्ट्र स्पिरीट आसवन आणि पेयमद्य निर्मिती नियम. १९६६ मधील नियम १३ (३) (ब) प्रमाणे १ मे. टनापासून मिळणारे उत्पादन ३६५ प्रुफ लिटर असणे आवश्यक असताना त्यापेक्षा जास्त म्हणजे सरासरी ४६० प्रुफ लिटर इतके झालेले आहे. त्यामुळे मळीच्या (टिआरएस) Total Reducing (Sugar) अहवालानुसार मद्यार्काच्या उत्पादनात घट आलेली नाही. उर्वरीत रक्कम रु. ५२.२९ वसुल करण्याची कारवाई संबंधित अधिक्षकांकडून चालू आहे. याशिवाय उर्वरित रक्मेच्या वसुलीचा अहवाल महालेखापाल-१ यांना पाठविण्याबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

सदरहू परिच्छेदासंदर्भात विभागाने केलेल्या खुलाशासंदर्भात महालेखापाल यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत

स्पिरीटच्या उत्पादनात घट झाल्याने होणारी महसूलाची हानी शासनाच्या निदर्शनास आणून देणे हा लेखा परिक्षणाचा हेतू होता. यासंदर्भात अस्तित्वात असलेल्या यंत्रणेद्वारे प्रत्येक खड्डा /टाकी मधील मळींचे परिमाण शासकीय विश्लेषकाने तपासणे व याबाबत आयुक्त, राज्य

उत्पादन शुल्क यांना अहवाल सादर करणे यावरुन उत्पादकाने कळविलेल्या उत्पादनावर निगराणी ठेवण्याचा शासनाचा स्पष्ट हेतू दिसून येतो. यावरुन हानीचे प्रमाण कळविणे व महसूलाची हानी रोखणे या बाबी केवळ अहवाल देऊन कळविणे हे अपुरे आहे. प्रस्तुत संदर्भात असे नमूद आहे की, समितीच्या अहवालानुसार उत्पादनातील हानी, साठवणे आणि वितरण याबाबत विचाराधीन आहेत. याबात सदर समिती केव्हा अस्तित्वात आली व केव्हा अहवाल सादर केला हे कळविण्यात यावे. या समितीच्या अहवालावर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे व याबाबत निर्णय घेतलेला असल्यास ते ही कळविण्यात यावे.

शासनाचे अभिप्राय :-

सदर समिती जानेवारी, २००२ मध्ये अस्तित्वात आलेली असून समितीने मे, २००५ मध्ये अहवाल सादर केला.

हानीचे प्रमाण निश्चित करणे ही बाब तांत्रिक व गुंतागुंतीची आहे. समितीचा अहवाल शासनाच्या विचाराधीन असून सदर अहवालातील सर्व मुद्यांचा सर्वंकष अभ्यास करुन याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली

महाराष्ट्र बाटलीबंद मद्य (अनुज्ञप्ती देणे, नूतनीकरण किंवा अनुज्ञप्ती पुढे चालू ठेवण्याचा कालावधी आणि शुल्क) नियम, १९९६ मधील तरतूदीनुसार उक्त नियमाच्या नियम ४ च्या कलम (१) प्रमाणे मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क प्रत्येक वर्षी अनुज्ञप्ती शुल्काचे दर प्रमाणित करतात. अनुज्ञप्ती शुल्क हे ज्या शहरात, नगरात किंवा गावातील ज्या भागात दारुचे दुकान असेल तेथील लोकसंख्येच्या टप्प्यावर आधारीत असते. हे दर २००३-०४ ते २००७-०८ या वर्षाकरीता सुधारीत केले होते. देय रकमा देण्यात कसूर केल्यास, देय रकमांवर नियत दिनांकापासून दरमहा दोन टक्के दराने व्याज देय होते.

अधिक्षक, उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या अभिलेख्यांची जानेवारी २००८ मध्ये चाचणी तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त होती, तरीसुध्दा २००३-०४ ते २००७-०८ या काळात अनुज्ञप्ती देण्यासाठी /नुतनीकरणासाठी ३,००,००१ ते १० लाखाच्या टप्प्यासाठी

असणारे अनुज्ञप्ती शुल्क आकारले गेले होते. परिणामी, २००३-०४ ते २००७-०८ या काळात रु. ९.४९ कोटींची कमी आकारणी झाली.

हे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यानंतर, अधिक्षक, उत्पादन शुल्क यांनी जानेवारी २००८ मध्ये ही बाब शासनास कळविण्यात येईल. असे विदीत केले. पुढील अहवाल प्राप्त झाला नाही. (नोव्हेंबर २००८)

महालेखापाल यांचे अभिप्राय :-

या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, या सारखीच प्रकरणे सन २००९-१० (परिच्छेद क्र. ५.५.१ च्या लेखापरीक्षण अहवालात निदर्शनास आलेली आहेत. ज्यामध्ये नमूद आहे की, सन २००१ च्या जनगनणेनुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखापेक्षा अधिक आहे असे तहसिलदार, कल्याण यांनी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क-ठाणे यांना कळविलेले आहे, हा मुद्दा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क-ठाणे यांनी मान्य करुन सन २००९-२०१० या वर्षातील अनुज्ञप्ती नुतनीकरण केलेल्या कल्याण डोंबिवली माहानगरपालिका क्षेत्रातील अनुज्ञप्तीधारकांना मागणीपत्र पाठविलेली आहेत. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

शासनाचे अभिप्राय :-

महालेखापालांनी शासनाने केलेला खुलासा मान्य केलेला नाही. तथापि यापुर्वी महालेखापालांना दिलेला खुलासा मान्य करण्यात यावा.

कोल्हापूर, नशिक, पुणे आणि रायगड या चार जिल्ह्यातील अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांची फेब्रुवारी आणि मार्च २००८ मध्ये चाचणी तपासणी केली असता, २००१-०२ ते २००७-०८ या काळात नूतनीकरण केलेल्या १०० अनुज्ञ ाप्तीधारकांकडून लोकसंख्येचा चुकीचा टप्पा लागू केल्याने रु. १.०१ कोटी अनुज्ञप्ती शुल्क कमी वसूल केल्याचे निदर्शनास आले. याशिवाय, देय शुल्काचे विलंबाने प्रदान केल्यास विहीत दराने व्याज देय होते.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने आक्षेप मान्य केले आणि मार्च ते ऑगस्ट, २००८ मध्ये पाच प्रकरणात रु.६०,४७८ व्याजासह रु.१.७३ लाख वसूल केले. उर्वरीत रकमेच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही (नोव्हेंबर २००८).

महालेखापालांचे अभिप्राय :-

या कार्यालयाच्या अभिलेखानुसार अधिक्षक नाशिक यांच्याकडून रुपये २९,२८,५००/- एवढी रक्कम वसुल करणे बाकी असून अधिक्षक पुणे यांचेकडून ६९,६८,५००/- एकूण (रुपये ९८,९७,०००/-) वसुल होणे बाकी आहे या वसुलीचा प्रगती अहवाल लोकलेखा समितीला द्यावयाच्या खुलाशात नमूद करण्यात यावा.

शासनाचे अभिप्राय :-

या प्रकरणी पुणे जिल्ह्यातील अनुज्ञप्ती धारकांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या आदेशात असे निदर्शनास आणून दिले की, जोपर्यंत जनगणनेचे आकडे प्रसिध्द होत नाहीत तोपर्यंत यासंदर्भातील लोकसंख्येप्रमाणे सदर अनुज्ञप्ती शुल्क वसुल करता येणार नाही. याचप्रमाणे नाशिक येथील अनुज्ञप्तीधारकांनीही मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून याबाबतचा निकाल प्रतिक्षाधीन आहे. त्यामुळे सदर शुल्क वसुलीयोग्य नाही.

मे २००४ ते मार्च, २००८ मध्ये केलेल्या अहमदनगर, जालना, लातुर, मुंबई, नागपूर, नाशिक, उस्मानाबाद, पुणे, सातारा, सोलापूर आणि अहमदनगर, जालना, लातुर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, नागपूर, नाशिक, उस्मानाबाद, पुणे, सातारा, सोलापूर आणि ठाणे येथील अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे दिसून आले की, २००२-०३ ते २००७-०८ या कालावधीकरीता नूतनीकरण करण्यांत आलेल्या ४९ अनुज्ञप्तीधारकांकडून सुधारीत दर लागू न केल्याने रु. २८ लाख अनुज्ञप्ती शुल्क कमी वसूल केले गेले.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने हे आक्षेप मान्य केले आणि जानेवारी २००५ ते सप्टेंबर २००८ दरम्यान १६ प्रकरणांत रु. ५१.८५० व्याजासह रु. ५.७५ लाख वसूल केले. उर्वरीत रकमेच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही (नोव्हेंबर २००८).

ही बाब मे, २००८ मध्ये शासनास कळविण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८).

महालेखापाल यांचे अभिप्राय :-

या कार्यालयाच्या अभिलेखानुसार वसुलीच्या थकीत रकमा आहेत.

१) अधिक्षक, लातुर रु. २,१७,०००/-

२) अधिक्षक, मुंबई शहर रु. ३,०५,८००/-

३) अधिक्षक, पुणे रु.८,४१,९००/-

४) अधिक्षक, सातारा रु. १,०८,५००/-(प्रा.प.६३) आणि रु.१,७१,०००/- (प्रा.प.५५)

५) अधिक्षक, सोलापूर रु. १,०८,५००/-

६) अधिक्षक, ठाणे रु. ६२,०००/- या वसुलीचा प्रगती अहवाल लोकलेखा समितीला द्यावयाच्या खुलाशात नमूद करण्यात यावा.

शासनाचे अभिप्राय:-

रु.१८,१४,७००/- या रकमेपैकी रु. १३,२८,८००/- या रकमेची वसुली करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम रु. ४,८५,९००/- पैकी पुणे जिल्ह्याची (प्रा.प.६३) रु. ३,७७,४०० ही रक्कम वसुल करण्यात येत आहे. लातुर जिल्ह्यातील अनुज्ञप्तीधारकाने अनुज्ञप्ती समर्पित केलेली असून तत्कालीन अनुज्ञप्तीधारकाचा शोध लागत नाही यामुळे रु. १,०८,५००/- ही रक्कम वसुल करता आली नाही.

विशेषाधिकार शुल्काची वसुली न करणे/कमी वसुली करणे

मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ च्या तरतूदीनुसार अनुज्ञप्ती एका नावावरुन दुसऱ्या नावावर वर्ग करण्यासाठी (घटनेतील बदलासह) किंवा उक्त नियमांच्या नियम ५ आणि ६ अन्वये एक किंवा भागीदार जोडताना/वगळताना अनुज्ञप्तीधारकांना विशेषाधिकार शुल्क भरावे लागते. अनुज्ञप्ती हस्तांतरीत (घटनेतील बदलासह) करण्यासाठी अनुज्ञप्ती शुल्काच्या १०० टक्के इतके आणि भागीदार वगळताना ५० टक्के इतके शुल्क आकारणीय आहे. ४ ऑक्टोबर १९९६ च्या परतुंकाप्रमाणे आयात केलेल्या विदेश मद्याची भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याची (एफ.एल I आणि एफ.एल II) आणि देशी दारुची (सी.एल.II आणि सी.एल.III) विक्री किंवा साठवणूक या संबंधातील अनुज्ञप्ती हस्तांतरण प्रकरणात नियम ५ लागू नव्हता. हे परंतूक १८ जून, २००४ ला सुधारीत करुन नियम ५ लागू नसलेल्या एफ.एल.I आणि सी.एल. II अनुज्ञप्ती वगळण्यात आल्या.

अहमदनगर, अकोला, औरंगाबाद, धुळे, जळगांव, जालना, कोल्हापूर, मुंबई, नांदेड, नंदुरबार, नाशिक, परभणी, पुणे, सातारा, आणि अहमदनगर, अकोला, औरंगाबाद, धुळे,

जळगाव, जालना, कोल्हापुर, मुंबई उपनगर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, परभणी, पुणे, सातारा आणि ठाणे येथील अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाच्या तसेच आयुक्त राज्य उत्पादन शुल्क मुंबई आणि उत्पादन शुल्क अधिकारी औरंगाबाद कार्यालयाच्या अभिलेख्यांची ऑक्टोबर २००७ ते मार्च, २००८ दरम्यान चाचणी तपासणी केली असता, २००२-०३ ते २००६-०७ मधील विविध कालावधीकरीता पाच अनुज्ञप्तीधारकांकडून ९.९३ लाख विशेषाधिकार शुल्क वसुल न केल्याचे आणि १०७ अनुज्ञप्तीधारकांकडून संबंधित कालावधीत लागू असलेल्या दरापेक्षा रु. ६५.३४ लाख कमी वसुल केल्याचे निदर्शनास आले.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने आक्षेप मान्य केले आणि नोव्हेंबर २००७ ते सप्टेंबर २००८ मध्ये २० प्रकरणांत रु. ३८,९५२ व्याजासह रु. ७.१८ लाख वसुल केले. उर्वरीत रकमेच्या वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही (नोव्हेंबर २००८).

महालेखापाल यांचे अभिप्राय :-

या कार्यालयाच्या अभिलेख्याप्रमाणे ११२ प्रकरणात एकूण आक्षेपित रक्कम रु. ७५.२६ लाख इतकी आहे. ३० प्रकरणांमध्ये रु. १२.९२ लाख वसुली झालेली असून ८२ प्रकरणात रु. ६२.३४ लाख अद्याप वसुल व्हावयाची आहे.

शासनाचे अभिप्राय :-

शासन अधिसूचना दिनांक ०४.१०.१९९६ व दिनांक १८.०६.२००४ नुसार सुधारणा केल्याप्रमाणे मुंबई मद्य निषेध (विशेषाधिकार शुल्क) नियम १९५४ मधील नियम ५ हा किरकोळ देशीमद्य विक्री अनुज्ञप्ती (सीएल-३) व बंद बाटलीमधून विदेशी मद्य विक्रेता अनुज्ञप्ती (एफएल-२) या अनुज्ञप्त्यांना लागू होत नाही. या अधिसूचनेद्वारे केलेल्या सुधारणांमुळे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या सन १९९२ च्या परिपत्रकामधील तरतूदीत निष्प्रभ झालेल्या आहेत.

अहमदनगर, बुलढाणा, धुळे, जालना, कोल्हापूर, मुंबई, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, परभणी, पुणे, रायगड, सातारा, सोलापूर आणि ठाणे जिल्ह्यांतील अधिक्षक, उत्पादन शुल्काच्या अभिलेख्यांची डिसेंबर २००७ ते मार्च २००८ दरम्यान चाचणी तपासणी केली असता, एफ.एल.II आणि सी.एल.III अनुज्ञप्ती भागीदार वगळताना २००४-०५ ते २००७-०८ दरम्यान १३२ अनुज्ञप्तीधारकांकडून अनुज्ञप्ती शुल्काची ५० टक्के इतकी रक्कम वसुल केल्याचे निदर्शनास आले. तथापि, ह्या प्रकरणात अनुज्ञप्तीच्या घटनेत भागीदारी संस्थेकडून मालकी

हक्काकडे असा बदल झाला होता. ह्याकरीता १०० टक्के दराने देय असलेले अनुज्ञप्ती शुल्क वसुलीयोग्य असतानासुध्दा वसुल केले नव्हते. याचा परीणाम रु. ९०.०५ लाख विशेषाधिकार शुल्क वसुल न होण्यात झाला.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, बुलढाणा, धुळे, नागपूर, नंदूरबार, नाशिक, रायगड आणि सातारा उत्पादन शुल्क अधिक्षकांनी रु. २३.१८ लाखाचा अंतर्भाव असलेल्या ३४ अनुज्ञप्तीविषयीची बाब आयुक्त, उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे नमूद केले आणि अहमदनगर, कोल्हापूर, परभणी, पुणे, सोलापूर आणि ठाणे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षकांनी रु. ५६.५५ लाख अंतर्भूत असलेल्या ८५ अनुज्ञप्तींच्या बाबतीत नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे विदीत केले. हे उत्तर समर्थनीय नाही. कारण मुंबई दारुबंदी विशेषाधिकार शुल्काच्या नियम ५ आणि त्यानंतर नोव्हेंबर १९९२ मध्ये निर्गमित केलेल्या आयुक्त, उत्पादन शुल्काच्या स्पष्टीकरणाप्रमाणे घटनेतील बदलासाठी १०० टक्के शुल्क आकारणीय होते. रु. ११.९७ लाखाचा अंतर्भाव असलेल्या सात प्रकरणांबाबत एका उत्पादन शुल्क अधिक्षकाकडून उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८). अधिक्षक, जालना आणि नांदेड यांनी आक्षेप मान्य केले आणि जुलै ते सप्टेंबर २००८ मध्ये सहा प्रकरणांत रु. १८,६८३ व्याजासह रु. १.३५ लाख वसूल केले.

ही बाब मे, २००८ मध्ये शासनास कळविण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८).

महालेखापाल यांचे अभिप्राय :-

हक्कबदल होत असल्यास याबाबत नियम ५ नुसार व त्याबाबतच्या आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांच्या दिनांक १८ नोव्हेंबर, १९९२ च्या परिपत्रकातील स्पष्टीकरणानुसार भागीदार घेणे किंवा वगळणे याकरीता प्रत्येक वेळी १०० टक्के शुल्क घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खुलासा समर्थनीय नाही. आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांनी नोव्हेंबर, १९९२ मध्ये केलेल्या स्पष्टीकरणाची पूर्तता करण्यात यावी. या कार्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे ११० अनुज्ञप्तीधारकांकडून रु. ८६.८९ लाख येणे बाकी आहे.

झालेल्या वसुलीची माहिती या कार्यालयातील नोंदीशी ताडून पहावी. या वसुलीच्या रकमांद्वारे सन २००७-०८ च्या लेखापरिक्षणातील प्रारुप परिच्छेद क्र. ७४ व ७५ ची पूर्तता करण्यात यावी.

साक्ष :-

लोकलेखा समितीने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ व दिनांक ३० जानेवारी,ख २०१३ रोजी या परिच्छेदासंदर्भात प्रधान सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) यांची साक्ष घेतली.

साखरेच्या घटकावर स्पिरीटच्या उत्पादनातील हानी, साठवण व वितरण याबाबतच्या सद्य:स्थितीची माहिती समितीला देण्यासंदर्भात तसेच उत्पादनाचे मानक, उत्पादनातील हानी, साठवणूक, वितरण इ. बाबींचा विचार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने मे, २००५ मध्ये शासनास अहवाल सादर केला. सदरहू अहवालामध्ये केलेल्या शिफारशीनुषंगाने अद्याप कार्यवाही का झाली नाही, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी खुलासा करतांना सांगितले की, मळीच्या गुणवत्तेचे प्रमाण तपासण्यासाठी प्रयोगशाळेकडे पाठविलेल्या सॅम्पलचे अहवाल विभागाकडे येतात. या परिच्छेदामध्ये महालेखाकारांचा आक्षेप असा आहे की, प्रयोगशाळेने जो गुणवत्ता अहवाल दिला त्याप्रमाणे जास्त दारुचे उत्पादन व्हावयास पाहिजे होते. विभागाचे असे म्हणणे आहे की, महालेखाकारांनी जे आक्षेप घेतले ते १९९१ च्या परिपत्रकाप्रमाणे घेतलेले आहेत. १९९१ चे परिपत्रक हे जी मळी एक्स्पोर्ट होते त्याचे सॅम्पल घेऊन ते प्रयोगशाळेकडे पाठवून तपासणी करुन घेण्याच्या संदर्भातील आहे. राज्यामध्ये जी दारु तयार होते त्या संदर्भातील ते परिपत्रक नाही. या बाबतीत मिसकम्युनिकेशन झाले आहे. दुसरा आक्षेप असा होता की, नियमाप्रमाणे १ मेट्रिक टन मळीपासून होणारे उत्पादन २२० बल्क लिटर किंवा ३६५ प्रुफ लिटर असावयास पाहिजे पण उत्पादन त्यापेक्षा कमी झाले. यामध्ये जो मापदंड आहे त्यापेक्षा प्रत्यक्षात जास्त उत्पादन झालेले आहे. तिसरा मुद्दा असा आहे की, मळीपासून जेव्हा दारु तयार होते त्या प्रोसेसमध्ये जी हानी होते त्या हानीवर हायकोर्टाच्या, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे एक्साईज ड्युटी लावता येत नाही. त्यामुळे यामध्ये एक्साईज लॉस झालेला नाही. जेव्हा बॉटलींग होते तेव्हा एक्साईज ड्युटी लावली जाते.

महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपास विभागाने महालेखापालांच्या आक्षेपातील सर्व मुद्यांचा सर्वंकष अभ्यास करुन याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे विभागाने सादर केलेल्या अभिप्रायामध्ये नमूद केले आहे. ही बाब निदर्शनास आणून समितीने त्यासंदर्भात कोणते निष्कर्ष काढले अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी जानेवारी, २००२ मध्ये एक समिती स्थापन झाली होती. त्यांनी दिलेल्या अहवालामध्ये २२० बल्क लिटरपेक्षा कमी उत्पादन झाले नाही पाहिजे असे नमूद केल्याचे समितीस अवगत केले.

समितीने मापदंडापेक्षा जास्त उत्पादन झाले असेल तर हा परिच्छेद कसा आला अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी १९९१ च्या परिपत्रकाच्या आधारावर ते झालेले आहे. ते परिपत्रक एक्स्पोर्ट होणाऱ्या मळीच्या संदर्भात होते. एक्स्पोर्ट होणाऱ्या मळीचे सॅम्पल प्रयोगशाळेकडे पाठवून तपासणी करण्याच्या संदर्भात ते परिपत्रक होते अशी माहिती दिली. याअनुषंगाने समितीने महालेखाकारांबरोबर समन्वय केले नाही का अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी परिपत्रकाच्या मुद्याच्या बाबतीत ते झालेले नाही अशी माहिती दिली.

महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर ते विभागाकडे पाठविले जाते. त्या बाबतीत विभागाने कोऑर्डिनेशन केले पाहिजे. संबंधित विभागाची ती जबाबदारी आहे. हा कोणाच्या स्वेच्छेचा प्रश्न नाही. महालेखाकारांच्या आक्षेपाच्या संदर्भात विभागाने स्पष्टीकरण दिले पाहिजे. पण विभागाचे अधिकारी महालेखाकारांकडे जात नाहीत. या बाबतीत कोण जबाबदार आहे अशी विचारणा समितीने केली असता, महालेखाकारांना उत्तर पाठविले होते पण त्यामध्ये १९९१ चे सर्क्युलर वेगळ्या कारणासाठी होते, ते या कारणासाठी नव्हते हा मुद्दा स्पष्ट करावयाचा राहून गेला होता हे खरे आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

याअनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी महालेखाकारांच्या अभिप्रायास अनुसरुन समितीस अधिक माहिती देताना नमूद केले की, ऑगस्ट १९९१ मध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने एक परिपत्रक काढले होते आणि त्यावर आधारीत महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदाबाबत मुद्दा उपस्थित केला आहे आणि मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ च्या तरतुदीसंबंधी परिच्छेद उपस्थित केला आहे. जेव्हा मोलॅसिस घेतले जाते तेव्हा सर्क्युलरप्रमाणे साखर आणि टीआरएस किती आहे हे पाहून त्याप्रमाणे अंतर्भाव करावा लागतो. परंतु त्यावेळी असे मत मांडण्यात आले की, एकंदर ७ कारखाने असून त्यांनी स्वतःच्या लॅबोरेटरीज् मधून टीआरएस

घेतले आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या प्रयोगशाळेमध्ये सातत्याने टीआरएस बाबत तपासणी करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या अहवालामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले आणि त्यांनी स्वतःच्या लॅबमधून सदरहू प्रमाण काढल्यानंतर त्यांना ते कमी असल्याचे दिसून आले. १ मे.टन मोलॅसिसमधून २२० बल्क लि. किंवा ३६५ प्रूफ लिटर अल्कोहोल निर्माण झाले पाहिजे या निकषावर महालेखाकारांनी परिगणना करुन यामध्ये नुकसान झाले असा आक्षेप काढला. पण याबाबतीत ज्या सर्क्युलरचा उल्लेख करण्यात आला आहे ते ऑगस्ट १९९१ मधील आहे. तेव्हा महाराष्ट्रातील मोलॅसिस या राज्याच्या बाहेर एक्सपोर्ट होत होते. त्यावेळी याबाबत कंत्राटदारांनी संबंधित आयुक्तांकडे तक्रार केली होती की, मोलॅसिस कमी दर्जाचे आहे. त्यामुळे याबाबत असे आदेश काढण्यात आले की, मोलॅसिस निर्गमित करताना ते तपासून देण्यात यावे. सदरहू परिपत्रक निर्यात करावयाच्या मळीची गुणवत्ता तपासण्याच्या संदर्भात होते. तसेच आपले जे रुल्स आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, 'minimum alcohol to be produced from one metric tonne of molasses.' हे त्यापेक्षा जास्त किंवा कमी असू शकते. Output depends upon the type of molasses, pattern of molasses. आपण सतत डिस्टीन्यूशन करतो, त्यामुळे यामध्ये फरक पडलेला आहे. आपल्या रुल्स्मध्ये असे आहे की, '200 bulk litre of alcohol should be produced from 1 metric tonne of molasses.' यापेक्षा जास्त असेल तर प्रभारी अधिकारी दोन टक्क्यापर्यंत मोलॅसिस असेल तर त्याला मान्यता देतात आणि त्यापेक्षा जास्त असेल तर आयुक्तांमार्फत मान्यता दिली जाते. तसेच जर अल्कोहोलचे प्रमाण नियमामध्ये नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असेल तर त्यावर ड्युटी आकारण्यात यावी असे रुल्स्मध्ये नमूद करण्यात आले आहे.पण इंडस्ट्री कमिशनरच्या मान्यतेनंतर याला आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क मान्यता देतात. याबाबत उच्च न्यायालयामध्ये केस झाली होती. त्यावेळी हाय कोर्टाने असे सांगितले की, अल्कोहोलची निर्मिती कमी असेल तर एक्साईज ड्युटी वसूल करता येणार नाही. त्यामुळे रुल्समध्ये कमी किंवा जास्त प्रमाण असण्याबाबत तरतूद नाही. तसेच तिसरा मुद्दा असा आहे की, आपण ते वसूल करु शकत नाही. या संबंधातील ज्या स्टेजेस आहेत, त्यामध्ये बॉटल, पी.ई.टी.बॉटल किंवा पाऊच हे वेअर हाऊस मधून बाहेर पडते तेव्हा एक्साईज ड्युटी लावली जाते अशी माहिती दिली व सध्या लागू असलेल्या नियमानुसार

एक्साईज ड्युटीमध्ये कोणतीही हानी झाली नसल्याने सदरहू परिच्छेद वगळण्यात यावा अशी विनंती केली.

याबाबत उच्च न्यायालयाने कधी निर्णय दिला आहे त्यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी १९८६ मध्ये निर्णय देण्यात आला आहे अशी माहिती दिली. याबाबतीत कमिटी स्थापन केल्यानंतर संबंधितांनी शासनाकडे रिपोर्ट सादर केला आहे. जर तो शासनाने मान्य केला असेल तर ती बाब समिती देखील मान्य करील असे समितीने स्पष्ट केले असता, २००५ मध्ये रामकृष्ण समितीचा रिपोर्ट सबमिट झाला होता. मात्र त्या बाबत शासनाने अजूनपर्यंत निर्णय घेतलेला नाही अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

सन २००२ मध्ये जी समिती स्थापन करण्यात आली होती, त्याबाबत सन २००५ मध्ये अहवाल सादर करण्यात आला आहे. मात्र त्याबाबत सन २०१२ पर्यंत निर्णय झालेला नाही ही बाब समितीने निदर्शनास आणली तसेच याबाबतीत विभागाने शासनाला रिमाईंड केले आहे काय, त्यादृष्टीने पाठपुरावा केला आहे काय. तसेच जोपर्यंत शासन या अहवालावर निर्णय घेत नाही तोपर्यंत लोकलेखा समिती यासंबंधी निर्णय घेऊ शकणार नाही. असे विदीत केले. यासंदर्भात शासनाकडे जो अहवाल सादर केलेला आहे तो मागविण्यासंदर्भात समितीने निदेश दिले. सदरहू अहवालातील शिफारशी समितीस प्राप्त झालेल्या आहे. **(विवरणपत्र क्र.१)**

सन २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त होती. तरीसुध्दा २००३-२००४ ते २००७-२००८ या काळात अनुज्ञप्ती देण्यासाठी/नुतनीकरणासाठी ३,००,००१ ते १० लाखाच्या टप्प्यासाठी असणारे अनुज्ञप्ती शुल्क आकारले गेले होते. परंतु २००३-२००४ मध्ये कमी आकारणी झालेली आहे असे नमूद करण्यात आले आहे. याबाबतीत महालेखापाल यांच्याकडे जो खुलासा पाठविण्यात आला तो मान्य करण्यात आलेला नाही. याबाबतीत विभागाचे काय म्हणणे आहे अशी समितीने विचारणा केली असता, सन २००४ मध्ये सेन्सेसची आकडेवारी प्राप्त झाली. २००१ मध्ये कल्याण-डोंबिवली येथील लोकसंख्या १० लाख ६१ हजार इतकी होती. तसेच तेथील २७ गावांची लोकसंख्या १ लाख ३१ हजार इतकी होती. परंतु सेन्सेसची जी आकडेवारी प्राप्त झाली त्यानुसार २००३ मध्ये तेथील १०-२० गावे कल्याण-डोंबिवली मधून वगळण्यात आली.

त्यामुळे तेथील लोकसंख्या १० लाखा पेक्षा कमी झाली अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

सन २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखापेक्षा अधिक आहे असे तहसीलदार, कल्याण यांनी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांचेकडे पाठविली होती. ठाणे कार्यालयाने ती बाब मान्य करुन सन २००९-२०१० या वर्षातील अनुज्ञप्ती नुतनीकरण केलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनुज्ञप्तीधारकांना मागणीपत्र पाठविलेली आहेत त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही असा उल्लेख महालेखापालांच्या अभिप्रायात आहे ही बाब निदर्शनास आणून हा प्रस्ताव अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांनी शासनाकडे पाठविला होता काय अशी विचारणा समितीने केली असता,शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. जनगणनेच्या आकड्यानुसार दहा लाखाच्या वर लोकसंख्या झाली असेल तर अनुज्ञप्ती वसुली करण्यात येईल असा शासनाने निर्णय घेतला आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

जनगणनेनुसार लोकसंख्या कमी झाली आहे ही बाब शासनाने मान्य केली आहे जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या ११ लाख ९३ हजार ५१२ एवढी आहे. यासंदर्भात आलेल्या तक्रारीनुसार तपासणी करण्यात आल्यानंतर ती लोकसंख्या १० लाख ४७ हजार झाली म्हणजे जवळपास दीड लाखांनी कमी झाली आहे. लोकसंख्येबाबत तेथिल स्थानिक लोकप्रतिनिधीना बोलावून त्यांच्याशी चर्चा करुनच हा प्रश्न सुटेल असे समितीने स्पष्ट केले.

जनगणनेच्या आकड्यांमध्ये बदल झाला, तो बदल कसा झाला आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २००३ ला जनगणनेचे आकडे प्राप्त झाले. माननीय उच्च न्यायालयाचे असे आदेश आहे की, लोकसंख्येचे आकडे जोपर्यंत प्राप्त होत नाहीत तोपर्यंत जास्त लोकसंख्या आहे म्हणून जास्तीची वसुली करु नये. महालेखाकार कार्यालयाचे असे म्हणणे आहे की, सन २००१ पासून ही वसुली करावयाला पाहिजे होती.

सन २००२ ते २००७ मधील विविध कालावधीकरिता पाच अनुज्ञप्ती धारकांकडून रु.१० लाख विशेषाधिकार शुल्क वसूल केलेले नाही यासंदर्भात समितीने विचारणा केली असता

विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, लायसन्सधारक लायसन्समध्ये पार्टनर ॲड करतो किंवा कमी करु शकतो. जेव्हा दोनपेक्षा अधिक पार्टनर्स असतात तेव्हा त्याला पार्टनरशिप धरले जाते. परंतु जेव्हा एकच लायसन्सधारक असतो त्याला सोल प्रोपरायटरशिप म्हटले जाते. १९९६ पूर्वी मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ च्या तरतुदीनुसार, अनुज्ञाप्ती एका नावावरुन दुसऱ्या नावावर वर्ग करण्यासाठी (घटनेतील बदलासह) अनुज्ञप्ती शुल्काच्या १०० टक्के इतके आणि भागीदार वगळतांना ५० टक्के इतके शुल्क आकारणीय होते. त्यानंतर शासनाने दिनांक ४/१०/१९९६ व १८/६/२००४ च्या अधिसूचनेद्वारे या नियमांमध्ये सुधारणा केली. मुंबई मद्य निषेध (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ चा नियम ५ हा सीएल-३ व एफएल-२ या लायसन्सधारकांना लागू होत नाही. या सुधारणांमुळे सन १९९२ च्या परिपत्रकामधील तरतुदी निष्प्रभ झालेल्या आहेत.

याअनुषंगाने समितीने ५४ लाख आणि ६३ लाख रुपयांची रिकव्हरी मान्य केली आहे काय अशी विचारणा केली असता उपमहालेखाकार मुंबई यांनी समितीला माहिती देतांना सांगितले की, regarding paragraph 5.4.1., as per records, out of Rs. 75.26 lakh, Rs.62.34 lakh is still outstanding. In respect of paragraph 5.4.2, as per records Rs.86.89 lakh is still outstanding,

यासंदर्भात त्यावेळी १९९२ चे सर्क्युलर लागू होते असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी दिले.

परिपत्रकाच्या आधीची २० ते २५ लाख रुपये रिकव्हरी होती. परिपत्रक आल्यानंतरची काही प्रकरणे आहेत. त्यानंतर विभागाने नियम बदलले. परिपत्रकाच्या आधीच्या वसुलीविषयी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी परिच्छेद क्रमांक ५.४.१ च्या बाबतीत समितीस माहिती देताना सांगितले की, यामध्ये १५ जिल्ह्यातील १७ कार्यालयात ऑडिट केले होते. त्यामध्ये तीन प्रकारची रिकव्हरी होती. "Shifting of licences from point A to B, Addition and Deletion of Partners" असे प्रकार त्यामध्ये होते. ८२ केसेसमध्ये ६२.३४ लाख रुपये वसुली होती. परिच्छेद क्रमांक ५.४.२ मध्ये १३२ लायसन्सेसच्या बाबतीत आक्षेप होते. या प्रकरणांमध्ये १०० टक्के ऐवजी ५० टक्के प्रमाणे अनुज्ञप्ती शुल्क वसूल केल्याचे निदर्शनास आले असे आक्षेपात म्हटले आहे. २००७-२००८ मधील हा परिच्छेद आहे. १९९६ मध्ये केलेल्या

सुधारणेप्रमाणे यामध्ये वसुलीची आवश्यकता नाही. यासंदर्भात महालेखाकारांना आता कळविण्यात आले आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीसंदर्भातील प्रश्नावलीची माहिती आठ दिवसांच्या कालावधीत समितीकडे सादर करण्याचे निदेश समितीने दिले. त्यानुसार सदरहू माहिती समितीस प्राप्त झाली आहे. विभागाकडून समितीला रामकृष्ण समितीचा अहवाल सादर करण्यात आला आहे. असे समितीने स्पष्ट केले व त्याअनुषंगाने देशी दारु दुकानाच्या संदर्भात लायसन्स विकता येते का अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी देशी दारु दुकानाचे लायसन्स विकता येत नाही. संबंधित लायसन्स धारकाने विनंती केल्यास ते दुसऱ्याला हस्तांतरीत करता येते अशी माहिती दिली.

समितीने गत ३ वर्षापासून उत्पादनात कशाप्रकारे वाढ झाली याविषयी विचारणा केली असता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी माहिती देतांना सांगितले की, गेल्या वर्षी महसुली उत्पादन ८६०५ कोटी रुपयांचे होते, त्या अगोदर ५,८०० कोटी रुपये व त्या मागील वर्षी ५,२०० कोटी रुपयांपर्यंत उत्पादन झाले होते. गेल्या वर्षी ४८ टक्के महसुली उत्पादन वाढले होते. एस्कलेशन रेट ४६ टक्के होता. मागील वर्षी शासनाने देशी दारु आणि फॉरेन लिकरच्या दरामध्ये ३७ टक्के व बीअरच्या दरात ३१ टक्के वाढ केली. त्यामुळे महसुली उत्पादनात वाढ झाली. सुरुवातीला मद्यविक्रीच्या प्रमाणात घट जाणवली होती. परंतु नंतर उत्पन्नात वाढ झाली.

एक्साईज विभागात आकृतीबंधानुसार भरती केली जाते या संदर्भात समितीच्या बैठकीत एक्साईज विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला अशी विनंती केली होती की, एक्साईज विभागाला वाढीव स्टाफ दिल्यास महसुली उत्पादनात वाढ होऊ शकेल. त्या अनुषंगाने एक्साईज विभागात कर्मचारी/अधिकारी वर्ग भरण्यासंबंधीची कार्यवाही झाली आहे का अशी विचारणा केली असता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी रिक्त पदांची भरती करण्यासंबंधी गेल्या वर्षापासून कार्यवाही सुरु आहे. १ अतिरिक्त आयुक्त, २ सह आयुक्त, २ उपायुक्त या पदासंबंधी कार्यवाही झाली आहे. एमपीएससीमार्फत १७ अधीक्षक, ११ उप अधीक्षक आणि प्रमोशनवर ६ उप अधिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विभागामार्फत ७०० कॉन्स्टेबल्सची भरती झाली आहे. सब इन्स्पेक्टरची २३८ पदे रिक्त असून सदर पदे

भरण्यासंबंधी एमपीएससीमार्फत कार्यवाही केली जाते. पूर्वी खात्यामार्फत पदे भरण्यासाठी शासनाची परवानगी होती अशी माहिती दिली.

सदर पदे भरण्यासंबंधी लवकरात लवकर कार्यवाही करावी. स्टाफ कमी असल्यामुळे गावठी व देशी दारु मोठ्या प्रमाणावर फोफावत आहे असे समितीने मत व्यक्त केले असता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी २३८ सब इन्स्पेक्टरची पदे भरण्यासंबंधी एका महिन्यात कार्यवाही केली जाईल असे समितीस आश्वासित केले.

अधीक्षक, उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या अभिलेख्यांची जानेवारी, २००८ मध्ये चाचणी तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, २००१ च्या जनगणनेनुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त असताना देखील सन २००३-०४ ते २००७-०८ या काळात अनुज्ञप्ती देण्यासाठी / नुतनीकरणासाठी ३,००,००१ ते १० लाख लोकसंख्येच्या टप्प्यासाठी असलेले अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात आल्यामुळे उक्त काळात ९.४९ कोटी रुपयांची कमी आकारणी झाली. या विषयामध्ये लोकसंख्या वाढल्यामुळे जी गावे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होणार होती.

प्रत्यक्षात ती गावे महानगरपालिकेत येत नव्हती. या संदर्भात लोकांची आंदोलने सुरु आहेत. हा परिच्छेद अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या संदर्भात संबंधितांना बोलावून हा प्रश्न मार्गी लावावा असे समितीने सांगितले असता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी सन २००१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार अनुज्ञप्ती शुल्क आकारले जात होते. हा प्रश्न सन २००१ ते सन २००४ च्या कालावधीतील आहे. १० लाख लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्या असल्यामुळे २७ गावे त्यातून वगळण्यात आली. नियमानुसार ही रक्कम आता वसूल करता येणार नाही अशी माहिती दिली. यावर समितीने सदर रक्कम क्षमापित करण्यासंबंधी विभागाने कार्यवाही करावी. जेणेकरुन हा परिच्छेद मार्गी लागण्यास मदत होऊ शकेल व कल्याण-डोंबिवलीच्या संदर्भात अनुज्ञप्ती शुल्काच्या वसुलीसंबंधी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करण्यात यावी असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी

मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या तरतूदींनुसार परिशोधित स्पिरीट वर विहीत दराने उत्पादन शुल्क देय आहे. शासनाच्या पृथक्करण अहवालाप्रमाणे स्पिरीटचे उत्पादन ७८५.८० लाख बल्क लिटर असणे आवश्यक आहे. अहमदनगर, कोल्हापूर आणि पुणे येथील सात आसवन्यांचे २००२-०३ ते २००६-०७ यामधील विविध कालावधीकरीता उत्पादन ७६०.२५ लाख बल्क लिटर होते. परिणामत: परिशोधित स्पिरीटच्या उत्पादनात २५.२३ लाख लिटर (४२.६७ लाख प्रुफ लिटर) इतकी घसरण झाल्याने रु.५३.३४ कोटीच्या अधिक महसूलास शासनास मुकावे लागते असे अभिप्राय महालेखाकारांनी व्यक्त केले आहेत.

महालेखाकारांनी घेतलेले आक्षेप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी निर्गमित केलेले परिपत्रक एनएलस १९९१/११ अ दिनांक १२/८/१९९१ मधील निर्देशांच्या आधारावर असून सदरहू परिपत्रक याप्रकरणी लागू नसल्याने सदरहू आक्षेप योग्य नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोरील साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आणले.

सहआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या दिनांक १२/८/१९९१ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्यातदारांकडून घटक मळी प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात आल्यानंतर ती कमी प्रतीची असल्याच्या तक्रारी होत असल्याने मळीची निर्यात करताना वाहतूक पासावर मळीतील साखरेचे प्रमाण व ग्रेड स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. तसेच साखर कारखान्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी मळीचे नमुने महिन्यातून एकदा पश्चिम महाराष्ट्र विभाग महामंडळ मर्यादीत, जिल्हा अहमदनगर यांचे कडून तपासून कारखान्यांनी दर्शविलेला ग्रेड / साखर याच्या प्रमाणाची पडताळणी करुन ते प्रमाणित करण्यात यावे अशी तरतूद करण्यात आली आहे.

साखर कारखानदाराचे हित मळीमधून जास्तीत जास्त साखरेचे घटक काढून घेण्याचे व डिस्टीलरीज याचे हित मळीमधून जास्तीत जास्त अल्कोहोल मिळावे म्हणून मळीमध्ये जास्तीत जास्त साखरेचे घटक असण्यामध्ये आहे. **साखर कारखानदार व डिस्टिलरीज यांचे हित परस्परविरोधी असल्याने त्यामध्ये मेळ घालण्याकरीता सर्व प्रकारच्या मळीतील साखरेच्या प्रमाण घटकाचे निश्चितीकरण होणे गरजेचे असल्याचे समितीचे अभिप्राय असून याकरिता सहआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या दिनांक १२/८/१९९१ च्या परिपत्रकातील तरतुदी**

निर्यात होणाऱ्या मळीसहीत निर्यात न होणाऱ्या मळीनाही लागू करण्यासंदर्भातील स्पष्ट तरतुदी सदरहू पत्रकात करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

मुंबई उच्च न्यायालय येथे महाराष्ट्र डिस्टीलरीज लिमिटेड वि. महाराष्ट्र शासन रिट पीटीशन क्र.४०१/८९ चा निर्णय दिनांक ७/४/१९९० मध्ये तसेच मा.सर्वोच्च न्यायालयातील मे. सिन्थेटीक अँड केमिकल्स वि. उत्तरप्रदेश शासन (१९९९) S.C.C. १०९ यामध्ये "अल्कोहोलची निर्मिती व दारुच्या उत्पादनामध्ये झालेली घट" यावर राज्य शासन उत्पादन शुल्क लावू शकत नसल्याचा निर्णय दिला आहे.

सदरहू निर्णयानुषंगाने मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील तरतूदींचा अभ्यास करुन अभिप्राय सादर करण्यास विधी व न्याय विभागास विनंती केली गेली असता त्यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार तसेच लोकलेखा समितीच्या दिनांक २५ जून १९९६ रोजीच्या बैठकीतील निर्णयाचा आधार घेऊन शासनाने दिनांक ३ जानेवारी, २००२ रोजी एक्सपर्ट समितीची स्थापना केली. यासंदर्भातील रामकृष्णन समितीने शासनास अहवाल सादर केला असून सदरहू अहवालामध्ये निश्चित प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात स्पिरीटचे उत्पादन झाल्यास संबंधित डिस्टीलरीजकडून खुलासा मागविण्याबाबत व खुलासा समाधानकारक नसल्यास वाढीव/सुधारीत उत्पादनावर जेवढे उत्पादन शुल्क लावले जाऊ शकते त्यापेक्षा कमी नसेल इतका दंड वसुल करण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली आहे.

सदरहू अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसल्याने साखर कारखानदार व डिस्टीलरीज यांच्यावर कोणतेही नियंत्रण राहीले नसल्याने उत्पादन शुल्कापोटी मिळणाऱ्या महसूलास शासनास मुकावे लागत असल्याचे समितीचे अभिप्राय आहेत. शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा स्पिरीटचे कमी उत्पादन झाल्यास केवळ डिस्टीलरीजना जबाबदार धरणे उचित होणार नाही. कारण **साखर कारखानदारांचा कल मळीमधून जास्तीत जास्त साखरेचे घटक काढून घेण्यामध्ये असून व स्पिरीटचे उत्पादन मळीमध्ये किती प्रमाणात साखरेचे घटक आहे यावर अवलंबून असल्याने यास साखर कारखानदारांनाही जबाबदार धरण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

रामकृष्णन समितीच्या अहवालातील शिफारशींची त्वरीत अंमलबजावणी व्हावी व अहवालातील शिफारशीनुसार संबंधित अधिनियम व नियमांमध्ये सुधारणा करण्यासंदर्भात

कार्यवाही व्हावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र बाटलीबंद मद्य अनुज्ञप्ती देणे, नुतनीकरण, अनुज्ञप्ती पुढे चालु ठेवण्याचा कालावधी आणि शुल्क नियम, १९९६ मधील तरतुदीनुसार अनुज्ञप्ती शुल्काचे दर ज्या शहरात, नगरात किंवा गावातील ज्या भागात दारुचे दुकान असेल तेथील लोकसंख्येच्या टप्प्यावर आधारीत असते.

अधिक्षक उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त होती तरीसुध्दा सन २००३-०४ ते २००७-०८ या काळात अनुज्ञप्ती देण्यासाठी/नुतनीकरणासाठी ३ लाख ते १० लाखाच्या टप्प्यासाठी असणारे अनुज्ञप्ती शुल्क आकारले गेल्याने शासनाच्या ९.४९ कोटी इतक्या महसूलाची हानी झाली तसेच २००१-०२ ते २००७-०८ या काळात नुतनीकरण केलेल्या १०० अनुज्ञप्तीधारकांकडून लोकसंख्येचा चुकीचा टप्पा लागू केल्याने रु. १.०१ कोटी महसूल शासनास मिळाला नाही. तसेच मे, २००४ ते मार्च २००८ मध्ये ११ जिल्ह्यातील १२ कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात नूतनीकरण करण्यात आलेल्या ४९ अनुज्ञप्तीधारकांकडून सुधारीत दर लागू न केल्याने ४.२८ लाख अनुज्ञप्ती शुल्क कमी वसुल केले गेले असे महालेखाकारांनी अभिप्राय व्यक्त केले आहेत.

सदरहू प्रकरणे महालेखाकारांनी विभागाच्या निदर्शनास आणल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन कार्यवाहीस प्रारंभ केला असता काही व्यक्तींनी जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशांना मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले.

दाखल झालेल्या याचीका खालील प्रमाणे

१) श्री.सुनिल तेलंग वि. जिल्हाधिकारी पुणे,

रीट याचीका क्र. ३५४८/२००९

न्यायालयाने दिनांक १५/६/२००९ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांचा दिनांक १.१०.२००८ चा शुल्क वसुल करण्यासंदर्भातील आदेश रद्द केला.

२) अ) श्री.संजिव शेट्टी वि.जिल्हाधिकारी पुणे,

रीट याचिका क्रमांक ३५३३/२००९

ब) श्री.किशोरीलाल चढ्ढा वि.जिल्हाधिकारी पुणे,

रीट याचिका क्रमांक ३१८६/२००९.

क) श्री.रमेश जेठवानी वि.जिल्हाधिकारी पुणे,

रीट याचिका क्रमांक ३१८७/२००९

ड) श्री.देवेंद्र कालरा वि.जिल्हाधिकारी पुणे,

रीट याचिका क्रमांक ३१८८/२००९

इ) श्री.बाळकृष्ण तेलंग वि.जिल्हाधिकारी पुणे,

रीट याचिका क्रमांक ३५४८/२००९

सदरहू रिट याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दिनांक १५ जून, २००९ रोजी एकत्रित निर्णय देऊन जिल्हाधिकारी यांचे आदेश रद्द केले.

मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे दाखल अपिल क्रमांक ३६०/२००८/जलसाबाई जाधव वि. जिल्हाधिकारी पुणे यामध्ये आयुक्तांनी उपरोक्त नमूद उच्च न्यायालयाचा निर्णयाचा आधार घेऊन दिनांक ३१.०८.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे जिल्हाधिकारी पुणे यांचे आदेश रद्द केले.

मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार बॉम्बे फॉरेन लिकर रुल्स मधील भाग दोन नियम २४ हा दारु विक्रेत्याने दारु विक्रीकरीता परवाना घेण्यासंदर्भातील असून नियम २५ हा दारु विक्रेता म्हणून परवाना घेणे व त्यासंदर्भात फीचा भरणा करणे यासंदर्भातील आहे. सदरहू नियमानुसार ज्या महानगरातील लोकसंख्या १ लाख असेल तर रु. २५,०००, ज्या शहरातील लोकसंख्या १ लाखाच्या वर परंतु १० लाखाच्या खाली असेल तर रु. ६५ हजार, ज्या शहरामध्ये लोकसंख्या १० लाख व त्याच्या वर असेल तर १,००००० फी ची आकारणी करण्यासंदर्भात तरतूद केली आहे.

सदरहू नियमातील परंतुकान्वये अनुज्ञप्ती शुल्क आकारतांना अस्तित्वात असलेल्या अलिकडील जनगणना अहवालानुसार निश्चित केलेली लोकसंख्या विचारात घेण्यात यावी अशी तरतूद करण्यात आली आहे.

सदरहू न्यायालयीन प्रकरणांमध्ये संबंधित दारु विक्रेत्याचे परवाने जानेवारी २००१ मध्ये निर्गमित करण्यात आले होते व त्यावेळी १९९१ चा जनगणना अहवाल अस्तित्वात होता. जो शासकीय राजपत्रामध्ये दिनांक ३० जानेवारी २००१ ला प्रसिध्द करण्यात आला होता.

२००१ चा जनगणना अहवाल ऑगस्ट २००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आला असल्याने नियम २५ अंतर्गत परंतुकान्वये सदरहू प्रकरणी १९९१ च्या जनगणना अहवालानुसार निश्चित केलेल्या लोकसंख्येनुसार फीची आकारणी योग्य असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले.

याअनुषंगाने बॉम्बे फॉरेन लिकर रुल्स मधील नियम २५ मधील परंतुक वगळून अस्तित्वात असलेल्या अलिकडील जनगणना अहवालासह शासनाकडे इतरही माध्यमातून अद्ययावत असलेली लोकसंख्येची आकडेवारी अनुज्ञप्ती शुल्क आकारतांना विचारात घेण्यासंदर्भात नियमामध्ये स्पष्ट तरतुदी करण्यात याव्यात जेणेकरुन तांत्रिक बाबीच्या आधारे शासनास महसुलास मुकावे लागणार नाही अशी समितीची शिफारस आहे.

गृह विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालामधील क्र. ७.२ "पोलीस जमा" या परिच्छेदासंदर्भात महालेखापालांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

अन्य राज्य सरकार/केंद्रसरकारकडून पोलीस तैनातीच्या खर्चाची मागणी न करणे

दिनांक १९ मे २००३ च्या पोलीस महासंचालकांच्या परिपत्रकानुसार राज्य राखीव पोलीस दलाच्या समादेशकांनी (commandants) राज्य राखीव पोलीस दलाचे पोलीस बाहेरील राज्यातून परत आल्यावर एक महिन्याच्या आत त्यांच्या खर्चाचे विवरणपत्र तयार करायला हवे. अशा प्रकारे प्राप्त झालेली विवरणपत्रे एकत्रित करुन राज्य महालेखापरीक्षकांकडे प्रमाणित करण्यासाठी पाठवायला हवे. परंतु शासनाने केलेल्या मागण्यांवर किंवा तैनात केलेल्या पोलीसांच्या मूल्याच्या वसुलीवर लक्ष ठेवण्यासाठी कोणतेही विवरणपत्र किंवा नोंदवही विहित केली नव्हती.

पोलीस महासंचालकांच्या कार्यालयाच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली असता असे आढळले की, २००२-०३ आणि २००६-०७ मधील विविध कालावधीत सात राज्यात/केंद्रशासित प्रदेशात तैनात केलेल्या राज्य राखीव पोलीस दलाच्या खर्चाची विवरणे पूर्ण करण्यास ९ ते ३८ महिन्यांचा विलंब झाला होता. तसेच, यामधील कोणत्याही प्रकरणात विभागाने पोलीसांच्या खर्चाच्या वसुलीसाठी रुपये ४.९९ कोटीची मागणी केली नव्हती. नोंदवही किंवा विवरणपत्रे यातून मागणीवर लक्ष ठेवण्याच्या पध्दतीचा विभागात अभाव असल्याचा परिणाम तैनात पोलीसांच्या खर्चासाठी रुपये ४.९९ कोटी न मिळण्यात झाला.

शासनाने ही वगळणूक मान्य केली (सप्टेंबर २००८) आणि रक्कम वसुल करण्याचे मान्य केले. वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (नोव्हेंबर २००८)

ज्ञापन :

केंद्रशासन व अन्य राज्यांना पुरविण्यात येणाऱ्या पोलीस बंदोबस्तानंतर कंपनी परत आल्यावर एका महिन्याच्या कालावधीत खर्चाची विवरणपत्रे व खर्च वसुलीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत तसेच अप्पर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल कार्यालयामार्फत संबंधितांना वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वसुलीवर नियंत्रण ठेवण्यासाठी

नोंदवही ठेवून पाठपुरावा करण्याबाबत दिनांक ०८/०९/२००८ च्या ज्ञापनान्वये संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक व गट कार्यालयामध्ये नोंदवह्या ठेवण्यात आल्या आहेत.

ज्या प्रकरणांमध्ये संबंधित राज्यांकडे लेखाप्रमाणपत्र पाठवून रकमेची मागणी करण्यात आलेली आहे मात्र त्यांनी अद्याप प्रतिपूर्ती केलेली नाही अशा राज्यांकडे अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या स्तरावरुन अर्ध शासकीय पत्र पाठवून पाठपुरावा करण्यात आलेला आहे. एकूण ७ राज्यांकडे तैनातीच्या खर्चाची रक्कम प्रलंबित आहे. त्यापैकी पाँडेचेरीकडे प्रलंबित असलेल्या रुपये ९५,४५,०६३/- एवढ्या रकमेपैकी रु. ९४,५४,१६४/- एवढी रक्कम वसुल झाली असून सद्यस्थितीत रुपये ९०,८९९/- एवढी रक्कम प्रलंबित आहे.

प्रतिपूर्तीची मागणी प्रलंबित राहू नये यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक २५/०१/२०१० च्या ज्ञापनान्वये त्रैमासिक विवरणपत्र विहित करण्यात आले असून त्यानुसार माहिती सादर करण्याच्या सूचना सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल तसेच विशेष पोलीस महानिरिक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे/नागपूर यांना देण्यात आल्या आहेत.

तैनात केलेल्या पोलीसांच्या खर्चाची कमी वसुली

पोलीसांच्या खर्चाच्या परिगणनेच्या अचूकतेची खात्री करण्यासाठी शासनाने कोणतीही प्रणाली विहीत केली नव्हती.

चाचणी तपासणी करताना असे आढळले की, सहा पोलीस आयुक्त आणि दोन पोलीस अधिक्षकांच्या कार्यालयातील २००२-०३ आणि २००६-०७ मधील विविध कालावधीत ४० प्रकरणात महागाई भत्ता, रजेचे वेतन, निवृत्ती अंशदान, निरीक्षक प्रभार मिळून एकूण रुपये ३.२३ कोटी मागणीपत्रात दर्शविले गेले नव्हते. याचा परिणाम **जोडपत्र - II मधील विस्तृत विवरणात (परिशिष्ट क्र.)** दर्शविल्याप्रमाणे विविध संस्थांकडून येणारी रुपये ३.२३ कोटीची कमी वसुली होण्यात झाला.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने आक्षेप स्वीकारले आणि वसुलीसाठी सुधारित मागणीपत्र पाठविण्याचे मान्य केले. (सप्टेंबर २००८) वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. (नोव्हेंबर २००८)

ज्ञापन :-

ज्या पोलीस घटक प्रमुखांनी पोलीस बंदोबस्त पुरविणेकामी महागाई वेतन, विशेष वेतन, रजा वेतन, निवृत्ती वेतन, अंशदान इत्यादीच्या अनुषंगाने परिगणना न करता कमी दराने शुल्क आकारणी केली आहे अशा प्रकरणी प्रचलित दराने परिगणना करुन शासनास येणे असलेल्या रकमेची सुधारित मागणी संबंधित खाजगी व्यक्ति व संस्थांकडे करावी आणि ती वसुल करुन पुर्तता अहवाल सादर करण्याच्या सूचना पोलीस महासंचालक कार्यालयाने संबंधित पोलीस घटक प्रमुखांना दिनांक २२/०९/२००८ च्या ज्ञापनान्वये दिल्या आहेत. प्रचलित नियमाप्रमाणे पोलीस संरक्षण शुल्काची अचूक परिगणना करण्याची जबाबदारी पोलीस घटक प्रमुखांकडील सहायक लेखाधिकारी यांचेवर सोपविण्याबाबतच्या सूचना पोलीस महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं /३५/२८०१/एसीएम/८४/०८ दिनांक ०८/०९/२००८ अन्वये सर्व घटकांना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे पोलीस संरक्षण शुल्क आकारणी योग्य प्रकारे होण्यासाठी व त्याच्या वसुलीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक पोमसं/३५/२८०१/एसीएम/८४/२८०८ दिनांक १३/०५/२००९ अन्वये तसेच दिनांक १४/०१/२०१० अन्वये सर्व घटकांना दोन स्वतंत्र प्रमाणित नमुने (Standard Examples) निर्गमित करण्यात आले आहेत.

शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एसएसए-१०१०/प्र.क्र.४/विशा-४ दिनांक १२/०५/२०११ अन्वये जिवास धोका असल्याप्रकरणी देण्यात आलेल्या पोलीस संरक्षक शुल्काची परिगणना करण्यासंदर्भात सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी दिनांक ०१/०१/२००६ पासून करण्यात आली आहे.

व्यक्तींकडून पोलीस खर्च वसुल न करणे

नागपूर आणि पुणे येथील पोलीस आयुक्त कार्यालय आणि सातारा येथील पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली असता असे आढळले की, वर्ष २००२-०३ आणि २००६-०७ मधील विविध कालावधीत ११९ व्यक्तींना पुरविलेल्या सुरक्षा व्यवस्थेसाठीचा खर्च (रु. १.६७ कोटी) ना आगाऊ वसुल केला होता ना पोलीस दल परतल्यानंतर मागणी (रु. ९३.०७ लाख) केली होती. याचा परिणाम पोलीस मूल्याचे रु. २.६० कोटी वसुल न होण्यात झाला.

ज्ञापन :-

पोलीस नियमावली भाग-३ नियम ४८४ नुसार खाजगी व्यक्ती यांना पुरविण्यात येणाऱ्या पोलीस संरक्षणावरील खर्चाची आगावू वसुली करुन कोषागारात भरणे आवश्यक आहे. तसेच मागितलेले अग्रीम प्राप्त झाल्याखेरीज खाजगी व्यक्तींना पोलीस संरक्षण देण्यात येऊ नये असेही सदर नियमात स्पष्ट केले आहे.

तथापि, खाजगी व्यक्तींना पोलीस संरक्षण पुरविण्याचे कामकाज घटक कार्यालयांकडून केले जाते. राज्यातील घटक प्रमुख, खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्था यांना पोलीस संरक्षण देतानाच नियमांस अनुसरुन अग्रीम वसुल करुन घेत नाहीत. किंवा नंतरही दैनंदिन तत्वावर वसुली करत नाहीत आणि त्यांचेकडील आधीची प्रलंबित रक्कम वसुल झाली आहे किंवा नाही याची नोंद न घेताच त्यांना पोलीस संरक्षण पुरवितात.

खाजगी व्यक्तींना संरक्षण पुरविताना उपरोक्त नियमांचे तंतोतंत पालन करण्याबाबत सर्व संबंधितांना वारंवार पोलीस महासंचालक यांचेकडून कळविण्यात आलेले आहे. तसेच संरक्षण शुल्क प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन मुंबई पोलीस कायदा, १९५१ चॅप्टर ५ नियम ४९ अन्वये कायदेशीर कार्यवाही करुन वसुली नियमित करण्याच्या सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे सूचनांचे पालन केले जात नाही. याचाच परिणाम खाजगी व्यक्तींकडून रु. २.६० कोटी खर्च वसुल न होण्यात झालेला आहे.

महानगरपालिकांकडून पोलीसांचा खर्च वसुल न करणे

आठ पोलीस आयुक्त आणि दोन पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली असता असे आढळले की, २००२-०३ ते २००६-०७ मधील विविध कालावधीत, ११ महानगरपालिकांसाठी तैनात केलेल्या पोलीसांचा रु. २२.४७ कोटी खर्च आगाऊ वसुल केला नव्हता.

ज्ञापन :-

महानगरपालिका, नगरपालिका यांना गार्ड पुरविताना त्यांच्याकडून आगावू खर्च वसुल करण्यात येऊ नये असे महाराष्ट्र पोलीस नियमावली खंड-३ नियम ४८४ मध्ये स्पष्ट नमूद केले आहे. मात्र, ठाणे, पुणे, नागपूर, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नवी मुंबई आणि नाशिक महानगरपालिका यांना अनधिकृत बांधकामांविरुध्द काम करणाऱ्या पथकाच्या संरक्षणासाठी

पोलीसांची पदे मंजूर करतांना सदर पथकासाठी येणारा तीन महिन्याचा संपूर्ण खर्च सदर महानगरपालिकांकडून आगावू वसुल करण्याबाबत शासनाने आदेश दिलेले आहेत. मात्र संबंधित घटकांनी सदर शासन आदेशाचे पालन केलेले नाही आणि त्यांच्याकडून तैनात केलेल्या पोलीसांचा खर्च महानगरपालिकांकडून आगावू वसुल करुन घेण्यात आलेला नाही.

याबाबतही वर नमूद केल्याप्रमाणे संबंधितांना वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु, त्याचे पालन होत नसल्यानेच महानगरपालिकांकडे रु. २२.४७ कोटी खर्च वसुल करण्यात आलेला नाही.

बँकांकडून पोलीसांचा खर्च वसुन न झाल्याबद्दल

पाच पोलीस आयुक्त कार्यालयांच्या अभिलेख्यांची छाननी केली असता असे आढळले की, १९९८ ते २००७ मधील विविध कालावधीत १४ बँकांकडून तैनात केलेल्या पोलीसांच्या खर्चाची रु. २.४२ कोटी वसुली प्रलंबित होती. नोव्हेंबर २००८ पर्यंत वसुली झालेली नव्हती.

अशाप्रकारे व्यक्ती आणि महानगरपालिकांकडून पोलीसांचे मूल्य आगाऊ वसुल करण्याच्या विहित पध्दतीचा अवलंब न केल्याने आणि पोलीसांच्या मूल्यांची बँकांकडून आगाऊ वसुली करण्याच्या पध्दतीचा अभाव ह्यामुळे रु. २७.४९ कोटी वसुल झाले नाहीत.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने (सप्टेंबर २००८) असे नमूद केले की संबंधित प्राधिकाऱ्यांना रक्कमा वसुल करण्याच्या आणि पोलीस खर्चाची रक्कम आगाऊ वसुल करण्यासंबंधातील अधिनियमातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ज्ञापन :-

पोलीस नियमावली भाग-३ नियम ४८४ नुसार स्वायत्त संस्था यांना पुरविण्यात येणाऱ्या पोलीस संरक्षणावरील खर्चाची आगाऊ वसुली करुन कोषागारात भरणे आवश्यक आहे. तसेच मागितलेले अग्रीम प्राप्त झाल्याखेरीज खाजगी व्यक्तींना पोलीस संरक्षण देऊ नये असेही सदर नियमात स्पष्ट केले आहे.

तथापि स्वायत्त संस्थांना पोलीस संरक्षण पुरविण्याचे कामकाज घटक कार्यालयाकडून केले जाते. राज्यातील घटक प्रमुख, स्वायत्त संस्था यांना पोलीस संरक्षण देतानाच नियमास अनुसरुन अग्रीम वसुल करुन घेत नाहीत किंवा नंतरही दैनंदिन तत्वावर वसुली करत नाहीत.

आणि त्यांचेकडील आधीची प्रलंबित रक्कम वसुल झाली आहे किंवा नाही याची नोंद न घेताच त्यांना वर्षानुवर्षे पोलीस संरक्षण पुरवितात.

बँकांना संरक्षण पुरविताना उपरोक्त नियमांचे तंतोतंत पालन करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे. तसेच संरक्षण शुल्क प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन मुंबई पोलीस कायदा १९५१ चॅप्टर ५ नियम ४९ अन्वये कायदेशीर कार्यवाही करुन वसुली नियमित करण्याच्या सूचनाही सर्व संबंधितांना वारंवार देण्यात आलेल्या आहेत.

खाजगी व्यक्ती/संस्था यांना पुरविण्यात येणाऱ्या पोलीस बंदोबस्ताकामी शासनास येणे असणाऱ्या वसुलीच्या रकमेवर नियंत्रण ठेवण्याकरीता नोंदवही ठेवण्याबाबतच्या सूचना सर्व पोलीस घटक प्रमुखांना महासंचालक कार्यालयाच्या परिपत्रक क्र. पोमसं/१६-अ/मलेनिप/पोलीसरिसीट/३४/०७, तसेच पोमसं/३५/२८०१/८४/०८अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे महानगरपालिका, नगरपालिकांकडील प्रलंबित शुल्क प्रकरणी समायोजन करणेसाठी प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविण्याबाबतही महासंचालक महानगरपालिका, नगरपालिका यांना संरक्षणासाठी शासनाने मंजूर केलेल्या पदांच्या खर्चाची वसुली करतांना संबंधित शासन निर्णयात दिलेल्या सूचनेप्रमाणे अत्यंत काटेकोरपणे पालन करुन या संस्थांकडे संरक्षण शुल्क प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्याबाबतही कळविण्यात आलेले आहे.

रेल्वेच्या मंजूरीशिवाय पदांची निर्मिती केल्याने पोलीस खर्चाचा ५० टक्के हिस्सा न मिळणे

रेल्वे वित्तिय कोड खंड-१ पॅरा ८५६ अनुसार जर शासकीय लोहमार्ग पोलीसांची मंजूर पदे रेल्वेच्या मंजूरीने निर्धारित केलेली असतील तर अशा शासकीय लोहमार्ग पोलीसांचा खर्च राज्य सरकार व रेल्वे यांनी ५०:५० प्रमाणात वाटून घ्यावयाचा असतो. परंतु रेल्वेने मंजूर केलेल्या मर्यादेपर्यंतच पदांची निर्मिती झाली याची खात्री करण्यासाठी शासनाने कोणतीही यंत्रणा राबविली नव्हती.

अतिरिक्त पोलीस महासंचालक (लोहमार्ग) यांच्या कार्यालयातील दस्तऐवजांची पाहणी करताना असे आढळून आले की, सन २००२-०३ ते २००६-०७ मधील कालावधीत रेल्वेने मंजूर केलेल्या शासकीय लोहमार्ग पोलीसांच्या ५६१६ पदाकरीता राज्यशासनाने ६०६३ पदांची निर्मिती केली. अशा प्रकारे ४४७ पदांची रेल्वेच्या मंजूरीशिवाय निर्मिती झाली.

संचालक (राखीव पोलीस दल) रेल्वे महामंडळ, भारत सरकार, रेल्वे मंत्रालयाने (डिसेंबर २००४) अतिरिक्त पदांसाठी कार्योत्तर मंजूरी देण्यास नकार दिला. राज्य सरकारने वर्ष २००२-०३ ते २००६-०७ दरम्यान ४४७ पदांसाठी केलेल्या रुपये २४.९६ कोटी खर्चापैकी रुपये १२.४८ कोटी खर्चाची प्रतिपूर्ती रेल्वेकडून होणे आवश्यक होते. विहित पध्दतीनुसार विभागास रेल्वेच्या अनुमतीने पदांची निर्मिती करण्यास अपयश आल्याकारणाने रेल्वेसाठी तैनात केलेल्या पोलीसांच्या खर्चाचा रुपये १२.४८ कोटीचा हिस्सा प्राप्त झाला नाही.

ज्ञापन :-

सुरक्षिततेच्या व निकडीच्या दृष्टीकोनातून रेल्वे पोलीसांची नवीन पदे निर्माण करुन राज्य शासनाकडून तातडीने भरण्यात येतात. त्यानंतर संबंधित घटक प्रमुखांमार्फत प्रस्ताव पोलीस महासंचालक व शासनाकडून रेल्वे बोर्डाकडे गेल्यावर पदांना रेल्वे मान्यता देते. त्यानुसार या परिच्छेदात नमूद केलेल्या ४४७ पदांपैकी ३७८ पदांना रेल्वे प्रशासनाने मान्यता दिली आहे. उर्वरित पदांना रेल्वे प्रशासनाकडून मान्यता मिळविण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

रेल्वेकडे प्रलंबित असलेली एकूण रक्कम रुपये ६७.५० कोटी बाबतचे लेखाप्रमाणपत्र महालेखाकार (लेखापाल) मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाले आहे. त्यामुळे हा मुद्दा निर्लेखित करण्याची विनंती अप्पर पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाच्या दिनांक ११/०५/२०१२ पत्रान्वये करण्यात आली आहे.

थकीत प्रलंबित वसुली

अतिरिक्त पोलीस महासंचालकांनी (लोहमार्ग) शासकीय लोहमार्ग पोलीस तैनातीच्या प्रलंबित वसुलीसाठी एकूण रु. १५९.५७ कोटीची मागणी केली होती. त्यापैकी रु. १०१.६७ कोटी वर्ष २००२-०३ (१९७९-८० पासून नंतरच्या) पूर्वीच्या काळातील होते. फाईलीची छाननी करतांना असे आढळले की, देय रकमेच्या वसुलीचा पाठपुरावा करण्यासाठी योग्य ती कार्यवाही केली नव्हती.

पाच पोलीस आयुक्त आणि तीन पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयात १९८३ आणि २००७ दरम्यान विविध कालखंडात २८ संस्थांकडून तैनात पोलीसांच्या खर्चाची एकूण रु. ९.४६ कोटी वसुली प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले.

पोलीस आयुक्त, ठाणे कार्यालयात नोव्हेंबर १९९० ते मार्च २००२ मधील महानगरपालिकांकडील तैनात पोलीसांच्या खर्चाची रु. ८.५१ कोटीची वसुली प्रलंबित होती.

पोलीस महासंचालकांच्या कार्यालयातून पाच राज्यात राज्य राखीव पोलीस दलाच्या तैनात केलेल्या पोलीसांच्या खर्चाची रु. ९१.०७ लाख वसुली प्रलंबित होती. ही वसुली मार्च १९८७ आणि मे २००१ दरम्यानच्या विविध कालखंडातील होती. प्रलंबित राशींचे विश्लेषण करता असे आढळले की, ही वसुली येणे असलेल्या राज्यांना मागणीपत्रे पाठविण्यात ४ ते १७ वर्षाचा असाधारण विलंब झाला होता. कोणत्याही प्रकरणांत एप्रिल २००८ पर्यंत वसुली प्रभावित झाली नव्हती.

वसुली सनियंत्रित करण्याच्या पध्दतीचा अभाव असल्याने व विभागात प्रभावशाली अनुवर्ती कार्यवाही न झाल्याने मोठ्या प्रमाणात वसुली शिल्लक तर राहिलीच, शिवाय त्यामुळे बराच काळ व्यतीत झाल्याने वसुली न होण्याची शक्यता निर्माण झाली.

ज्ञापन :-

महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-३ मधील नियम ४८४ प्रमाणे खाजगी व्यक्ती, स्वायत्त संस्था यांच्याकडून पोलीस संरक्षण शुल्क वसुल करण्यात येते. सदर नियमावलीतील पृष्ठ क्र. ३५९ वर पोलीस संरक्षण देण्यासंदर्भातील अर्जाचा नमुना देण्यात आलेला आहे. सदर नियमावलीत उशिरा प्रदान करण्यात येणाऱ्या संरक्षण शुल्काच्या प्रलंबित रकमेवर ९.५ टक्के दराने व्याज आकारण्याची तरतूद आहे. सदरच्या तरतुदी महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३५/२८०१/एसीएम/८४/०८, अन्वये सर्व पोलीस घटक प्रमुखांना पुन्हा निदर्शनास आणून देण्यात आलेल्या असून त्यांना सदर नियमाप्रमाणे प्रलंबित संरक्षण शुल्कावर व्याजाची आकारणी करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. महासंचालक कार्यालयाने खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्था यांचेकडील संरक्षण शुल्काचे वसुलीप्रकरणी विवरणपत्र विहित केलेले असून त्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या माहितीचा आढावा घेवून वसुली प्रकरणी संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात येतात. तसेच सदरची माहिती संकलित करुन शासनासही सादर करण्यात येते.

अ) लोहमार्ग पोलीस तैनातीच्या प्रलंबित वसुलीसाठी रेल्वे प्रशासनाची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांच्याकडे गांभीर्याने पाठपुरावा करुन प्रलंबित रक्कम अतिशीघ्रतेने वसुल करुन घेण्याबाबत

अप्पर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना महासंचालक कार्यालयामार्फत वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

पोलीस संरक्षण शुल्क वसुलीबाबत त्याचप्रमाणे ज्या व्यक्ती व संस्था थकबाकी देण्याचे टाळतात त्यांचेवर मुंबई पोलीस कायदा, १९५१ प्रमाणे कार्यवाही करुन थकबाकी वसुली करणेबाबत सर्व संबंधितांना महासंचालक कार्यालयाकडुन वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच संरक्षण शुल्क प्रलंबित असलेल्या घटकांना सदर कायद्याप्रमाणे कार्यवाही करुन ज्या स्वायत्त/खाजगी व्यक्ती यांनी संरक्षण शुल्क अदा केलेले नाही. अशा प्रकरणांची सविस्तर माहिती शासनास सादर करण्याबाबत महासंचालक कार्यालयाचे ज्ञापनान्वये संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

महानगरपालिका, नगरपालिकांकडील प्रलंबित शुल्क प्रकरणी समायोजन करणेसाठी प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविण्याबाबतही परिपत्रक अन्वये सर्व संबंधितांना सूचीत करण्यात आले आहे. तसेच महानगरपालिका, नगरपालिका यांना संरक्षणासाठी शासनाने मंजूर केलेल्या पदांच्या खर्चाची वसुली करताना संबंधित शासन निर्णयात दिलेल्या सूचनेप्रमाणे अत्यंत काटेकोरपणे पालन करुन या संस्थांकडे संरक्षण शुल्क प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्याबाबतही कळविण्यात आलेले आहे.

अधिसूचनेप्रमाणे संशोधित दर लागू करण्यास विलंब झाल्याने कमी वसुली

१५ ऑगस्ट, २००६ ते ५ डिसेंबर २००६ च्या कालावधीत सात पोलीस आयुक्त व तीन पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयातील दस्तऐवज पडताळून पाहिले असता, १८,३२८ ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी गुन्हा केला असता रु. १०० ऐवजी पूर्वीच्याच रु. ५० दराने दंड आकारण्यात आला असल्याचे आढळून आले. प्रभावी तारखेपासून अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात विभागाला अपयश आल्याकारणाने रु. ९.१६ लाख महसूल कमी वसुल झाला.

सरकाने ही त्रुटी मान्य केली (सप्टेंबर २००८) आणि यापुढे वेळेवर अनुपालन करण्यासाठी अधिसूचना आगाऊ पारीत करण्यात येतील असे नमुद केले आहे.

ज्ञापन :-

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १७७ अंतर्गत गुन्ह्यासाठी ऑटोरिक्षा आणि टॅक्सीकरीता रु. ५०/- आणि अन्य सर्व वाहनांसाठी रु. १००/- दराने तडजोड शुल्क

आकारण्यात येत होते. शासन अधिसूचना दि. ९.८.२००६ अन्वये कलम १७७ अंतर्गत गुन्ह्यासाठी सर्व प्रकारच्या वाहनांना रु. १००/- शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १५.८.२००६ पासून करावयाची होती. तथापि, बृहन्मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नवी मुंबई, पुणे, सोलापूर आणि ठाणे ही सात पोलीस आयुक्तालये आणि चंद्रपूर, जळगांव आणि सातारा या तीन पोलीस अधीक्षक कार्यालयाने वरील निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ५.१२.२००६ पर्यंत केली नाही. त्यामुळे शासनास रु. ९.१६ लक्ष महसूल कमी मिळाला आहे, हे खरे आहे.

ऑगस्ट, २००६ नंतर कलम १७७ अंतर्गत गुन्ह्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शंभर रुपये तडजोड शुल्काच्या रकमेत आतापर्यंत वाढ करण्यात आलेली नाही. सदर घटना टाळण्यासाठी तडजोड शुल्काच्या रकमेत वाढ करण्यासंबंधीची अधिसूचना आगाऊ पारीत करण्यात येईल. तसेच, सदरहू अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्याबरोबरच शासनाच्या वेबसाईटवर व प्रसारमाध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल.

साक्ष:

समितीने दिनांक ३१.१०.२०१२ रोजी "पोलीस जमा" या परिच्छेदासंदर्भात प्रधान सचिव, गृह व संबंधित वरीष्ठ पोलीस अधिकारी यांची साक्ष घेतली. "तैनात केलेल्या पोलीसांच्या खर्चाची कमी वसुली" या महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता सह पोलीस आयुक्त, मुंबई यांनी असे स्पष्ट केले की, सन २००२-२००३ आणि २००६-२००७ मधील विविध कालावधीमधील एकूण ४० प्रकरणात महागाई भत्ता, रजेचे वेतन, निवृत्ती अंशदान या संदर्भातील एकूण रक्कम ३.२३ कोटी रुपये होती. त्यापैकी १.८९ कोटी रुपये एवढी रक्कम मुंबईशी संबंधित होती. त्यापैकी १.६१ कोटी रुपये इतकी वसुली केलेली आहे. २६ लाख ८७ हजार रुपये बाकी आहे. एकूण वसुली ८५.५० टक्के झालेली आहे. परिच्छेद क्रमांक ७.२.८ मध्ये मुंबई पोलीस अधिनियमातील तरतुदी आणि महाराष्ट्र पोलीस नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक ४८४ प्रमाणे खाजगी व्यक्ती आणि संस्थांना पुरविलेल्या पोलीस संरक्षणासाठी पोलीस खर्चाची रक्कम वसूल करण्याबाबतचा मुद्दा आहे. खाजगी व्यक्ती/संस्था यांनी पोलीस संरक्षणासाठी मागणी केल्यास शुल्क आकारुन त्यांना पोलीस संरक्षण पुरविण्यात येते. ३१ संरक्षित व्यक्तींकडून ३१ लाख २३ हजार रुपये इतकी

रक्कम वसूल केलेली असून १२ संरक्षित व्यक्तींकडून २३ लाख ६५ हजार रुपये एवढी रक्कम वसूल व्हावयाची आहे. या रकमेच्या वसुलीबाबत जिल्हाधिकारी आणि शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे. यामध्ये आमची एकूण वसुली ५६.८९ टक्के झालेली आहे. प्रलंबित वसुलीबाबत कार्यवाही सुरु आहे. सह पोलीस आयुक्त, (प्रशासन) मुंबई यांच्याकडून मागणी केली जाते पण वेळेवर वसुली होत नाही. त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. पैसे लवकर भरण्याबाबत विनंतीपत्र देण्यात येईल त्याचबरोबर शासनाला आणि जिल्हाधिकाऱ्यांना देखील कळविले जाईल.

समितीने सुरक्षा पुरविलेल्या खाजगी लोकांनी पैसे न देण्याचे कारण काय आहे अशी विचारणा केली असता सह पोलीस आयुक्त यांनी खाजगी लोकांनी पैसे न देण्याचे कारण नाही. काही लोकांकडून लवकर पैसे येत नाहीत. परंतु यामध्ये ५६ टक्के वसुली झालेली असून ही वसुली समाधानकारक आहे. याचा विचार समितीकडून व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

समितीने कोणत्या खाजगी व्यक्तींकडील वसुली प्रलंबित आहे असे विचारले असता सहपोलीस आयुक्त (प्रशासन) मुंबई यांनी ज्या खाजगी व्यक्तींकडे वसुली बाकी आहे त्यामध्ये राजीव पाठक यांच्याकडे १,०१,२२० रुपये, तरणजितसिंग सहानी यांच्याकडे ३९,०५० रुपये जगदिपसिंग यांच्याकडे ६३,२७५ रुपये, अजय गोन्सालिया यांच्याकडे १,७८,६४० रुपये, शहनाझ दरवेश यांच्याकडे २,५६,७९० रुपये, मुकुंद पाठक यांच्याकडे १०,२१८ रुपये, विकास ड्रेसवाला यांच्याकडे १,८०,६१४ रुपये, प्रकाशचंद्र सेनगर यांच्याकडे १,४९,१८४ रुपये, मोहम्मद फरीद शेख यांच्याकडे २,४८,६९८ रुपये, कलिमुद्दीन शरीफ यांच्याकडे ४,२५,८९२ रुपये, सन्ना दयाकर रेड्डी यांच्याकडे १,३९,४७६ रुपये, माजीद मेनन यांच्याकडे ५,७२,७९५ रुपये अशा प्रकारे १२ व्यक्तींकडून एकूण २३,६५,८५२ रुपये वसुली बाकी आहे अशी माहिती दिली.

समितीने ज्या व्यक्तींकडे वसुली प्रलंबित आहे त्यांच्या बाबतीत काय कारवाई करता येईल, त्यांच्यावर व्याज आकारणी करणार का, त्यांच्याकडे थकबाकी असताना त्यांचे संरक्षण चालू असेल तर ते परत घेणार का याअनुषंगाने समितीने राहिलेली वसुली सहा महिन्यामध्ये वसुली करावी व त्याबाबतची माहिती समितीला सादर करावी असे सूचित केले असता सह

पोलीस आयुक्त यांनी त्यासंदर्भात समितीस आश्वासित केले. तथापि अद्यापपावेतो केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस अप्राप्त आहे.

समितीने तीन महिन्याचा संपूर्ण खर्च महानगरपालिकांकडून आगावू वसूल करण्याबाबत शासनाने आदेश दिलेले असतानाही महानगरपालिकांनी पैसे भरलेले नाहीत यासंदर्भात विचारणा केली असता सह पोलीस आयुक्त (प्रशासन) मुंबई यांनी महानगरपालिकांच्या बाबतीत खर्चमेळ करुन घेण्यात येईल. परिच्छेद क्रमांक ७.२.८.३ बँकांकडील वसुलीच्या संदर्भात आहे. पाच पोलीस आयुक्त कार्यालयांच्या अभिलेख्यांची छाननी केली असता असे आढळले की, १९९८ ते २००७ मधील विविध कालावधीत १४ बँकांकडून तैनात केलेल्या पोलिसांच्या खर्चाची रु. २.४२ कोटी वसुली प्रलंबित असल्याचे नमूद केले.

याअनुषंगाने समितीने या बँकांची तसेच खाजगी व्यक्तींची यादी द्यावी व तीन महिन्याच्या आत वसुली करावी असे निदेश दिले.

यानुषंगाने सह पोलीस आयुक्त, (प्रशासन) मुंबई यांनी समितीस आश्वासित केले व अधिक माहिती देताना या बँका पाच आयुक्त कार्यालयांच्या क्षेत्रातील आहेत. पाच आयुक्तालयाची वसुली २.४२ कोटी रुपये असून त्यापैकी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडियाची वसुली १७,१९,१७३ रुपये असून त्यापैकी १२,५२,८५२ रुपये वसुली करण्यात आलेली आहे ही वसुली ७२.२८ टक्के आहे. स्टेट बँकेचे ४ लाख ८० हजार रुपये बाकी असल्याचे विदीत केले.

समितीने खाजगी व्यक्ती, बँका, महानगरपालिका यांना आपण सुरक्षा पुरविण्या संदर्भात एखादा वेगळा सेल निर्माण केला आहे का अशी विचारणा केली असता सह पोलीस आयुक्त (प्रशासन) मुंबई यांनी यासंदर्भात डेडीकेटेड सेल निर्माण करण्यात येईल असे नमूद करुन याबाबतीत व्यवस्थित कागदोपत्री रेकॉर्ड ठेवला जातो. दिलेल्या बंदोबस्ताची सर्व माहिती ठेवली जाते आणि त्याप्रमाणे हिशेब करुन या महिन्याला एवढा बंदोबस्त पुरविलेला आहे व त्याची एवढी रक्कम झालेली आहे, हे कळविले जाते असे स्पष्ट केले.

केंद्र शासनासाठी सुरक्षा पुरविली आणि पैसे आले नाही तर काय करता अशी समितीने विचारणा केली असता सह पोलीस आयुक्त यांनी आपण सुध्दा केंद्रीय राखीव दल बोलवितो तेव्हा ते सुध्दा शुल्क आकारतात. यामध्ये पुस्तकी समायोजन होते अशी माहिती दिली.

खाजगी व्यक्ती, महानगरपालिका, बँका यांचेकडून पोलीसांचा खर्च वसुल न झाल्यासंदर्भात उप महालेखाकार, मुंबई यांनी त्यांचे मत व्यक्त करतांना समितीला सांगितले की, "The non-observance of the prescribed procedure to recover the cost of police in advance from individuals and Municipal Corporation and absence of a system for recovery of cost of police from banks in advance, resulted in non-recovery of Rs. 27.49 Crore. The department have not followed the procedure for recovery in advance from individuals and Municipal Corporation. In respect of Banks, there is no system for recovery in advance. Therefore, we recommend to the Government to formulate a system for recovery in advance from banks."

ही प्रकरणे महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने (सप्टेंबर,२००८) असे नमूद केले की, संबंधित प्राधिकाऱ्यांना रकमा वसूल करण्याच्या आणि पोलीस खर्चाची रक्कम आगाऊ वसूल करण्यासंबंधातील अधिनियमातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. २००८ मध्ये सूचना दिल्यानंतर आतापर्यंत फक्त ३ कोटी रुपये वसूल केलेले आहेत. यामध्ये कार्यक्षमतेबद्दलचा प्रश्न निर्माण होतो असे मत समितीने व्यक्त केले.

खाजगी व्यक्ती, बँका यांच्याकडील वसुली जास्त आहे. वसुली १०-१० वर्षे प्रलंबित राहणे योग्य नाही. या बाबतीत १५ दिवसात आढावा घेऊन या संदर्भात काय कार्यवाही होणार आहे हे समितीला कळविण्याचे निदेश दिले. तथापि यासंदर्भातील माहिती समितीला अद्याप प्राप्त झाली नाही. १० वर्षे म्हणजे खूप कालावधी आहे. काही लोक सेवानिवृत्त झालेले असतात. नंतरच्या लोकांना संदर्भ माहीत नसतो. पत्रव्यवहारामध्ये वेळ जातो. कोणी न्यायालयात गेले तर तोही प्रश्न निर्माण होतो असे मत समितीने व्यक्त केले.

समितीने जर वसुली प्रलंबित असेल तर आता त्यावर व्याज लावण्यात येणार आहे काय तसेच याबाबतीत बँकांना, खाजगी लोकांना व्याज का लावले जात नाही अशी विचारणा केली असता प्रधान सचिव (गृह) यांनी बँकांना, खाजगी लोकांना व्याज लावले जाते. याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात घेत असल्याची माहिती समितीस दिली.

समितीने "महानगरपालिका, नगरपालिका यांना गार्ड पुरविताना त्यांच्याकडून आगाऊ खर्च वसूल करण्यात येऊ नये असे महाराष्ट्र पोलीस नियमावली खंड-३, नियम ४८४ मध्ये

तरतूद आहे काय व असल्यास तो नियम बदलण्यासंदर्भात विचारणा केली असता प्रधान सचिव (गृह) यांनी याबाबतीत नगरविकास विभागाबरोबर चर्चा करुन आपआपसात योग्य निर्णय घेऊन वसुली करण्याचा प्रयत्न केले जाईल असे समितीस सूचित केले.

अप्पर पोलीस महासंचालक (रेल्वे) यांनी परिच्छेद क्र. ७.२.९ बाबत नमूद केले की, रेल्वे बोर्डाचे पोलीस आणि महाराष्ट्र राज्याचे पोलीस अशी योजना असून ५० टक्के वेतन केंद्र शासनाकडून आणि ५० टक्के राज्य शासनाकडून उपलब्ध होतात. याठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे सरकारने २००२-२००३ ते २००६-२००७ दरम्यान ४४७ पदांसाठी केलेल्या रुपये २४.९६ कोटीपैकी १२.४८ कोटी रुपये प्राप्त झाले नाहीत. याबाबत पाठपुरावा केल्यानंतर २५ तारखेला मुख्य सुरक्षा आयुक्त यांनी ते मंजूर केले असून आता ते वितरित होतील अशी माहिती दिली.

त्यानुषंगाने समितीने सन २००२-०३ ते २००६-०७ या कालावधीत रेल्वेने मंजूर केलेल्या शासकीय लोहमार्ग पोलिसांच्या ५६१६ पदांकरता राज्य शासनाने ६०६३ पदांची निर्मिती केली. अशा प्रकारे ४४७ पदांची रेल्वेच्या मंजूरीशिवाय निर्मिती करण्यात आली आणि ही पदे कोणत्या मान्यतेने भरण्यात आली, तसेच यासाठी काही भरती प्रक्रिया अंमलात आणली होती काय अशी विचारणा केली असता यासंदर्भात अप्पर पोलीस महासंचालक (रेल्वे) यांनी ४४७ पदांपैकी ३७८ पदांना रेल्वे प्रशासनाने मान्यता दिली होती. परंतु सदरहू पदांच्या मान्यतेची प्रत कार्यालयात उपलब्ध होऊ शकली नाही. आता फक्त ६९ पदांच्या मंजुरीबाबत प्रश्न निर्माण झालेला आहे असे स्पष्टीकरण दिले.

समितीने शासनाच्या अधिसूचनेनूसार मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १७७ अंतर्गत गुन्ह्याला ५० रु. ऐवजी १०० रु. असा संशोधीत दंड लागू केला असतांना पूर्वीच्याच ५० रु. इतक्या दराने दंड का वसुल करण्यात आला अशी विचारणा केली असता विशेष पोलीस महासंचालक यांनी यामध्ये दंडाची रक्कम ५० रुपयांवरुन वाढवून १०० रुपये करण्यात आली होती. परंतु सदरहू दंडाची रक्कम वाढीबाबतची अधिसूचना संबंधित विभागाला उशिराने मिळाल्यामुळे दंड वसूलीच्या रकमेत तफावत झाली आहे. तसेच सध्या ५० आणि १०० रुपये दंड आकारण्यात येतो. ती रक्कम वाढविण्याबाबत समितीने शिफारस करावी, अशी समितीस

विनंती केली असता समितीने दंड वाढवून देण्याबाबतची टिप्पणी समितीला सादर करावी, समिती शासनाकडे या अनुषंगाने निश्चितपणे शिफारस करेल असे अभिप्राय व्यक्त केले.

याच विषयाच्या अनुषंगाने समितीने दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ रोजी पोलिस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई येथे भेट दिली व या बैठकीस मुंबई, पुणे, ठाणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती आणि नागपूर येथील पोलीस आयुक्त देखिल उपस्थित होते.

या बैठकीमध्ये समितीने गृह विभागासंदर्भात पूर्वीच्या अहवालांमध्ये केलेल्या एकूण १२ शिफारशींसंदर्भात का कार्यवाही करण्यात आली नाही, अन्य राज्य सरकार, केंद्र सरकार यांच्याकडून पोलीस तैनातीच्या खर्चाची वसुली न करणे, खाजगी बँका, महानगरपालिकांना संरक्षण पुरविल्यासंदर्भात खर्च वसुल न होणे यासंदर्भात महानगरपालिकांना स्वतःचा फोर्स स्थापन करण्यासंदर्भात कार्यवाही करणे, पोलीस खात्याचे आधुनिकीकरण, यासंदर्भात साधक बाधक चर्चा केली.

समितीने मुंबई, पुणे, ठाणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, सोलापूर आणि नागपूर येथील पोलीस आयुक्तांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या खाजगी संस्था/व्यक्ती यांना पुरविण्यात आलेल्या बंदोबस्तांच्या मोबदल्यात येणे असलेल्या रकमेच्या संदर्भात माहिती विचारली.

पोलीस आयुक्त ठाणे, यांनी अशी माहिती दिली की, सन २००२-२००३ पासून सन २००७ पर्यंत ठाणे जिल्हयातील सर्व महापालिकांकडून ४ कोटी ३६ लाख रुपये वसूल करावयाचे होते. त्यापैकी ४ कोटी ५ लाख रुपये वसूल करण्यात आले असून आता फक्त ३१ लाख रुपये प्रलंबित आहेत. प्रलंबित रक्कम वसूल करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. बँकांकडून १,२२,३७४ रुपये वसूल करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्त, पुणे यांनी माहिती देताना पुणे महानगरपालिकेने सर्व पैसे भरले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे ५,८९,३९१ रुपये प्रलंबित होते, त्यापैकी ४,२९,४५३ रुपये वसूल करण्यात आले आहेत. प्रलंबित रक्कम भरण्यास महानगरपालिका तयार आहे. यासंदर्भात शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे. सदर दुरुस्ती झाल्यानुसार फरकाची रक्कम देण्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका तयार आहे.

समितीने पुणे येथील कोणत्या बँकेकडून वसुली बाकी आहे अशी विचारणा केली असता पोलीस आयुक्त, पुणे यांनी पुणे येथील महानगरपालिकेकडील पैसा वसूल झाला असून तीन बँकाकडून पैसा वसूल करावयाचा आहे. यामध्ये बँकाकडून ३३,९६,४३५ रुपये वसूल करावयाचे आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडे ५,१०,०८२ रुपये वसूल करावयचे आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया करन्सी चेष्ट शाखा यांचेकडून संरक्षणापोटी ७,८२,०६५ रुपये वसूल करावयाचे आहेत. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र यांच्याकडून २१,१३,२८७ रुपये वसूल करावयाचे आहेत. या बँकाकडे वसूलीबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. सदर पैसा वसूल करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे. अशी माहिती दिली. तसेच संरक्षणापोटी येणारा पैसा प्रलंबित असेल तर संरक्षण थांबविण्याचे अधिकार विभागाला देण्यात यावे. संरक्षण देणे थांबविले तर थकित पैसा येण्यास सुरुवात होते असे मत व्यक्त केले.

यासंदर्भात समितीने बँकेकडे थकबाकी असेल तर त्यांचे संरक्षण बंद करण्यास अडचण येईल. परंतु खाजगी व्यक्ती व संस्था यांच्याकडे थकबाकी असेल तर त्यांचे संरक्षण ताबडतोब बंद करता येईल असे मत व्यक्त केले असता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र यांनी खाजगी संस्था व व्यक्ती यांच्याकडे थकबाकी असेल तर त्यांना देण्यात येणारे संरक्षण बंद करण्यात आले असल्याचे स्पष्ट केले.

समितीने विविध महानगरपालिकांना पुरविलेल्या सुरक्षेसंदर्भात व वसुल न झालेल्या खर्चासंदर्भात विचारणा केली असता विभागीय पोलीस आयुक्तांनी खालील माहिती दिली.

पोलीस आयुक्त नागपूर, यांनी सन २००२-०३ ते २००६-०७ या कालावधीतील वसुली सन २००९-१० करण्यात आली आहे. रूपये १.६९ कोटी शुल्क वसूल करण्यात आलेले आहे. आता फक्त चालू वर्षाची थकबाकी महानगरपालिकेकडून वसूल करणे बाकी आहे अशी माहिती दिली.

समितीने संबंधित महानगरपालिकेकडून व्याज वसूल केले आहे काय असे विचारले असता रूपये ७४.०० लाख इतक्या व्याजाची मागणी केली आहे. त्याबाबत पत्र व्यवहार सुरू आहे. तथापि, यामध्ये वाद आहे. त्यांनी व्याज मान्य केलेले नाही अशी माहिती पोलीस आयुक्त नागपूर यांनी दिली.

पोलीस आयुक्त नाशिक यांनी सर्व रक्कम वसूल केली असून १०० टक्के सेटलमेंट झालेले आहे अशी माहिती दिली.

पोलीस आयुक्त अमरावती यांनी आयुक्तालयांतर्गत रूपये ५,७१,५४२ वसुली होती. त्यापैकी रूपये ५,५४,०६०.०० इतकी रक्कम वसूल झालेली आहे. रूपये १७,४८३ इतकी रक्कम वसूल करण्याचे राहिलेले आहे. सदर रक्कम निर्लेखित केलेली आहे अशी माहिती दिली.

पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी हॉटेल अनुज्ञप्ती शुल्क पाच हजार इतके आकारले होते. फाईव्ह स्टार हॉटेलच्या परमिटसाठी देखील एवढेच शुल्क होते. त्यांच्यासाठी वेगळे शुल्क आकारावे असा मुद्दा होता. त्याप्रमाणे रूपये १,२६,०००/- इतकी रक्कम येते. ती वसूल केलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेकडे रूपये १.९३ कोटी बाकी होते. ते आता वसूल झाले आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेला अतिक्रमण हटविण्यासाठी संरक्षण पुरविण्यात आले होते. त्यापैकी रूपये ९,६९,४६० एवढी रक्कम येणे बाकी होती. त्याची वसुली करीत आहोत अशी माहिती दिली.

पोलीस आयुक्त मुंबई यांनी १, ६४, ८५, ५४९ रूपयांची वसुली करण्यात आलेली आहे, तर ७५, ९३,४८७ इतक्या रकमेची वसुली बाकी आहे. परिच्छेद ७.२.८.३ प्रमाणे पाच पोलीस आयुक्त कार्यालयांच्या खर्चाची रूपये २.४२ कोटी वसुली प्रलंबित होती. मुंबई पोलीस आयुक्तालयाला SBI कडून रूपये १७,३३,१९३ एवढी रककम संरक्षणापोटी येणे होती. रूपये १२,५२,८८२ इतकी रक्कम वसूल केली आहे. उर्वरित रूपये ४,८०,३११ रक्कम हा कॅलक्युलेशनमधील फरक आहे. त्यामुळे आता SBI कडून कोणतीही रक्कम येणे नाही अशी माहिती दिली.

समितीने पोलीस विभागाच्या आधुनिकीकरणाबाबतचा मुद्दा उपस्थित केला असता पोलीस महासंचालक महाराष्ट्र यांनी समितीस माहिती देतांना सांगितले की, संगणकीकरण करतांना हार्डडिस्क ने-आण करावी लागते. इन्व्हेस्टिगेशनवर खर्च करण्यासाठी तरतूद नाही. त्यासाठी तरतूद करावी अशी मागणी शासनाकडे केली आहे. याच सभागृहात माननीय मुख्यमंत्री व तत्कालीन उपमुख्यमंत्री आले होते तेव्हा इन्व्हेस्टिगेशन फंड निर्माण करावा, अशी मागणी केली होती. यासाठी किमान २५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. इन्व्हेस्टिगेशन

फंडाचा समावेश बजेटमध्ये करावा. कारण इन्व्हेस्टिगेशन करण्यासाठी सतत पैसा खर्च करावा लागतो.

पोलिसांना दरवर्षी गणवेश मिळत नाही. स्वतःच्या पैशातून गणवेश खरेदी करावा लागतो. अमुक अमुक ठिकाणावरुन गणवेशाचे कापड खरेदी करावे असे बंधन घालण्यात आले आहे. गणवेशाचे कापड घेऊन पोलीस कर्मचारी स्वतः गणवेश शिवून घेतात. वर्षातून एक तरी गणवेश मिळाला पाहिजे असे अभिप्राय नोंदविले.

तसेच पोलिसांचे वाहन निर्लेखित करण्याच्या मुद्यासंदर्भात पोलिसांची जेवढी वाहने ठराविक वर्षानंतर निर्लेखित केली जातात तेवढी वाहने त्यांना खरेदी करण्याची परवानगी मिळाली पाहिजे. हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. पोलिसांच्या घरासाठी ११ हजार कोटी रुपयांची गरज आहे. परंतु दरवर्षी १०० ते १५० कोटी रुपये या कामासाठी मिळतात. अशा प्रकारे जर निधी मिळाला तर सर्व पोलिसांना घरे मिळण्यासाठी ५५ ते ६० वर्षे लागतील. पोलिसांच्या घरांचा प्रश्न अत्यंत बिकट झालेला आहे. यावर आवश्यक ती कार्यवाही करण्याची गरज आहे. पोलिसांचे अनेक प्रश्न आहेत.

समितीने महिला पोलीसांच्या प्रश्नाबाबत विचारणा केली असता, पोलीस विभागात महिलांसाठी ३० टक्के आरक्षण आहे. आता पोलीस विभागात महिलांचे प्रमाण १६ टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. महिलांसाठी चेजिंग रुम, टॉयलेट अनेक पोलीस स्टेशनमध्ये नाही. निम्म्यापेक्षा जास्त पोलीस स्टेशनमध्ये या सुविधा नाहीत. पुरुष पोलिसांना देखील चेजिंग रुम व टॉयलेटची व्यवस्था नाही. माहिती गोळा करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पोलीस स्टेशनला या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जागा आहे किंवा नाही याची माहिती गोळा करण्यात येत आहे. त्यानंतर यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती पोलीस महासंचालकांनी दिली.

पोलीस महासंचालकांनी मुंबईतील पोलिसांच्या वसाहती संदर्भात माहिती देतांना पोलिसांसाठी नवीन गृहनिर्माण वसाहती बांधण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले असून मुंबईतील घाटकोपर येथे पोलीस वसाहतीचे काम सुरू आहे. तसेच, वरळी, माहीम, सांताक्रूझ, कालिना येथे नवीन गृहनिर्माण वसाहत बांधण्याचे काम पोलीस गृहनिर्माण विभागाने प्रस्तावित केले आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून हे काम आता हाती

घेण्यात येणार आहे. पोलीस वसाहत दुरूस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. दुरूस्तीच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे पाहिजे तेवढ्या इमारती वेळेवर दुरुस्त होत नाही ही वस्तुस्थिती आहे असे समितीच्या निदर्शनास आणले.

पोलीस महासंचालकांनी पोलीस विभागासंदर्भात समितीसमोर मांडलेल्या व्यथा दूर करण्यासंदर्भात समिती निश्चितच शासनास शिफारशी करेल असे मत समितीने व्यक्त करुन लोकलेखा समितीच्या संदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, ए.जी. कार्यालय यांनी समन्वय साधून सर्व कारभारात सुसूत्रता आणावी. त्याचप्रमाणे पोलीस खात्याचे लॅन्ड रेकॉर्ड व पोलीस खात्याची इस्टेट कोठे आहे, याचा शोध घेण्यात यावा. पोलीसांच्या जागा कोठे कोठे आहेत. पोलीसांचे सर्व रेकॉर्ड संगणीकृत करण्यात यावे. पोलिसांची भरती दरवर्षी करण्यात यावी. समितीच्या माहितीनुसार ४६८७ जागा रिक्त आहेत. सीआयडीकडे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत त्या भरण्यासंदर्भात कार्यवाही करावी. सीआयडीकडे प्रकरण दिल्यानंतर ८ ते १० वर्षात त्याचा निकाल लागत नाही. या कामासाठी कर्मचारी व इतर यंत्रणा नसतात. त्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. अनेक गुन्हे घडत आहेत. काही गुन्हयांची नोंद होते तर अनेक गुन्ह्यांची नोंद होत नाही. आरोप सिध्द करण्यासाठी चार्जशीट दाखल केली जात नाही. एटीएस संदर्भातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांचे अधिकार वाढविण्याची शिफारस समिती शासनाकडे करणार आहे असे स्पष्ट केले.

अभिप्राय व शिफारशी

निवडणुका, धार्मिक कार्यक्रम, दंगल इ.साठी इतर राज्ये, केंद्र सरकार यांचेकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस कुमकीची मागणी केली जाते. दिनांक १९ मे २०१३ रोजीच्या पोलीस महासंचालकाच्या परीपत्रकानुसार राज्य राखीव दलाच्या समादेशकांनी (Commandants) राज्य राखीव दलाचे पोलीस बाहेरील राज्यातून परत आल्यानंतर एक महिन्याच्या आत त्यांच्या खर्चाची विवरणपत्रे तयार करुन ती राज्य महालेखापरीक्षकाकडून प्रमाणित करुन घेण्यासंदर्भात तरतूद आहे. सदरहू तरतूदींचे पालन न झाल्याने व विहीत वेळेत वसुलीची मागणीच न केल्याने पोलीस तैनातीची रु. ४.९९ कोटी इतकी रक्कम विहीत वेळेत शासनास न मिळाल्याचे समितीचे अभिप्राय आहेत. **यानुषंगाने तैनात पोलीसांच्या खर्चाची**

विवरणे विहीत कालावधीत पूर्ण करुन निश्चित कालमर्यादेत संबंधित राज्य/केंद्र शासन यांचेकडे खर्चाची मागणी करण्यासंदर्भात पोलीस समादेशकांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व यासंदर्भातील दिनांक १९ मे २०१३ रोजीच्या पोलीस महासंचालकाच्या परिपत्रकाचे तंतोतंत पालन होण्यासंदर्भात शासन स्तरावरुन उचित कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र पोलीस नियमपुस्तिका खंड III पॅरा ४८४ (१) अनुसार पोलीसांच्या खर्चाच्या परीगणनेच्या अचुकतेची खात्री करण्यासाठी कोणतीही प्रणाली विहीत केली नसल्याने रु. ३.२३ कोटीची मागणीच करण्यात आली नाही. समितीसमोरील साक्षीदरम्यान सह पोलीस आयुक्त, (प्रशासन) मुंबई यांनी मुंबई विभागाशी, संबंधित रु. १.८९ कोटी रकमेपैकी १.६१ कोटी इतकी वसुली झाल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. मुंबई शिवाय इतर विभागाने यासंदर्भात काय कार्यवाही केली याची माहिती समितीसमोर दिली गेली नाही. **यासंबंधित विभागांनी याची गांभीर्याने दखल घेऊन विविध संस्थांकडून येणारी रक्कम वसुल करावी व त्याची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत द्यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच शासनाने पोलीसांच्या खर्चाची परिगणना अचूक व्हावी याकरीता कार्यप्रणाली निश्चित करण्यात यावी अशी ही समितीची शिफारस आहे.**

पोलीस नियमावली भाग-३ नियम ४८४ नुसार खाजगी व्यक्तींना संरक्षण पुरविण्यासंदर्भातील खर्च आगाऊ वसुल करण्याची तसेच मागितलेला अग्रिम प्राप्त न झाल्यास पोलीस संरक्षण न देण्यासंदर्भात तरतूद आहे. तसेच थकित वसुली करण्यासंदर्भात मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ४९ अन्वये तरतूद करण्यात आली आहे. समितीसमोरील साक्षीदरम्यान मुंबई विभागात व्यक्तींना संरक्षण पुरविल्यासंदर्भात वसुली ५६.८९ टक्के इतकीच होऊ शकल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली, इतर विभागातही यापेक्षा वेगळी परिस्थिती असेल असे समितीला वाटत नाही.

खाजगी व्यक्तींना संरक्षण पुरवितांना मुंबई पोलीस अधिनियमातील तसेच पोलीस नियमावलीत तरतूदींचे काटेकोर पालन कार्यालयाकडून होत नसल्याने (सन २००२-०३ व २००६-०७) या मधील कालावधीमध्ये रु. २.६० कोटी इतका महसूल शासनास वेळेत प्राप्त झाला नाही. पोलीस विभागाची मुख्य जबाबदारी, कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हाचा तपास

करणे इ. असतांना खाजगी व्यक्तींना संरक्षण पुरवितांना पोलीस विभागावर अतिरिक्त ताण पडतो व मुख्य जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडण्यामध्ये अडचण निर्माण होते. **काही अपवादात्मक परिस्थिती वगळता खाजगी व्यक्तींना संरक्षण पुरवितांना अग्रिम वसुल करण्यात यावे त्याशिवाय संरक्षण प्रदान करण्यात येऊ नये तसेच थकीत वसुली करण्याकरीता जमीनीचा महसूल वसुल करण्यासंदर्भातील जी प्रक्रिया अवलंबिण्यात येते तिचे अनुसरण करावे व खाजगी व्यक्तींना संरक्षण पुरवितांना अधिनियम / नियमातील तरतुदींचे काटेकोर पालन होण्यासंदर्भात शासन स्तरावरुन कार्यवाही व्हावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच खाजगी व्यक्तींना संरक्षण पुरविण्यासंदर्भात आजतागायत प्रलंबित असलेली वसुली करण्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीला सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

महानगरपालिका, नगरपालिका इ. स्वायत्त संस्थांना पोलीसांमार्फत सुरक्षा पुरविण्यात येते. समितीसमोरील साक्षीदरम्यान ठाणे विभागात ३१ लाख, औरंगाबाद विभागात ९,६०,४६०, मुंबई विभागात ७५,९३,४८७.०० इतकी रक्कम वसुली होणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. तसेच महाराष्ट्र पोलीस नियमावली खंड-३ नियम ४८४ मध्ये महानगरपालिकाकडून आगावू वसुली करण्यासंदर्भात तरतूद नसल्याचेही समितीच्या निदर्शनास आले. **महानगरपालिकांना /नगरपालिकांना स्वतःचा असा उत्पन्न स्त्रोत असतो त्यामुळे महानगरपालिका /नगरपालिका यांचेकडून पोलीसांकडे सुरक्षा व्यवस्थेची मागणी होत असल्यास त्यांचेकडून या कामी आवश्यक ते शुल्क आकारुन त्याची विहित कालमर्यादेत वसुली करण्यात यावी. समितीसमोर प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मोठ्या प्रमाणात वसुली प्रलंबित असल्याचे दिसून येत असल्याने भविष्यात वसुली संदर्भात अडचण येवू नये यादृष्टीने महानगरपालिका /नगरपालिकांकडून आगाऊ वसुली करण्यासंदर्भात महाराष्ट्र पोलीस नियमावलीत आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१९९८ ते २००७ या कालावधीत १४ बँकांना तैनात केलेल्या पोलीसांच्या खर्चाची रु. २.४२ कोटी वसुली प्रलंबित असल्याचे महालेखापालांनी अभिप्राय व्यक्त केले आहेत. समितीसमोरील साक्षीदरम्यान पोलीस सह आयुक्त, (प्रशासन) मुंबई यांनी ही बाब मान्य केली असून मुंबई पोलीस आयुक्तालयासंदर्भात स्टेट बँक ऑफ इंडियाची वसुली १७,१९,१७३ रु.

असून १२,५२,८५२ रु. वसुल केले असल्याचे व ४ लाख ८० हजार रु. वसुल व्हायचे बाकी आहे अशी माहिती दिली. यानुषंगाने समितीने ज्या बँकांकडे व खाजगी व्यक्तींकडे वसुली प्रलंबित आहे त्यांची यादी द्यावी व तीन महिन्याच्या आत वसुली करावी असे निदेश दिले असतांनाही समितीस माहिती प्राप्त झाली नाही, यावर समिती नाराजी व्यक्त करीत आहे. **ज्या बँकांकडे संरक्षण पुरविण्यासंदर्भातील खर्च प्रलंबित असेल त्यांच्याकडून तीन महिन्याच्या आत संपूर्णपणे वसुली करुन त्याची माहिती तात्काळ समितीस उपलब्ध करावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच यापुढील काळात बँकां तर सुरक्षा प्रदान करतांना येणाऱ्या खर्चाची आगाऊ वसुली करण्यात यावी व त्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता विशेष सेल निर्माण करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने सभागृहास सादर केलेल्या विविध अहवालांमध्ये गृह विभागासंदर्भात केलेल्या एकूण १२ शिफारशींची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात गृह विभाग गंभीर नसल्याचे निदर्शनास येत असून ही बाब अतिशय गंभीर आहे. समितीने केलेल्या व **प्रलंबित असलेल्या शिफरशींवर गृह विभागाने तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १७७ अन्वये, या अधिनियमाच्या किंवा त्याखालील नियमांचा विनियमांच्या किंवा अधिसूचनेच्या कोणत्याही तरतुदीचा भंग केला असेल व त्या अपराधासाठी कोणत्याही शिक्षेची तरतुद केलेली नसेल त्या अपराधाकरीता लावण्यात आलेला दंड ५० रु. ऐवजी १०० रु. करण्यात आला असतांनाही त्यासंदर्भातील अधिसूचना विभागाला उशिरा मिळाल्याने अनेक दिवस ५० रु. याप्रमाणेच दंड आकारला गेला व त्यामुळे शासनास तब्बल ९.१६ लाख महसूल कमी मिळाला ही बाब समितीच्या निदर्शनास आली.

गृह विभागाने ९ ऑगस्ट, २००६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेची माहिती संबंधित पोलीस विभागाला डिसेंबर, २००६ पर्यंत न होणे यास विभागाचा गलथानपणाच कारणीभूत असल्याचे समितीचे मत आहे. सर्व पोलिस ठाण्यांचे संगणकीकरण होत असल्याने मुख्यालयामधून निर्गमित होणारे आदेश/सूचना या संगणकाद्वारे राज्यातील सर्व पोलिस ठाण्यांपर्यंत पोहोचतील यादृष्टीने आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी **व त्या अधिसूचनेनुसार,**

आदेशानुसार कार्यवाही होते किंवा नाही याची नोंद शासनस्तरावरुन वेळोवेळी व्हावी यासंदर्भात समितीची शिफारस आहे. तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १७७ अन्वये या अधिनियमातील किंवा त्याखालील नियम, विनियम व अधिसूचनेच्या तरतूदींचा भंग केल्यास त्या अपराधावरील लावण्यात आलेल्या दंडाची रक्कम रु. ५०० इतकी करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

समितीसमोरील साक्षीदरम्यान पोलीस विभागाच्या आधूनिकीकरणाचा ज्यामध्ये संगणकीकरण सी.सी.टी.व्ही. इ. तसेच पोलीसांची महत्वाची कामे म्हणजे गुन्ह्याचा तपास पोलिसांचे गणवेश, महिला पोलीसांचे प्रश्न यासंदर्भात मुद्दे उपस्थित झाले असता यासंदर्भात तरतूदच नसल्याचे समितीच्या निदर्शनास तसेच हा खर्च भागविण्यासाठी जवळपास २५ कोटी इतक्या रकमेची आवश्यकता असल्याचे तसेच यासंदर्भात बजेट मध्येच तरतूद होणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. पोलीसांच्या गणवेशाचा मुद्दा उपस्थित झाले असता गणवेशाचे कापड एका विशिष्ट ठिकाणावरुनच खरेदी करण्याचे अवाजवी बंधन घातले गेल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांचा गणवेश स्वत:च विकत घ्यावा लागत असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना वर्षातून कमीतकमी एका गणवेशाची तरी तरतूद असणे आवश्यक आहे. महिला पोलिसांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित झाला असता पोलीस विभागात महिलांकरीता ३० टक्के आरक्षण असल्याचे व सध्या पोलीस विभागात महिलांचे प्रमाण १६ टक्के पर्यंत पोहचले असूनही महिलांसाठी चेंजिंग रुम, टॉयलेट इ. सुविधा अनेक पोलीस स्टेशनमध्ये नसल्याचे समितीच्या निदर्शनास या सर्व बाबींचा साकल्याने तसेच गांभीर्यपूर्वक विचार करता पोलीस विभागास फार मोठ्या प्रमाणात निधीची कमतरता असल्याचे तसेच वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशासकीय बाबींवर निधी खर्च करण्यासंदर्भातील अधिकार फार मर्यादीत असल्याचे समितीचे अभिप्राय आहे.

आजच्या विज्ञान, तंत्रज्ञानाच्या युगात पोलीस विभागाचे आधुनिकीकरण व्हावे ही काळाची गरज आहे. **पोलीसांचे अत्यंत महत्वाचे काम म्हणजे गुन्ह्याचा तपास यासाठी पोलीस दल सबळ व सक्षम करण्याकरीता आवश्यक निधीची तरतूद प्रत्येक वर्षाच्या बजेटमध्ये करण्यात यावी व यापूढे सदरहू खर्च भागविण्याकरीता पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक अशा वरीष्ठ अधिकाऱ्यांना प्रशासकीय बाबींकरीता असलेली खर्चाची मर्यादा वाढविण्यात यावी तसेच प्रत्येक**

पोलीसांना शासनातर्फे वर्षातून गणवेश मिळण्याकरीता लागणाऱ्या खर्चाचे अग्रिम वर्षाच्या सुरुवातीस देण्यास यावे अशी समितीची शिफारस आहे. महिला पोलीसांकरीता प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये चेंजिंग रुम, टॉयलेट इ. आवश्यक सुविधांसंदर्भात शासन स्तरावरुन निश्चित कालमर्यादेत कार्यवाही व्हावी अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील परिच्छेद क्र. ७.३ "हमी शुल्काची वसुली न करणे" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

हमी शुल्काची वसुली न करणे

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २९३ अन्वये राज्य शासनाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कर्जे देणाऱ्या विविध संस्था/रोखेधारक यांना कर्जाची रक्कम/गुंतवणुका आणि त्यावरील व्याजाचे प्रदान यासाठी कर्जे मिळविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधिच्या तारणावर राज्य शासन हमी देते. अशी हमी राज्याकरिता घटनासापेक्ष दायित्व ठरते. वित्त विभागाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ च्या शासन निर्णयानुसार हमी शुल्काची वसुली करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची आहे.

दिनांक १८ नोव्हेंबर १९८८ आणि १५ एप्रिल १९९७ च्या शासन निर्णयानुसार हमी शुल्काचे दर प्रतिवर्षी ०.५० ते २ प्रतिशत होते. ३१ मार्च आणि ३० सप्टेंबर अखेरीस अदत्त रकमेवरील हमी शुल्क प्रतिवर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबर रोजी ऋणको महामंडळांनी/संस्थांनी शासकीय खात्यात जमा करावयाचे असते. हमी शुल्काचे विलंबाने प्रदान केल्यास पहिल्या तीन महिन्यासाठी प्रतिवर्षी १६ टक्के व त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दंडनीय व्याज देय आहे.

शासकीय हमीवर आधारीत रोखे आणि कर्जाद्वारे निधी उभारणाऱ्या तीन प्रशासकीय विभागांच्या अंतर्गत सहा पालिकांच्या दस्तऐवजांचे विस्तृत विश्लेषण केले असता असे आढळून आले की, एप्रिल २००६ ते मार्च २००८ या काळात देय असलेले हमी शुल्क महामंडळानी प्रदान केले नव्हते. देय रक्कम वसूल करण्यासाठी प्रशासकीय विभागांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. परिणामी जोडपत्र-III मध्ये दर्शविल्याप्रमाणे हमी शुल्क आणि दंडनीय व्याज यांच्या एकूण रु. १४४.०६ कोटीची वसूली झाली नाही.

ही बाब मे २००८ मध्ये शासनाला कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८).

जोडपत्र-III

हमी शुल्क आणि दंडनीय व्याजाची वसुली दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	विभागाचे नाव/घटकांचे नाव	हमीची रक्कम	हमीचा दिनांक/प्रदानाचा नियत दिनांक	रक्कम		
				हमी शुल्क	दंडनीय व्याज	एकूण
अ)	महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई (रोखे मालिका क्र. XIX ते XXII)	४०६.९८	३० डिसेंबर, २००३ एप्रिल २००६ ते एप्रिल २००८	२०.७२	५.४८	२६.२०
	रोखे मालिका क्र. XXIII	३८०.००	१५ जानेवारी २००५ एप्रिल २००६ ते एप्रिल २००८	१५.८८	४.४६	२०.३४
ब)	बँकांकडून कर्ज (१४ कर्ज)	१,११५.६७	१७ नोव्हेंबर २००५ एप्रिल २००६ ते एप्रिल २००८	४३.१८	१३.७७	५६.९५
	एकूण -	**१,९०२.६५**		**७९.७८**	**२३.७१**	**१०३.४९**

ज्ञापन :

उपरोक्त महालेखापरिक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामधे खालील प्रमाणे नमूद केले आहे.

शासन हमीच्या आधारे महामंडळाने उभारलेल्या सर्व कर्ज अथवा कर्जरोखे प्रकरणात हमी देण्याच्या तारखेपासून हमी शुल्काऐवजी तेवढ्या हमी शुल्काच्या रकमेचे समभाग भांडवलात रुपांतर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने हमी शुल्क भरले नाही. तसेच शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावानुसार हमी शुल्क वसूल करण्यात आले नाही व त्यावर दंडनीय व्याजही आकारण्यात आले नाही.

मंत्रीमंडळाच्या दिनांक ०७.११.२००२ च्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे शासन हमीच्या आधारे महामंडळाने उभारलेल्या सर्व कर्ज अथवा कर्जरोखे प्रकरणांत ०.२५ टक्के या एकसारख्या दराने हमी देण्याचे व कर्ज घेतलेल्या दिनांकापासून अथवा कर्जरोखे निर्गमित केलेल्या दिनांकापासून हमी शुल्क आकारण्यात यावे व या हमी शुल्काऐवजी तेवढ्या किमतीचे समभाग महामंडळ निर्गमित करेल व शासनाच्या नावे हस्तांतरीत करेल असा निर्णय घेण्यात

आला आहे. त्यानुसार हमी शुल्काच्या दायित्वापोटी देय असलेल्या रकमेचे शासनाचा समभाग म्हणून रुपांतर करण्याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. महामंडळाने सदरच्या देय रकमेचे रुपांतर समभाग भागभांडवलात केले असल्याने देय रकमेचे निर्लेखित केल्यासारखे नाही.

दिनांक २३.०२.२०१० पर्यंत हमीशुल्कापोटी देय असलेली रक्कम समभाग भागभांडवलामध्ये रुपांतर करावयाची होती आणि त्यानुसार हमीशुल्कापोटी देय असलेल्या रु. ७६८.५६ कोटीचे रुपांतर महामंडळाने समभाग भागभांडवलात केलेले आहे. दिनांक २४.०२.२०१० ते ३१.०३.२०१० पर्यंत हमीशुल्कापोटी शासनास देय असलेल्या रु. ४.९८ कोटीचे प्रदान महामंडळाने केलेले आहे.

महामंडळास आतापर्यंत वितरणयोग्य नफा नाही. महामंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पांचा सवलतीचा काळ (Concession Period) हा बहुतांशी ३० वर्षापर्यंतचा आहे. पथकरातून मिळणारे उत्पन्न हे प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात कमी असते. वाहतुकीमध्ये आणि पथकरामध्ये वेळोवेळी होणाऱ्या वाढीमुळे दरवर्षी साधारणत: ७ टक्के ते १० टक्के इतकी वाढ पथकर उत्पन्नात होते. म्हणजेच रोकड प्रवाह हा प्रकल्पाच्या शेवटच्या काळात जास्त असतो आणि शेवटी, कर्जाची परतफेड झाल्यामुळे व्याजभार कमी होत जातो. त्यामुळे प्रकल्पापासून मिळणारा नफा हा प्रकल्पाच्या शेवटच्या काळात जास्त मिळतो. सवलतीच्या कालखंडात प्रकल्पापासुन मिळणाऱ्या उत्पन्नाद्वारे महामंडळ कर्जाची परतफेड करत असते. परंतु प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात तोटा हा सुरुवातीच्या (Gestation Period) असून अपेक्षित आहे. नंतरच्या काळात हा तोटा भरुन घेणे अपेक्षित आहे.

महामंडळ कर्जे व कर्जरोखे यांची त्यांच्या अटी व शर्तीनुसार नियमितपणे परतफेड करीत आहे. तसेच पथकर उत्पन्नाचे सुरक्षितीकरण करुन (Securitisation) अग्रिम उत्पन्नाद्वारे कर्जाची परतफेड करीत आहे. याद्वारे प्राप्त झालेली पूर्ण रक्कम नफा व तोटा खात्यामध्ये नसून ते अग्रिम म्हणून घेतलेली असल्यामुळे तोटा दिसतो. परंतु महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे रोकड प्रवाह सुरळीत आहे व कर्जफेडीमध्ये काही कसूर होत नाही. महामंडळाकडे असलेल्या उत्पन्नाची साधने वाढत असून प्रकल्पाची एकूण सद्य: मूल्य स्थिती (NPV) सकारात्मक असल्याचे दिसत आहे.

साक्ष :-

हमी शुल्काची वसुली करणे या परिच्छेदासंदर्भात समितीने दि.३०.१०.२०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय संचिवांनी अशी माहिती दिली की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची गॅरंटी शासनाकडून देण्यात येते तसेच शासन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून हमी शुल्क घेते त्याच्या थकबाकी संदर्भातील हा मुद्दा आहे. त्या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून ॲडजेस्टमेंट झाली नव्हती, कारण हमी स्वरुपाच्या रकमेच्या सहभागाचे भांडवलामध्ये रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दिनांक २३-२-२०१० पर्यंत हमी स्वरुपाच्या रकमेची इक्वीटी शेअर्स्मध्ये ७६८.५६ इतक्या रकमेची एम.एस.आर.डी.सी.ने पूर्णपणे ॲडजेस्टमेंट केली आहे. त्यानंतर कॅश फॉर्मबाबत दिनांक २४-२-२०१० पासून २१-३-२०१० पर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने शासनाकडे दिनांक ३१-३-२०१० प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून हमी स्वरुपामध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

एखाद्या कामाला शासनाची मान्यता नसेल तरी देखील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ जाहीर टेंडर काढून काम करु शकते काय, त्यासाठी खर्च करु शकते काय कारण सदरहू कामासाठी महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासनाने रक्कम उपलब्ध करुन दिलेली नाही. असे असतानाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने यासंबंधातील प्रक्रिया पूर्ण न करता दोन वेळा टेंडर काढलेले आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची जी कार्यपध्दती आहे, त्यामध्ये शासन विभागाकडे जे काम सोपविते किंवा शासनाने ज्या कामांसाठी ऑब्जेक्टीव्हज् दिलेले आहेत. त्याच्या अंमलबजावणीसाठी या कामांची टेंडर काढणे, निविदा मागविणे यासाठी बोर्ड ऑफ डायरेक्टर किंवा एखाद्या सक्षम प्राधिकरणाची (कॉम्पीटंट ॲथॉरिटीची) मंजुरी घेऊन काम करण्यात येते. एखाद्या कामाला वित्तीय प्रोव्हीजन केलेली नसेल तर अशावेळी कोणत्याही प्रकारच्या परवानगीच्या प्रक्रियेतून न जाता जाहीर टेंडर काढण्यात आले आहे अशी समितीने विचारणा केली असता निविदा मागविणे आणि वर्क ऑर्डर देऊन काम करणे यामध्ये दोन

वेगवेगळे भाग आहेत. याबाबत अर्थसंकल्पात तरतूद नसली तरी अपवाद घडतात असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी दिले.

याअनुषंगाने समितीने असे विचारले की, याला शासनाची मान्यता नसताना किंवा प्रकल्प मंजूर झालेला नसताना जाहीर निविदा काढण्यात आल्या हे खरे आहे काय तसेच सदरहू कामासाठी तरतूद नसेल तर निविदा काढू शकत नाही यावर विभागीय प्रतिनिधींनी स्पष्टीकरण देताना असे सांगितले की, निविदा काढू शकतो परंतु वर्क ऑर्डर देऊ शकत नाही कारण वर्क ऑर्डर दिल्यानंतर जबाबदारी येते.

बीड येथील उड्डाण पुलाबाबत सांगावयाचे तर सदरहू रस्ता केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. तेथे केंद्र शासनाची एजन्सी काम करीत आहे. मात्र यासाठी सदरहू एजन्सीने कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही, महाराष्ट्र शासनाची परवानगी घेतलेली नाही. सदरहू काम २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्यामुळे पायाभूत सुविधा समितीची देखील परवानगी घेतलेली नाही. असे असतानाही ६० कोटी रुपयांचे टेंडर काढले पण ते रद्द केले. त्यानंतर दुसऱ्या वेळेला ९७ कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले आणि तेही रद्द केले. जे काम ३० ते ३५ कोटी रुपयांमध्ये झाले असते त्याचा खर्च आता ९७ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे पण त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद नाही. यासाठी आर्थिक तरतूद कशी करण्यात येते याबाबत समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा करताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रकल्प घेतला असेल तर तो महामंडळामार्फत केला जातो. परंतु विभाग बहुतांशी प्रकल्प स्वत:हून हाती घेत नाही ते शासनाचे प्रकल्प असतात त्यामुळे शासन यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करीत असते. शासन अर्थसंकल्पीय तरतूद करीत नाही किंवा जर तरतूद केलीच तर बँक लोन घेऊन केली जाते. समितीने उड्डाण पुलाचा मुद्दा काढला आहे तो वेगळा आहे याबाबत विधान सभेमध्ये देखील प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. तसेच बोर्ड ऑफ डायरेक्टर यांनी कामाला मान्यता देऊन त्यासाठी टेंडर काढण्याकरता परवानगी दिलेली आहे.मात्र याबाबतीत दोन-तीन वेळा अंदाजपत्रक बदलण्यात आले, आणि कामाचा स्कोप बदलण्यात आला.

यासाठी बोर्डाने मान्यता दिलेली आहे असे सांगण्यात आले. पण सदरहू बोर्ड हेच सर्वेसर्वा आहे काय? तसेच याला कोणाची मान्यता आहे अशी विचारणा समितीने केली असता

याबाबत बोर्ड काही करु शकत नाही. याठिकाणी आय.ए.एस. झालेले शासनाचे तीन-तीन सचिव आहे आणि मंत्रीमंडळ आहे त्यामुळे ते असे करणार असे म्हणणे बरोबर नाही. अशा वेळी त्याठिकाणी जे निर्णय घेतले जातात ते शासनाकडे मंजुरीसाठी पाठविले जातात आणि जर शासनाने त्याला मंजूरी दिली नाही तर ते काम होऊ शकत नाही. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

याबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे? सदरहू रस्ता केंद्रशासनाच्या अंतर्गत येत असल्यामुळे याबाबत संबंधितांची परवानगी घेतली आहे काय? राज्य शासनाची परवानगी घेतली आहे काय? जर एखाद्या कामासाठी २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च होत असेल तर त्यासाठी पायाभूत सुविधा समितीची परवानगी घेण्यात आली आहे काय? यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे काय? तसेच राष्ट्रीय महामार्ग २११ आहेत आणि ते परिवहन मंत्री महोदयांच्या अधिपत्याखाली आहेत आणि आता ते राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरीत झाले आहेत. आता त्याठिकाणी चौपदरी रस्ता करीत आहेत आणि यामध्ये सदरहू रस्ता असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने याबाबत केंद्र शासनाशी संपर्क साधलेला आहे. परंतु अजून त्यासाठी पूर्णपणे संमती मिळालेली नसून यासाठी जो प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, त्याला केंद्र सरकारची परवानगी आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी समितीस असे विदित केले की, विभागाने याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता आणि त्यांनी इन- प्रिन्सिपल ॲप्रुव्हल दिलेले आहे. शासनाला एम.ओ.यु.करावयाचा असून त्याबाबत मसुदा तयार करण्यात आला आहे मात्र अजून त्यावर सही झालेली नाही.

विभागीय प्रतिनिधींनी केलेल्या उपरोक्त खुलाशाच्या अनुषंगाने समितीने अशी पृच्छा केली की, यासाठी केंद्र शासनाची परवानगी आहे की नाही यासंदर्भात खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, यासाठी केंद्र शासनाची परवानगी नाही. समितीने जे प्रश्न विचारलेले आहेत ती बाब शासन स्तरावरील आहे. म्हणून याबाबत एम.डी.यांनी उत्तर देणे योग्य नाही.

याविषयी अधिक माहिती देतांना विभागाने सचिवांनी असा खुलासा केला की, महाराष्ट्र शासनाची या प्रकल्पाला मान्यता नाही. जर एखाद्या कामासाठी २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त

खर्च येणार असेल तर सदरहू काम पायाभूत समितीकडे मान्यतेसाठी पाठविले जाते. मात्र अजून सदरहू काम पायाभूत समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित केलेले नाही तसेच महाराष्ट्र शासनाची मंजुरी मिळालेली नसल्यामुळे आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही.

सदरहू कामाचे टेंडर काढण्यासाठी घाई का करण्यात आली? यासाठी महामंडळाने ६० कोटी रुपयांचे टेंडर काढले ते रद्द केले. त्यानंतर ९७ कोटी रुपयांचे टेंडर काढले आहे? मात्र प्रत्यक्षात या कामासाठी परवानगी मिळालेली नाही, त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच या कामासाठी जो कन्सल्टंन्ट नेमण्यात आला आहे त्यांना पैसे देण्यात आले आणि त्यामुळे वित्तीय तूट निर्माण झाली याला कोण जबाबदार आहे अशी विचारणा समितीने केली असता महामंडळाचे जे उद्दिष्ट आहे त्यानुसार अहवाल तयार करुन त्यासाठी टप्प्याटप्प्याने तरतूद केली आहे की नाही हे पहाण्यासाठी बोर्ड आणि एम.डी.सक्षम आहेत. त्यानुसार अहवाल केलेला असून टेंडर काढलेले आहे. मात्र आम्ही टेंडर काढल्यानंतर जर सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसेल तर त्यासाठी वर्क ऑर्डर देता येत नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

एकंदरीत सदरहू प्रकरण पाहता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला टेंडर काढण्याची घाई झालेली आहे असे म्हणावे लागेल. याठिकाणी ज्यापध्दतीने उत्तरे देण्यात आली आहेत त्यावरुन काही चूक केली आहे असे संबंधितांना वाटत नाही. उलट उत्तम प्रकारे काम केले आहे असे महामंडळाला वाटत आहे. प्रशासनामध्ये काम करण्याच्या काही पध्दती आहेत. कोणतेही महामंडळ असले तरी तो शासनाचा अनुषंगिक एक भाग आहे. शासनाने काम करीत असताना जे नियम किंवा संकेत तयार केलेले असतात ते पायदळी तुडवले जातात. लोकप्रतिनिधींना बजेटेड कामे आहेत व त्यासाठी ते आग्रही असतात. एखादे काम करीत असताना त्यापूर्वी विभागाने थोडी पूर्वतयारी करावयास पाहिजे. कारण अर्थसंकल्प पास झाल्यानंतर त्याअनुषंगाने पुढील कामे करता येतात. याठिकाणी समितीला अधिकाऱ्यांकडून गांभीर्याने उत्तरे दिली जात आहेत असे वाटत नाही. याठिकाणी ज्यापध्दतीने उत्तरे देण्यात आली आहेत त्याबाबत संबंधितांवर कारवाई केली पाहिजे आणि समितीने याविषयी तीव्र नापसंती व्यक्त करावयास पाहिजे. याबाबतीत संबंधितांवर कारवाई करण्यात यावी आणि गरज भासली तर संबंधितांना निलंबित करण्याबाबत सांगितले जाईल. सिंचनाबाबत चर्चा झाली पण

यासाठी केंद्र शासनाची, राज्य शासनाची मान्यता नाही म्हणजे महाराष्ट्र राज्य विकण्यासाठी कोणाला आंदण म्हणून दिला आहे काय ? ही बाब समितीला पसंत नाही म्हणून आपण संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शिफारस केली जाईल. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी कामामध्ये हलगर्जीपणा दाखविला आहे. राज्य आणि केंद्र शासनाचे नियम नसताना, आर्थिक तरतूदी नसताना तसेच पायाभूत सुविधा समितीची परवानगी नसताना अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा दाखविला आहे. याठिकाणी संबंधित विभागाचे सचिव उपस्थित असून त्यांनी संबंधितांची पूर्ण चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी आणि विभागीय सचिवांनी जे अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरूद्ध एक महिन्यामध्ये कारवाई केली पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेचा विषय आहे. आपण जो कर्मचारीवर्ग घेतला आहे त्यांनी खोटी प्रमाणपत्रे दिलेली आहेत. त्याची आपण स्वतंत्रपणे छाननी करून घेतली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले.

वाहतुकीमध्ये आणि पथकरामध्ये वेळावेळी होणाऱ्या वाढीमुळे दरवर्षी साधारणत: ७ टक्के ते १० टक्के इतकी वाढ पथकर उत्पन्नात होते. ही बाब महालेखाकार/वित्त सचिव यांना मान्य आहे काय अशी विचारणा समितीने केली असता महालेखाकार यांनी असे सांगितले की, The MSRDC is doing survey before applying toll tax. Projection of increase in toll tax is to be assessed by the MSRDC because they are having the data.

यासंबंधी वित्त सचिवांनी असा खुलासा केला की, सक्षम प्राधिकरणाची मान्यता असल्याशिवाय टेंडर काढणे बरोबर नाही. पथकरासंबंधी जो मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे त्यासंबंधी वित्त विभागाचे असे मत आहे की, ७ ते १० टक्के इतकी वाढ प्रस्तावित करतात त्यावेळी कुठला दर आहे हे स्पष्ट होत नाही हे पूर्वीचे प्रकल्प आहेत. त्यामध्ये डेटा कसा वाढत गेला याचा आधार देणे आवश्यक आहे. तो डेटा सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला तर काही तरी अनुमान (कन्क्युजन) काढता येईल.

आतापर्यंत महामंडळाने किती रकमेचे कर्जरोखे उभे केले आहेत व किती कर्जाची परतफेड करण्यात आली आहे यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, महामंडळाने ८४७० कोटी रूपयांचे कर्ज घेतले होते त्यापैकी ५५२० कोटी रूपयांची परतफेड केली आहे. २९५१ कोटी रूपये लोन आणि बॉंडचे आहेत. कर्जरोखे आणि लोन का

काढले हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे, वांद्रे-वरळी सी-लिंक हे दोन महत्त्वाचे प्रकल्प होते. प्रकल्प सुरू होण्यापूर्वी शासन फंडिग देऊ असे सांगते. पण प्रत्याक्षात महामंडळाला शासनाकडून फंड मिळत नाही. त्यामुळे महामंडळाला मार्केट मधून निधी घ्यावा लागतो. शासनाने निधीची हमी घेतल्यानंतर बजेटमध्ये तरतूद केली पाहिजे. पण त्याची पूर्तता होत नाही. महामंडळाने प्रकल्पाचे काम पूर्ण सुरू केल्यानंतर ते पूर्ण करावे लागते. कारण तो प्रकल्प सार्वजनिक असतो. शासन निधी देत नसल्यामुळे मग महामंडळाला नाईलाजाने मार्केटमधून कर्जरोख्यांद्वारे किंवा बँकांकडून लोन घेऊन प्रकल्प पूर्ण करावा लागतो. आज शासनाकडून महामंडळाला ३००० कोटी रूपये येणे आहे. ही जी रक्कम आहे ती परतफेडीची व व्याजाची आहे.

शासन प्रकल्पाला हमी देते हे ठीक आहे. लोनसाठी डायरेक्ट फंडिंग सरकारचे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, शासनाने सगळ्यांना एकच न्याय लावला पाहिजे. शासनाची कंपनी असल्यामुळे वेगळा न्याय अशी भूमिका घेता कामा नये. महामंडळाला देय पैसे शासनाने दिले पाहिजेत. शासन देय निधी देत नसल्यामुळे महामंडळाला कर्जरोख्यांद्वारे निधी उभा करावा लागतो. यासाठी मार्केटमध्ये महामंडळाला हमी द्यावी लागते. सदर हमी शासन देते तेव्हा .२५ इतका व्याज दर होता तो आता २ टक्के वाढला आहे. शासनाच्या निधीतून प्रकल्प घेताना टेंडर कॉस्ट देखील शासनाने दिली पाहिजे. ती दिली नाही तर मग बाजारामधून कर्ज रोखे काढून सोय करावी लागते. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

शासन महामंडळाला निधी का देत नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी विभागाला जेवढी तरतूद प्राप्त होते त्यातून त्यांना निधी देण्यात येतो असा खुलासा केला.

शासनाकडून विभागासाठी निधीची तरतूद कमी केली जाते असा विचार करून चालणार नाही. विभागाच्या मंत्र्यांसमवेत बसून वित्त विभागाकडून बजेट मागून घेतले पाहिजे. एखादा प्रकल्प हाती घेतल्यानंतर तो पूर्ण केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

प्रकल्पाच्या सुरूवातीला शासनाच्यावतीने ५८० कोटी रूपये देऊ असे लेखी सांगितले होते. त्यामुळे महामंडळाने टेंडर काढून प्रकल्प पूर्ण केला. ५८० कोटीपैकी महामंडळाला फक्त २०० कोटी रूपये मिळाले. तथापि, ३८० कोटी रूपये गेल्या दहा वर्षात मिळालेले

नाहीत. या ३८० कोटी रूपयांसाठी महामंडळाला मार्केटमध्ये जावे लागले. मार्केटमधून महामंडळाने ३८० कोटी रूपये उचलले यासाठी शासनाने हमी दिली. शासनाने हमी दिल्यानंतर .२५ टक्के इतके व्याज शासनाने आकारले पाहिजे. तथापि, शासनाचा हमी शुल्काचा व्याज दर २४ टक्के आहे अशाने महामंडळ कसे काय चालणार ? ही बाब लोकलेखा समितीने लक्षात घेऊन यासंबंधी शासनाला निदेश देण्याची विनंती विभागीय प्रतिनिधींनी समितीला केली.

समितीने याअनुषंगाने २४ टक्के व्याजदर महामंडळाने मान्य कसा काय केला सदर व्याजदर कमी करण्यासंबंधी वित्त विभागाशी काही चर्चा केली आहे काय, वित्त विभागाशी चर्चा करून व्याजदर कमी करण्याचा प्रयत्न केला आहे काय ? अशी विचारणा केली असता, शासन हमी देत असल्यामुळे महामंडळाला विचारात घेतले जात नाही शासनाने हमी दिल्यानंतर महामंडळ काहीही करु शकत नाही. सुरूवातीला निधी देऊ असे सांगितल्यामुळे महामंडळाने प्रकल्पाचे काम सुरू केले. ५८० कोटी रूपयांचा प्रकल्प असल्यामुळे त्याचे काम थांबविणे शक्य नव्हते. हा मोठा प्रकल्प असल्यामुळे तो पूर्ण करावा लागला. एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ काम करीत असते. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने निधी दिला तर मग महामंडळावर मार्केटमध्ये जाऊन पैसे उभारण्याची वेळच येणार नाही. शासन निधी देत नसल्यामुळे महामंडळाला मार्केटमध्ये जाऊन कर्जरोख्यांद्वारे निधी उभा करावा लागतो. पण त्यासाठी महामंडळाची हमी चालत नाही त्यामुळे शासन हमी देते तेव्हा महामंडळाला शासनाच्या सर्व अटी व शर्ती मान्य कराव्या लागतात. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

महामंडळाचे एकूण किती प्रकल्प आहेत, त्यासाठी शासनाने किती निधी देण्याचे मान्य केले होते, त्यापैकी किती निधी शासनाने दिला आहे, शासनाने निधी न दिल्यामुळे महामंडळाने मार्केटमधून किती कर्ज उभारले आहे, त्याचा व्याजदर किती आहे व यात गुंतलेली एकूण रक्कम किती आहे या संबंधीची विस्तृत माहिती आपण समितीला द्यावी असे समितीने निदेश दिले तथापि माहिती अद्याप अप्राप्त आहे.

दिनांक २३.०२.२०१० पर्यंत हमी शुल्कापोटी देय असलेली रक्कम समभाग भागभांडवलामध्ये रूपांतर करावयाची होती आणि त्यानुसार हमी शुल्का पोटी देय असलेल्या रूपये ७६८.५६ कोटीचे रूपांतर महामंडळाने समभाग भांडवलात केलेले आहे. दिनांक २४.०२.२०१० ते ३१.०३.२०१० पर्यंत हमी शुल्का पोटी शासनास देय असलेल्या रूपये ४.९८ कोटीचे प्रदन महामंडळाने केलेले आहे असे स्पष्टीकरणात नमूद केले आहे. तर रूपये १०३.४९ कोटींची वसुली झाली नाही असा महालेखापरीक्षकांचा आक्षेप आहे. तेव्हा रूपये १०३.४९ कोटीच्या हमी शुल्काच्या वसुलीची सद्य:स्थिती काय आहे याबाबत माहिती देण्यास समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दिनांक ३१.०३.२०१० पर्यंत गॅरंटी प्राप्त झाली होती. दिनांक २३.२.२०१० पर्यंत हमी शुल्कापोटी देय असलेल्या रूपये ७६८.५६ कोटीचे रूपांतर महामंडळाने समभाग भांडवलामध्ये केलेले आहे. या हमी शुल्का पोटी शासनास देय असलेल्या रूपये ४.९८ कोटीचे प्रदान महामंडळाने केलेले आहे त्याचे अकौंटींग ३१ मार्च २०१० रोजी झालेले आहे.

टोल टॅक्स वसूल केला जातो, परंतु त्यासाठी असलेल्या अटींची पूर्तता मात्र केली जात नाही. रस्त्यावरुन रोज किती गाड्यांची ये-जा होते, टोल नाक्याची अंतिम मुदत किती आहे, इ. माहिती तेथील फलकावर लावणे आवश्यक आहे. ही माहिती फलकावर लावणार आहात काय अशी विचारणा समिती केली असता टोल नाक्याच्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले लावण्यासाठी एजन्सी निश्चित केली आहे. येत्या पंधरा-वीस दिवसात टोल नाक्यावर डिस्प्ले बसविण्यात येतील. या फलकावर १३-१४ मुद्यांची माहिती देण्यात येणार असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

टोल नाक्याच्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक बोर्ड एकाच ठिकाणी न लावता तीन चार ठिकाणी लावण्यात यावेत, जेणेकरुन चालकाला ते लगेच दिसू शकतील. वरळी सी लिंक हा सहा पदरी रोड असल्यामुळे केवळ एक फलक लावून चालणार नाही तर तीन-चार फलक उंच जागी लावण्यात यावेत असे मत समितीने व्यक्त केले.

समितीने सूचना केल्याप्रमाणे टोल नाक्याच्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक बोर्ड दोन चार ठिकाणी लावण्यात येतील या फलकाची साईज चार बाय चार फूटांची राहणार असून या

फलकावर एका वेळेस चार मुद्यांची माहिती याप्रमाणे तीनदा जवळपास बारा ते चौदा मुद्यांची माहिती देण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

वरळी सी लिंक च्या पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याच्या सद्य:स्थितीविषयी माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या प्रकल्पाचा आर.एस.ओ.पी. या कंपनीस कॉन्ट्रॅक्ट दिलेला आहे, परंतु काही बाबींमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि सदरहू कंपनी यांच्यात वाद निर्माण झाल्यामुळे हा प्रस्ताव रद्द करावा म्हणून महामंडळाने शासनाकडे पाठविला आहे. वरळी ते हाजी अली या दुसऱ्या टप्प्यासाठी आर्थिक बाबीसंबंधीचा प्रस्ताव पायाभूत समितीसमोर आलेला असून तो विचाराधीन आहे. या समितीने मंजुरी दिल्यानंतर त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही होईल. तिस-या टप्प्यात हाजी अली ते नरिमन पाईंट या टप्प्याचे काम प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने विद्यमान आमदार तसेच माजी आमदांराना टोल भरावा लागू नये म्हणून पास दिला आहे. लोकप्रतिनिधी टोल नाक्यावरुन गाडी घेऊन जात असतांना चालक कार्ड दाखवितात. टोल नाक्यावरील कर्मचारी फारसे शिकलेले नसतात ते लोकप्रतिनिधींच्या गाड्या अडवितात आणि त्यांची माणसे ते कार्ड घेऊन तेथील व्यवस्थापकाकडे घेऊन जातात. त्यांच्याकडे जी लॉक की असते तेथे ते गाडी नंबर लिहितात. ही प्रोसेस पूर्ण करण्यासाठी बराच वेळ जातो. आमदारांची गाडी चालकाने टोल नाक्यावर कार्ड दाखविल्यानंतर लगेच सोडायला हवी. अशा प्रकारच्या सूचना संबंधित ठेकेदाराना देणार आहात काय अशी विचारणा समितीने केली असता टोल नाक्याच्या ठिकाणी शेवटची व्ही.आय.पी. लेन असते. तेथून गाडी नेली तर अशी अडचण येणार नाही, परंतु तरी देखील समितीने सांगितल्यानुसार संबंधितांना सूचना देण्यात येतील. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तसेच सन्माननीय आमदार महोदयांच्या गाड्या टोल नाक्यावरुन जात असतांना त्यांना थांबवून न ठेवता तात्काळ जाऊ द्यावे, अशा स्वरुपाचे परिपत्रक राज्यातील सर्व टोल नाक्यावर पाठवून त्याची प्रत विधानसभेचे २८८ सन्माननीय आमदारांना देण्यात येईल असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

समितीने आजच्या बैठकीत विचारलेली माहिती येत्या पंधरा दिवसात समितीला द्यावी असे निदेश समितीने दिले असता माहिती समितीस देण्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केले.

३० ऑक्टोबर २०१२ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्याने समितीने दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांची पुन: साक्ष घेतली. सदर बैठकीत परिच्छेद क्रमांक ७.३ "हमी शुल्काची वसूली न करणे" यासंदर्भात महिती देताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने २००७-२००८ पर्यंत देय हमी शुल्काचे शासनास प्रदान केले नव्हते, २००७-२००८ मधील हमी शुल्क आणि दंडनीय व्याजाची १०३.४९ कोटी रुपये एवढी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही केली नाही असा मुद्दा असून या बाबतीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ३१ मार्च, २०१० पर्यंत हमी शुल्कापोटी देय असलेल्या ७६८.५६ कोटी रुपयांचे समभाग भांडवलात रुपांतर केलेले आहे. त्यामुळे २००७-२००८ ची रक्कम त्यामध्ये समाविष्ट झालेली आहे. त्या व्यतिरिक्त २४.२.२०१० ते ३१.३.२०१० या कालावधीची हमी शुल्कापोटी शासनास देय असलेली ४.९८ कोटी रुपये एवढी रक्कम त्यांनी कॅशमध्ये जमा केलेली आहे. तसेच आणखी ०.८ कोटी रुपये कॅशमध्ये दिलेले आहेत. असे एकूण ७७४.३४ कोटी रुपये ३१ मार्च, २०१० पर्यंत दिलेले आहेत. त्यानंतर १ एप्रिल, २०१२ पर्यंत गॅरंटेड लोनची बाकी रक्कम २०६५.६७ कोटी रुपये होती. त्यापैकी १ एप्रिल, २०१२ पर्यंत १०६.२९ कोटी रुपयांचे रिपेमेंट केलेले आहे. ३१ सप्टेंबर, २०१२ पर्यंत १९५९.६८ कोटी रुपये गॅरंटेड लोन बाकी आहे. कर्जावर २ टक्के गॅरंटी फी आहे आता १२५.४७ कोटी रुपये गॅरंटी फी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने शासनाला देणे बाकी आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, रक्कम बाकी राहण्याचे कारण काय ? या बाबतीत सिस्टिम नाही का यावर वित्त सचिवांनी असे सांगितले की, हमी शुल्क वसूल करण्याचा अधिकार संबंधित प्रशासकीय विभागाचा आहे. जी प्रलंबित रक्कम देय होती ती समभागामध्ये रुपांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानंतरच्या रकमेचे समभागामध्ये रुपांतर करण्याचा निर्णय झालेला नाही.

यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, माहे मार्च, २०१० ते ३० सप्टेंबर, २०१२ पर्यंतची १२५ कोटी रुपये रक्कम सांगितली ही अडीच वर्षाची रक्कम आहे. आता गॅरेंटेड लोनची बाकी रक्कम १९५९ कोटी रुपये आहे इतर कर्ज फार कमी आहे. एकूण कर्ज २२९६ कोटी रुपये आहे. त्यापैकी १९५९ कोटी रुपये गॅरेंटेड लोनची रक्कम आहे. तसेच सध्या काही प्रकल्प पाईपलाईनमध्ये आहेत तर काही प्रकल्प नियोजनाच्या स्तरावर आहेत. एकूण १० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प प्रपोज्ड असतील. बहुतेक सर्व प्रकल्प बीओटीचे आहेत काही प्रकल्पात बजेट तयार करण्यासाठी कन्सल्टंटच्या फीवर खर्च होतो.

विभागाची टोल घेण्याची जी पध्दत आहे त्यामध्ये एखाद्या टोलची मर्यादा संपल्यानंतर त्यांना एक्स्टेंशन देत असताना कोणते नियम लावण्यात येतात ? त्यांना जुन्या दराप्रमाणे प्रपोर्शनेट करुन देतो का ? त्या ठिकाणी पावत्या फाडावयाच्या असतात त्या फाडल्या जात नाहीत ते कोणाला तरी सबलेट करतात. त्यामध्ये फार मोठा गैरव्यवहार चालतो. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे जेवढे टोलनाके असतील, बीओटीचे रस्ते असतील किंवा महामंडळाने बांधून नंतर टोल वसूल करण्यासाठी एजेंट नेमले असतील, त्या बाबतची माहिती समितीच्या मागच्या बैठकीत मागितली होती. किती टोलच्या बाबतीत टेंडर्स झाले आणि किती टोलच्या बाबतीत विनाटेंडर एक्स्टेंशन दिले, त्यांना कोणत्या नियमानुसार एक्स्टेंशन दिले, याची माहिती समितीला देण्याचे निदेश समितीने दिले. याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सद्य:स्थितीत विभागाकडे ३१ टोल स्टेशन्स आहेत. त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ टोल गोळा करते. त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने एजन्ट नेमण्यात येतात. त्यासाठी संचालक मंडळाने नियम केलेले आहेत. टोलची रक्कम जर २० कोटी रुपयांपर्यंत अपेक्षित असेल तर तीन वर्षाची अपफ्रंट भरावी, २० ते १०० कोटी रुपये असेल तर दर वर्षी अपफ्रंट भरावी, १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल तर दर महिन्याला अपफ्रंट भरावी म्हणजे टोल डिफॉल्ट राहणार नाही जे एक्स्टेंशन देतो ते तीन महिन्यापर्यंत देतो. काही वेळा दंड आकारला जातो. दंडाला प्रतिसाद मिळाला नाहीत तर दुसऱ्यांदा दंड आकारतो. तीन महिने एक्स्टेंशन देण्याची तरतूद आहे. सध्या एकही प्रकल्प एक्स्टेंशनवर चालवित नाही. ज्या ठिकाणी एक्स्टेंशन दिले ते तीन महिन्यांच्या मर्यादेत दिले.

तीन महिने एक्स्टेंशन दिल्यानंतर त्यापेक्षाही जास्त काळ टोल वसुली करीत असतील तर त्या बाबतीत कोणती दक्षता घेण्यात येते ? लोकांची अशी तक्रार आहे की, मुदत संपल्यावर सुध्दा टोलची वसुली केली जाते. अशा लोकांवर कोणती कारवाई करण्यात येते ? सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्या ठिकाणी टोल जमा केला जातो विभागाचे जे लोक गैरव्यवहार करतात त्यांच्यावर काय कारवाई केली ? विभागातील सेवानिवृत्त झालेले तसेच सध्या कार्यरत असलेले कर्मचारी शासनाचा टोल बुडवितात. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वर सावित्री नदीच्या पुढचा टोलनाका दोन-तीन वर्षापासून बंद झाल्याची बातमी वर्तमानपत्रात आली. परंतु, आजही त्या ठिकाणचा टोलनाका चालू आहे. जे लोक टोल भरतात त्यांच्याकडून पैसे घेतात. जे लोक टोल भरत नाहीत त्यांच्याकडून पैसे घेत नाहीत ही बाब समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, मुंबई-गोवा हा राष्ट्रीय महामार्ग आहे. ते ठिकाण महामंडळाच्या अखत्यारित नसून केंद्र शासनाकडे आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या बाबतीत केंद्र शासनाचे धोरण आहे. सदर टोल नाका बंद करण्याचा प्रस्ताव विभागाकडून केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. परंतु, अजून धोरणात्मक निर्णय झालेला नाही.

पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी मिळून तो टोलनाका चालवितात. अशी अनेक ठिकाणे असतील. किमान या एका टोलनाक्याची चौकशी करुन खरोखर तो टोलनाका चालू आहे की, बंद आहे हे सांगावे. तसेच टोलनाक्याच्या आजूबाजूच्या ३-४ किलोमीटर परिसरात जी गावे असतात तेथील लोक त्या रस्त्याचा वापर करीत नाहीत. त्यांना जर टोलनाका पास करावयाचा असेल तर त्यांच्या वाहनांना टोल द्यावा लागतो. उदा. मुलुंड आणि ठाणे यामधला जो टोलनाका आहे त्या ठिकाणी ठाण्याकडील लोकांना इकडे यावयाचे असेल किंवा मुलुंडकडील लोकांना तिकडे जावयाचे असेल तर टोल भरावा लागतो. केवळ २-३ किलोमीटर अंतरासाठी त्यांच्याकडून टोल घेतला जातो. याबाबतीत काय तरतूद आहे ? ४-५ किलोमीटर अंतरात राहणाऱ्या लोकांना टोल लागणार नाही अशी काही तरतूद केली आहे का अशी समितीने विचारणा केली असता, माहे जुलै, २००९ ला सार्वजनिक बांधकाम विभागाने टोल पॉलिसी केली त्यामध्ये ५ किलोमीटरच्या परिघामध्ये जेवढी गावे

असतील त्या गावातील लोकांना टोलमध्ये सुट दिली महिन्याला जेवढा टोल लागतो त्याचे १० टक्के द्यावयाचे आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शासन निर्णयामध्ये गावाचा उल्लेख आहे मुलुंड मुंबई शहरामध्ये आहे आणि दुसरीकडे ठाणे शहर आहे. मुलुंड आणि ठाणे या भागात राहणाऱ्या लोकांना पूर्ण टोल भरावा लागतो. टोल नाक्याच्या आसपासच्या पाच किलोमीटरच्या परिसरामधील रहिवाशांना महिन्याच्या टोल पासच्या एकूण रकमेच्या केवळ दहा टक्के रक्कम अदा करावी लागेल, अशा प्रकारचा कलम संबंधित कायद्यामध्ये सन २००९ मध्ये पास करण्यात आला होता. टोल पासच्या महिन्याच्या एकूण रकमेऐवजी केवळ दहा टक्के रकमेचा पास जवळपासच्या रहिवाशांकरिता देण्यात यावा, याकरिता विभाग कोणती कार्यवाही करीत आहे ? कायद्यामध्ये याकरिता कोणती तरतूद करता येईल, याचा विभागाने विचार करावा, असे मत समितीने व्यक्त केले असता याकरिता कायद्यामधील तरतुदींचा अभ्यास करुन अशा प्रकारच्या तरतूदीसंदर्भात नियम बनवून लागू करता येईल का ? याची तपासणी करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

टोलची मुदत संपल्यानंतरही सर्रासपणे वाहनधारकांकडून टोल वसूल केला जात आहे. वसूल केलेल्या टोलच्या माध्यमातून कराराप्रमाणे रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीही करण्यात येत नाही. खामगाव-जालना बायपास लिंक रोड येथील टोलची मुदत संपल्यानंतरही संबंधित ठेकेदाराला चार वर्षांची मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. टोल वसुलीच्या काळामध्ये सदरहू ठेकेदाराने संबंधित रस्त्याची कोणत्याही प्रकारची देखभाल व दुरुस्ती केलेली नाही. खामगांव - जालना बायपास लिंक रोडची अवस्था अतिशय वाईट असून तेथे अपघातांची संख्या वाढत आहे. खामगाव-जालना बायपास लिंक रोड हा चार लेनचा महामार्ग आहे. या महामार्गाचे केवळ ६० टक्के काम करुनही ठेकेदाराने त्या संदर्भातील ९० टक्के पैसे उचलून फरार झालेला आहे. चार वर्षांपासून या रस्त्यावर खोदकाम केलेले आहे, त्यानंतर त्या रस्त्याची दुरुस्ती न केल्यामुळे एकूण ५०० लोक अपघातामध्ये मृत्युमुखी पडलेली आहेत. पुणे येथे जाणा-या लक्झरीजचा तर तेथे नेहमी अपघात होत असतो. तरीही सदरहू ठेकेदाराला काळया यादीमध्ये टाकण्यात आलेले नाही. सदरहू ठेकेदाराने संबंधित रस्त्याचे काम करण्याकरिता महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन दोघांचेही पैसे उचललेले आहेत. त्यानंतर ठेकेदार फरार झालेला आहे. खामगाव-जालना

बायपास रोडवर १०० किलोमीटचा रस्ता खोदून ठेवण्यात आलेला आहे. या रस्त्याचे पुढील काम कधी होणार आहे ? या रस्त्याच्या कामाकरिता दुसरा ठेकेदार नेमण्याची शासनाची तयारी नाही. या रस्त्याच्या कामाची सद्यस्थिती कळविण्याचे निदेश समितीने दिले. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी जालना-देऊळगावराजा या संपूर्ण रस्त्याच्या बांधकामाचे व देखभाल दुरुस्तीचे केंद्र व राज्य शासनाचे असे मिळून एक पॅकेज असल्याचे समितीस सांगितले.

सदरहू रस्त्याचे काम ज्या ठेकेदाराला देण्यात आले होते ? त्या ठेकेदाराने कोणत्या बँकेबरोबर फायनान्शियल सप्लाय फिक्स करुन ॲग्रीमेंट केले होते. सदरहू ॲग्रीमेंट समितीला तपासणी करण्याकरिता पाहिजे असे समितीने सुचित केले असता, या अनुषंगाने माहिती देताना विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला की, सदरहू रस्त्याचे काम प्रलंबित असल्यामुळे सदरहू बँक गॅरंटी आणि ॲग्रीमेंटच्या अनुषंगाने दुसरा उद्योजक हे काम हाती घेण्याकरिता पुढे येत आहे. या संदर्भातील कागदोपत्री कामकाज पूर्ण झालेले आहे. सदरहू रस्त्याच्या कामाचे ॲग्रीमेंट स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेबरोबर करण्यात आले होते.

पुणे - मुंबई पूर्व द्रुतगती मार्गावरही अनेक अपघात होऊ लागलेले आहेत. या महामार्गाचे काम केलेल्या ठेकेदाराचे आणि विभागाचे ॲग्रीमेंट खरोखर तपासण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. या महामार्गाचे काम आयआरबीकडे सोपविण्यात आलेले होते. हा महामार्ग क्रॉस करीत असतांना आजुबाजूच्या गावातील स्थानिक रहिवासी भरधाव गाडयांच्या धडकेमुळे मृत्युमुखी पडलेले आहेत. पुणे-मुंबई या महामार्गावर अल्कोहोलिक डिटेक्टर्स, रोड सेफ्टी, हायवे पोलिसांची जबाबदारी या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज आहे. तसेच, महामार्गामध्ये रिलॅक्स स्टेशन्स, मेडीकल फॅसिलिटीज, ट्रॉमा केअर सेंटर्सच्या योग्य सेवेची उपलब्धतता, याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. महामार्गावर योग्य ठिकाणी रिफ्लेक्टर्सही नसल्याचे आढळून आलेले आहे. या महामार्गावर जनावरे फिरत असतात, त्यांना वाचवित असतांना अनेक अपघात होतात. अथवा जनावरे मध्ये आल्यामुळे त्यांचाही मृत्यू होतो. महामार्गाचे बांधकाम करीत असतांना ठेकेदाराची देखभाल व दुरुस्तीसंदर्भात असलेली जबाबदारी तसेच, वाहतूक पोलिसांची भूमिका पुन्हा नव्याने आखण्याची गरज आहे. समितीला पुणे-मुंबई हायवेच्या कामाचे ॲग्रीमेंट पाहावयाचे आहे. महामार्गावरील काही भाग नादुरुस्त

असल्यामुळे गाडयांचे टायर्स फुटतात. टायर्स ब्लास्ट झाल्यामुळेही अनेक अपघातांना तोंड द्यावे लागते. या सर्व अनेक कारणांमुळे पुणे - मुंबई महामार्गावरील असुरक्षितता वाढत चालली असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. नागपूर, वर्धा, यवतमाळ या महामार्गावर एकूण दोन ते तीन टोल वसूली केंद्रे आहेत. या टोल प्लाझांची मुदत अनुक्रमे ७-१०-५ अशी आहे. सदरहू टोलवसूलीची कालमर्यादा ही बांधकाम खर्च व देखभाल दुरुस्ती खर्च या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेली होती. हे महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सौजन्याने बांधण्यात आलेले आहेत. याकरिता केंद्र व राज्य शासनानेही निधी पुरविलेला आहे. परंतु राज्य शासनाने या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी कोणावर कशाप्रकारे टाकलेली आहे. या रस्त्यांच्या सायनेजची परिस्थिती काय आहे ? या संदर्भातील माहिती समितीला विदित करणे आवश्यक आहे. महामार्गाची बांधणी करीत असतांना केवळ टोल प्लाझा बांधण्याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असते टोल प्लाझा बरोबरच मेडीकल फॅसिलिटीज शेड्स, ॲम्ब्यूलन्स, हेल्पलाईन नंबर्स, या सर्व गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. रोडचे बांधकाम करीत असतांना आवश्यक असणा-या गोष्टींच्या पुर्ततेबाबत स्पेसिफिक गाईडलाईन्स विभागाने नव्याने आखणे व त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचेही मत समितीने व्यक्त केले.

यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, वर्धा-यवतमाळ बायपास रोड हा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने बांधलेला आहे. त्यानंतरचा रोड हा सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेला आहे. देवळी - सालोड हा रोड बीओटी पॅकेजच्या माध्यमातून बांधण्यात आलेला आहे. केळझर- देवळी हा पूर्ण रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बांधलेला असून त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारीही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने स्वत:कडे घेतलेली आहे.

पुणे - सातारा - खानापूर या रस्त्यावरील टोल नाक्यावर टोल देण्यावरुन जी भानगड झाली होती, त्याची पुनरावृत्ती होता कामा नये. मंत्री महोदय, आमदार, खासदार, यांच्या गाडीचे व्ही.आय.पी.नंबर्स जरी टोल प्लाझावर दिले असले तरीही प्रत्येक वेळी व्ही.आय.पी. संबंधित नंबर्सच्याच गाडीतून येतील असे नाही. विधानसभा सदस्य व इतर सदस्यांना ठराविक बॅचेस जर देण्यात आले, तर अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.

टोल प्लाझावरील कर्मचारी प्रत्येक वेळी नवीन व कमी शिकलेले असल्यामुळे त्यांना काही तांत्रिक बाबी कळत नाहीत. तसेच, महाराष्ट्राच्या विधानमंडळाविषयी व त्यामध्ये काम करणाऱ्या सदस्यांविषयी कोणतीही कल्पना नसते. टोल प्लाझावर ठराविक नंबर्सच्या गाडयांना टोलमधून सूट देण्यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत. या सर्व अडचणींचा आढावा घेऊन त्या संदर्भात प्रभावी असा उपाय योजण्याकरिता काही कालावधीची आवश्यकता असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

अभिप्राय व शिफारशी

समितीला प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

बीड येथील उड्डाण पुल जेथे बांधावयाचा आहे तो रस्ता केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. तेथे केंद्र शासनाची एजन्सी काम करीत आहे असे असतानाही MSRDC ने उड्डानपूलाचा प्रस्ताव आणला होता. मात्र यासाठी कोणत्याही प्रकारची वा महाराष्ट्र शासनाची परवानगी घेतलेली नाही. सदरहू काम २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्यामुळे पायाभूत सुविधा समितीची देखील परवानगी घेतलेली नाही. असे असतानाही ६० कोटी रुपयांचे टेंडर काढले पण ते रद्द केले. त्यानंतर दुसऱ्या वेळेला ९७ कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले आणि तेही रद्द केले. जे काम ३० ते ३५ कोटी रुपयांमध्ये झाले असते त्याचा खर्च आता ९७ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे पण त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद नाही. यासाठी बोर्ड ऑफ डायरेक्टर यांनी कामाला मान्यता देऊन त्यासाठी टेंडर काढण्याकरता परवानगी दिलेली आहे.मात्र याबाबतीत दोन-तीन वेळा अंदाजपत्रक बदलण्यात आले, आणि कामाचा स्कोप बदलण्यात आला.

जेथे पुल बांधायचा आहे तो रस्ता केंद्र शासनाच्या अंतर्गत येतो. राष्ट्रीय महामार्ग २११ आहेत आणि ते केंद्रिय परिवहन मंत्री महोदयांच्या अधिपत्याखाली आहेत आणि आता ते राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरीत झाले आहेत. आता त्याठिकाणी चौपदरी रस्ता व बायपास करण्याची प्रक्रिया पूर्ण होत आली असून अजून केंद्र शासनाची त्यासाठी पूर्णपणे संमती मिळालेली नाही.

या कामासाठी केंद्र शासनाची तसेच महाराष्ट्र शासनाची मान्यता नाही. जर एखाद्या कामासाठी २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार असेल तर सदरहू काम पायाभूत समितीकडे मान्यतेसाठी पाठविले जाते. मात्र अजून सदरहू काम पायाभूत समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित केलेले नाही व बीड येथील राष्ट्रीय महामार्गावर पुल बांधण्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला टेंडर काढण्याची घाई झालेली होती. प्रशासनामध्ये काम करण्याच्या काही पध्दती आहेत. कोणतेही महामंडळ असले तरी तो शासनाचा अनुषंगिक एक भाग आहे. शासनाने काम करीत असताना जे नियम किंवा संकेत तयार केलेले असतात ते पायदळी तुडवले जातात. लोकप्रतिनिधींना बजेटेड कामे आहेत व त्यासाठी ते आग्रही असतात. कारण बजेट पास झाल्यानंतर त्याअनुषंगाने पुढील कामे करता येतात. राज्य आणि केंद्र शासनाचे नियम नसताना, आर्थिक तरतूदी नसताना तसेच पायाभूत सुविधा समितीची परवानगी नसताना, कोणत्याही नियमात बसत नसताना अधिकाऱ्यांनी या सर्व प्रकरणात हलगर्जीपणा दाखविला आहे. **त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची पूर्ण चौकशी करुन जे अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरूद्ध कारवाई करुन त्याची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी तसेच या सर्व प्रकरणात जर काही आर्थिक नुकसान झाले असेल तर ते कसे भरुन काढता येईल त्याची जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे.**

पुल बांधण्यापूर्वीची जी प्रक्रिया असते त्या प्रक्रियेतील एकही तरतूद पूर्ण केलेली नाही हे मान्य करण्यात आले आहे आणि ही बाब गंभीर आहे. ज्याला जसे पाहिजे तसे संबंधितांनी आदेश दिले आहेत. या कामासाठी कोणतीही मान्यता नसताना टेंडर काढण्यात आले, जो खर्च करण्यात आला तो शासनाच्या तिजोरीवर भार पाडला नसला तरी ही टेंडरदाराची फसवणूक आहे. प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी टेंडर काढणे ही संबंधित अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा आहे व बीड येथील पुलाबाबत दोन वेळा टेंडर काढण्यास जे जबाबदार आहेत त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे एकूण किती प्रकल्प आहेत, त्यासाठी शासनाने किती निधी देण्याचे मान्य केले होते, त्यापैकी किती निधी शासनाने दिला आहे, शासनाने निधी न दिल्यामुळे महामंडळाने मार्केटमधून किती कर्ज उभारले आहे, त्याचा व्याजदर

किती आहे व यात गुंतलेली एकूण रक्कम किती आहे तसेच अशा प्रकारचे बेकायदेशीर प्रकल्प आणखी कुठे MSRDC ने ह्यामध्ये घेतले गेले आहेत या संबंधीची विस्तृत माहितीची मागणी समितीने करुन ही माहिती प्राप्त झाली नाही. सदरहू माहिती समितीला तातडीने देण्यात यावी. हमी शुल्कासाठी महामंडळास आकारण्यात येणारा २४ टक्के व्याजाच्या दराबाबत पुनर्विचार करुन योग्य तो व्याज दर आकारण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ रस्ते तयार करते त्याबदल्यात टोल टॅक्स वसूल केला जातो, परंतु त्यासाठी असलेल्या अटींची पूर्तता मात्र केली जात नाही. रस्त्यावरुन रोज किती गाड्यांची ये-जा होते, टोल नाक्याची अंतिम मुदत किती आहे, आतापर्यंत किती पैसे वसूल झाले आणि किती बाकी असून ते कधी पर्यंत वसूल होतील इ. माहिती तेथील फलकावर लावणे आवश्यक आहे. ही माहिती फलकावर लावण्यात येत नाही. टोल नाक्याच्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले लावण्यासाठी एजन्सी निश्चित करण्यात आली नाही. या फलकावर १३-१४ मुद्यांची माहिती १५ दिवसात लावण्याचे समितीला आश्वासित करुनही अद्याप कार्यवाही झाली नाही. याप्रकरणी तातडीने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जुलै, २००९ ला सार्वजनिक बांधकाम विभागाने टोल पॉलिसी केली त्यामध्ये टोल नाक्यांचा ५ किलोमीटरच्या परिघामध्ये जेवढी गावे असतील त्या गावातील लोकांना टोलमध्ये सुट दिली. महिन्याला जेवढा टोल लागतो त्याचे १० टक्के द्यावयाचे आहेत. टोल नाक्याच्या आसपासच्या पाच किलोमीटरच्या परिसरामधील रहिवाशांना महिन्याच्या टोल पासच्या एकूण रकमेच्या केवळ दहा टक्के रक्कम अदा करावी लागेल, अशा प्रकारचा शासन निर्णय सन २००९ मध्ये निर्गमित करण्यात आला आहे. **टोल नाक्याजवळील हे पाच किलोमीटरच्या परिसरामध्ये राहत असलेल्या रहिवाशांना संबंधित शासन निर्णयाच्या तरतुदी अंतर्गत असलेली अट लवकरात लवकर लागू करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

टोलची मुदत संपल्यानंतरही सर्रासपणे वाहनधारकांकडून टोल वसूल केला जात आहे. वसूल केलेल्या टोलच्या माध्यमातून कराराप्रमाणे रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीही करण्यात येत नाही. खामगाव-जालना बायपास लिंक रोड येथील टोलची मुदत संपल्यानंतरही संबंधित ठेकेदाराला चार वर्षांची मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. **टोल**

वसुलीच्या काळामध्ये सदरहू ठेकेदाराने संबंधित रस्त्याची कोणत्याही प्रकारची देखभाल व दुरुस्ती केलेली नाही. खामगांव - जालना बायपास लिंक रोडची अवस्था अतिशय वाईट असून तेथे अपघातांची संख्या वाढत आहे. त्यामुळे टोल ठेकेदारांना मुदतवाढ देताना रस्त्याची देखभाल करण्यात आली आहे किंवा नाही, शासनाचे निकष पाळण्यात आले आहे किंवा नाही या सर्व बाबींचा टोल ठेकेदारीला मुदतवाढ देण्यापूर्वी गांभिर्याने विचार करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

पुणे - मुंबई पूर्व द्रुतगती मार्गावरही अनेक अपघात होऊ लागलेले आहेत. हा महामार्ग क्रॉस करीत असतांना आजुबाजूच्या गावातील स्थानिक रहिवासी भरधाव गाडयांच्या धडकेमुळे मृत्युमुखी पडलेले आहेत. पुणे-मुंबई या महामार्गावर अल्कोहोलिक डिटेक्टर्स, रोड सेफ्टी, हायवे पोलिसांची जबाबदारी या सर्व गोष्टींकडे लक्ष देण्यात आले नाही. तसेच, महामार्गामध्ये रिलॅक्स स्टेशन्स, वैद्यकीय सुविधा, ट्रॉमा केअर सेंटर्सच्या योग्य सेवेची उपलब्धतता, याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. महामार्गावर योग्य ठिकाणी रिफ्लेक्टर्सही नसतात. या महामार्गावर जनावरे फिरत असतात, त्यांना वाचवित असतांना अनेक अपघात होतात. अथवा जनावरे मध्ये आल्यामुळे त्यांचाही मृत्यू होतो. महामार्गाचे बांधकाम करीत असतांना ठेकेदाराची देखभाल व दुरुस्तीसंदर्भात असलेली जबाबदारी तसेच, वाहतूक पोलिसांची भूमिका पुन्हा नव्याने आखण्याची गरज आहे. महामार्गावरील काही भाग नादुरुस्त असल्यामुळे गाडयांचे टायर्स फुटतात. टायर्स ब्लास्ट झाल्यामुळेही अनेक अपघातांना तोंड द्यावे लागते. या सर्व अनेक कारणांमुळे पुणे - मुंबई महामार्गावरील असुरक्षितता वाढत चालली असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. **महामार्गाची बांधणी करीत असतांना केवळ टोल प्लाझा बांधण्याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असते टोल प्लाझा बरोबरच वैद्यकिय सुविधा, ॲम्ब्यूलन्स, हेल्पलाईन नंबर्स, या सर्व गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच महामार्गावर गाडी बंद पडली किंवा वाहकाल गाडी थोडा वेळ थांबवायची असेल तर किमान १० ते २० कि.मी. दरम्यान रस्त्याच्या लगत थोडे बांबण्यासाठी आरक्षीत जागा ठेवावी. रस्त्याचे बांधकाम करीत असतांना आवश्यक असणाऱ्या गोष्टींच्या पुर्ततेबाबत निश्चित मार्गदर्शक तत्वे विभागाने नव्याने आखून त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

पुणे - सातारा - खानापूर या रस्त्यावरील टोल नाक्यावर टोल देण्यावरुन जो वाद निर्माण झाला होता त्याची पुनरावृत्ती होता कामा नये. मंत्री महोदय, आमदार, खासदार, यांच्या गाडीचे व्ही.आय.पी.नंबर्स जरी टोल प्लाझावर दिले असले तरीही प्रत्येक वेळी व्ही.आय.पी. संबंधित नंबर्सच्याच गाडीतून येतील असे नाही. टोल प्लाझावरील कर्मचारी बदलत असल्याने व कमी शिकलेले असल्यामुळे त्यांना बऱ्याच गोष्टीचे ज्ञान नसते त्यामुळे त्यांना विधानमंडळ सदस्य व लोकप्रतिनिधी यांच्यासाठी कसे वागावे, बोलावे, त्यांच्याशी आचरण कसे असावे याबाबत प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. टोल प्लाझावर ठराविक नंबर्सच्या गाडयांना टोलमधून सूट देण्यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत. या सर्व अडचणींचा आढावा घेऊन त्या संदर्भात प्रभावी अशी उपाययोजना करुन नवीन मार्गदर्शक सूचना राज्यातील सर्व टोल नाक्यांना देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील परिच्छेद क्र. ७.३ "हमी शुल्काची वसुली न करणे" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

हमी शुल्काची वसुली न करणे

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २९३ अन्वये राज्य शसनाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कर्जे देणाऱ्या विविध संस्था/रोखेधारक यांना कर्जाची रक्कम/गुंतवणुका आणि त्यावरील व्याजाचे प्रदान यासाठी कर्जे मिळविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधिच्या तारणावर राज्य शासन हमी देते. अशी हमी राज्याकरिता घटनासापेक्ष दायित्व ठरते. वित्त विभागाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ च्या शासन निर्णयानुसार हमी शुल्काची वसुली करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची आहे.

दिनांक १८ नोव्हेंबर १९८८ आणि १५ एप्रिल १९९७ च्या शासन निर्णयानुसार हमी शुल्काचे दर प्रतिवर्षी ०.५० ते २ प्रतिशत होते. ३१ मार्च आणि ३० सप्टेंबर अखेरीस अदत्त रकमेवरील हमी शुल्क प्रतिवर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबर रोजी ऋणको महामंडळांनी/संस्थांनी शासकीय खात्यात जमा करावयाचे असते. हमी शुल्काची विलंबाने प्रदान केल्यास पहिल्या तीन महिन्यासाठी प्रतिवर्षी १६ टक्के व त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दंडनीय व्याज देय आहे.

शासकीय हमीवर आधारीत रोखे आणि कर्जाद्वारे निधी उभारणाऱ्या तीन प्रशासकीय विभागांच्या अंतर्गत सहा पालिकांच्या दस्ताऐवजांचे विस्तृत विश्लेषण केले असता असे आढळून आले की, एप्रिल २००६ ते मार्च अ२००८ या काळात देय असलेले हमी शुल्क महामंडळानी प्रदान केले नव्हते. देय रक्कम वसूल करण्यासाठी प्रशासकीय विभागांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. परिणामी जोडपत्र-III मध्ये दर्शविल्याप्रमाणे हमी शुल्क आणि दंडनीय व्याज यांच्या एकूण रु. १४४.०६ कोटीची वसूली झाली नाही.

ही बाब मे २००८ मध्ये शासनाला कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८).

जोडपत्र III

हमी शुल्क आणि दंडनीय व्याजाची वसुली दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	विभागाचे नाव	हमीची रक्कम	हमीचा प्रदानाचा नियत दिनांक	रक्कम		
				हमी शुल्क	दंडनीय व्याज	एकूण
१	पाटबंधारे					
१.	महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे (रोखे मालिका क्र. २००३/अ)	४१२.३३	१ फेब्रुवारी २००३ एप्रिल २००६ ते एप्रिल २००८	१७.४०	४.८६	२२.२६
२.	गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद (रोखे मालिका क्र. VI)	३६.०६	१४ फेब्रुवारी २००३ १ फेब्रुवारी २००३ एप्रिल २००६ ते एप्रिल २००८	१.५२	०.४२	१.९४
३.	विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर (रोखे मालिका क्र. VIII)	१७.२९	७ फेब्रुवारी २००३ एप्रिल २००६ ते एप्रिल २००८	०.७२	०.२०	०.९२
४.	कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे (रोखे मालिका क्र. VI)	८५.४८	१ फेब्रुवारी २००३ एप्रिल २००६ ते एप्रिल २००८	३.६०	१.०१	४.६१
	एकूण	**५५१.१६**		**२३.२४**	**६.४९**	**२९.७३**

ज्ञापन :

उपरोक्त महालेखापरिक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामधे खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

मा.राज्यपाल महोदयांच्या आदेशानुसार महामंडळाना स्वतंत्रपणे कर्जरोख्यांची उभारणी करण्याची परवानगी नाकारण्यात आली. महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनीमार्फत उभारण्यात येणाऱ्या रोख्यांना अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याने व शासनाकडून पूर्णपणे अंशदान मिळत नसल्याने महामंडळांनी शासन हमी भरण्याबाबत असमर्थता दर्शविली होती. तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००४ (२०२/२००४)/जसंनि दि. २८.६.२००४ अन्वये सिंचन व्यवस्थापन हा विषय शासनाने महामंडळाकडून काढून घेवून शासनाकडे ठेवला आहे. त्यामुळे पाणीपट्टीद्वारे वसुल होणारी रक्कम शासनाकडे जमा करण्यात येत आहे. अशाप्रकारे महामंडळांना शासनाकडून मिळणाऱ्या निधीव्यतिरिक्त उत्पन्नाचे अन्य साधन शिल्लक राहीलेले नाही. यास्तव

पाचही महामंडळांनी हमी शुल्क व त्यावरील दंडनिय व्याज माफ करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केले होते. त्या पार्श्वभूमीवर पाचही महामंडळांनी दंडनिय व्याजासह हमी शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव काही वर्षे शासनाच्या विचाराधीन होता. तथापि हमी शुल्क व दंडनिय व्याजाची एवढी मोठी रक्कम माफ करणे उचित होणार नाही असे आढळून आल्याने दिनांक ३१ मार्च, २००९ पर्यंतचे पाचही महामंडळाकडील सर्व प्रलंबित हमी शुल्क व दंडनिय व्याजापोटी रुपये ३,४३,२३५.९८ लक्ष रक्कम शासनाकडे खालीलप्रमाणे जमा करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	**महामंडळाचे नाव**	**रक्कम (रुपये)**
१.	महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे	१९६८,६७,५७,०००/-
२.	विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	५३३,०३,११,०००/-
३.	कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे	१३०,८६,०९,०००/-
४.	तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	३५४,२३,७६,०००/-
५.	गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद	४४५,५५,४५,०००/-
	एकूण	**३,४३,२३५.९८ लक्ष**

साक्ष :-

लोकलेखा समितीने दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ रोजी "हमी शुल्काची वसुली करणे" या परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याच्या उद्दिष्टे, शासनाकडून मिळणा-या निधी व्यतिरिक्त त्यांची उत्पन्नाची असणारी अन्य साधने आणि सद्य:स्थितीत राज्य शासनाने महामंडळाचे नियमित खर्चाचे दायित्व स्वीकारले असल्यास ते कोणते व ते का स्विकारले या विषयी माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, राज्यामध्ये सन १९९६ ते १९९८ या कालावधीत पाच पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना झाली. कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना १९९६ मध्ये झाली. गोदावरी पाटबंधारे महामंडळ सन १९९८ मध्ये स्थापन झाले. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ सन १९९७ मध्ये स्थापन झाले. तापी खोरे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ डिसेंबर १९९७ मध्ये स्थापन झाले. या महामंडळांचे सर्वात महत्वाचे काम म्हणजे पाटबंधारे विभागातील प्रकल्प मार्गी लावणे होय. या महामंडळामार्फत लवादाच्या निर्णयानुसार पाणी अडवून प्रकल्पाची कामे पूर्ण करावयाची आहेत. तापी खोरे विकास

महामंडळाअंतर्गत खानदेश आणि उत्तर महाराष्ट्र हा भाग येतो. गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळात मराठवाडा, नाशिक व अहमदनगर जिल्ह्याचा काही भाग येतो.

गोदावरी खोऱ्यामध्ये नाशिक जिल्ह्याचा काही भाग येतो. तापी खोरे विकास महामंडळामध्ये जळगाव, धुळे, नंदूरबार, नाशिक हे जिल्हे येतात. या पाचही महामंडळांना शासनाकडून निधी मिळतो. दुसरे म्हणजे निधी उभारण्यासाठी विविध स्वरुपाच्या बॉन्डच्या माध्यमातून पैसा उभा केला जात होता आणि तिसरे उत्पन्नाचे साधन म्हणजे पाणी विभागातून जी पाणीपट्टी वसुल केली जाते, त्यातून उत्पन्न मिळते. उत्पन्नाचे हे या महामंडळाचे स्त्रोत आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९९६ मध्ये कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाची स्थापना झाली. सन २००० सालापर्यंत ५९४ टीएमसी पाणी अडवायला हवे होते. ५९४ टीएमसी पाणी आतापर्यंत अडविण्यात आले आहे का? याअनुषंगाने विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कृष्णा पाणी तंटा लवादाने सन १९७६ साली दिलेल्या निर्णयास अनुसरुन संबंधित भागांमध्ये कामे सुरु होती. त्यानंतर दुसरा पाणी तंटा लवादाचे कामकाज सुरु झाले. या कृष्णा पाणी तंटा लवादाने दिलेल्या अंतरीम निवाड्यावर तीनही राज्याचे स्पष्टीकरण मागितले असून त्यावर सुनावणी चालू आहे. अद्याप दुसऱ्या लवादाचा अंतिम निर्णय व्हावयाचा आहे. पहिल्या लवादाने दिलेल्या निर्णयानुसार आपल्या वाट्याला पाणी आले आहे त्यात ५६० टीएमसी पाणी अधिक २५ टीएमसी पाणी पुनर्उद्भवाद्वारे असे एकूण ५८५ टीएमसी अनुज्ञेय होते. या व्यतिरिक्त १४ टीएमसी पाणी आंध्रप्रदेशच्या पोलावरम प्रकल्पामुळे एकूण ५९९ टीएमसी पाणी अनुज्ञेय होते. पहिल्या लवादाने अनुज्ञेय केलेल्या पाणी वापरासाठी ५६० टीएमसी पाणी साठा निर्माण करावयाचा आहे. आता केवळ ५४० टीएमसी पाणीसाठा निर्माण झाला आहे. उर्वरित जे मध्यम प्रकल्प आहेत त्यांच्यासाठी पाणीसाठा निर्माण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

कृष्णा खोरे प्रकल्पाचे पाणी मराठवाड्यातील आष्टी व इतर काही तालुक्यापर्यंत अद्यापही पोहोचलेले नाही. एकीकडे पाणी अडविण्याचे काम पूर्ण झाले आहे असे म्हटले जाते. परंतु दुसरीकडे मात्र इतर तालुक्यात पाणी आलेले नाही. ही एक प्रकारची विसंगती आहे. तसेच कृष्णा खोरे प्रकल्पाचे २२ टीएमसी पाणी अद्यापपर्यंत का पोहचले नाही याबाबत

समितीने विचारणा केली असता, पाणीसाठा आणि पाणीवापर या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. लवादाचा जो निर्णय होता त्या अनुषंगाने जो पाणीसाठा निर्माण झाला त्याची आकडेवारी समितीला देऊन पाणी वापराच्या बाबतीत कृष्णा खोऱ्याच्या विविध भागांमध्ये, मराठवाडा भागात कामे प्रगतिपथावर असून ती पुढीलप्रमाणे असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत १११ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. पूर्ण व बांधकामाधीन प्रकल्पांद्वारे एकूण ५६० अ.घ.फू. इतका पाणीसाठी तसेच २१.५८ लक्ष हे. इतके सिंचनक्षेत्र (ICA) निर्माण करणे प्रस्तावित आहे. त्यापैकी जून २०१२ अखेर ५४४.३४ अ.घ.फू. इतका पाणीसाठा व १५.३८ लक्ष हे. इतके सिंचनक्षेत्र निर्माण झाले आहे. सद्य:स्थितीत १५.६६ अ.घ.फू. पाणी साठा व ६.२० लक्ष हे. इतके सिंचन क्षेत्र (ICA) निर्माण करणे बाकी आहे.

प्रकल्पांची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे रु. १६४३४ कोटी इतक्या रकमेची आवश्यकता आहे.

मा.राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत दरवर्षी साधारणपणे प्रकल्पांचे कामासाठी रु. १००० कोटी इतक्या निधीची तरतूद होते. निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजनेची कामे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामार्फत प्रगतीपथावर असून माहे नोव्हेंबर २०१२ अखेर झालेला खर्च रु. ४८५.४५ कोटी इतका आहे. प्रकल्पांतर्गत उर्वरित कामांची अंदाजित किंमत रु. ४३५९.६० कोटी एवढी आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मराठवाडा हैद्राबाद राज्यातून मुंबई राज्यात आणि मुंबई राज्यातून महाराष्ट्रात सामील झाल्यापासून मराठवाड्यातील लोकांचा असा अनुभव आहे की, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील लोक सातत्याने मराठवाड्यावर अन्याय करीत आलेले आहेत. आपण तिकडे पाणी साठवून ठेवलेले आहे पण मराठवाड्याला पाणी मिळत नाही. मराठवाड्याला पाणी का मिळत नाही याचे उत्तर मिळत नाही. २०१२ चा पावसाळा सुरु झाल्यापासून जायकवाडी धरणामध्ये एक थेंब सुध्दा पाणी येऊ दिले नाही. हा अन्याय आहे. २००५ मध्ये शासनाने कायदा केला, प्राधिकरण निर्माण केले. त्या कायद्याप्रमाणे २०१२ च्या पावसाळ्यामध्ये

जायकवाडी धरणामध्ये २००५ च्या कायद्याप्रमाणे २७ टीएमसी पाणी यावयास पाहिजे होते पण ते आलेले नाही. मराठवाड्यावर अन्याय होत असल्याची भावना मराठवाड्यातील लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यात १४ मध्यम आणि ५ मोठी धरणे आहेत. ही धरणे ७० टक्के, ८० टक्के, १०० टक्के भरलेली आहेत. विभागाने धोरणामध्ये बदल करुन खाली पाणी येऊ दिले नाही. अनियमित पावसामुळे पुढच्या काळात राज्यामध्ये अनेक प्रश्न निर्माण होणार आहेत. नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील १४ धरणे भरलेली आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये सहा-सात धरणे आहेत. या वर्षी १०० टक्के पाण्याचा साठा झालेला नाही. काही धरणात ८० ते ९० टक्के पाण्याचा साठा झाला. दरवर्षी पडणारे पावसाचे जे पाणी आहे त्याचे समन्यायी वाटप करावयाचे असेल तर ज्यावेळी पावसाळा सुरु होतो त्यावेळी एक धरण १०० टक्के भरेपर्यंत थांबून नंतर त्यातील पाणी कॅनॉल किंवा नदीतून खालच्या धरणाला गेले पाहिजे. जायकवाडीमध्ये पाण्याची पातळी उणे ३८ पर्यंत खाली गेली. पाऊस पडला परंतु वरच्या भागातील धरणात पाणी अडविले पण खालच्या भागातील धरणांचा विचार केला नाही. त्यामुळे या बाबतीत विभागाला धोरण ठरवावे लागेल. तसेच मराठवाड्यामध्ये पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सहा दिवस पाणी त्या भागामध्ये थांबले होते. ३ लाख क्युसेक्स पाणी पैठणला येईपर्यंत दीड लाख क्युसेक्स आले. मराठवाड्यामध्ये फार मोठे नुकसान झालेले आहे. नुकसान होत असेल तर ते मराठवाड्याने सहन करावयाचे आणि चांगले काही होत असेल तर त्याचा फायदा नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्याने घ्यावयाचा हे बरोबर नाही. १५ सप्टेंबरच्या अगोदर कोणत्याही धरणामध्ये ७० टक्केपेक्षा जास्त पाणी साठवू नये असे शासनाचे धोरण आहे की नाही याबाबत समितीने विचारणा केली असता यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, वरच्या धरणामधून जायकवाडी धरणामध्ये पाणी सोडावे या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये एक जनहित याचिका दाखल झालेली आहे. दिनांक २९ ऑक्टोबर, २०१२ रोजी न्यायालयामध्ये त्यावर सुनावणी झाली तसेच दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ रोजी सुध्दा त्या याचिकेवर सुनावणी आहे ही बाब न्यायालयात आहे. विशेषत: वरच्या धरणातील पाणी खालच्या धरणामध्ये सोडण्याबाबतचा विषय त्यामध्ये आहे. समितीने जो मुद्दा उपस्थित केला तशी परिस्थिती जेव्हा असते त्याबाबतचा मुद्दा या प्रकरणामध्ये आहे. ही जनहीत याचिका या वर्षीच्या पावसाळ्यात

(सन २०१२) पावसाच्या दुर्भिक्षामुळे जायकवाडी धरणात अत्यल्प पाणीसाठा झाल्याने जायकवाडी धरणाच्या उर्ध्व भागातील १) दारणा २) गंगापूर ३) निळवंडे-भंडारदरा ४) प्रवरा ५) मुळा या पाच उप खोऱ्यातून पाणी सोडण्याबाबत मराठवाडा जनता विकास परिषद, औरंगाबाद यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. १००/१२ दिनांक १६.१०.२०१२ रोजी दाखल केलेली आहे. याबाबत दिनांक ३० ऑक्टोबर २०१२, ०३ डिसेंबर २०१२, १९ डिसेंबर २०१२ व ८ जानेवारी २०१३ रोजी सुनावणी झालेली आहे. अद्यापी मा. न्यायालयाचा अंतिम निर्णय झालेला नाही. जायकवाडी धरणात उर्ध्व भागातील भंडारदरा व निळवंडे धरणातून दिनांक २१.२०.२०१२ ते १७.१०.२०१२ या कालावधीत २.२८ अ.घ.फू. पाणी सोडले. त्यापैकी पैठण धरणात १.११ अ.घ.फू. पाणी प्राप्त झाले आहे.

दि. २१.११.२०१२ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी औरंगाबाद विभाग पाणी विषयक बैठक मुंबई येथे झाली. बैठकीतील निर्णयास अनुसरुन दिनांक २८.११.२०१२ पासून दिनांक १३.१२.२०१२ रोजी पर्यंत एकूण ८.२५ अ.घ.फू. पाणी उर्ध्व धरण समूहातून सोडण्यात आले. त्यापैकी जायकवाडी धरणात प्रत्यक्षात सर्व वहन व्यय वजा जाता ५.४१ अघफू पाणी प्राप्त झाले आहे. त्यामुळे औरंगाबाद शहर पिण्यासाठी, औरंगाबाद औद्योगिक पाणीपुरवठा घरगुती वापरासह जालना-अंबड व गेवराई योजनेसाठी पिण्याचे पाणी पुरवठा तसेच जलाशयावरील २०५ गावे यांचेसाठी जुलै २०१३ पर्यंत पाणी उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

जायकवाडी धरणाच्या उर्ध्व बाजुकडील धरणात साठणाऱ्या पाण्याचा योग्य प्रकारे वाटप होण्याच्या दृष्टीने खरीप हंगामातील पाण्याची निकड, बाष्पीभवन तसेच वहनव्यय इ. विचारात घेऊन मार्गदर्शक तत्वे तयार करण्याच्या दृष्टीने महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांचा अभ्यासगट गठीत करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच समन्यायी वाटपाचे तत्व आहे परंतु १५ सप्टेंबरला ७० टक्के धरण भरले असले पाहिजे असा स्पेसिफिक उल्लेख नाही. वरच्या भागामध्ये जो पाऊस पडतो तो जून महिन्यापासून सुरु होतो. बऱ्याचवेळा दुष्काळी भागामध्ये काही ठिकाणी परतीचा पाऊस पडतो. एखादे धरण भरल्यानंतर पुढे कार्यवाही करावी किंवा समिती म्हणते त्याप्रमाणे ७० टक्के धरण भरल्यानंतर पुढील कार्यवाही करावी तसा उल्लेख नाही. या बाबतीत समन्यायी वाटपाचे तत्व आहे असा

खुलासा विभागीय सचिवांनी समिती समोर केला. तसेच सध्याचे जे कार्यकारी संचालक आहेत त्यांच्याकडून तसेच आता कार्यरत असलेले मुख्य अभियंता श्री. लोखंडे यांच्याकडून माहिती घेऊन समितीला यासंदर्भात माहिती सादर करण्यात येईल असे आश्वासित केले.

दि. १५ सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रातील कोणत्या धरणामध्ये किती पाणीसाठा असला पाहिजे हे ठरले आहे. दि. १५ सप्टेंबरपूर्वी जो पाऊस पडला असेल ते पाणी खाली सोडले गेले पाहिजे असे धोरण ठरले असेल तर ते सांगण्यामध्ये अडचण नाही. जे नियम आहेत, जे कायदे आहेत ते सांगण्यामध्ये न्यायालयाचे काहीही बंधन नाही. त्यावेळी असे धोरण ठरले असेल तर त्याची माहिती देण्यास समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, राज्यामध्ये १९७६ चा पाटबंधारे कायदा आहे. २००३ मध्ये राज्याने स्वत:ची जलनीती स्वीकारली. त्या अनुषंगाने राज्यामध्ये महाराष्ट्र वॉटर रिसोर्स रेग्युलेटरी ॲथॉरिटी स्थापन करण्याचा कायदा व शेतकऱ्यांकडून सिंचन व्यवस्थापन करण्याचा कायदा असे दोन नवीन कायदे केले. हे दोन्ही कायदे सन २००५ मध्ये झाले. या तीनही कायद्यांच्या अनुषंगाने आपले पाणी व्यवस्थापनाचे काम सध्या चालू आहे. एमडब्ल्यूआरआरए हा कायदा २००५ साली झाला त्यानंतर त्या कायद्यामध्ये काही दुरुस्त्या झाल्या. कायद्यामध्ये झालेल्या दुरुस्त्या आणि मूळ कायदा या संदर्भातील बाब न्यायालयासमोर असल्याचे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. समितीने जे सांगितले त्या अनुषंगाने समन्यायी वाटप तसेच हेड-रीच, मिडल-रीच तसेच टेल-रीचच्या बाबतीत कायद्यामध्ये तरतूद आहे. अंमलबजावणीच्या संदर्भातील मुद्दा न्यायालयासमोर आहे.

लवादाच्या निर्णयाप्रमाणे आतापर्यंत गोदावरील खोऱ्यातील किती पाणी अडवू शकलो आणि किती पाणी उपलब्ध आहे ? न अडविलेले किती पाणी आंध्र प्रदेशमध्ये वाहून जाते याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी पुढील माहिती समितीस दिली.

गोदावरी खोऱ्यातील गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत लवादाच्या निवाड्यानुसार वार्षीक सुमारे ३८५.७० अ.घ.फू. पाणीवापर अनुज्ञेय आहे. आतापर्यंत पूर्ण झालेल्या व बांधकामाधीन प्रकल्पामध्ये सुमारे ३८० अ.घ.फू. पाणी साठवण क्षमता निर्माण झालेली आहे. दरवर्षी प्रत्यक्ष पाणीवापर हा त्या त्या वर्षी धरणांमध्ये उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यानुसार होतो. मराठवाड्याच्या मध्य गोदावरी क्षेत्रातील पूर्ण झालेल्या प्रकल्पांमध्ये दरवर्षी

होणारा पाणी वापर हा पाणी उपलब्धतेनुसार कमी होत असल्यामुळे १८.३३ अ.घ्.फू. पाणी वापराचे नवीन लघु पाटबंधारे योजनांचे नियोजन करण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यांचा बृहत आराखडा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. गोदावरी खोऱ्यातील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत लवादाप्रमाणे सुमारे ६७७.७५ अ.घ.फू. पाणीवापर अनुज्ञेय आहे. आतापर्यंत पूर्ण झालेल्या व बांधकामाधीन प्रकल्पामध्ये ५२२.८५ अ.घ.फू साठवणक्षमता निर्मितीचे नियोजन करण्यात आले आहे. यापैकी २१५.२६ अ.घ.फू. पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे व २८७.३३ अ.घ.फू. पाणीसाठवण क्षमता निर्माण करण्याची कामे प्रगतीत आहेत. तसेच २०.२६ अ.घ.फू. पाणीसाठा निर्मितीच्या प्रकल्पांस प्रशासकीय मान्यता प्राप्त असून अद्याप कामे सुरु होणार आहेत.

पाटबंधारे हा अतिशय महत्वाचा विषय आहे. या बाबतीत सध्या राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरु आहे. राज्यामध्ये पाच सिंचन महामंडळे आहेत. ही महामंडळे कोणत्या वर्षी स्थापन केली, कोणत्या उद्देशाने स्थापन केली हे विभागाने सांगितले. या बाबतीत आतापर्यंत कशा पध्दतीने काम करीत आलेलो आहोत, प्रत्येक खोऱ्यामध्ये जे पाणी उपलब्ध आहे त्यातील किती पाणी अडवू शकलो, किती पाणी अडवू शकलो नाही, या माध्यमातून सिंचनाचे क्षेत्र किती प्रमाणात वाढवू शकलो, धरणाच्या कामांच्या बाबतीत अर्थसंकल्पामध्ये तरतूद करुन कशा पध्दतीने खर्च करु शकलो, कोणकोणत्या प्रकल्पाला कशा पध्दतीने महत्व दिले गेले, या महत्वाच्या बाबी आहेत. कृष्णा खोऱ्यातील २४ टीएमसी पाण्याची योजना हाती घेतली. ती मूळ योजना ५ हजार कोटी रुपयांची आहे. ५ हजार कोटी रुपयांच्या योजनेसाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये फक्त १०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मूळ योजना ५ हजार कोटी रुपयांची असताना विभाग फक्त १०० कोटी रुपये तरतूद करणार असेल तर ती योजना पूर्ण होण्यास किती वर्षे लागतील ? अशा योजना हाती घेऊन एवढी कमी तरतूद करुन धरण पूर्ण करु शकतो का आणि पाणी अडवू शकतो का याचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे आहे. सर्व खोऱ्यातील जे पाटबंधारे प्रकल्प आहेत त्यावर आतापर्यंत किती खर्च करु शकलो आणि यापुढे किती खर्च करावा लागेल, एवढे पैसे खर्च करुन कोणत्या वर्षापर्यंत पाणी अडवू शकतो आणि सिंचनाचे किती क्षेत्र वाढवू शकतो याची संपूर्ण माहिती समितीला

सादर करावी. असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी खालील माहिती समितीस दिली.

राज्यातील ५ पाटबंधारे विकास महामंडळांमार्फत ६७० प्रकल्प बांधकामाधीन असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु. कोटीत व सिंचन क्षमता हेक्टर)

महामंडळाचे नाव	प्रकल्प				प्रकल्प कामावर ३१.३.१२ अखेर खर्च	प्रकल्प कामाची १.४.१२ ची उर्वरीत किंमत	प्रकल्पिय सिंचन क्षमता	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता	उर्वरित सिंचन क्षमता
	मोठे	मध्यम	ल.पा.	एकूण					
कोकण पा.वि.म.	४	११	५४	६९	४९१५	४४५०	२४७५३३	६६७३०	१८०८०३
तापी पा.वि.म.	१०	१८	३६	६४	३५६७	१०६०३	५७१७१७	११४८९२	४५६८२५
म.कृष्णा खोरे वि.म.	३३	२७	५५	११५	१५०३१	१७८५०	२२३१३४७	८८३२०७	१३४८१४०
गोदावरी म.पा.वि.म.	१५	१६	१२५	१५६	१०५४९	१५००३	९९३३४६	५७४९७५	४१८३७१
विदर्भ पा.वि.म.	१७	५२	१९७	२६६	१९१४६	३०५४४	१६५८७०३	४९४०७०	११६४६३३
एकूण	७९	१२४	४६७	६७०	५३२०८	७८४५०	५७०२६४६	२१३३८७४	३५६८७७२

महामंडळांना स्वतंत्रपणे कर्जरोख्यांची उभारणी करण्याची परवानगी नाकारण्याची कारणे काय आहेत ? सिंचन व्यवस्थापन हा विषय शासनाने महामंडळाकडून काढून घेण्याचे कारण काय ? एप्रिल, २००६ ते मार्च,२००८ या काळात देय असलेले हमी शुल्क महामंडळांनी प्रदान न करण्याची कारणे काय आहेत ? महामंडळांना दंडनीय व्याजासह हमी शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव किती कालावधीसाठी प्रलंबित होता ? या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचे समितीने निदेश दिले असता, विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सन २००७-२००८ च्या अहवालातील हमी शुल्क देण्याच्या बाबतीत पाचही महामंडळांसाठी राज्य शासनाने हमी शुल्क आणि त्यावरील व्याज याकरिता वेगळी तरतूद करण्यात आली होती आणि समायोजनेमुळे ते पैसे शासनाकडे जमा झालेले आहेत. २००७-२००८ या वर्षातील हमी शुल्क आणि त्यावरील व्याज तसेच मार्च २००९ पर्यंतचे हमी शुल्क आणि त्यावरील व्याज देखील जमा झालेले आहे. त्यामुळे ते माफ करण्याचा प्रश्नच येत नाही. मधल्या काळामध्ये सर्व

महामंडळातर्फे शासनास विनंती करण्यात आली होती की, सदरहू शुल्क आणि व्याज माफ करण्यात यावे आणि त्याअनुषंगाने याबाबत वित्त विभागाबरोबर चर्चा झाली असून यापूर्वी समितीने देखील तशी शिफारस केली होती. त्याबाबत वित्त विभागाबरोबर चर्चा करुन मार्च २००९ पर्यंत तशा प्रकारची तरतूद करुन ती रक्कम जमा झालेली आहे. त्यामुळे हमी शुल्काच्या बाबतीत सांगावयाचे तर २००९ पर्यंतचा विषय शिल्लक राहिलेला नाही. तसेच महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे पगार आणि प्रकल्पासाठी लागणारा निधी शासन देते. पूर्वी जे कर्जरोखे काढण्यात आले त्यावरील मुद्दल, व्याज शासन देत असते. त्यामुळे सदरहू हमी शुल्क महामंडळाने देणे आवश्यक आहे. २००९ नंतरचे हमी शुल्क आहे त्यासाठी वेगळी तरतूद करुन जसे पूर्वी पुस्तकी समायोजनेव्दारे रक्कम जमा करुन घेतली गेली तशाच प्रकारचा प्रस्ताव पाठविलेला आहे, त्या बाबत चर्चा सुरु असून अजून याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

सदरहू महामंडळे स्थापन होण्यापूर्वी सर्व कामे राज्य शासनामार्फत होत होती. तेव्हा सिंचन क्षमता किती होती? तसेच महामंडळे स्थापन झाल्यानंतर या कामांसाठी किती खर्च झाला आणि त्यामुळे सिंचन क्षमतेमध्ये किती वाढ झाली ? याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यात जून १९९७ पर्यंत ३२.२८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली व जून २०११ अखेर राज्यात ४८.२५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. उपलब्ध अभिलेखानुसार महामंडळ स्थापनेपूर्वी सुमारे रु. ११,६०० कोटी तर त्यानंतर सन २०१०-११ अखेरपर्यंत प्रकल्पावर भूसंपादन, पुनर्वसन व आस्थापनेसह सुमारे रु. ५३,५०० कोटी इतका खर्च झाला आहे. तसेच ५ महामंडळे स्थापन झाल्यापासून जी भौतिक प्रगती झाली आहे, त्याची आकडेवारी म्हणजे कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना झाल्यापासून ३१६ प्रकल्प पूर्ण झाले. १०० प्रकल्पामध्ये घळ भरणी केली आहे. त्यामुळे जवळजवळ १५७ अब्ज घनफूट इतकी साठवण क्षमता निर्माण झाली आहे आणि ४ लाख ११ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या एक दिवस अगोदर विधीमंडळ सभागृहास सादर करण्यात आलेल्या महाराष्ट्राची आर्थिक पहाणीमध्ये आतापर्यंत गेल्या १५ वर्षामध्ये महाराष्ट्रात ७० हजार कोटी रुपये सिंचनावर खर्च केले असून टक्केवारीनुसार सिंचनामध्ये ०.१ टक्क्या वाढ झाली

असल्याचे नमूद केले आहे. समितीला महामंडळाच्या स्थापनेच्या पूर्वी आणि त्यानंतर किती टक्के सिंचन झाले आहे याबाबत हेक्टरमध्ये सांगता आले नाही तरी अगोदर ५ लाख हेक्टरपर्यंत सिंचन होत असेल तर ते आता साडेपाच लाख हेक्टर किंवा ६ लाख हेक्टरपर्यंत झालेले आहे असे अंदाजाने सांगता येईल काय अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सिंचनाच्या बाबतीत महामंडळाचे जे संपादन आहे त्यासंबंधातील माहिती समितीला स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल असे आश्वासित केले.

तापी खोऱ्याच्या बाबतीत त्याठिकाणी कुठे-कुठे पाणी अडविण्यात आले आहे तसेच त्यातील किती पाणी वाया जात आहे आणि तसे होऊ नये यासाठी किती साठा करता येणे शक्य आहे? या अनुषंगाने विचार केला पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी तापी खोऱ्यामध्ये तापी महामंडळांतर्गत किती पाणी अडविले गेले याबाबत असा खुलासा केला की, केंद्र शासनाने तापी नदीवरील गुजरात राज्यातील उकई धरण स्थळी पाण्याची उपलब्धता निश्चित करण्यासाठी श्री. थिरुमल अंयगार यांची तांत्रिक समिती सन १९५८ मध्ये नेमली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालानुसार ७५ टक्के विश्वासार्हतेने ४०० अघफू पाणी उपलब्ध आहे. सदर पाण्याचे वाटप सन १९८६ च्या बैठकीत मध्यप्रदेश, महाराष्ट्र व गुजरात या राज्यामध्ये अनुक्रमे ७० अघफू, १९१.४० अघफू व १३८.६० अघफू या प्रमाणे करण्यात आले आहे. त्यानुसार तापी खोऱ्याचे महाराष्ट्राच्या वाट्यास १९१.४० अघफू पाणी आले आहे. मार्च २०१२ मध्ये केंद्रीय जल आयोगास सादर केलेल्या सुधारित तापी बृहत आराखड्यानुसार सदर १९१.४० अघफू पाण्याचा महाराष्ट्रातील प्रदेश निहाय हिस्सा उत्तर महाराष्ट्र प्रदेश १२१.६०८ अघफू, विदर्भ ६६.९५ अघफू व मराठवाडा २.८५ अघफू असा आहे. या महामंडळाच्या वाट्यास आलेल्या १२१.६०८ अघफू, पाण्यापैकी खालीलप्रमाणे पाणी अडविण्यात आलेले आहे.

१. महामंडळ स्थापनेपूर्वी पूर्ण झालेल्या प्रकल्पाद्वारे अडविलेले पाणी - ४९.७७ अघफू

२. महामंडळ स्थापनेनंतर पूर्ण झालेल्या प्रकल्पाद्वारे अडविलेले पाणी - ५.३१ अघफू

३. बांधकामाधीन प्रकल्पांद्वारे (जून २०१२ अखेर) - ४२.६९ अघफू

४. या महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांद्वारे एकूण - ९७.७७ अघफू पाणी अडविण्यात आले आहे.

उर्वरित २३.८३ अब्ज घनफूटापैकी २१.५ अघफू पाण्याचे नियोजन झाले असून, त्याची कामे प्रगतीपथावर आहेत व २.३३३ अघफू पाणी भविष्यकालीन योजनासाठी बृहत आराखड्यात राखून ठेवण्यात आलेले आहे.

अमळनेर येथील प्रकल्पांची ऊंची वाढवावयाची आहे.परंतु यासाठी शासनाने जी जमीन ताब्यात घेतली होती त्या अनुषंगाने तेथील लोकांना अजूनपर्यंत पैसे देण्यात आलेले नाहीत. सदरहू जमीन ताब्यात घेण्यासाठी शासनाने ५० कोटी रुपये खर्च केलेला आहे हे खरे आहे काय अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, अय्यंगार समितीच्या शिफारशीनुसार तापी खोऱ्यातील पाणी हे मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या वाट्याला आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याला १९१.४ टीएमसी पाणी उपलब्ध झाले असून त्यानुसार कामे सुरु आहेत.

निम्म तापी प्रकल्प ता.अमळनेर हा तापी नदीवरील मोठा संवर्गातील प्रकल्प असून ४३६०० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. प्रकल्पामुळे एकूण -१७ गावांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे. त्यापैकी ८ गावे पुर्णतः व ९ गावे अंशतः पुनर्वसित होणार आहे. प्रकल्पाची तृतीय प्रशासकीय मान्यता किंमत रु.११२७.७४ कोटी आहे.

निम्म तापी प्रकल्पाचे १८.३० X १६.७६ मी. संख्या २३ नग सुमारे १०००० मे. टनाचे मोठ्या स्वरुपाचे काम असून , कामांतर्गत धरणाच्या प्रस्तंभ कामासोबत अवगुंठीत भागांची (embedment) निर्मितीचे काम करण्यात येत आहे. त्यापोटी कामावर खर्च करण्यात येत आहे. भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामास प्राधान्य देऊन प्रकल्पाच्या इतर घटक भागांच्या निर्मितीसाठी निधीचे नियोजन करण्यात येत आहे. सन २०१२-१३ मध्ये सदर प्रकल्पासाठी रु. २५.०० कोटी अनुदान मंजूर असून त्यापैकी रु.२१.७१ कोटी अनुदान वितरीत झालेले आहे. तसेच निम्म तापी प्रकल्पाकरीता प्रकल्प सुरु झाल्यापासून माहे नोव्हेंबर २०१२ पर्यंत एकूण रु. २४८.१५ कोटी इतके अनुदान उपलब्ध झाले व ते खालीलप्रमाणे नमूद बाबींवर खर्च करण्यात आले आहे.

क्रमांक	बाब	माहे नोव्हेंबर २०१२ पर्यंत एकूण उपलब्ध अनुदानातून झालेला खर्च (रु.कोटी)	सन २०१२-१३ मधील उपलब्ध अनुदानातून झालेला खर्च (रु. कोटी)
१.	धरण स्थापत्य करणे	१०७.३६	९.३३
२.	दरवाजे निर्मिती	४५.६५	६.६०
३.	भूसंपादन व पुनर्वसन	६७.३९	१.७६
४.	इतर कामे	३.१७	१.४४
५.	आस्थापना	२४.५८	२.५८
	एकूण (रु. कोटी)	**२४८.१५**	**२१.७१**

निम्म तापी प्रकल्पाकरीता एकूण ७२६१ हेक्टर जमिन संपादनाची आवश्यकता आहे. त्यापैकी २५८.७६ हेक्टर जमिनी संपादीत केली असून, उर्वरित ७००२ हेक्टर क्षेत्र धरण बांधकामाच्या प्रगती नुसार टप्प्या टप्प्याने संपादीत करण्याचे प्रस्तावित आहे. सद्य:स्थितीत भूसंपादनवर, भूसंपादनाचा अंतिम निवाडा व संपादीत करावयाचा जमिनीचा २/३ मोबदला मिळून एकूण रु. २२.५० कोटी खर्च झाला आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील १२९३ हेक्टर जमिनी संपादीत करण्याचे प्रस्ताव कार्यान्वित आहेत. सदर प्रस्तावाकरीता २/३ रकमेच्या मोबदल्यापोटी रु. ६६.०० कोटीची मागणी महसूल विभागाकडून प्राप्त झाली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर रक्कम अदा करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत जमिन ताब्यात घेऊन शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदला रक्कम दिलेली नाही. अशी वस्तुस्थिती नाही. वर नमूद केलेले १२९३ हेक्टर क्षेत्र संपादनानंतर धरणाची उंची वाढविण्याचे काम हाती घेणे शक्य होईल.

निम्म तापी प्रकल्पाच्या धरणाचे काम सुरु असून त्या अनुषंगाने धरणाच्या ठिकाणी दरवाजे तसेच भू-संपादन इ.कामासाठी पैसे उपलब्ध झाले असून २०१२-२०१३ मध्ये सदरहू धरणाच्या कामासाठी किंवा भू-संपादनाच्या कामासाठी घटकनिहाय झालेला खर्च खालीलप्रमाणे असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

स्थापत्य काम	रु. १०७.३६ कोटी
यांत्रिक (दरवाजे)	रु. ४५.६५ कोटी
भूसंपादन	रु. २२.५० कोटी
पुनर्वसन व त्यानुषंगी कामे	रु. ४४.८९ कोटी
इतर शिर्षावरील आवश्यक खर्च	रु. ३.१७ कोटी
आस्थापना	रु. २४.५८ कोटी
एकूण	**रु. २४८.१५ कोटी**

या अनुषंगाने समितीने पुढे अशी पृच्छा केली की, प्रत्यक्षात प्रकल्पासाठी ५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. त्यातील ७० ते ८० टक्के रक्कम दरवाजे बनविण्यासाठी खर्च झाले. मात्र भू-संपादनासाठी काहीही खर्च झाला नाही. कारण त्या प्रकल्पाची ऊंची वाढणार असल्यामुळे जे दरवाजे बनविण्यात आले आहेत, त्याचा काहीच उपयोग होणार नाही अशी स्थिती असून प्रथम भू-संपादन होणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

एखादा प्रकल्पाचे काम करीत असताना अगोदर भू-संपादन करावयाचे की घळ भरणी करावयाची याबाबतीत प्रॉयॉरिटी कोण ठरविते यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाच्या धोरणानुसार प्रकल्पाचे काम करताना भूसंपादन आणि पुनर्वसन या कामांना पहिले प्राधान्य दिले जाते. असे असताना या कामासाठी जो निधी उपलब्ध झाला तो संबंधितांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रकल्पावर खर्च झालेला आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्रकल्पाचे बांधकाम करतांना भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. तथापि धरणाच्या स्तंभाचे काम करण्यासाठी दरवाज्यांचे अवगुंठीत भाग (Embeded Parts) बसविणे आवश्यक असल्याने फक्त दरवाज्यांच्या अवगुंठीत भागांचीच प्राधान्याने निर्मिती करण्यात येत आहे. परंतु सदरहू कामे करताना भू-संपादन, पुनर्वसन इ.बाबी प्राधान्याने कराव्यात आणि मग बाकीची कामे सुरु करावीत असे शासनाचे धोरण आहे.

याबाबतीत शासनाचे धोरण असताना जर काही चुकीची गोष्ट झाली असेल तर यामध्ये जे जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय अशी पृच्छा समितीने केली असता, शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे भूसंपादन व पुनर्वसनावर तसेच धरण बांधकामाच्या आवश्यक बाबींवर उपलब्ध निधीतून खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे जबाबदारी निश्चितीचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तापी खोऱ्यातील पाणी अडविले जात नाही त्यामुळे त्याचा फायदा गुजरात राज्याला होतो. राज्यामध्ये दुष्काळ असताना देखील तापी नदीमध्ये पाणी असूनही १० दिवस धरणाची सर्व गेटस् उघडण्यात आल्याने पाणी वाया गेले. खरे म्हणजे अशा परिस्थितीत ते पाणी कुठेतरी साठविले पाहिजे पण तसे होत नाही. त्यामुळे तेथील कोणतीही कामे पूर्ण झालेली नाहीत. इतर भागांमध्ये पाणी सोडण्यात येत नाही अशी तक्रार असते पण याठिकाणी पाणी सोडावे लागल्याने पाणी वाया गेले अशी स्थिती आहे तापी खोऱ्यातील ८५ टक्के पाणी गुजरातमध्ये वाहून जात असल्याची बाब निदर्शनास आणून समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

याअनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, तापी नदी मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यातून जाते. महाराष्ट्राच्या वाट्याला जे पाण्ी आले आहे, त्यानुसार कामे सुरु असून हातनूर धरणाचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच गेल्या ३-४ वर्षामध्ये तापी खोऱ्यातील ३ बॅरेजेसची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तापी नदीमध्ये १५० ते २०० कि.मी.परिसरापर्यंत पाणी असते ही वस्तुस्थिती आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे तापी विकास महामंडळाला १० टक्के निधी उपलब्ध होतो. त्या माध्यमातून बॅरेजेसची कामे, धरणाची कामे तसेच कॅनॉलची कामे सुरु आहेत. तसेच निम्न तापी प्रकल्पाचे काम देखील सुरु आहे मात्र त्यासाठी उपलब्ध असलेला निधी कमी आहे ही वस्तुस्थिती आहे.सध्या जो निधी प्राप्त झाला आहे त्यातून ३ बॅरेजेसची कामे पूर्ण झाली आहेत.त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसामध्ये देखील तापी नदी भरलेली असते ही वस्तुस्थिती आहे.

पुणे शहराला ज्या धरणामधून पाणी पुरवठा केला जातो त्याठिकाणी पाण्याचा तुटवडा आहे. सध्या पुणे शहराला चार धरणाच्या माध्यमातून पाणी पुरवठा होतो. मात्र काही दिवसांपूर्वीच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये ४० गावांचा समावेश झालेला आहे. अशा परिस्थितीत वाढीव पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने कोणत्या प्रकारचे नियोजन करण्यात येत आहे? तसेच धरणातील गाळ काढणे आवश्यक असून त्यासाठी किती खर्च येणार आहे किंवा एखादे नवीन धरण बांधता येईल काय आणि त्यासाठी साधारणपणे किती खर्च येऊ शकतो यादृष्टीनेही विचार केला पाहिजे. सध्या पुणे शहराला कमी प्रमाणात पाणी उपलब्ध होत आहे.यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, पुणे शहराच्या पिण्याच्या खडकवासला धरणाचे मुळ प्रकल्प अहवालानुसार ५ टीएमसी इतकी तरतूद होती.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता टेमघर, वरसगांव, पानशेत व खडकवासला या चार धरणांचे मिळून खडकवासला संयुक्त प्रकल्पाद्वारे ११.६० टीएमसी व पवना धरणातून ०.३४ टीएमसी अशी एकूण ११.९४ टीएमसी इतक्या पाणी वापरास मंजूरी आहे. तसेच भामा आसखेड धरणातून १.३० टीएमसी पाणी वापरास मंजूरी आहे. अशी एकूण १३.२४ टीएमसी पाणी वापरास मंजूरी पुणे महानगरपालिकेस देण्यात आली आहे.

भामा आसखेड धरणातून वाढीव १.३७ टीएमसी मंजूरी प्रस्तावित आहे. प्रस्तावित १.३७ टीएमसी परिमाणांस देखील नुकतीच मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून अशाप्रकारे एकूण २.६७ टीएमसी इतका वाढीव पाणीकोटा आता भामा आसखेड धरणांतून मंजूर असून पाणीवापरासाठी पुणे महानगरपालिकेने अद्याप आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण केलेली आहे. १५ ऑक्टोबर २०१२ रोजीच्या उपलब्ध उपयुक्त पाणीसाठ्यावर आधारीत पुणे शहरास ११.२५ टीएमसी इतक्या पाणी वापराचे नियोजन आहे. तथापि प्रत्यक्षात सुमारे १६ टीएमसीपर्यंत पाणी द्यावे लागेल.

टेमघर, वरसगंव, पानशेत व खडकवासला या चार धरणांचे खडकवासला संयुक्त प्रकल्पाद्वारे मंजूर ११.६० टीएमसी पेक्षा अधिक म्हणजेच सरासरी १६ टीएमसी वार्षिक पाणी उचलले जाते. तसेच पवना प्रकल्पातून मंजूर ०.३४ टीएमसी पेक्षा जास्त म्हणजेच ०.४३२ टीएमसी वार्षिक पाणी उचलले जात आहे. अद्याप भामा आसखेड धरणातून पाणी घेण्यास सुरुवात केलेली नाही.

कृष्णा पाणी वाटप तंटा लवादानुसार सद्यस्थितीत कोणताही नविन प्रकल्प हाती घेणे शक्य नाही. मोठे धरण साठ्यातील गाळ काढण्याची कोणतीही प्रचलित पध्दत अस्तित्वात नाही. तसेच मोठ्या धरणातील गाळ काढणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होत नाही.

पाटबंधारे महामंडळाने पूर्ण केलेले प्रकल्प आणि त्या प्रकल्पामुळे निर्माण झालेली सिंचन क्षमता यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, शासनाने १९९६ ते १९९८ या कालावधीत पाटबंधारे प्रकल्प राबविण्यासाठी राज्याच्या विविध भागात ५ पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना केली. महामंडळाकडून स्थापनेनंतर जून २०११ पर्यंत झालेल्या महत्वाच्या उपलब्धी खाली दिल्या आहेत.

महामंडळाचे नाव	पूर्ण केलेले प्रकल्प	घळभरणी / द्वार उभारणीतून साठवण क्षमता निर्माण केलेले प्रकल्प	भौतिक साध्य		
			पाणीसाठवण क्षमता		सिंचन क्षमता (लक्ष हेक्टर)
			(दलघमी)	(अघफु)	
मकृखोविम	३१६	१००	४४४६	१५७	४.११
तापाविम	७१	८१	१२४९	४४	१.५१
कोपाविम	२४	३८	२४२९	८६	०.७२
गोमपाविम	२८६	२५४	३५६१	१२६	२.६५
विपाविम	९०	६२	२७१८	९६	३.८२
एकूण महाराष्ट्र	**७८७**	**५३५**	**१४४०३**	**५०९**	**१२.८१**

महामंडळांच्या स्थापनेनंतर, पूर्ण झालेल्या ७८७ प्रकल्पातून व प्रगतीपथावरील प्रकल्पातून, ५०९ अ.घ.फू. पाणीसाठवण क्षमता व १२.८१ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली.

समितीने स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याच्या उद्दिष्टाबाबत थोडक्यात माहिती देण्याबाबत विभागास सांगितले तसेच शासनाकडून मिळणाऱ्या निधीव्यतिरिक्त त्यांची उत्पन्नाची अन्य साधने कोणती होती ? सद्य:स्थितीत राज्य शासनाने महामंडळाचे नियमित खर्चाचे दायित्व स्विकारले आहे काय ? असल्यास कोणते व का यासंदर्भात विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला. १) पाणी तंटा न्यायाधिकरणाच्या निवाड्याद्वारे महाराष्ट्र राज्याला वाटप करण्यात आलेले कृष्णा नदीच्या खोऱ्यातील पाणी उपयोगात आणण्याकरीता पाटबंधारे प्रकल्पांचे बांधकाम पूर्ण करुन प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता १९९६ मध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची निर्मिती झाली.

२) पाणी तंटा न्यायाधिकरणाच्या निवाड्याद्वारे महाराष्ट्र राज्याला वाटप करण्यात आलेले गोदावरी खोऱ्यातील पाणी उपयोगात आणण्याकरीता पाटबंधारे प्रकल्पांचे बांधकाम पूर्ण करुन प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता १९९८ मध्ये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाची निर्मिती झाली.

३) पाणी तंटा न्यायाधिकरणाच्या निवाड्याद्वारे महाराष्ट्र राज्याला वाटप करण्यात आलेले गोदावरी आणि तापी नद्यांचे पाणी उपयोगात आणण्याकरीता पाटबंधारे प्रकल्पांचे

बांधकाम पूर्ण करुन प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता १९९७ मध्ये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाची निर्मिती झाली.

४) तापी नदीच्या महाराष्ट्र राज्याशी संबंधित पाणी उपयोगात आणण्यासाठी, तापी नदीच्या खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पास व लाभक्षेत्र विकास जलविद्युत निर्मिती योजनांस चालना देण्यासाठी डिसेंबर, १९९७ मध्ये तापी पाटबंधारे विकास महामंडळाची अन्वये निर्मिती झाली.

५) कोकणातील नद्यांचे पाणी उपयोगात आणण्याकरीता पाटबंधारे प्रकल्पांचे बांधकाम पूर्ण करुन प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता डिसेंबर, १९९७ मध्ये कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाची निर्मिती झाली.

६) या महामंडळांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांवरील सिंचनाची पाणी पट्टी व बिगर सिंचनाची पाणीपट्टी, अनुदान, अर्थसहाय्य, कर्जे, आगाऊ रकमा ही उत्पन्नाची साधने होती.

सद्य:स्थितीत शासनाने महामंडळाचे नियमित खर्चाचे दायित्व स्विकारले आहे. यामध्ये विविध पाटबंधारे विकास महामंडळांतर्गतचे अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, प्रकल्पांच्या बांधकामासाठी, कर्जरोख्यांचे मुद्दल परतफेड व व्याज परतफेड इ. बाबींसाठी शासनाकडून महामंडळास निधी उपलब्ध केला जातो.

या अनुषंगाने समितीने महामंडळांना स्वतंत्रपणे कर्जरोख्यांची उभारणी करण्याची परवानगी नाकारण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली. त्यावर या विभागास उपलब्ध होणारा नियतव्यय हा मा.राज्यपाल महोदयांचे निदेशानुसार विभाज्यिय स्वरुपाचा असतो. मा.राज्यपाल महोदयांचे निदेशानुसार निधीचे वाटप विहित सुत्रानुसार होणे आवश्यक असते. विविध सिंचन महामंडळांना कर्जरोखे उभारण्याची परवानगी दिल्यास मा.राज्यपाल महोदयांचे निदेशानुसार निधी वाटपाची सुसुत्रता राहणार नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सिंचन व्यवस्थापन हा विषय शासनाने महामंडळाकडून काढून घेण्याची कारणमिमांसा समितीने विचारली असता, सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा यासाठी सिंचन व्यवस्थापन प्रणाली, शेतकऱ्यांच्या पाणी वापर संस्थांना हस्तांतरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. सदर हस्तांतरणापूर्वी प्रकल्पाची आवश्यक देखभाल, दुरुस्ती शासनामार्फत करणे गरजेचे होते. ही कामे शासनाकडील निधीमधून करण्याचा निर्णय शासनाने घेतला

त्यामुळे सिंचन व्यवस्थापन हा विषय थेट शासनाचे नियंत्रणाखाली दिनांक ०१.०१.२००५ पासून घेण्यात आला असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी केले.

माहे एप्रिल, २००६ ते मार्च २००८ या काळात देय असलेले हमी शुल्क महामंडळांनी प्रदान न करण्याची कारणे काय आहेत अशी समितीने पृच्छा केली असता महामंडळाकडे पुरेसा निधी नसल्याने हमी शुल्क प्रदान करण्यात आले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महामंडळांना दंडनीय व्याजासह, हमी शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव किती कालावधीसाठी प्रलंबित होता. यासंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय या समितीच्या प्रश्नाला १९९९-२००० ते मार्च २००९ अखेरचे हमी शुल्क व त्यावरील व्याजासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करुन पुस्तकी समायोजनाने सदर रक्कम शासनाकडे जमा झाली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जलसंपदा विभागाअंतर्गत असलेल्या महामंडळाकडून शासनास किती हमी शुल्क येणे आहे. त्यापैकी आतापर्यंत किती हमी शुल्क प्राप्त झाले आहे. याअनुषंगाने विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला की, पाच महामंडळाकडील सर्व मालिकांचे मिळून रु. १७३४.९१ कोटी हमी शुल्क देय होते. यापैकी रु. ६२.५३ यावरील दंडनीय व्याज रु. १७५९.९८ कोटी असे एकूण रु. ३४३२.३६ कोटी देय होते. ही सर्व रक्कम पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करुन पुस्तकी समायोजनाद्वारे शासनाकडे जमा करण्यात आली आहे.

माहे एप्रिल २००९ ते मार्च २०१२ या कालावधीसाठी रु. ११६.३८११ कोटी इतकी हमी व त्यावर रु. ३४.९६ कोटी इतके दंडनीय व्याज असे एकूण १५१.३४११ कोटी इतकी रक्कम देय आहे.

दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी दिलेल्या माहिती समितीचे समाधान न झाल्याने समितीने पुनः दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी घेतलेल्या बैठकीत विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, जलसंपदा विभागाच्या अंतर्गत ५ महामंडळे येतात. महामंडळांची स्थापना झाल्यापासून वेगवेगळ्या कालावधीत जे कर्जरोखे उभारण्यात आले होते त्यावरील व्याज व दंडनिय व्याज यासंदर्भात आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. आक्षेपातील कालावधी सन २००८ पर्यंतचा आहे. सन १९९९ ते मार्च २००९ पर्यंत

महामंडळांकडे हमी शुल्काची रक्कम प्रलंबित होती. सन १९९९ ते मार्च, २००९ पर्यंतची हमी शुल्काची व त्यावरील व्याजाची रक्कम ३,४३२ कोटी ३५ लाख ९८ हजार रुपये इतकी रक्कम ५ महामंडळांकडे प्रलंबित होती. वित्त विभागाने बजेटमध्ये एवढ्या रकमेची तरतूद करुन सन २००९ पर्यंतच पुस्तकी समायोजन करुन घेतले आहे. माहे एप्रिल, २००९ ते मार्च, २०१२ पर्यंतची हमी शुल्काची रक्कम ११६ कोटी रुपये आणि त्यावरील व्याजाची रक्कम ३५ कोटी रुपये असून विभागाने या १५१ कोटी रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केलेला आहे. या रकमेची तरतूद करुन समायोजन करुन घ्यावे, अशी विनंती जलसंपदा विभागाने वित्त विभागाला केलेली आहे.

सन १९९९ ते २००८ पर्यंतची ही रक्कम आहे. वेळेवर समायोजन न केल्यामुळे ही रक्कम वाढत जाते. विभागाने वेळेवर बुक ॲडजेस्टमेंट पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता वित्त विभाग पुस्तकी समायोजन करुन घेतो. ज्या महामंडळांचे स्वत:चे उत्पन्नाचे साधन आहे त्यांच्याकडून ॲक्च्युअल वसूली करतो असे स्पष्टीकरण वित्त विभागाच्या सचिवांनी समितीस दिले. समितीने यावर काही महामंडळे पाणी पट्टीची रक्कम वसूल करतात. त्यातून महामंडळांना उत्पन्न मिळते असे मत व्यक्त केले.

जलसंपदा विभागाच्या अंतर्गत ५ महामंडळे येतात. पाणी पट्टीची रक्कम शासनाकडे जमा होते. त्यामुळे आता महामंडळांचे वेगळे उत्पन्नाचे साधन राहिलेले नाही. महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची रक्कम शासन देते असा खुलासा यावेळी विभागीय सचिवांनी केला.

समायोजन ७-८ वर्षानंतर केले जाते. त्या त्या आर्थिक वर्षात समायोजन का केले जात नाही, याबाबतची पद्धत काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, माहे मार्च, २०१२ पर्यंतची हमी शुल्काची रक्कम ११६ कोटी रुपये आणि त्यावरील व्याजाची रक्कम ३५ कोटी रुपये असे एकूण १५१ कोटी रुपये असून वित्त विभागाकडे नस्ती आलेली आहे. अर्थसंकल्पात तरतूद झाल्यानंतर समायोजन होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

न फेडलेले कर्जाबाबत (Outstanding loan) समितीने पृच्छा केली असता, कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या ४३९ कोटी रकमेची यावर्षी पूर्ण परतफेड होणार आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे ९० कोटी ३४ लाख रुपये शुल्क राहते. तसेच विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे १,६७९ कोटी रुपयांचे कर्जरोखे काढण्यात आले होते.कर्जरोख्यांची रक्कम आणि

त्यावरील व्याजाची रक्कम सर्व महामंडळांच्या बाबतीत शासन वेळेवर देते. कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे मार्च, २०१२ पर्यंतचे ६३ कोटी रुपये होते. त्यापैकी यावर्षी ४२.७ कोटी रुपयांची परतफेड होईल. पुढील वर्षी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे २१ कोटी २१ लाख रुपये राहतील.व्याजाचे दर वेगवेगळे आहेत. पुढील वर्षी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कर्जरोख्यांचे १७ कोटी रुपये राहतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अभिप्राय व शिफारशी

समितीला प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीच्या अनुषंगाने समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

पाणीसाठा आणि पाणीवापर या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. पाणी वापराच्या बाबतीत कृष्णा खोऱ्याच्या विविध भागांमध्ये, मराठवाडा भागात कामे प्रगतिपथावर आहेत. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत १११ प्रकल्प बांधकामाधिन आहेत. पूर्ण व बांधकामाधिन प्रकल्पांद्वारे एकूण ५६० अ.घ.फू. इतका पाणीसाठा तसेच २१.५८ लक्ष हे. इतके सिंचनक्षेत्र (ICA) निर्माण करणे प्रस्तावित आहे. त्यापैकी जून २०१२ अखेर ५४४.३४ अ.घ.फू. इतका पाणीसाठा व १५.३८ लक्ष हे. इतके सिंचनक्षेत्र निर्माण झाले आहे. सद्य:स्थितीत १५.६६ अ.घ.फू. पाणी साठा व ६.२० लक्ष हे. इतके सिंचन क्षेत्र (ICA) निर्माण करणे बाकी आहे.

प्रकल्पांची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी अंदाजे रु. १६४३४ कोटी इतक्या रकमेची आवश्यकता आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळातील दरवर्षी साधारणपणे रु. १००० कोटींची तरतूद करण्यात येते. परंतु प्रकल्प पूर्ण करण्यासाठी असणारा अंदाजित खर्च व दरवर्षी उपलब्ध होणारी तरतूद पहाता हे प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून विहित मुदतीत कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने ठोस उपाययोजना करण्यात यावी तसेच या कार्यक्रमानुसार प्रकल्पांना निधी उपलब्ध कशा प्रकारे करण्यात येईल याबाबत साकल्याने विचार करण्यात यावा, जेणेकरुन प्रकल्प प्रलंबित राहून त्यावर होण्याऱ्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होवून त्याचा आर्थिक भार शेवटी शासनास पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

राज्यामध्ये १९७६ चा पाटबंधारे कायदा आहे. २००३ मध्ये राज्याने स्वत:ची जलनीती स्वीकारली. त्या अनुषंगाने राज्यामध्ये महाराष्ट्र वॉटर रिसोर्स रेग्युलेटरी ॲथॉरिटी स्थापन करण्याचा कायदा व शेतकऱ्यांकडून सिंचन व्यवस्थापन करण्याचा कायदा असे दोन नवीन कायदे केले. हे दोन्ही कायदे सन २००५ मध्ये झाले. या तीनही कायद्यांच्या अनुषंगाने आपले पाणी व्यवस्थापनाचे काम सध्या चालू आहे. एमडब्ल्यूआरआरए हा कायदा २००५ साली झाला त्यानंतर त्या कायद्यामध्ये काही दुरुस्त्या झाल्या. कायद्यामध्ये झालेल्या दुरुस्त्या आणि मूळ कायदा या संदर्भातील बाब न्यायालयासमोर आहे. **पाण्याचे समन्यायी वाटप तसेच हेड-रीच, मिडल-रीच तसेच टेल-रीचच्या बाबतीत कायद्यामध्ये तरतूद आहे. अंमलबजावणीच्या संदर्भातील मुद्दा न्यायालयासमोर विचाराधीन आहे त्यासंदर्भात न्यायालयाने दिलेल्या निकालावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

विधीमंडळ सभागृहासास सादर झालेल्या महाराष्ट्राची आर्थिक पहाणी अहवालानुसार आतापर्यंत गेल्या १५ वर्षामध्ये महाराष्ट्रात ७० हजार कोटी रुपये सिंचनावर खर्च केले आहेत आणि टक्केवारीनुसार सिंचनामध्ये ०.१ टक्का वाढ झाली आहे. रु. ७० हजार कोटी सिंचनावर खर्च होऊन देखिल खर्चाच्या तुलनेत राज्याच्या सिंचन क्षमतेत अतिशय नगण्य वाढ झालेली आहे. विविध पाटबंधारे महामंडळे स्थापन करुन राज्याच्या सिंचन क्षमतेत वाढ झाली आहे का याची अधिक माहिती समितीस मिळण्यासाठी महामंडळाच्या स्थापनेच्या पूर्वी आणि त्यानंतर किती टक्के सिंचन झाले आहे याची सविस्तर माहिती समितीस त्वरित देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

एखाद्या प्रकल्पाचे काम करीत असताना अगोदर भू-संपादन करावयाचे की घळ भरणी करावयाची याबाबतीत शासनाच्या धोरणानुसार प्रकल्पाचे काम करताना भूसंपादन आणि पुनर्वसन या कामांना पहिले प्राधान्य दिले जाते. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्रकल्पाचे बांधकाम करतांना भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. तथापि धरणाच्या स्तंभाचे काम करण्यासाठी दरवाज्यांचे अवगुंठीत भाग (Embeded Parts) बसविणे आवश्यक असल्याने फक्त दरवाज्यांच्या अवगुंठीत भागांचीच प्राधान्याने निर्मिती करण्यात येत आहे. परंतु भू-संपादन, पुनर्वसन इ.बाबी प्राधान्याने करण्यात येत नसल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे याबाबत कठोर उपाययोजना करण्यात यावी. प्रकल्पबाधीतांचे पुनर्वसन करताना त्यांना

आर्थिक मोबदला देण्याऐवजी त्यांच्याकरिता कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन निर्माण करावे अशी समितीची शिफारस आहे.

तापी खोऱ्यातील पाणी अडविले जात नाही त्यामुळे त्याचा फायदा गुजरात राज्याला होतो. राज्यामध्ये दुष्काळ असताना देखील तापी नदीमध्ये पाणी असूनही १० दिवस धरणाची सर्व गेटस् उघडण्यात आल्याने पाणी वाया गेले. खरे म्हणजे अशा परिस्थितीत ते पाणी कुठेतरी साठविले पाहिजे पण तसे होत नाही. तेथील कोणतीही कामे पूर्ण झालेली नाहीत. इतर भागांमध्ये पाणी सोडण्यात येत नाही अशी तक्रार असते पण याठिकाणी पाणी सोडावे लागल्याने पाणी वाया गेले अशी स्थिती आहे. तापी खोऱ्यातील ८५ टक्के पाणी गुजरातमध्ये वाहून जात असल्याची बाब निदर्शनात आणून याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

तापी नदी मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यातून जाते. महाराष्ट्राच्या वाट्याला जे पाणी आले आहे, त्यानुसार कामे सुरु असून हातनूर धरणाचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच गेल्या ३-४ वर्षामध्ये तापी खोऱ्यातील ३ बॅरेजेसची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तापी नदीमध्ये १५० ते २०० कि.मी.परिसरापर्यंत पाणी असते ही वस्तुस्थिती आहे. तापी विकास महामंडळाला १० टक्के निधी उपलब्ध होतो. **त्या माध्यमातून बॅरेजेसची कामे, धरणाची कामे तसेच कॅनॉलची कामे सुरु आहेत. तसेच निम्न तापी प्रकल्पाचे काम देखील सुरु आहे मात्र त्यासाठी उपलब्ध असलेला निधी कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. जो निधी प्राप्त झाला आहे त्यातून ३ बॅरेजेसची कामे पूर्ण झाली आहेत. तापी खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले संपूर्ण पाणी अडवून त्याचा फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कसा होईल यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत आणि अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या महसूली जमा रकमांच्या अहवालामधील परिच्छेद क्र. ७.३ "हमी शुल्काची वसुली न करणे" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहे.

हमी शुल्काची वसुली न करणे

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २९३ अन्वये राज्य शासनाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कर्जे देणाऱ्या विविध संस्था/रोखेधारक यांना कर्जाची रक्कम/गुंतवणुका आणि त्यावरील व्याजाचे प्रदान यासाठी कर्जे मिळविण्यासाठी राज्याचा एकत्रित निधिच्या तारणावर राज्य शासन हमी देते. अशी हमी राज्याकरिता घटनासापेक्ष दायित्व ठरते. वित्त विभागाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ च्या शासन निर्णयानुसार हमी शुल्काची वसुली करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची आहे.

दिनांक १८ नोव्हेंबर १९८८ आणि १५ एप्रिल १९९७ च्या शासन निर्णयानुसार हमी शुल्काचे दर प्रतिवर्षी ०.५० ते २ प्रतिशत होते. ३१ मार्च आणि ३० सप्टेंबर अखेरीस अदत्त रकमेवरील हमी शुल्क प्रतिवर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबर रोजी ऋणको महामंडळांनी/संस्थांनी शासकीय खात्यात जमा करावयाचे असते. हमी शुल्काचे विलंबाने प्रदान केल्यास पहिल्या तीन महिन्यासाठी प्रतिवर्षी १६ टक्के व त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दंडनीय व्याज देय आहे.

शासकीय हमीवर आधारीत रोखे आणि कर्जाद्वारे निधी उभारणाऱ्या तीन प्रशासकीय विभागांच्या अंतर्गत सहा पालिकांच्या दस्ताऐवजांचे विस्तृत विश्लेषण केले असता असे आढळून आले की, एप्रिल २००६ ते मार्च २००८ या काळात देय असलेले हमी शुल्क महामंडळानी प्रदान केले नव्हते. देय रक्कम वसूल करण्यासाठी प्रशासकीय विभागांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. परिणामी जोडपत्र-III मध्ये दर्शविल्याप्रमाणे हमी शुल्क आणि दंडनीय व्याज यांच्या एकूण रु. १४४.०६ कोटीची वसूली झाली नाही.

ही बाब मे २००८ मध्ये शासनाला कळविण्यात आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००८).

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ	
खुल्या बाजारातील उधारी	**(रु. कोटी)**
हमीची रक्कम	रु. ३८५.५७
हमीचा दिनांक	२५/०३/१९९७ ते ०९/०१/२००४
प्रदानाचा नियत दिनांक	एप्रिल २००६ ते एप्रिल २००८
हमी शुल्क	रु. ८.२४
दंडनीय व्याज	रु. २.६०
एकूण	रु. १०.८४

ज्ञापन :

उपरोक्त महालेखापरिक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात शासनास हमी शुल्क प्रदान न केल्याची कारणे महामंडळाने खालीलप्रमाणे नमूद केली आहेत.

महामंडळास १९९६-९७ या वित्तीय वर्षापासून तोटा होण्यास सुरुवात झाली. तरीसुध्दा महामंडळ सुरळीतपणे त्याच्या मुद्दलाच्या वसुलीतुन हमी शुल्काची रक्कम २००२-०३ पर्यंत प्रदान करत होते.

महामंडळाने नवीन कर्ज पुरवठा २००५-०६ पासून बंद केल्याने अनुत्पादक कर्जात वाढ झाली व चांगल्या कर्जदारांनी कमी झालेल्या व्याज दराचा फायदा घेण्यासाठी महामंडळाकडील कर्ज खाते मुदत पूर्ण बंद करुन इतर वित्तीय संस्थेकडे स्थलांतर केले. याकारणाने महामंडळाचे उत्पन्न कमी होत गेले व महामंडळ सप्टेंबर २००३ पासून शासनास हमी शुल्क परत करण्यात कसुरदार ठरले. त्यानंतर सन २००३ ते २०१० या कालावधीत हमी शुल्काची रक्कम माफ करणेबाबत शासनाच्या वित्त विभागास पत्रव्यवहार केला. परंतु वित्त विभाग सदर प्रस्तावाशी सहमत नाही.

महामंडळाची गेल्या ४ वर्षाची कर्ज वसुली ही एसएलआर बंधपत्राच्या पूर्ण दायित्व फेडण्यास पुरेशी नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये रुपये ३१.३२ कोटी, २००८-०९ मध्ये रुपये ३२.६८ कोटी आणि २०१०-११ मध्ये रुपये २७.६४ कोटी असे अर्थसंकल्पीय तरतूदीतून अर्थसहाय्य केले आहे.

महामंडळाने ३१.०३.२०१० पर्यंत शासनास हमी शुल्काची रक्कम रुपये ३१.४४ कोटी तसेच महालेखाकारांच्या लेखा परिक्षकांनी परिगणना केलेल्या दंडात्मक व्याजाचा भरणा केलेला नाही. हमी शुल्काची रक्कम ही सांविधीक दायित्व (Statutory Liability) असल्यामुळे

सदर दायित्वाची पूर्तता प्रशासकीय खर्च वगळून उरणाऱ्या कर्ज वसुली मधून करेल. पर्यायाने शासनास महामंडळास होणाऱ्या कमी कर्ज वसुलीमुळे पुर्तता न करु शकणाऱ्या बंधपत्राच्या दायित्वाची तसेच अदत्त हमी शुल्क रकमेएवढी अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागेल.

तसेच येथे असे निदर्शनास आणू इच्छितो की, महामंडळास जून २००९ पासून मुख्य न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार त्याच्या वसुलीपैकी ३० टक्के रक्कम सिडबीसाठी ठेवावी लागत आहे. अशाप्रकारे महामंडळ उर्वरीत ७० टक्के कर्जवसुली मधुन प्रशासकीय खर्च व इतर सांविधिक दायित्वापोटीचा खर्च भागविल्यावर उरणाऱ्या रकमेचा विनियोग करीत आहे. म्हणून महामंडळाने हमी शुल्क अदा करण्यासाठी नव्याने ३१.४४ कोटी रुपयाची पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी सुधारीत प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

लोकलेखा समितीच्या दिनांक ०८.०९.२०१० रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी हमी शुल्क प्रदान न करणेबाबत शासनाच्या बऱ्याच महामंडळांनी हमी शुल्क प्रदान केलेले नाही, याविषयी लोकलेखा समितीच्या दिनांक ०८.०९.२०१० रोजीच्या बैठकीतील समितीच्या अध्यक्षांनी सूचित केल्याप्रमाणे कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या धर्तीवर महामंडळाने प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवावा. त्याच धर्तीवर महामंडळाने शासनास प्रस्ताव पाठवला. सदर प्रस्ताव शासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे. त्याबाबत शासन त्या प्रस्तावावर शहानिशा करीत आहे. त्यामुळे त्यासंदर्भात निर्णय झालेला नाही. मागील तीन वर्षापासून एसएलआर बंधपत्राच्या दायित्वासाठी महामंडळाची आर्थिक स्थिती असमर्थ असल्यामुळे एसएलआर बंधपत्राच्या दायित्वासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून शासन आर्थिक मदत करीत आहे.

याच संदर्भात उद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामधे सद्याची परिस्थिती नुसार त्यासंदर्भातील महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत असल्याचे नमूद केले आहे.

साक्ष :-

लोकलेखा समितीने दिनांक ३० ऑक्टोबर, २०१० रोजी हमी शुल्काची वसुली न करणे या परिच्छेदासंदर्भात सचिव, लघु व मध्यम उद्योग यांची साक्ष घेतली.

महामंडळास सन १९९६-१९९७ या वित्तीय वर्षापासून तोटा होण्याची कारणे, सन २००३ ते २०१० या कालावधीतील हमी शुल्काची रक्कम माफ करण्याबाबत शासनाने

असहमती दर्शविण्याची कारणे आणि हमी शुल्क या विषयीची माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी लाभार्थ्यांकडून कर्ज वसूल न झाल्यामुळे तोटा झालेला असून त्याची कारणे खालीलप्रमाणे असल्याचे नमूद केले.

१) जागतिकिकरण व जागतिक मंदी व त्यामुळे लघु उद्योगघटकांवर झालेला परिणाम.

२) उद्योगघटकांना मिळालेले अपुरे खेळते भांडवल.

३) महामंडळाने आकारलेले व्याज दर हे इतर बँकांपेक्षा जास्त होते.

४) शासनाच्या प्रोत्साहन योजनेअंतर्गत शासनाकडून उद्योगघटकांना वेळेमध्ये रक्कम न मिळाल्यामुळे व इतर वेगवेगळी कारणे तसेच

१) महामंडळाने राज्याच्या अविकसित व विकसनशील भागामध्ये पहिल्या पिढीतील उद्योजकांना केलेला कर्ज पुरवठा.

२) जास्तीच्या दराने उभारलेल्या भांडवलामुळे व्याजाचा बोजा वाढला.

३) जागतिकीकरणामुळे झालेला मुक्त व्यापार व त्याचा लघु उद्योगांवर झालेल्या परिणामांमुळे अनुत्पादित उद्योगघटकामध्ये झालेली वाढ.

४) सन २००० पासून कमी होत गेलेल्या व्याजदरामुळे उद्योजकांनी महामंडळाकडील कर्जखाते मुदतपूर्व बंद करुन इतर वित्तीय संस्थांकडे केलेले स्थलांतर.

५) कर्ज मंजूरी नसल्यामुळे अनुत्पादित मालमत्तेत झालेली वाढ.

६) शासनाकडून महामंडळास नवीन आर्थिक मदत न मिळणे.

तसेच सन २००३ ते २०१० या कालावधीतील हमी शुल्काची रक्कम माफ करण्याबाबत शासनाने असहमती दर्शविली नसून शासनाने काही माहिती तसेच महामंडळ बंद करण्याबाबतचा कृती आराखडा मागविला आहे. त्यामुळे महामंडळाच्या हमीशुल्क माफ करण्याच्या प्रश्नावर अजून निर्णय झाला नाही असाही खुलासा केला.

गेल्या ५ वर्षापासून महामंडळाने कर्जपुरवठा देणे बंद केलेले आहे. कारण १९९६ पासून महामंडळ तोट्यात आहे. शासनाने २००५ मध्ये हे महामंडळ बंद करावे आणि नवीन पतपुरवठा करु नये असा निर्णय घेतला असल्याचे व्यवस्थापकीय संचालकांनी समितीस सांगितले. उपासनी समितीचे या महामंडळाच्या संदर्भात काय मत होते अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा करताना अशी माहिती दिली की,

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीने महामंडळ बंद करण्याचा निर्णय घेतला. आपण मार्केटमधून पैशाची उभारणी केली होती. त्यासाठी शासनाने जी हमी दिली होती त्याचे हमी शुल्क २००३ पर्यंत पूर्णपणे अदा केलेले आहे. २००३ नंतर तोट्यामुळे हमी शुल्क अदा करु शकलो नाही. २०१० मध्ये झालेल्या साक्षीमध्ये हा विषय उपस्थित झाला होता. त्यामध्ये समितीने अशी सूचना केली होती की, ज्याप्रमाणे जलसंपदा विभागाने हमी शुल्क माफ करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला तसा प्रस्ताव उद्योग विभागाने पाठवावा.

जलसंपदा विभागाचे हमी शुल्क माफ केल्यामुळे शासनाचे किती पैसे बुडाले याबाबत समितीने विचारणा केली असता जलसंपदा विभागाचे किती शुल्क माफ केले याची माहिती आता नाही. जलसंपदा खात्याच्या धर्तीवर प्रस्ताव पाठवावा असे समितीने म्हटले होते. त्याप्रमाणे विभागाने प्रस्ताव दिनांक २९.१०.२०१२ रोजी पाठविलेला आहे. एकूण ३१ कोटी रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला होता त्याबाबतचा निर्णय प्रलंबित आहे. आता जो परिच्छेद आहे त्यामध्ये १० कोटी रुपये एवढी रक्कम असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे म्हटले आहे की, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वसुलीपैकी ३० टक्के रक्कम सिडबीसाठी ठेवावी लागत आहे आणि उर्वरित ७० टक्के कर्जवसुलीमधून प्रशासकीय खर्च व इतर सांविधिक दायित्वापोटीचा खर्च भागविला जातो. प्रत्येक वर्षी असेच होणार आहे का ? समितीच्या या प्रश्नावर खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, सिडबी हे रिफायनान्सर होते त्यांनी हायकोर्टामध्ये आणि डीआरटीमध्ये केस दाखल केली होती. हायकोर्टाने अंतरिम आदेशामध्ये असे म्हटले आहे की, जी रिकव्हरी होईल त्यातील ३० टक्के रक्कम सिडबीसाठी आणि ७० टक्के रकमेतून पेमेंट वगैरे करावेत. उर्वरित जी रक्कम राहणार आहे त्या रकमेच्या बाबतीत निर्णय दिलेला नाही. ती केस चालू आहे. कोर्टाने अंतरिम आदेश दिलेला आहे. ३१ मार्च, २०१२ पर्यंतची एसएलआरची देणी अदा केलेली आहे. सिडबीच्या बाबतीत हायकोर्टामध्ये ९ तारखेला अंतिम निर्णय होणार आहे. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा आणि इतर खर्च हा एकप्रकारचा बोजाच असून वित्तीय महामंडळ बंद करण्याचा निर्णय झाला पण महामंडळ बंद झालेले नाही. महामंडळाचा दरवर्षीचा खर्च किती आहे आणि वसुली किती केली आहे आणि महामंडळाकडे किती अधिकारी/कर्मचारी आहेत व ते काय काम करतात अशी समितीने पृच्छा केली असता विभागीय प्रतिनिधींनी पुढील खुलासा केला. दरवर्षी जवळपास १० कोटी रुपये प्रशासकिय खर्च होतो. मागील तीन वर्षात विभागाने ४० ते ५० कोटी रुपयांची वसुली केली आहे. आणि महामंडळाकडे एकूण ८२ कर्मचारी आहेत व ते वसुलीचे काम करतात. तसेच कोर्ट केसेसही मोठ्या प्रमाणावर आहेत. समितीने या अनुषंगाने पुढे अशी विचारणा केली की, कर्मचाऱ्यांवर जेवढा खर्च होतो तेवढी तरी वसुली होते का यावर विभागीय प्रतिनिधींनी त्यापेक्षा जास्त वसुली होते. सरासरी ४० ते ५० कोटी रुपये वसुली होते व महामंडळाला कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी १२ ते १३ कोटी रुपये खर्च होतो असे सांगितले. विभागाकडून ४० कोटी रुपये वसुली करतात पण येणे किती बाकी आहे अशी विचारणा समितीने केली असता मुद्दलाच्या वसुलीची रक्कम १८० कोटी रुपये आणि व्याजाच्या वसुलीची रक्कम ११०० कोटी रुपये आहे.

विभागाकडे एकूण स्टाफ ८२ असून मागील तीन वर्षात एकूण १२४ कोटी रुपये वसुली केलेली असून एसएलआर बॉण्डची लायबिलिटी १५४ कोटी रुपये अदा केलेली आहे.महामंडळाचे एक मुख्यालय आणि ६ विभागीय कार्यालये आहेत. विभागीय कार्यालयांमध्ये चार-पाच कर्मचारी काम करतात आणि जेवढी शक्य होईल तेवढी वसुली करतात. जवळपास ९५ टक्के कर्मचारी स्वेच्छानिवृत्त किंवा सेवानिवृत्त झालेले आहेत. आता फक्त ५ टक्के कर्मचारी वर्ग राहिलेला आहे. त्यांनी वसुली करणे, कोर्ट केसेस हाताळणे तसेच बाकीची प्रशासकीय कामे करावयाची आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

कोर्ट केसेससाठी वर्षाचा खर्च किती आहे व विभागीय कार्यालये कोणकोणत्या ठिकाणी आहेत याबाबत समितीने माहिती देण्यास सांगितले असता डीआरटीमध्ये, जिल्हा कोर्टामध्ये केसेस दाखल केल्या जातात. यासाठी जवळपास ३ ते ४ कोटी रुपये खर्च येतो. विभागीय कार्यालये ही ठाणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, पुणे आणि कोल्हापूर या ठिकाणी असून मुंबईला मुख्यालय आहे असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी केले.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या संदर्भात सविस्तर माहिती देण्याबाबत तसेच मूळ कर्ज किती दिले, किती सबसिडी दिली, व्याजाची रक्कम किती आहे, स्टाफ किती आहे, देणी किती आहेत, कोर्ट केसेसवर किती खर्च किती होतो, पगारावर किती खर्च होतो, पुढे महामंडळाला काय भविष्य आहे कोणत्या विभागाकडे किती रक्कम प्रलंबित आहे याची समितीला खातेनिहाय माहिती सादर करण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती दिली

महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ (महावित्त)

लोकसभेने संमत केलेल्या राज्य वित्तीय महामंडळे कायदा १९५१ अनुसार महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाची (महावित्त) स्थापना झालेली आहे. महाराष्ट्र राज्यात १९६२ पासून व गोवा राज्य आणि दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशात १९६४ पासून महावित्त कार्य करीत आहे.

राज्य वित्तीय महामंडळे कायदा १९५१ मध्ये राज्य वित्तीय महामंडळे (सुधारणा) अधिनियम २००० द्वारे दुरुस्ती करण्यात आली असून ती दिनांक ५.९.२००० पासून अंमलात आणण्यात आली आहे.

कार्य व उद्दिष्ट्ये :

जमीन, इमारत, यंत्रसामग्री व उपकरणे अशा प्रकारची स्थावर मालमत्ता संपादन करण्यासाठी लघु व मध्यम उद्योजकांना आवश्यक असलेल्या मुदत कर्जाची गरज भागविणे हे महावित्तचे मुख्य कार्य आहे. नवीन उद्योग उभारण्यासाठी तसेच अस्तित्वात असलेल्या उद्योगांचा विकास व आधुनिकीकरण यासाठी कर्जे दिली जात होती.

रोजगार निर्मिती व गुंतवणूकीस मिळालेली चालना

महामंडळाने केलेल्या अर्थसहाय्यामुळे २००९-१० या वर्षापर्यंत सुमारे १४.१० लाख लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. तसेच सुरुवातीपासून एकंदर ६६९७ कोटी रुपया एवढ्या गुंतवणूकीस चालना मिळाली आहे. महामंडळाने मागास विकसनशील तसेच विकसित भागात केलेली कर्जमंजूरी खालीलप्रमाणे आहे.

	कर्जमंजूरी संख्या	रुपये लाखात रक्कम
मागास भाग	१७६००	१०५४.२९
विकसनशील भाग	१९४६२	१४२५.९२
विकसित भाग	२१५१०	९५१.१७
एकूण	५८५७२	३४३१.३८

महामंडळाने एकूण केलेल्या रु. ३४३१.३८ कोटी कर्जमंजूरीमध्ये ५४८३२ लघुउद्योगास रु. २५५०.१५ कोटी रुपयाचे कर्जमंजूर केले होते व त्याचे प्रमाण एकूण कर्जमंजूरीच्या तुलनेत सुमारे ७४.३१ टक्के होते. सध्या कर्जमंजूरी बंद करण्यात आली आहे.

कर्ज मंजूरी व कर्ज वितरण

सन २००५-०६ पासून वित्तीय तुटवड्यामुळे नवीन उद्योग घटकांना कर्जमंजूरी व सन २००६-०७ पासून कर्जवितरण पूर्णत: बंद करण्यात आले आहे. २००५-०६ च्या आधीच्या वर्षापर्यंत महामंडळाने रु. ३४३१.३८ कोटी कर्जमंजूरी व रु. २४७४.२७ कोटी कर्जवितरण केले होते.

कर्जवसुली

महामंडळ कर्जमंजूरी बंद केल्यामुळे सध्या फक्त कर्जवसुलीचे काम चालू आहे. महामंडळाने मागील तीन वर्षात कमी आस्थापना खर्चात खालील कर्जवसुली केली आहे.

वर्ष	कर्जवसुली (रु.कोटीत)
२००८-०९	५३.५३
२००९-१०	४५ .३२
२०१०-११	३५.८६
२०११-१२	४३.८०

अनुत्पादित मालमत्तेमधून कर्जवसुली चांगल्याप्रकारे होत असल्याने आधीच्या वर्षात त्या कारणासाठी नफातोटा पत्रकात तरतूद वळती करावी लागत आहे. त्यामुळे महामंडळास २००८-०९ व २००९-१० व २०११-१२ या तीन वर्षात तरतूदीनंतर नफा झाला आहे.

महामंडळाची आर्थिक परिस्थिती व गेल्या वर्षातील नफा /तोटा ह्याविषयी प्रगती खालीलप्रमाणे दिलेली आहे.

महामंडळाच्या वित्तीय स्थितीविषयी माहिती :

(रुपये कोटींमध्ये)

३१ मार्च (वर्ष अखेर)	२००९	२०१०	२०११	२०१२
एकूण उत्पन्न	१४८६.६५	१७३२.५३	१३२३.७८	२२०८.७७
करपूर्व नफा/(तोटा)	२०६८.७७	२८२६.८३	(२५०९.३८)	२१५३.९७
करोत्तर नफा/(तोटा)	२०६८.७७	२८२६.८३	(२५०९.३८)	२१५३.९७

संघटनात्मक रचना :-

राज्यातील मागास भागात उद्योगांच्या विकासासाठी सेवा उपलब्ध करुन देणे व व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करण्याच्या धोरणास अनुसरुन महामंडळाने जवळ जवळ सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी शाखा कार्यालये स्थापन केली होती. सध्या मुख्य कार्यालय वगळता महामंडळाची ६ विभागीय कार्यालये आणि १ शाखा कार्यालय गोवा येथे आहेत.

महामंडळाची विभागीय कार्यालये व त्यांच्या कार्यकक्षेतील जिल्हे यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	विभागीय कार्यालय	जिल्हे
१	मुंबई कोकण, दमण, दीव	बृहन्मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, व केंद्रशासित दमण व दीव
२	नागपूर	नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ
३	औरंगाबाद	औरंगाबाद, बीड, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी व हिंगोली
४	पुणे	पुणे, अहमदनगर व सोलापूर
५	कोल्हापूर	कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग व गोवा
६	नाशिक	नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार

व्याजाच्या दराविषयी माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ज्यावेळी कर्ज दिले गेले त्यावेळी व्याजदर २२ टक्केपर्यंत होता. सन १९९० मध्ये कर्ज दिले गेले

त्यावेळी १८ टक्के, २२ टक्के, २५ टक्के असे व्याजदर होते. तसेच १०० टक्के एनपीए अकाऊंट असल्याचे सांगितले.

कोर्टात काही केसेस विभागाने दाखल केल्या असतील, काही केसेस त्यांनी दाखल केल्या असतील. त्यामध्ये वन टाईम सेटलमेंटचा प्रयोग केला आहे का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, ज्या केसमध्ये शक्य आहे त्या बाबतीत वन टाईम सेटलमेंट करतो. अशा सेटलमेंट खूप कमी असतात. कारण विभागाच्या सेटलमेंटप्रमाणे जी रक्कम होते ती देण्यास लोक तयार होत नाहीत. एकूण ८०० ते १००० केसेस पैकी डीआरटीमध्ये जवळपास २०० केसेस असतील. तसेच एकोणपन्नासाव्या वार्षिक अहवालातील थकबाकीमध्ये मुद्दल १४४८०.८४ असा उल्लेख केला आहे व ही रक्कम लाखात असल्याचा खुलासाही विभागीय प्रतिनिधींनी केला.

याबाबत समितीला तपशीलवार टिप्पणी सादर करावी असे समितीने निदेश दिले तथापि माहिती अप्राप्त आहे.

अभिप्राय व शिफारशी

समितीला प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीच्या अनुषंगाने समितीचे अभिप्राय शिफारशी पुढील प्रमाणे केल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यात सन १९६२ पासून महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाची (महावित्त) स्थापना झालेली आहे. सन २००५-२००६ पासून वित्तीय तुटवड्यामुळे नवीन उद्योग घटकांना कर्जमंजूरी व सन २००६-२००७ पासून कर्जवितरण पूर्णतः बंद करण्यात आले आहे. कर्जवितरण बंद केल्यामुळे सध्या फक्त कर्ज वसुलीचे काम करण्यात येत आहे. विभागाचे एकूण ८२ कर्मचारी असून सन २००९ - २०१० ते २०११-२०१२ या ३ वर्षात रु. १२४ कोटी एवढी वसुली करण्यात आली आहे. प्रतिवर्षी साधारणपणे ४०-५० कोटी वसुली होत आहे तर महामंडळास आस्थापनेवरील खर्चापोटी प्रतिवर्षी रु. १२ ते १३ कोटी खर्च येत आहे. याच कर्मचाऱ्यांपासून वसुलीचे तसेच कोर्ट केसेसचेही काम हाताळण्यात येते. मुद्दलाची वसुली रु. १८० कोटी व त्यामधील येणे व्याज रु. ११०० कोटी आहे.

महामंडळाचे एक मुख्यालय व ६ विभागीय कार्यालये असून विभागीय कार्यालयात प्रत्येकी ५-६ कर्मचारी कार्यरत आहेत. महामंडळाचे जवळपास ९५ टक्के कर्मचारी स्वेच्छानिवृत्त

वा सेवानिवृत्त झालेले आहेत. महामंडळाने कर्ज-वितरण बंद केलेले असल्यामुळे आता फक्त कर्ज वसुलीच करणे बाकी राहिले असल्याने महामंडळाने कर्जवसुली जलद गतीने व विशिष्ट कालमर्यादेत होण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून त्यानुसार जास्तीत जास्त वसुली करण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच कर्जवसुली व कोर्ट केसेस मार्गी लागल्यावर महामंडळाकडे असलेला कर्मचारीवर्ग शासनाच्या इतर विभागांकडे वर्ग करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

महामंडळाने वितरीत केलेल्या कर्जाची वसुली थकीत असल्यामुळे महावित्तने उद्योजकांविरुध्द कोर्टात केसेस दाखल केलेल्या आहेत तर महामंडळाविरुध्द काही केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. या केसेस बरीच वर्षे प्रलंबित असून त्यांचा निकाल लागणे दृष्टीक्षेपास नसल्यास वन टाईम सेटलमेंट करण्याबाबत महावित्तने विचार करावा तसेच महावित्तच्या एकोणपन्नासाव्या वार्षीक अहवालामध्ये थकबाकी म्हणून रु. १४४८०.८४ लाख उल्लेख असल्याने या थकबाकीदारांनी नावे, त्यांच्या थकबाकीचा सद्यस्थिती अहवाल, थकबाकीची वसुली करण्याकरीता केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

परिशिष्ट - अ

परिशिष्ट - ब

मंगळवार, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(४) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.
(५) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(८) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(९) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१०) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(११) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१२) श्री. सुरेश नवले, वि.प.स.
(१३) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

निमंत्रित

(१४) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
२. श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती एम.हिमबिंदू, वरिष्ठ उपमहालेखाकार

वित्त विभाग :

श्री. श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग) विभाग

श्रीमती राधिका रस्तोगी, सचिव, लघू व मध्यम उद्योग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

सार्वजनिक बांधकाम विभाग

१) श्री. एस.के.मुखर्जी, सचिव
२) श्री. बिपीन श्रीमाळी, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

जलसंपदा विभाग, मंत्रालय

श्री.एकनाथ पाटील, प्रधान सचिव,

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ७.३ संदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम व उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग) व प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती सदस्य

(२) श्री. मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(६) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.
(७) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(८) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(९) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.
(१०) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(११) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(१२) श्री. आर.एम. वाणी, वि.स.स.
(१३) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(१४) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.स.स.
(१५) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
(१६) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१७) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१८) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(३) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. सुरेश जगताप, उप महालेखाकार

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

गृह विभाग

१) श्रीमती मेधा गाडगीळ, प्रधान सचिव
२) श्री. सत्यपालसिंह, पोलीस आयुक्त, मुंबई

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

१) श्री. सुमित मलिक, प्रधान सचिव
२) डॉ. संजय मुखर्जी, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.५.२, ५.३ व ५.४ संदर्भात प्रधान सचिव गृह (राज्य उत्पादन शुल्क) व परिच्छेद क्र. ७.२ संदर्भात प्रधान सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.
(५) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(६) श्री. ए.टी. पवार, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(९) श्री. नाना पटोले, वि.स.स.
(१०) श्री. आर.एम. वाणी, वि.स.स.
(११) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१२) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(१३) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१४) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(१५) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
(१६) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१७) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(१८) श्री. विनायक राऊत, वि.प.स.
(१९) श्री. मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के. चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(३) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री.यशवंतकुमार, महालेखाकार (लेखापरीक्षा) नागपूर
श्री. सुरेश जगताप, उप महालेखाकार (लेखापरीक्षा) मुंबई

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

महसूल व वन (महसूल) विभाग :

श्री.स्वाधीन क्षत्रिय, अतिरिक्त मुख्य सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.२ संदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव महसूल व वन (महसूल) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ५.२२ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री. विवेक पंडित, वि.स.स.
(७) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.
(८) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
(९) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१०) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(११) श्री. विनायक राऊत, वि.प.स.
(१२) श्री. मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(२) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

श्री.वि.द. आठवले, उप सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

श्री.संजीव दयाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.७.२ संदर्भात पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई येथे भेट देवून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र यांचे समवेत बैठक घेतली.

बुधवार, दिनांक २३ जानेवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.१० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(५) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(६) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(७) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(८) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय, मुंबई.
श्री.जहांगीर इनामदार, वरिष्ठ महालेखाकार

वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
श्रीकांत देशपांडे,सचिव, वित्त (लेखा व कोषागरे)

साक्षीदार :

जलसंपदा विभाग
श्री.एकनाथ पाटील, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग.

सार्वजनिक बांधकाम विभाग
श्री. एस.के.मुखर्जी, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ७.३ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा व सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ३० जानेवारी, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. मधुकर चव्हाण, वि.स.स.
(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(५) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.
(६) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(९) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(१०) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(११) प्रा. सुरेश नवले, वि.स.स.
(१२) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय, मुंबई.

श्री.सुरेश एस.जगताप, उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग

श्रीकांत देशपांडे, सचिव, (लेखा व कोषागरे),

साक्षीदार :

गृह (राज्य व उत्पादन शुल्क) विभाग

१) श्री.सुमित मलिक, प्रधान सचिव
२) डॉ.संजय मुखर्जी, आयुक्त

वित्त विभाग

१) श्री.के. शिवाजी, प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा)
२) श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) (अति.कार्यभार)
३) श्रीमती राधिका रस्तोगी, सचिव, लघू व मध्यम उद्योग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
४) श्री.संजय भाटिया, विक्रीकर आयुक्त

महसूल व वन (महसूल) विभाग

श्री.स्वाधीन क्षत्रिय, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल)

माहिती व तंत्रज्ञान विभाग

श्री.राजेश अग्रवाल, सचिव, माहिती व तंत्रज्ञान

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.२.२, २.४, २.५, २.७ संदर्भात सचिव, वित्त व परिच्छेद क्र. ५.२, ५.३, ५.४ संदर्भात प्रधान सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक डिसेंबर, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक डिसेंबर, २०१३ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील मिराई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

१. श्री.मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
२. श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
३. श्री.सुनिल केदार, वि.स.स.
४. श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
५. श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
६. श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
७. श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स.
८. श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
९. श्री.बदामराव पंडीत, वि.स.स.
१०. प्रा.राम शिंदे, वि.स.स.
११. श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
१२. श्री.आर.एम. वाणी, वि.स.स.
१३. श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
१४. श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
१५. प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
१६. श्री.विनायक मेटे, वि.प.स.
१७. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

१८. श्री.विनायक राऊत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(४) श्री.यु.के. चव्हाण, अतिरिक्त सचिव
(५) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
(६) श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(७) श्री.कैलास पाझारे, कक्ष अधिकारी

समितीने सोळावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणांसह तो संमत केला.